सांडूनियां एकपण । एका जनार्दना शरण । सुगम साचें आत्मज्ञान । तें भक्तिसाधन हरि सांगे ॥ ७४२ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे एकादशस्कंधे भगवदुद्धवसंवादे परमहंससंहितायां एकाकारटीकायां परमार्थ-निर्णयो नाम अष्टाविंशतितमोऽध्यायः ॥ २८ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

इति श्रीमद्भागवतमहापुराणे एकादशस्कन्धे अष्टाविंशतितमोऽध्यायः ॥ २८ ॥

अध्याय एकोणतिसावा.

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ ॐनमो श्रीगुरुदयार्णव । तुझे कृपेसी नाहीं थांव । कृपेनें तारिसी जीव । जीवभाव सांडवूनी ॥ १ ॥ सांडवूनी देहबुद्धी । निरसोनि जीवोपाधी । भक्त तारिसी भवाब्धीं । कृपानिधि कृपाळुवा ॥ २ ॥ तुझें पाहतां कृपाळूपण । जीवासी जीवें मारिसी पूर्ण । नामा रूपा घालिसी शून्य । जाति-गोत संपूर्ण निर्दळिसी ॥ ३ ॥ निर्दळूनि आपपरां । निसंतान करिसी संसारा । तो तूं जिवलग सोयरा । कृपाळु खरा घडे केवीं ॥ ४ ॥ जेवीं आंधारीं नांदते दृष्टी । भासती नक्षत्रें खद्योतकोटी । ते आंधारेंसीं सूर्य घोंटी । तेवीं तुझी भेटी साधकां ॥ ५ ॥ तुझी जेथ साचार भेटी । तुवां केलिया कृपादृष्टी । संसार-भेदाची त्रिपुटी । त्रिगुणेंसीं सृष्टी दिसेना ॥ ६ ॥ न दाखवूनि गुणादि सृष्टी । दाविसी अद्वय ब्रह्म दृष्टी । त्यासी कदा नव्हे दृष्टीभेटी । भेटीसी तुटी कदा न पडे ॥ ७ ॥ जो कदा न देखिजे दृष्टी । त्यासी केवीं

कथनानें साधक तरून जातील. ४१ एकनाथ आपला एकपणा सोडून जनार्दनाला शरण आहे. आतां श्रीहरि आत्मज्ञान सुगम होण्याचें जें भक्तिरूप साधन तें सांगेल. ७४२.

इति श्रीमद्भागवतपुराणांतील एकादशस्कंधाचा परमहंससंहितेमधला श्रीधर-एकनाथविरचित टीकानुसार विष्णुशर्मकृत सान्वयार्थ-भावार्थासह श्रीकृष्ण-उद्धव-संवादांतील परमार्थ-निर्णय नांवाचा अठ्ठाविसावा अध्याय समाप्त झाला.

ॐनमः । दयासागर श्रीगुरूला नमस्कार असो. तुझ्या कृपेला पार नाहीं. जीवाभावापासून सोडवून तूं कृपेनें जीवाला तारितोस, १ हे कृपानिधे, दयाळू गुरुराया ! तूं जीवाची देहबुद्धि सोडवून त्यांची उपाधि नाहींशी करितोस व भक्तांना संसारसमुद्रांतून तारितोस. २ तुझें कृपाळुत्व मोठें विलक्षण आहे. जीवाला जीवानें मारणारा व नाम-रूपाला शून्य करून त्यांचें जात व गोत यांसह निर्दाळणारा तूं दयाळु खरा ! ३ आप-पर भावनेचा नाश करून तूं संसाराचें निर्मूलन करितोस, तो तूं जीवलग, सोयरा व खरा कृपाळु होशील कसा ! ४ अंधारामध्यें दृष्टीला कोट्यवधि नक्षत्रें व काजवे दिसतात. पण सूर्य त्या अंधाराला जसा नाहींसा करितो, तशी साधकाला तुझी भेट आहे. ५ तुझी जेव्हां खरोखरच भेट होते व तूं जेव्हां कृपादृष्टीनें पहातोस, तेव्हां संसारभेदाची त्रिपुटी व त्रिगुणांसह सृष्टि दिसत नाहीं. ६ गुणादि सृष्टि न दाखवितां तूं दृष्टीला अद्वय ब्रह्म दाखवितोस, त्याला कधीं दृष्टीची भेटच होत नाहीं व भेटींत कधीं अंतरहि पडत नाहीं. ७ ज्याला कधीं दृष्टीनें पाहिलेंच नाहीं, त्याची भेट

होय भेटी । भेटीसी कदा न पडे तुटी । हेही गोष्टी घडे केवीं ॥ ८ ॥ जैसा गर्भ मातेच्या पोटीं । असोनि माउली न देखे दृष्टीं । तरी तिचे भेटींसी नव्हे तुटी । तेवीं तुझे पोटीं साधक ॥ ९ ॥ माता कळवळोनि पाळी तान्हें । शेखीं माउलीतें तें नेणे । तेवीं तुजमाजीं अज्ञानें । तुवां प्रतिपाळणें निजलोभें ॥ १० ॥ जन्मल्या बाळाकारणें । माता वाढवी शहाणपणें । तेवीं तुझेनि निजज्ञानें । सज्ञान होणें साधकीं ॥ ११ ॥ साधकीं लाहतां तुझें ज्ञान । थितें नाठवे मीतूंपण । जीव विसरला जीवजण । अद्वयें पूर्ण परमात्मा ॥ १२ ॥ असोत या बहुता गोष्टी । नव्हतां सद्गुरुकृपादृष्टी । करितां उपायांच्या कोटी । नव्हे भेटी परमार्थी ॥ १३ ॥ जाहालिया सद्गुरुकृपादृष्टी । साधनें उठती उठाउठीं । ब्रह्मानंदें कोंदे सृष्टी । स्वानंदपुष्टी साधकां ॥ १४ ॥ जाहलिया गुरुकृपा प्राप्त । उपनिषदांचा माथितार्थ । साधकांचा चढे हात । कृपा समर्थ श्रीगुरूची ॥ १४ ॥ सद्गुरुकृपा समर्थ । तेणें कृपे श्रीभागवत । वाखाणिलें जी प्राकृत । शुद्ध मथितार्थ सोलींव ॥ १६ ॥ जनार्दनकृपादृष्टीं । माझ्या मराठ्या आरिखा गोष्टी । रिघाल्या एकादशाचे पोटीं । स्वानंदतुष्टी निजबोधें ॥ १७ ॥ संस्कृतप्राकृतपरवडी । सज्ञान सेविती स्वानंदगोडी । गाय काळी आणि तांबडी । परी दुधीं वांकुडी चवी नाहीं ॥ १८ ॥ तेवीं संस्कृतप्राकृतभाखा । ब्रह्मासी पालट नाहीं देखा । अभय अभेदें बदला एका । साह्य निजसखा जनार्दन ॥ १९ ॥ जनार्दनकृपेस्तव जाण । अष्टाविंशाचें निरूपण । गुह्य गंभीर स्वानंदघन । तेंहीं केलें व्याख्यान अतिशुद्ध ॥ २० ॥ तेथें नानाविधा उपपत्ती । निजबोधें साधूनि युक्ती । स्वयें बोलिला श्रीपती । ब्रह्मस्थिति निष्टंक ॥ २१ ॥ ब्रह्म अद्वयत्वें परिपूर्ण । तेथ हेतु मातु अनुमान । न रिघे बुद्धियुक्तीसीं मन । अगम्य जाण सर्वार्थी ॥ २२ ॥ नाहीं दृश्य द्रष्टा दर्शन । नाहीं

कशी होणार ! व भेटींत कधीं अंतर पडत नाहीं, हें तरी कसें घडेल ! ८ मातेच्या उदरांत गर्भ असतो, तिला तो दिसत नाहीं, पण तिच्या व त्याच्या भेटींत कांहीं अंतर पडत नाहीं. तसे साधक तुझ्यापाशीं रहातात. ९ माता मोठ्या कळवळ्यानें तान्ह्या बाळाचें पालन-पोषण करिते, पण तें जसें त्या मातेला ओळखीत नाहीं, त्याप्रमाणें तुझ्यापाशीं अज्ञजन आहेत, त्यांचा तूं स्वतःच प्रेमास्तव सांभाळ करितोस. १० जन्मलेल्या मुलाला माता जशी शहाणपणानें वाढविते, त्याप्रमाणें तुझ्या आत्मज्ञानानें साधक ज्ञानी होतात. ११ साधकाला तुझें ज्ञान प्राप्त झालें कीं, मग त्याला असलेलेंहि 'मी-तूंपण' आठवत नाहीं. जीव अद्वयभावानें पूर्ण परमात्माच असल्यामुळें जीवपणाला विसरतो. १२ हा पाल्हाळ राहो. सद्गुरूची कृपादृष्टि झाल्यावांचून कोट्यवधि उपाय जरी केले, तरी परमार्थाची भेट होत नाहीं. १३ सद्गुरुकृपादृष्टि होतांच साधनें भराभर उठून जातात. सृष्टि ब्रह्मानंदानें भरून जाते व साधकाला स्वानंदपुष्टि मिळते. १४ गुरुकृपा प्राप्त झाली असतां उपनिषदांचा मथितार्थ साधकाच्या हातीं येतो. श्रीगुरूची कृपा (अशी) समर्थ आहे. ११५ सद्गुरुकृपा समर्थ होती, म्हणूनच त्यांच्या कृपेनें श्रीभागवताचा शुद्ध व सरळ मथितार्थ प्राकृतांत मीं वर्णिला. १६ जनार्दनाच्या कृपादृष्टीनेंच माझ्या वेड्या-वाकड्या मराठी गोष्टी स्वानंदाच्या भरांत आत्मज्ञानानें एकादश स्कंधांत शिरल्या. १७ संस्कृत-प्राकृत या दोहोंनील स्वानंदाची गोडी सज्ञान सेवन करोत. गाय तांबडी असो, किंवा काळी असो, तिच्या दुधाची चव जशी सारखीच असते, १८ त्याप्रमाणें संस्कृत भाषा असो किंवा प्राकृत भाषा असो, ब्रह्मामध्यें बदल होत नाहीं. एकनाथ अभेदानें हें निर्भयपणें बोलला, त्याला निजसखा जनार्दन साह्य आहे. १९ श्रीजनार्दनाच्या कृपेनेंच गेल्या अठ्ठाविसाव्या अध्यायाचें निरूपण केलें व त्यांतील गुह्य, गंभीर, स्वानंदघन ब्रह्माचेंहि अति शुद्ध व्याख्यान केलें. २० त्यांत अनेक प्रकाच्या उपपत्तींनीं आत्मज्ञानानें युक्ति-प्रयुक्ति साधून स्वतः श्रीपतीनें निश्चित ब्रह्मस्थिति सांगितली. २१ ब्रह्म अद्वय असल्यामुळें परिपूर्ण आहे. त्यांत हेतु, कथा-वार्ता, अनुमान, बुद्धि, युक्ति, यांसह मन प्रवेश करीत नाहीं. तें सर्व साधनांना अगम्य आहे. २२ त्यांत दृश्य-द्रष्टा-दर्शन; ध्येय-धाता-ध्यान; कर्म-कर्ता-करण; ही त्रिपुटी नाहीं. 'मी-तूंपणा'

ध्येय ध्याता ध्यान । कर्म कर्ता कारण । मीतूंपण असेना ।। २३ ।। युक्तीनें सांडिला प्राण । दृष्टांतीं वाहिली आण । प्रमाणें जाहलीं अप्रमाण । बोधेंसीं क्षीण विवेक जाहला ।। २४ ।। तेथ बोल ना मौन । आकार ना शून्य । गुण आणि निर्गुण । समूळ जाण असेना ।। २५ ।। ऐशी ब्रह्माची निजस्थिती । कृष्णकृपा उद्धवासी प्राप्ती । अबळांसी अगम्य निश्चितीं । जन कैशा रीतीं तरतील ।। २६ ।। ब्रह्मस्थिति अतिदुर्गम । हें उद्धवासी कळलें वर्म । साधकांचें साधावया काम । उपायो सुगम पूसत ।। २७ ।। कृष्ण निजधामा जाईल आतां । मग ब्रह्मप्राप्ति न ये हाता । साधक गुंतती सर्वथा । उपाय तत्त्वतां कोण सांगे ।। २८ ।। एवं साधकांचिया हिता । उद्धव कळवळोनि तत्त्वतां । सुगमप्राप्ती ये हाता । तो उपाय अच्युता पूसत ।। २९ ।। एकुणतिसावा निरूपण । ब्रह्मप्राप्तीचें सुगम समाधान । सप्रेम भगवद्भजन । तें भक्तिलक्षण हरि सांगे ।। ३० ।। सुगम साधनें ब्रह्मप्राप्ती । अबळांसी लाभे जैशा रीतीं । साश्लोकीं देवासी विनंती । उद्धव तदर्थीं करितसे ।। ३१ ।।

उ० उ०–सुदुस्तरामिमां मन्ये योगचर्यामनात्मनः । यथाऽञ्जसा पुमान् सिध्येत्तन्मे ब्रूह्यञ्जसाऽच्युत

पूर्वाध्यायीं ब्रह्मस्थिती । सांगितली जे दुर्गम गती । भोळ्या भाविकां अबळांप्रती । हे ब्रह्मप्राप्ती साधेना ।। ३२ ।। वस्तु व्यक्त ना अव्यक्त । शेवीं प्रकट ना नव्हे गुप्त । न कळे मूर्त कीं अमूर्त । केवीं साधकां तेथ प्रवेशू ।। ३३ ।। जें स्थूल ना सूक्ष्म होये । जें आहे नाहीं शब्द न साहे । जेथ पाहतें पाहणें दोनी जाये । तें साधकां होये केवीं साध्य ।। ३४ ।। जें दिसे तें ब्रह्म म्हणावें । तंव तें माया

नाहीं. २३ युक्तीनें प्राण सोडिला, दृष्टान्तानें शपथ वाहिली व प्रमाणें अप्रमाण झालीं. ज्ञानासह विचार क्षीण झाला. २४ त्यांत बोल व मौन; आकार व शून्य; गुण व निर्गुण हीं समूळ नाहींत, असें जाणावें. २५ अशाप्रकारची ब्रह्मस्थिति श्रीकृष्णकृपेनें उद्धवाला प्राप्त झाली. पण ती ज्ञानादि योगसाधनें करण्यास असमर्थ असलेल्या अज्ञजनांस अगम्य आहे. तेव्हां ते लोक कशा रीतीनें तरतील ! २६ ब्रह्मस्थिति अत्यंत दुर्गम आहे, हें वर्म उद्धवाला कळलें होतें. म्हणून साधकांचें कार्य साधण्यासाठीं त्यानें श्रीकृष्णाला सोपा उपाय विचारिला. २७ आतां कृष्ण निजधामाला जाईल, मग ब्रह्मप्राप्ति हातीं येणार नाहीं व साधक संसारांत सर्वथा गुंतून पडतील; तेव्हां खरा उपाय कोण सांगेल ! २८ याप्रमाणें साधकांच्या हितासाठीं उद्धवानें मोठ्या कळवळ्यानें ब्रह्मप्राप्तीचा सुलभ उपाय श्रीकृष्णाला विचारिला. २९ एकोणतिसाव्या अध्यायांत सप्रेम भगवद्भजन हें ब्रह्मप्राप्तीचें सोपें साधन आहे. त्या भक्तीचें लक्षण श्रीहरि सांगत आहे. ३० ज्यायोगें अज्ञजनांस सोप्या साधनानें ब्रह्मप्राप्ति होईल, तें साधन सांगण्यासाठीं उद्धव पुढील सहा श्लोकांनीं श्रीकृष्णाला विनंति करीत आहे. ३१.

[या एकोणतिसाव्या अध्यायांत पूर्वीं सविस्तर निरूपिलेला जो भक्तियोग तोच भगवान् आपल्या भक्ताला संक्षेपतः सांगत आहेत.]

उद्धवः उवाच–उद्धव म्हणाला–हे अच्युत इमां योगचर्यां अनात्मनः सुदुस्तरां मन्ये–हे अच्युता ! ज्यानें आपल्या चित्ताला स्वाधीन ठेवलेलें नाहीं, त्याला ही योगचर्या अति दुस्तर आहे असें मी समजतों, म्हणून, **पुमान् यथा अञ्जसा सिध्येत् तथा अञ्जसा मे ब्रूहि**–पुरुष ज्याप्रकारें अनायासानें सिद्ध होईल व ज्याप्रकारें मला त्यांचा अनायासानें बोध होईल त्याप्रकारें सांग. १.

तूं गेल्या अध्यायांत जी ब्रह्मस्थिति सांगितलीस, ती अत्यंत दुर्लभ आहे. भोळ्या भाविक अज्ञजनांस ती ब्रह्मप्राप्ति साधणार नाहीं. ३२ परब्रह्म व्यक्त नाहीं व अव्यक्त नाहीं. शेवटीं प्रकट नाहीं व गुप्तहि नाहीं. तें मूर्त आहे. कीं अमूर्त आहे, तेंहि कळत नाहीं. त्यांत साधकाचा प्रवेश कसा व्हावा ! ३३ जें स्थूल नव्हे व सूक्ष्म नव्हे, जें 'आहे' म्हणतां येत नाहीं व 'नाहीं' म्हणतां येत नाहीं. ज्यांत पहाणारें व पहाणें हीं दोन्हीं नाहींशीं होतात, तें साधकाला कसें साध्य व्हावें ! ३४ जें दिसतें तें ब्रह्म असें जर म्हणावें तर तें नांव-रूपानें मायात्मक आहे. बरें; तें

रूपें नांवें । आतां नाहींचि म्हणोनि सांडावें । तेणेंही नाडावें साधकीं ॥ ३५॥ जें आकार ना नव्हे शून्य । जेथें न रिघे ध्येय ध्यान । ज्यासी लाजे ज्ञेय ज्ञान । ज्यातें साधन स्पर्शेना ॥ ३६ ॥ जें न चढे शब्दाचे हात । जें नातुडे मौनाच्या आंत । आंतबाहेर नाहीं जेथ । काय साधकीं तेथ करावें ॥ ३७ ॥ नाहीं आंतबाहेर विचारा । तेथ काय धरावें निर्धारा । जेथ निर्धारूही पुरा । धरावया धीरा धीर नाहीं ॥ ३८ ॥ साधकीं स्थिर करावया मन । कांहीं न दिसे अवलंबन । तेथें अनात्मे अज्ञान जन । त्यांसी दुस्तर जाण हा योगू ॥ ३९ ॥ यापरी निजात्मप्राप्ती । कदा न चढे अबळाहातीं । मज तंव मानलें निश्चितीं । हे आत्मस्थिति दुस्तरू ॥ ४० ॥ ऐशिया ब्रह्माची ब्रह्मप्राप्ती । अज्ञान अप्रयासें पावती । तैशी सुगम साधनस्थिती । सांग श्रीपती कृपाळुवा ॥ ४१ ॥ तुवां निजधामा प्रयाण । मांडिलेंसे अतित्वरेन । एथ तरावया अज्ञान । सुगम साधन सांगिजे ॥ ४२ ॥ म्हणोनि घातलें लोटांगण । धांवोनि धरिले श्रीकृष्णचरण । तुज गेलिया अज्ञान जन । तरावया साधन सुगम सांगें ॥ ४३ ॥ पव्हणियापरीस पायउतारा । स्त्रियां अबळां अतिसोपारा । तैशिया उपायप्रकारा । शार्ङ्गधरा सांगिजो ॥ ४४ ॥ तुझ्या ठायीं सद्भाव पूर्ण । परी नेणती शब्दज्ञान । ऐसे जे अज्ञान जन । तरावया साधन सुगम सांगें ॥ ४५ ॥ मनोनिग्रहो अतिकठिण । साधकां नेमवेना संपूर्ण । तेचि अर्थीचें निरूपण । उद्धव आपण सांगत ॥ ४६ ॥

प्रायशः पुण्डरीकाक्ष युञ्जतो योगिनो मनः । विषीदन्त्यसमाधानान्मनोनिग्रहकर्शिताः ॥ २ ॥

ऐकें कृष्णा कमलनयना । शिणतां साधक साधना । कदा नाकळवे मना । तेही विवंचना अवधारीं ॥ ४७ ॥ निग्रहावया निजमन । साधक साधिती प्राणापान । त्यांसीही छळोनियां मन । जाय निघोन

नाहीं म्हणून सोडून द्यावें, तर साधकांची फसगत होते. ३५ जें साकार नव्हे व शून्यहि नव्हे, जेथें ध्येय व ध्यान यांचा प्रवेश नाहीं. ज्याला ज्ञेय व ज्ञाता लाजतात. ज्याला साधन स्पर्शहि करीत नाहीं, ३६ जें शब्दाचा विषय होत नाहीं, जें मौनाच्या आंत सांपडत नाहीं; ज्यांत आंत-बाहेर नाहीं, तेथें साधकानें काय करावें ! ३७ जें विचाराच्या आंतहि नाहीं व बाहेरहि नाहीं, तेथें निश्चय तरी काय करावा ! जेथें धैर्यवानाला पुरा निश्चय करण्याचाहि धीर होत नाहीं, ३८ जेथें साधकाला मन स्थिर करावयास कांहींच आधार दिसत नाहीं, तेथें आत्मज्ञान न जाणणाऱ्या अज्ञ लोकांना तर हा योग अत्यंत बिकटच आहे. ३९ अशा प्रकारें अज्ञ-जनांस आत्मप्राप्ति केव्हांहि होणार नाहीं. माझें तर ठाम मत आहे कीं, ही आत्मप्राप्ति दुर्गम आहे. ४० हे कृपाळु श्रीपते ! अशा ब्रह्माची अज्ञलोकांना सहज प्राप्ति होईल, असा सोपा उपाय सांग. ४१ तं आतां मोठ्या त्वरेनें निजधामास जावयास निघाला आहेस. यास्तव अज्ञजनांनाच तरून जाण्याचा सोपा उपाय सांग. ४२ असें म्हणून उद्धवानें धांवत जाऊन लोटांगण घातलें व श्रीकृष्णाचे चरण धरून तो बोलला कीं, निजधामाला गेल्यावर अज्ञजनांना तरून जाण्यासारखें सोपें साधन कोण सांगेल ! खोल पाण्यांतून पोहून जाण्यापेक्षां पायउतार बरा. स्त्रिया व दुर्बल जन यांना तो अतिशय सोपा वाटतो. त्यासारखा एखादा सोपा उपाय. हे श्रीकृष्णा ! सांग. ४४ ज्यांचा तुझ्यावर पूर्ण सद्भाव असतो, पण त्यांना ब्रह्मज्ञान कळत नाहीं, असे जे अज्ञजन आहेत, त्यांना तरून जाण्यासाठीं सोपा उपाय सांग. ४५ मनोनिग्रह अत्यंत कठिण आहे, साधकाला मनाचें पूर्ण नियमन करतां येत नाहीं. याचेंच निरूपण उद्धव आतां करीत आहे. ४६

—उद्धव याचीच दुष्करता सविस्तर सांगतो—

पुण्डरीकाक्ष—हे कमलनयना ! मनः युञ्जतः योगिनः प्रायशः असमाधानात् मनोनिग्रहकर्शिताः विषीदन्ति मनाचा निग्रह करणारे, त्याला आपल्या वश करून घेणारे योगी, असमाधानामुळें म्ह० अनिग्रहामुळें मनाचा निग्रह करण्यामध्यें श्रांत होऊन प्रायः क्लेश भोगितात. २.

हे कमलनयना श्रीकृष्णा ! ऐक. साधक साधनांनीं कितीहि प्रयास करीत असला, तरी त्याला मनाचें नियमन करितां येत नाहीं. त्याचेंहि विवेचन करितों, ऐक. ४७ मनोनिग्रह करण्यासाठीं साधक प्राणापान साध्य करितात;

तत्काळ ॥ ४८ ॥ घालूनियां एकांतीं आसन । मनोनिग्रहीं जें सावधान । त्यांसीही ठकूनियां मन । जाय निघोन चपलत्वें ॥ ४९ ॥ मनोनिग्रहीं आम्ही हटी । म्हणोनि रिघाले कपाटीं । त्यांसीहि ठकूनि मन शेवटीं । जाय उठाउठी चपलत्वें ॥ ५० ॥ एक आकळावया मन । त्यजूनि बैसले अन्न । तंव मनें केलें आनेआन । जागृति स्वप्न अन्नमय ॥ ५१ ॥ मनोनिग्रह करितां देख । मन खवळे अधिकाधिक । मनोनेमी सज्ञान लोक । शिणले साधक साधनीं ॥ ५२ ॥ वारा बांधवेल मोटें । अग्नि प्राशवेल अवचटें । समुद्र घोंटवेल घोंटें । मन आत्मनिष्ठे तरी न ये ॥ ५३ ॥ आकाश करवेल चौघडी । महामेरु बांधवेल पुडीं । शून्याची मुरडवेल नरडी । परी या मनाच्या बोढी अनिवार ॥ ५४ ॥ काळ जिंकवेल तत्त्वतां । त्रिभुवनीची लाभेल सत्ता । परी मनोनिग्रहाची वार्ता । तुजवीण अच्युता घडे केवीं ॥ ५५ ॥ तापसां मन तत्काळ छळी । मन नेमस्तांचा नेम टाळी । मन बळियांमाजीं महाबळी । करी रांगोळी धैर्याची ॥ ५६ ॥ मन इंद्रातें तळीं पाडीं । मन ब्रह्मयातें हटेंचि नाडी । ऐशी मनाची बोखटी खोडी । आपल्या प्रौढी नावरे ॥ ५७ ॥ साधनीं साधक शिणतां । मनोजयो न येचि हाता । तुजवांचूनि अच्युता । मन सर्वथा नावरे ॥ ५८ ॥ अत्यंत साधूनि निरवडी । मनोजयो आणितां जोडीं । तंव सिद्धींची दाटे आडाडी । तेणेंही मन नाडी साधकां ॥ ५९ ॥ तुझी कृपा नव्हतां जाण । साधकां कदा नागवे मन । मनोनिग्रहार्थ जाण । तुझे चरणा शरण रिघावें ॥ ६० ॥ तुझी कृपा नव्हतां जाण । साधकां कदा नागवे मन । तूं तुष्टल्या जनार्दन । मनपणा मन स्वयें विसरे ॥ ६१ ॥ सर्वभावें न रिघतां शरण । साधकां कदा नावरे मन । मनोनिग्रहार्थ जाण । तुझे चरणा शरण रिघावें ॥ ६२ ॥

पण मन त्यांनाहि फसवून तत्काल निघून जातें. ४८ जे एकान्तांत आसन घालून मनोनिग्रहांत सावध असतात, त्यांनाहि ठकवून मन चपलपणानें निघून जातें. ४९ कांहीं योगी आम्ही 'मनोनियमन करण्यांत निग्रही आहोंत' असें ह्मणून पर्वताच्या गुहेंत जाऊन बसतात; पण मन चपल असल्यामुळें त्यांनाहि ठकवून तत्काल निघून जातें. ५० कोणी मनाला स्वाधीन ठेवण्यासाठीं अन्न सोडून बसले, पण मनानें त्यांस जागेपणीं व स्वप्नांत अन्नाचाच ध्यास लावून ठेविला. ५१ याप्रमाणें मनोनिग्रह करूं लागल्यास मन अधिक अधिकच खवळतें. मनाचें नियमन करण्यांत सज्ञान साधकहि थकले. ५२ कदाचित् वाऱ्याचीहि मोट बांधितां येईल, अग्नि सहज प्राशन करितां येईल, समुद्र एका घोटांत प्राशन करितां येईल; पण मन केव्हांहि आत्मनिष्ठ होणार नाहीं. ५३ आकाशाची चौघडी करितां येईल, महामेरूची पुडी बांधितां येईल, शून्याची मान मुरगळतां येईल, पण हें मन ताब्यांत ठेवणें अति दुष्कर आहे. ५४ काळाला पूर्णपणें जिंकितां येईल, त्रिभुवनाची सत्ता प्राप्त होईल, पण हे अच्युता! तुझ्यावांचून मनोनिग्रह साध्य होणें शक्य नाहीं. ५५ मन तपस्वी जनास तत्काल फसवितें. तें नियमित वागणारांचा नेम मोडितें. मन बलाढ्यांतहि बलाढ्य आहे. तें धैर्याची राखरांगोळी करितें. ५६ मन इंद्राला खालीं पाडितें, ब्रह्मदेवाला हटानें नाडितें. असें हें मन मोठें खोडकर आहे. त्याला साधक स्वतःच्या प्रौढीनें आवरूं शकत नाहीं. ५७ साधक साधनें आचरून थकला तरी मनोजय त्याच्या हातीं येत नाहीं. हे श्रीहरे! तुझ्यावांचून मन सर्वथा आवरत नाहीं. ५८ अतिशय सावधपणानें मनोजय साधला, तर सिद्धींची गर्दी जमते व त्यानेंहि मन साधकाला छळूं लागतें. ५९ तुझ्या कृपेवांचून मन साधकाच्या हातीं केव्हांहि सांपडत नाहीं, म्हणून मनोनिग्रहासाठीं अगोदर तुझ्या चरणांना शरण निघावें. ६० तुझी कृपा नसल्यास मन कदापि वश होत नाहीं. तूं जनार्दन संतुष्ट झालास कीं, मन स्वतःच आपलें मनपण विसरतें. ६१ भक्तिभावानें शरण गेल्यावांचून साधकाला मन कदापि आवरतां येत नाहीं. यास्तव मनोनिग्रहासाठीं तुझ्या चरणांना शरण निघावें. ६२.

अथात आनन्ददुघं पदाम्बुजं हंसाः श्रयेरन्नरविन्दलोचन ।
सुखं नु विश्वेश्वर योगकर्मभिस्त्वन्माययाऽमी विहता न मानिनः ॥ ३ ॥

कमलापति कमलवदना । कमलालया कमलनयना । नाभिकमळीं कमलासना । तुवां ब्रह्मज्ञाना अर्पिलें ॥ ६३ ॥ त्या तुझ्या चरणींचें चरणामृत । तुझ्या कृपा ज्यास होय प्राप्त । मनोजय त्याचा होय अंकित । तो होय विरक्त भवभावा ॥ ६४ ॥ तुझ्या चरणामृताची गोडी । मनोजयातें तत्काळ जोडी । आधिव्याधिभवपाश तोडी । स्वानंदकोडी साधकां ॥६५॥ सकळ साधनांचें निजसार । सांख्ययोगविवेक सधर । त्या साराचेंहि निजसार । तुझी भक्ति साचार श्रीकृष्णा ॥ ६६ ॥ जाणोनि भक्तीचें रहस्य । हृदयप्रेमा लोधलें मानस । तेंचि विज्ञान राजहंस । भजनसारांश सेविती ॥ ६७ ॥ काया वाचा आणि मन । सद्भावें सदा संपन्न । ऐशिया भक्तां तुझे चरण । स्वानंदें पूर्ण दुभती ॥ ६८ ॥ धर्मअर्थकाममोक्षांसी । साङ्ग साधनें सिद्धी त्यांसी । विकळ जाहलिया साधनांसी । ये साधकांसी अपावो ॥ ६९ ॥ तैशी तंव तुझी भक्ति नव्हे । तुज भजतां जीवेंभावें । भजकां विघ्न कदा न पवे । शेखीं भक्त नागवे विघ्नांसी ॥ ७० ॥ जें सूर्य आणि खद्योतासी । भेटी होय सावकाशीं । तरी विघ्नें भक्तांपाशीं । धीरु यावयासी न धरिती ॥ ७१ ॥ पडतां पंचाननाची घाणी । होय मदगजभंगाणी । तेवीं तुझ्या भावार्थभजनीं । होय धूळधाणी विघ्नांची ॥ ७२ ॥ येणें निश्चयें निजसंपन्न । तुझ्या चरणीं अनन्य शरण । त्यांसी नातळे जन्ममरण । मा इतर विघ्न तें कैंचें

—ज्याअर्थी कित्येक असे क्लेश भोगितात त्याअर्थी—

अथ अतः—यास्तव, (ये) हंसाः—जे सारासार विवेक करण्यामध्यें चतुर असतात ते, आनंददुघं पदाम्बुजं सुखं नु श्रयेरन्—सर्व आनंदाची पूर्ति करणाऱ्या तुझ्या चरणकमलाचेंच अनायासानें निश्चित सेवन करितात. अरविंदलोचन विश्वेश्वर—हे कमलनयना, विश्वेश्वरा ! अमी त्वन्मायया विहताः योगकर्मभिः मानिनः न (श्रयेरन्)—पण जे तुझ्या मायेनें विवेकहीन होतात ते योगानुष्ठानानें अभिमानी होऊन तुझ्या चरणकमलाचा आश्रय करीत नाहींत. [किंवा हे तुझे भक्त तुझ्या मायेनें प्रतिबद्ध झालेले नसतात. त्यामुळें योगकर्मांनीं ते मानी होत नाहींत; पण जे तुझे भक्त नसतात ते तुझ्या मायेनें मोहित होऊन ते ' आम्ही योगज्ञ व कर्मकुशल आहोंत ' अशा अभिमानानें बद्ध होतात, मुक्त होत नाहींत.] ३.

हे कमलापते, कमलवदना, कमलनिवासा, कमलनयना, श्रीकृष्णा ! तुझ्या नाभिकमलांतील कमलासनावर बसणाऱ्या ब्रह्मदेवाला तूंच ब्रह्मज्ञान अर्पण केलेंस. ६३ त्या तुझ्या चरणांचें चरणामृत तुझ्या कृपेनें ज्यांस प्राप्त होतें, त्यांचा मनोजय अंकित होतो व ते भक्त प्रपंचसुखाविषयीं विरक्त होतात. ६४ तुझ्या चरणामृताची गोडी मनोजयाला तत्काल जोडते. साधकांच्या आधि-व्याधि व भवपाश यांना नाहींसें करिते व त्याला स्वानंदाच्या राशी प्राप्त करून देते. ६५ हे श्रीकृष्णा ! सगळ्या साधनांचेंहि सार असा जो दृढ सांख्ययोगविवेक त्याचेंहि सार अशी तुझी भक्ति आहे. (सर्व साधनांत श्रेष्ठ असलेल्या ज्ञानयोगाहूनहि तुझी भक्ति अधिक श्रेष्ठ आहे.) ६६ भक्तीचें रहस्य जाणून ज्यांचें मन हृदयांतील प्रेमाकडे वेधतें, तेच विज्ञानयुक्त राजहंस भजनसारांश सेवितात. ६७ जे काया-वाचा-मनानें सर्वदा सद्भावानें युक्त असतात, त्या भक्तांना तुझे चरण पूर्ण स्वानंदानें फलद्रूप होतात. ६८ धर्म-अर्थ-काम-मोक्ष हे सांग साधनानेंच साध्य होतात; पण त्या साधनांत थोडेसें जरी चुकलें, तरी साधकाला अपाय होतो. ६९ परंतु तुझी भक्ति तशी नाहीं. जीवाभावानें तुझें भजन केलें असतां भक्तावर कदापि विघ्न येत नाहीं. ७० उलट भक्तच विघ्नाला नागवितो. सूर्य व काजवा यांची जर सावकाश भेट होईल, तर विघ्नें भक्तापाशीं येण्याचें धाडस करतील. ७१ सिंहाचा नुसता वास येतांच मत्त हत्ती जसा पळत सुटतो, तशी तुझ्या भावार्थभजनानें विघ्नांची धुळधाण होते. ७२ अशा निश्चयानें संपन्न होऊन तुझ्या चरणांना अनन्य शरण येणारांस जन्म-मरण स्पर्शहि करीत नाहीं; मग इतर विघ्नें कोठून येणार ! ७३ कामधेनु जशी आपल्या वासराला तृप्त करिते,

॥ ७३ ॥ येणें भावें जे अनन्यशरण । त्यांसी तुझे निजचरण । स्वानंदें सदा करिती पूर्ण । जेवीं कामधेनु जाण निजवत्सा ॥ ७४ ॥ भक्तिसरोवरीं निर्मळ । नवविध रसें रसिक जळ । तेथ तुझें चरणकमळ । विकासत केवळ भावार्थसूर्यें ॥ ७५ ॥ तेथ स्वानुभवैकभ्रमर । झेंपावोनियां अरुवार । कुचंबों नेदितां केसर । आमोदसुखसार सेविती ॥ ॥ ७६ ॥ तेथ विवेकी परमहंस । ते सरोवरींचे राजहंस । चरणकमळीं करूनि वास । आमोद सुरस सेविती ॥ ७७ ॥ हो कां आर्त जिज्ञासु अर्थार्थी । हेही ते सरोवरीं असती । परी कमळामोद नेणती । ते क्रीडती कमळातळीं ॥ ७८ ॥ ऐसिया भोळ्या भक्तांसी । तूं तारिसी हृषीकेशी । एवं जे जे लागले भक्तीसी । अपावो त्यांसी असेना ॥ ७९ ॥ भावें करितां तुझें भजन । तूं भावार्थें होसी प्रसन्न । तुझ्या प्रसन्नता तुझे चरण । स्वानंदें पूर्ण वर्षत ॥ ८० ॥ तूं विश्वमूर्ति विश्वेश्वरू । तूं ब्रह्मादिकांचा ईश्वरू । तुझा जाहलिया अभय करू । भक्तां भवपारू स्पर्शेना ॥ ८१ ॥ तुझी भक्ति तें त्यांचें सत्कर्म । तुझा भाव तो त्यांचा स्वधर्म । तुज नैवेद्य अर्पणें उत्तम । तोचि याग परम भक्तांचा ॥ ८२ ॥ नित्य स्मरणें तुझें नाम । हाचि भक्तांचा जपसंभ्रम । तुझें कीर्तन मनोरम । ते समाधि परम भक्तांची ॥ ८३ ॥ एवं भक्त करिती जें जें कर्म । तें तें तूं होसी पुरुषोत्तम । ज्यासी तूं तुष्टसी मेघश्याम । त्यासी भवभ्रम स्पर्शेना ॥ ८४ ॥ यापरी भजनमुखें । भक्त तारिसी निजात्मसुखें । तेणें सुखाचेनि हरिखें । अतिसंतोखें डुल्लत ॥ ८५ ॥ एवं अनपेक्षित भक्तजन । तूं निजसुखें करिसी पूर्ण । तुज न रिघती जे शरण । ते मायेनें जाण मोहिले ॥ ८६ ॥ जे तुझ्या चरणांसी विमुख । ते स्वप्नींही न देखती सुख । चढतेंवाढतें भोगिती दुःख । मायेनें मूर्ख ते केले ॥ ८७ ॥ त्यजूनि तुझें चरणध्यान । करितां योगयागक्रिया दान । तें तें साधकां होय बंधन । खवळे अभिमान ज्ञातृत्वें ॥ ८८ ॥

त्याप्रमाणें भक्तिभावानें शरण येणारांस तुझे चरण निरंतर स्वानंदानें परिपूर्ण करितात. ७४ भक्तिरूपी निर्मल सरोवरांत नवविध रसांचें रसिक जल आहे, भावार्थ सूर्याचा उदय होतांच त्यांतील तुझें चरणकमल विकसित होतें. ७५ आत्मानुभवरूपी भ्रमर त्यांतील केसर चुरडूं न देतां हळूच त्यावर झेंपा टाकितात आणि स्वानंदाचें सुख सेवितात. ७६ विवेकी परमहंस हेच त्या सरोवरांतील राजहंस होत. ते तुझ्या चरणकमलांजवळ राहून सुरस मकरंद सेवितात. ७७ त्या सरोवरांत आर्त, जिज्ञासु व अर्थार्थी हेहि असतात; पण ते हा कमलांतील आमोद जाणत नाहींत. ते कमलाच्या खालीं क्रीडा करीत असतात. ७८ हे श्रीकृष्णा ! अशा भोळ्या भक्तांना तूं तारितोस. अशा-प्रकारें जे जे तुझी भक्ति करितात, त्यांचा नाश कदापि होत नाहीं. ७९ श्रद्धेनें तुझें भजन केलें असतां तूं भावार्थामुळें प्रसन्न होतोस व तुझ्या प्रसन्नतेमुळें तुझे चरण स्वानंदाचा परिपूर्ण वर्षाव करितात. ८० तूं विश्वमूर्ति विश्वेश्वर आहेस. तूं ब्रह्मदेवादिकांचा ईश्वर आहेस. तुझा अभय हस्त प्राप्त झाला असतां भक्तांना भवभार स्पर्शहि करीत नाहीं. ८१ तुझी भक्ति हेंच त्यांचें सत्कर्म; तुझा भाव हाच त्यांचा स्वधर्म; तुला उत्तम नैवेद्य अर्पण करणें हाहि भक्तांचा श्रेष्ठ यज्ञच आहे. ८२ नित्य तुझें नामस्मरण करणें, हाच भक्तांचा जप व तुझें मनोरम कीर्तन हीच भक्तांची समाधि होय. ८३ याप्रमाणें भक्त जें जें कर्म करितो, तें तें तूं पुरुषोत्तम स्वतःच होतोस. तूं मेघश्याम ज्यांवर संतुष्ट होतोस, त्यांस भवभ्रम स्पर्शहि करीत नाहीं. ८४ याप्रमाणें भजनद्वारां आत्मसुख देऊन तूं भक्तांना तारितोस आणि त्यांच्या सुखाच्या आनंदानें तूं अत्यंत संतोषानें डुलत असतोस. ८५ याप्रमाणें निरपेक्ष भक्तजनांना तूं आत्मसुखानें पूर्ण करितोस. तुला जे शरण येत नाहींत, ते मायेनें मोहित झाले आहेत, असें जाणावें. ८६ जे तुझ्या चरणांना विमुख होतात त्यांना स्वप्नांतहि सुख दिसत नाहीं. ते चढतें-वाढतें दुःख भोगीत असतात. इतके ते मायेनें मूर्ख होतात. ८७ तुझ्या चरणांचें ध्यान सोडून योग, यज्ञ, दान इत्यादि जीं साधनें आचरितात, तीं साधकाला बंधक होतात व त्यामुळें त्यांचा ज्ञानाभिमान खवळतो. ८८.

पूर्वश्लोकाचा चरण। 'त्वन्मायया ऽमी विहता न मानिनः'

हाचि श्लोकींचा अंतील चरण। उपक्रमोनियां आपण। पंडितांचा ज्ञानाभिमान। अभक्तपण प्रकाशी ॥ ८९ ॥ आम्ही ज्ञाते आम्ही योगी। आम्ही प्रवर्तक कर्ममार्गी। आम्ही श्रोत्रिय पवित्र जगीं। आमुची मार्गी अतिशुद्ध ॥ ९० ॥ लोक केवळ अज्ञान। तैसे आम्ही नव्हों आपण। आमचें वचन प्रमाण। सर्वार्थी जाण सर्वांशीं ॥ ९१ ॥ आम्ही ज्ञाते हें मानूनि दृढ। ज्ञानाभिमानें केले मूढ। पांडित्यें होऊनि गर्वारूढ। दुःख दुर्वाड भोगिती ॥ ९२ ॥ अभिमानाऐसा वैरी। आन नाहीं संसारीं। तो हा ज्ञानाभिमानेंकरीं। घाली दुस्तरीं सज्ञाना ॥ ९३ ॥ असो हे अभक्तांची कथा। जे चुकले भक्तिपंथा। यालागीं नाना परींची व्यथा। देहअहंता सोसिती ॥ ९४ ॥ जिहीं भक्तीसी विकूनि चित्त। जाहले अनन्यशरणागत। त्यांसी तारिता तूं जगन्नाथ। निजसुखें निजभक्त नांदविसी ॥ ९५ ॥ तुझे जे कां भक्तजन। जिहीं भक्तीसी विकिला प्राण। त्यांसी न मागतां ब्रह्मज्ञान। सहजें जाण ठसावे ॥ ९६ ॥ तुझें करितां निजभजन। भक्तांसी कदा न बाधी विघ्न। सुखें होती सुखसंपन्न। हेंचि नवल कोण गोविंदा ॥ ९७ ॥ जे तुज अनन्यशरण। तूं सर्वदा त्यांअधीन। तेचि अर्थीचें निरूपण। उद्धव आपण सांगत ॥ ९८ ॥

किं चित्रमच्युत तवैतदशेषबन्धो दासेष्वनन्यशरणेषु यदात्मसात्त्वम्।
यो रोचयन् सहमृगैः स्वयमीश्वराणां श्रीमत्किरीटतटपीडितपादपीठः ॥ ४ ॥

मूळ श्लोकांतील 'त्वन्मायया ऽमी विहता० म्ह० तुझ्या मायेनें विवेकशून्य झालेले लोक ज्ञानाभिमानानें तुझ्या चरणांचा आश्रय करीत नाहींत' या शेवटल्या चरणाचा अर्थ पाहूं गेल्यास पंडितांचा ज्ञानाभिमान व अभक्तपणा व्यक्त होतो. ८९ 'आम्ही ज्ञाते, आम्ही योगी, आम्ही कर्ममार्गाचे प्रवर्तक, आम्ही जगांत पवित्र श्रोत्रिय आहोंत. आमचा मार्ग अत्यंत शुद्ध आहे. ९० लोक केवळ अज्ञ असतात, तसे आम्ही नाहीं. आमचें वचन सर्वांना सर्वथा प्रमाण आहे.' ९१ त्यांना 'आम्ही ज्ञाते' या दृढ समजुतीनें ज्ञानाभिमानानें मूढ केलें आहे. ते आपल्या पांडित्यामुळें अत्यंत गर्विष्ठ होतात व अनिवार्य दुःख भोगितात. ९२ अभिमानासारखा संसारांत दुसरा वैरी नाहीं. तो ज्ञानाभिमानाच्या हातीं सज्ञान लोकांनाहि दुस्तर अनर्थांत टाकितो. ९३ ही अभक्तांची गोष्ट राहो. पण जे तुझ्या भक्तिमार्गाला चुकतात, ते नानाप्रकारच्या व्यथा व देहअहंता सोशितात. ९४ भक्तीला आपलें चित्त विकून जे तुला अनन्य शरण झाले, त्यांना तूं जगन्नाथ तारितोस व आपल्या भक्ताना आत्मसुखांत ठेवितोस. ९५ तुझ्या ज्या भक्तांनीं भक्तीला आपला प्राण विकला आहे त्यांनीं न मागतांच त्यांच्या चित्तांत ब्रह्मज्ञान ठसतें. ९६ तुझें भजन केलें असतां भक्तांना विघ्न कदापि बाधत नाहीं. हे गोविंदा! ते सहज सुखसंपन्न होतात हें केवढें आश्चर्य! ९७ जे तुला अनन्य शरण येतात, त्यांच्या तूं सर्वदा अधीन होतोस. उद्धव आतां याविषयींचेंच निरूपण करीत आहे. ९८.

—पण तुझे भक्त तुझ्या प्रसादानें कृतार्थ होतात, यांत कांहीं आश्चर्य नाहीं, असें उद्धव सांगतो :—

अच्युत, अशेषबन्धो! अनन्यशरणेषु दासेषु यत् तव आत्मसात्त्वं तत् किं चित्रं—अच्युता, हे सर्वबंधो, अनन्यशरण झालेल्या भक्तांच्या ठिकाणीं तुझें जें स्वाधीनत्व (जसें नंद, गोपी, बलि इत्यादिकांच्या ठिकाणीं,) तें काय आश्चर्य आहे! (नाहीं. कारण—) यः स्वयं ईश्वराणां श्रीमत्किरीटतटपीडितपादपीठः मृगैः सह अरोचयत्—जो स्वतः ईश्वरांचाहि वंदनीय ईश्वर तो तूं श्रीरामरूपानें वानरांशीं मोठ्या प्रीतीनें सख्य करिता झालास. ['ईश्वराणां श्रीमत्किरीटतटपीडितपादपीठः' ब्रह्मादि ईश्वरांचे जे अत्यंत शोभायुक्त किरीट, त्यांच्या अग्रांनीं ज्याचें पाय ठेवण्याचें पीठ घासलें आहे, असा स्वतः तूं ईश्वरांचाहि ईश्वर.] ४.

विघ्न न बाधी तुझ्या भक्तांसी । हें नवल नव्हे हृषीकेशी । तूं भुलोनि भक्तप्रेमासीं । भक्ताधीन होसी सर्वदा ॥ ९९ ॥ होऊनि निजदासाअधीन । मध्यरात्रीं पुरविसी अन्न । शेखीं तुज न मिळे भोजन । भुकेल्या पान भाजीचें ॥ १०० ॥ उभय सेनेचे देव्हडीं । शस्त्रें सुटतां अतिकडाडीं । तेथ सोशिसी रथाची वोढी । शेखीं रथींचीं घोडीं तूं धुशी ॥ १ ॥ तुझा मुकुट नाकळे वेदांसी । तेथ भक्तांचा चाबूक खोंविसी । देखतां सकळिकां रायांसी । रणीं घोडे धुसी निजांगें ॥ २ ॥ वागोरे धरोनि दांतीं । चारी घोडे चहूं हातीं । धुतां न लाजसी श्रीपती । भक्ताधीन निश्चितीं तूं ऐसा ॥ ३ ॥ बंदीचा सोडविला ज्यासी । तो उग्रसेन स्वामी करिसी । उच्छिष्टें धर्मांघरींचीं काढिसी । शेखीं गायी राखिसी नंदाच्या ॥ ४ ॥ असो ते थोरांची थोर मात । तूंचि मिळोनि गोपाळांत । उभाउभ्यां खासी त्यांचा भात । छंदें नाचत त्यांचेनी ॥ ५ ॥ न म्हणसी सोवळें ओवळें । प्रत्यक्ष केवळ गोवळे । त्यांचेनि उच्छिष्टकवळें । स्वानंदमेळें डुल्लसी ॥ ६ ॥ द्रौपदीचिये अतिसांकडीं । नेसतीं जाहलासी तूं लुगडीं । गोपिकांचिया निजआवडीं । तूं कडोविकडीं नाचसी ॥ ७ ॥ पूर्णकलश नेतां पाहीं । कांटा मोडला गोपीचे पायीं । तो पाय धरूनि हातीं दोहीं । तूं कांटा लवलाहीं फेडिसी ॥ ८ ॥ खांदीं वाहिलें दुर्वासासी । द्वारपाळ तूं बळीपाशीं । ऐसा भक्ताधीन तूं होसी । वचनें वर्तसी दासांच्या ॥९॥ देवा तूं ऐसें म्हणसी । गोवळत्व सत्यत्वें मानिसी । तें तुज न घडे हृषीकेशी । तूं पूज्य होसी सुरनरां ॥ ११० ॥

पूर्व श्लोकींचें पद । 'श्रीमत्किरीटतटपीडितपादपीठः'

इंद्र चंद्र आणि महेंद्र । ब्रह्मा बृहस्पति आणि शंकर । ऐसे पूज्य जे कां ईश्वर । तेही तुझे किंकर श्रीकृष्णा ॥ ११ ॥ तुझे आसनाचे पादपीठीं । यांच्या मुकुटमणियांच्या कोटी । घर्षणीं झणत्कार उठी । नमस्कारीं दाटी सुरवरां ॥ १२ ॥ तुझी आज्ञा न मानितां । ब्रह्मादिकांचिया माथां । साटू वाजे जी सर्वथा ।

हे श्रीकृष्णा ! तुझ्या भक्तांना विघ्नें बाधत नाहींत, यांत नवल नाहीं. कारण तूं भक्तिप्रेमाला भुलून सर्वस्वीं भक्तांच्या अधीन होतोस. ९९ तूं आपल्या दासांच्या अधीन होऊन दुर्वासाला मध्यरात्रीं द्रौपदीच्या हातीं अन्न पुरविलेंस. शेवटीं तुला भोजन मिळालें नाहीं; तेव्हां एका भाजीच्या पानानें भूक शांत केलीस. १०० दोन्ही सैन्यांच्या मध्यें, शस्त्रांच्या खणखणाटांत तूं रथावर बसून अर्जुनाचें सारथ्य केलेंस व शेवटीं त्याचीं घोडीं धुतलींस १ व तुझा जो मुकुट देवानांहि अगम्य, त्यांत तूं चाबुक खोवून ठेविलास. २ दातांत लगाम धरून चार हातांनीं चार घोडे धुण्यांत तूं लाज धरिली नाहींस. हे श्रीपते ! असा तूं भक्तांच्या अधीन आहेस. ३ तूं उग्रसेनाला कारागृहांतून सोडवून राजा केलेंस. धर्मराजाच्या घरीं यज्ञांत ब्राह्मणांची उष्टीं काढिलींस व शेवटीं नंदाच्या गायी राखिल्यास. ४ या थोरांच्या थोर गोष्टी राहोत. तूं बाळ-गोपाळांत मिसळून उभ्यानेंच त्यांचा भात खाल्लास व त्यांच्या छंदानें नाचलास. ५ सोंवळें ओंवळें म्हटलें नाहींस. जे प्रत्यक्ष गवळी, त्यांच्या उष्ट्या घांसानें स्वानंदांत डुलत राहिलास. ६ द्रौपदीच्या संकटप्रसंगीं तूं तिची नेसतीं लुगडीं झालास. गोपिकांच्या आवडीमुळें तूं त्यांच्या बरोबर नानापरीनें नाचलास. ७ एकदां पाण्यानें कांठोंकांठ भरलेली घागर नेत असतां एका गोपीच्या पायांत कांटा मोडला; तेव्हां तूं आपल्या दोन्हीं हातांनीं तिचा पाय धरून तत्काळ तो काढून टाकिलास. ८ दुर्वासऋषीला तूं खांद्यावरून वाहून नेलेंस. बळीचा द्वारपाळ झालास. असा तूं भक्तांच्या अधीन होतोस व दासांच्या वचनांत रहातोस. ९ हे श्रीकृष्णा ! तूं स्वतःला गौळी म्हणवितोस व तें सत्य मानितोस; पण तें घडणें केव्हांहि शक्य नाहीं. कारण तूं देवादिकांनाहि पूज्य आहेस. ११०.

(मूळ श्लोकांतील श्रीमत्किरीट० या पदाचा अर्थ–) हे श्रीकृष्णा ! इंद्र, चंद्र, महेंद्र, ब्रह्मदेव, बृहस्पति आणि शंकर हे जे पूज्य ईश्वर तेहि तुझे किंकरच आहेत. ११ नमस्कार करिते वेळीं तुझ्या सिंहासनाच्या पाय ठेवण्याच्या पायरीवर यांच्या कोट्यवधि मुकुटांचें घर्षण होऊन त्यांचा झणत्कार होतो. तुला वंदन करण्यास श्रेष्ठ देवांची इतकी गर्दी जमते. १२ तुझी आज्ञा अमान्य केल्यास ब्रह्मदेवादिकांच्याहि मस्तकावर चाबुक बसतो. मग इतरांची काय कथा ! १३ तुझ्या आज्ञेच्या भीतीनें वायु प्राणाला नियमानें वागवितो. हे गोविंदा, तुझ्या आज्ञाभयानें

मा इतरांची कथा ते कोण ।। १३ ।। तुझे आज्ञेभेणें जाण । वायु वागवी नेमस्त प्राण । सूर्य चालवी दिनमान । तुझे आज्ञेभेणें गोविंदा ।। १४ ।। तुझे आज्ञेचे भयभागीं । समुद्र मर्यादा नुल्लंघी । तुझ्या आज्ञेच्या नियोगीं । वर्षिजे मेघीं जळ काळीं ।। १५ ।। तुझे आज्ञेची अगाध थोरी । स्वयें मृत्यु बंदी शिरीं । तोही स्वकाळीं प्रळयो करी । आज्ञेबाहेरी कदा न निघे ।। १६ ।। आशंका ।। मी तंव नंदाचा खिल्लारी । उग्रसेनाची सेवा करीं । माझी हे एवढी थोरी । मिथ्या मुरारी म्हणशील ।। १७ ।। तुवां पाडूनि काळाचे दांत । गुरुपुत्र आणिला एथ । इंद्र केला मानहत । गोकुळीं अद्भुत वर्षतां ।। १८ ।। इतरांची गोठी कायशी । होऊनि वत्सें वत्सपांसीं । वेड लाविलें विधात्यासी । शेखीं गोवळ होसी नंदाचा ।। १९ ।। बाणकैवारालागूनी । शिव आला अतिकोपोनी । तो त्वां जिंकिला अर्धक्षणीं । शार्ङ्गपाणी ईश्वरेश्वरा ।। १२० ।। तुझी भेटी घ्यावयाकारणें । उत्कंठा वाहिजे नारायणें । ब्राह्मणअपत्यद्वारा तेणें । तुझी भेटी वांछिणें सर्वदा ।। २१ ।। तूं भक्तकाजपंचानन । सत्य करावया अर्जुन । क्षीरसागरीं रिघोनि जाण । कृष्णनारायण भेटले ।। २२ ।। दोहींचें भेटींची परवडी । संत जाणती निजआवडीं । दोघां मिठी पडली गाढी । निजात्मगोडी अभिन्न ।। २३ ।। कृष्णीं विराला नारायण । कीं नारायणामाजीं श्रीकृष्ण । दोघां नाहीं दोनीपण । स्वरूप परिपूर्ण एकत्वें ।। २४ ।। तेथ अर्जुनासी जाहली व्यथा । थित्या अंतरलों कृष्णनाथा । तंव शेषशयनीं होय देखता । नारायणता श्रीकृष्णीं ।। २५ ।। तो तूं भक्तकाजकैवारी । लीलाविग्रही अवतारधारी । अवतार धरिसी नानापरी । दीनोद्धारी श्रीकृष्णा ।। २६ ।। यापरी गा हृषीकेशी । अगाध महिमा तुझेपाशीं । येचि अवतारीं आम्हांसी । प्रतीतीसी पैं आलें ।। २७ ।। अखंड ईश्वराची स्थिती । अनावृत्त ज्ञानस्फूर्ती । अद्वयानंदा नाहीं च्युती । अच्युत

सूर्य दिनमान चालवितो. १४ तुझ्या आज्ञेच्या धाकानेंच समुद्र आपल्या मर्यादेचें उल्लंघन करीत नाहीं. तुझ्या आज्ञेनें मेघ पावसाळ्यांत वृष्टि करितो. १५ असा तुझ्या आज्ञेचा महिमा अगाध आहे. स्वतः मृत्यु ती शिरसावंद्य मानितो व योग्यकालीं प्रलय करितो. तुझ्या आज्ञेबाहेर कोणीहि जात नाहीं. १६ (आशंका–) हे मुरारे ! तूं म्हणशील कीं, मी तर नंदाचा गुराखी. उग्रसेनाची सेवा करणारा. माझी एवढी थोरवी मिथ्या आहे. १७ (तर तसें नाहीं.) तूं काळाचें दांत पाडून गुरुपुत्राला परत आणिलेंस. गोकुळांत अद्भुत वृष्टि झाली असतां तूं इंद्राला गर्वहीन केलेंस. १८ इतरांच्या गोष्टी कशाला ! गोपाळांसह वत्सें होऊन तूं ब्रह्मदेवालाहि वेड लाविलेंस व शेवटीं नंदाचा गुराखी झालास. १९ हे ईश्वरेश्वरा, श्रीकृष्णा ! शंकर बाणासुराचा कैवार घेऊन अतिशय क्रोधानें आला असतां त्यालाहि तूं अर्ध्या क्षणांत जिंकिलेंस. १२० तुझी भेट घेण्यासाठीं नारायणाला उत्कंठा लागली होती. तो ब्राह्मणपुत्रद्वारां तुला भेटण्याची इच्छा सर्वदा करीत होता. २१ तूं भक्तांचें कार्य करणारा सिंह आहेस. अर्जुनाचें वचन सत्य करण्यासाठीं क्षीरसागरांत कृष्ण-नारायणाची जी भेट झाली, २२ त्या भेटीचें महत्त्व संतच आवडीनें जाणतात. दोघांना गाढ मिठी पडतांच एकरूपानें आत्मसुखाचा अनुभव आला. २३ नारायण कृष्णांत विराला कीं कृष्ण नारायणांत लीन झाला, हेंच कळलें नाहीं. दोघांतील द्वैत नाहींसें होऊन स्वरूप एकत्वानें परिपूर्ण झालें. २४ तेव्हां 'मी मात्र श्रीकृष्णनाथाला व्यर्थ अंतरलों ' असें म्हणून अर्जुनाचें मन व्यथित झालें. तों त्यानें श्रीकृष्णाला शेषशयनावर नारायणरूपच पाहिलें. २५ तो तूं भक्तांचा कैवारी, लीलाशरीरानें अवतार घेणारा, दीनांच्या उद्धारासाठीं नाना प्रकारचे अवतार घेतोस. २६ हे श्रीकृष्णा ! याप्रमाणें तुझा महिमा अगाध आहे. हें याच अवतारांत आमच्या प्रत्ययास आलें. २७ तुझी ईश्वरस्थिति अखंड आहे. तुझी ज्ञानस्फूर्ति माया-आवरणरहित आहे. तूं अद्वयानंदापासून

निश्चितीं या हेतू ॥ २८ ॥ ऐसा तूं अनंत अपरंपार । नियंत्या ईश्वराचा ईश्वर । तरी तूं भक्तकरुणाकर । तोही प्रकार अवधारीं ॥ २९ ॥

पूर्वश्लोकींचा चरण । 'यो रोचयन् सहमृगैः स्वयमीश्वराणाम्' ॥

देवां दुर्लभ जो नमस्कारा । तो तूं रिसां आणि वानरां । खेंव देसी रामचंद्रा । लीलावताराचेनि नात्यें ॥ १३० ॥ तुवां बोलावें कृपा करूनी । यालागीं वेद तिष्ठे सावधानीं । तो तूं वानरांच्या कानीं । गुज आळोंचूनी सांगशी ॥ ३१ ॥ तुझें ज्ञान न कळे वेदशास्त्रां । तो तूं विचार पुससी वानरां । अनुसरोनि त्यांच्या मंत्रा । उपायद्वारा वर्तसी ॥ ३२ ॥ यज्ञींचीं अवदानें प्रांजळें । कदा न घेसी यज्ञकाळें । तो तूं वानरांचीं वनफळें । खासी कृपाबळें सप्रेम ॥ ३३ ॥ ऐसें भक्तांचें निजप्रेम । तो तूं प्रतिपाळिसी मेघश्याम । त्या तुजमाजीं नाहीं विषम । तूं आत्माराम जगाचा ॥ ३४ ॥

'एतदशेषबंधो'

तूं अंतर्यामी निजसखा । परमात्मा हृदयस्थ देखा । तुजमाजीं भूतां भौतिकां । भिन्न आवांका असेना ॥ ३५ ॥ तूं जडातें चेतविता । मूढातें ज्ञानदाता । सकळ जीवां आनंदविता । तुझियाचि सत्ता जग नांदे ॥ ३६ ॥ मातापित्यांचें सख्यत्व देखा । तो प्रपंचयुक्त आवांका । तूं हृदयस्थ निजसखा । सकळ लोकां सुखदाता ॥ ३७ ॥ ऐसा तूं सर्वांचा हृदयस्थ । सर्ववंद्यत्वें अतिसमर्थ । जाणसी हृदयींचा वृत्तांत । स्वामी कृपावंत दीनांचा ॥ ३८ ॥ यापरी गा हृषीकेशी । दीनदयाळु निजभक्तांसी । ऐशिया सांडूनि स्वामीसी । कोण धनांधांसी भजेल ॥ ३९ ॥

कधीं ढळत नाहींस. म्हणून तुला 'अच्युत' म्हणतात. २८ असा तूं अनंत, अपरंपार आहेस. नियंत्या ईश्वराचाहि ईश्वर आहेस. तरी तूं भक्तांवर कृपा करितोस. तोहि प्रकार आतां सांगतों, ऐक. १२९.

मूळ श्लोकांतील 'यो रोचयन्०' याचें व्याख्यान-देवांना नुसत्या नमस्कारालाहि जो दुर्लभ, त्या तूं हे रामचंद्रा ! जांबवानासारख्या अस्वलाला व हनुमानासारख्या वानराला लीलावताराच्या नाटकाला अनुसरून आलिंगन दिलेंस. १३० तूं कृपा करून शब्द बोलावास म्हणून वेद तत्परतेनें तिष्ठत उभा असतो, त्या तूं वानरांच्या कानांत हळूच गुजगोष्टी सांगितल्यास. ३१ तुझें ज्ञान वेदशास्त्रांसहि कळत नाहीं, त्या तूं हनुमान् सुग्रीवादिकांची सल्ला घेतलीस. ३२ यज्ञांतील अवदानें तूं कधींहि प्रांजलपणें स्वीकारीत नाहींस. त्या तूं वानरांनीं दिलेलीं वनांतील फळें त्यांच्यावर कृपा करण्यासाठीं प्रेमानें खाल्लींस. ३३ असा तूं मेघश्याम भक्तांवरील आपलें प्रेम राखितोस. त्या तुझ्यांत विषमत्व नाहीं. तूं जगाचा आत्माराम आहेस. १३४.

मूळ श्लोकांतील 'एतदशेषबंधो' या पदाचें व्याख्यान-तूं अंतर्यामी, निजसखा हृदयस्थ परमात्मा आहेस ! तुझ्यामध्यें भूत व भौतिक यांविषयीं भेदभाव नाहीं. ३५ तूं जडाला चेतविणारा, मूढाला ज्ञान देणारा, सगळ्या जीवांना आनंद देणारा आहेस. तुझ्या सत्तेनें जगत् नांदत आहे. ३६ माता-पित्यांचें प्रेम केवल प्रपंचयुक्त असतें; पण तूं हृदयस्थ निजसखा सगळ्या लोकांचा सुखदाता आहेस. ३७ असा तूं सर्वांच्या हृदयांत राहणारा, सर्वांना वंद्य, अति समर्थ ईश्वर, सर्वांच्या हृदयांतील विचार जाणतोस. तूं दिनांचा कृपाळु स्वामी आहेस. ३८ हे श्रीकृष्णा ! आपल्या भक्तांचा दीन दयाळ आहेस. अशा स्वामीला सोडून संपत्तीनें अंध झालेल्या लोकांस कोण भजणार ! १३९.

तं त्वाऽखिलात्मदयितेश्वरमाश्रितानां सर्वार्थदं स्वकृतविद्विसृजेत को नु ।
को वा भजेत् किमपि विस्मृतयेऽनु भूत्यै किं वा भवेन्न तव पादरजोजुषां नः ॥ ५ ॥

विधाता आणि हरि हर । हे मायागुणीं गुणावतार । तूं मायानियंता ईश्वर । भक्तकरुणाकर सुखदाता ॥ १४० ॥ त्या तुझी करितां निजभक्ती । चारी पुरुषार्थ चारी मुक्ती । भक्तांसी लोटांगणीं येती । एवढी अर्थप्राप्ती निजभक्तां ॥ ४१ ॥ निजभक्तांचें मनोगत । तूं सर्वज्ञ जाणता भगवंत । भक्तहृदयींचें हृद्गत । जाणोनि सर्वार्थ तूं देसी ॥ ४२ ॥ भावार्थाचे भोक्तेपण । जाणता तूं एक श्रीकृष्ण । तुजवेगळें हें लक्षण । आणिकां जाण कळेना ॥ ४३ ॥ ऐसा स्वामी तूं उत्तमोत्तम । तुझेनि साधकां सुख परम । आणिक नाहीं तुजसम । तूं स्वामी पुरुषोत्तम सर्वांचा ॥ ४४ ॥ तूं सर्वांचा स्वामी होसी । तूं कृपाळु निजभक्तांसी । अग्निविषादि नानाबाधेंसीं । तुवां प्रल्हादासी रक्षिलें ॥ ४५ ॥ तुज भक्तांची कृपा प्रबळ । उत्तानचरणाचें तानें बाळ । करोनियां वैराग्यशील । ध्रुवासी अढळ तुवां केलें ॥ ४६ ॥ शत्रुबंधु बिभीषण । तुज आला अनन्यशरण । त्याचे कृपेस्तव जाण । सकुळी रावण उद्धरिला ॥ ४७ ॥ छळूनि बांधिलें बळीसी । शेखीं कृपा उपजली कैसी । त्याचे द्वारीं द्वारपाळ होसी । निजलाजेसी सांडूनि ॥ ४८ ॥ ऐशी भक्तकृपा तुजपाशीं । भक्तहृद्गत तूं जाणसी । ऐशा सांडूनि निजस्वामीसी । कोण धनांधांसी सेवील ॥ ४९ ॥ देहादि इंद्रियां जें सुख भासे । तें तुझेनीच सुखलेशें । तो

—वास्तव तुला सोडून दुसऱ्याचा आश्रय कोण करील—

अखिलात्मदयितेश्वरं आश्रितानां सर्वार्थदं तं त्वा स्वकृतवित् कः विसृजेत नु—सर्व जगाचा आत्मा म्ह० चेतविता, आत्मा असल्यामुळेंच अतिशय प्रिय आणि ईश्वर असल्यामुळें भजनीय व आपल्या आश्रितांना सर्व पुरुषार्थ देणारा, अशा त्या तुला बलि, प्रल्हाद इत्यादिकांवर तूं केलेला उपकार जाणणारा किंवा स्वतःवर अंतर्यामित्वानें केलेला उपकार जाणणारा कोण बरें सोडील ! (अशा तुला कोण भजणार नाहीं ! तर मग काय फलाच्या उद्देशानें मी भजनीय आहे ! उत्तर—नाहीं. नाहीं.) किं अपि यत् केवलं भूत्यै अनु विस्मृतये कः वा भजेत्—तुझ्याहून भिन्न असलेलें व तूं दिलेलें असेंहि स्वर्गादि भोग्य कीं जे केवळ इंद्रियभोगासाठीं असून लागलेंच तुझें विस्मरण पाडणारें आहे. त्याचें सेवन तरी कोण करणार ! (किंवा तुझ्याहून भिन्न असलेलें जें देवतान्तर, किंवा धर्मज्ञानादि साधनें त्यांचें सेवन ऐश्वर्यासाठीं व संसाराच्या विस्मृतीसाठीं—मोक्षासाठीं कोण करील ! कोणी करणार नाहीं, त्या साधनांवांचून भोग-मोक्षादि फळ कसें मिळेल ! उत्तर—) तवपादरजोजुषां नः किं वा न भवेत्—तुझ्या चरणाचें सेवन करणारे जे आम्ही, त्या आम्हांला कशाची प्राप्ति होणार नाहीं ! ५.

ब्रह्मदेव, विष्णु व शंकर हे मायागुणांचे अवतार आहेत आणि तूं मायेचा नियंता ईश्वर असून भक्तांवर करुणा करणारा व सुखदाता आहेस. १४० त्या तुझी भक्ति केली असतां चारी पुरुषार्थ व चारी मुक्ति भक्तांपुढें लोटांगण घालीत येतात. भक्तांना एवढा लाभ होतो. ४१ तूं भगवान् आपल्या भक्तांचें मनोगत जाणतोस. भक्तहृदयांतील हृद्गत ओळखून त्याला तूं चारी पुरुषार्थ देतोस. ४२ भावार्थाचा भोक्तेपणा जाणणारा तूं एक श्रीकृष्णच आहेस. तुझ्यावांचून हें लक्षण दुसऱ्या कोणाला कळत नाहीं. ४३ असा तूं उत्तमोत्तम स्वामी आहेस. तुझ्यापासून साधकाला परम सुख मिळतें. तुझ्यासारखा दुसरा कोणीहि नाहीं. तूं पुरुषोत्तम सर्वांचा स्वामी आहेस. ४४ तूं सर्वांचा प्रभु असूनहि आपल्या भक्तांवर अत्यंत कृपा करितोस. तूं अग्नि, विष इत्यादि अनेक संकटांपासून प्रल्हादाचें रक्षण केलेंस. ४५ तुला भक्तांची अत्यंत दया येते. तूं उत्तानपाद राजाचें अज्ञ बालक वैराग्यसंपन्न केलेंस व त्या ध्रुवाला अढळपद दिलेंस. ४६ बिभीषण तुझ्या शत्रूचा बंधु असूनहि तो शरण येतांच त्याच्यावर कृपा करण्यासाठीं रावणाचा कुळासह उच्छेद केलास. ४७ बळीला फसवून बांधिलेंस; पण शेवटीं त्यावरहि तूं कशी कृपा केलीस पहा ! तूं लाज सोडून त्याच्याच दारांत द्वारपाळ होऊन राहिलास. ४८ असा तूं भक्तांवर कृपा करीत असतोस. तूं भक्तांचें हृद्गत जाणतोस. अशा स्वामीला सोडून धनांध स्वामीची सेवा कोण करील ! ४९ देहादि इंद्रियांना जें सुख भासतें, तें तुझ्या सुखलेशानेंच होतें. तो तूं सर्व सौख्यांसह भक्तांवर अनायासें

तूं सकळसुखसमावेशें । प्रसन्न अनायासें निजभक्तां ॥ १५० ॥ साधु जाणती तुझा महिमा । तूं ज्ञानियांचा अभेद आत्मा । भक्तप्रिय पुरुषोत्तमा । तुझा सुखाचा प्रेमा अप्रमेय ॥ ५१ ॥ तुझे सेवेचिया संतोखें । भक्त सुखावले निजसुखें । त्यांसी देहद्वंद्वजन्मदुःखें । स्वप्नींहीं संमुखें कदा नव्हती ॥ ५२ ॥ तुझ्या भजनसुखें तुझे भक्त । विषयीं होऊनि विरक्त । ते राज्य समुद्रवलयांकित । थुंकोनि सांडित तुच्छत्वें ॥ ५३ ॥ सकळभोगवैभवेंसी । स्वर्ग आलिया भक्तापाशीं । ते उपेक्षिती तयासी । जेवीं राजहंसीं थिल्लर ॥ ५४ ॥ जे विनटले भजनाच्या ठायीं । ते तूं सुखरूप करिसी पाहीं । देहीं असतां विदेही । सर्वां ठायीं समसाम्यें ॥ ५५ ॥ ऐसा स्वामी तूं हृषीकेशी । सदा संतुष्ट निजभक्तांसी । कठिणत्व नाहीं सेवेसी । कैसें म्हणती तें ऐक ॥ ५६ ॥ जाणें न लगे परदेशासी । आणि अनवसरू नाहीं सेवेसी । भक्तांनिकट अहर्निशीं । तूं हृदयनिवासी निजात्मा ॥ ५७ ॥ सेवेलागीं न लगे धन । शरीरकष्ट न लगती जाण । तुझ्या चरणीं ठेविल्या मन । तूं स्वानंदघन तुष्टसी ॥ ५८ ॥ तूं तुष्टोनि करिसी ऐसें । सांडविसी प्रपंचाचें पिसें । त्रिगुणेंसी त्रिपुटी नासे । अनायासें मिथ्यात्वें ॥ ५९ ॥ ऐसा तूं सुसेव्य आणि कृपाळु । निजस्वामी तूं दीनदयाळु । तुझी सेवा सांडी बरळु । मूर्ख केवळु अतिमंद ॥ १६० ॥ निमेषोन्मेषांचे व्यापार । तुझेनि चालति साचार । तुझे सेवेसी विमुख नर । ते पामर अभाग्य ॥ ६१ ॥ तुझी सेवा सुखरूप केवळ । तीस उपेक्षूनियां बरळ । विषयांचें विपयकल्लोळ । जे सर्वकाळ वांछिती ॥ ६२ ॥ ज्या विषयांचा विषयलेश । थित्या निजसुखा करी नाश । जन्ममरणांचा विलास । दुःख असोस भोगवी ॥ ६३ ॥ त्या विषयाचे विषयदाते । इंद्र महेंद्र कृपणचित्तें । त्यांसी भजती जे विषयस्वार्थें । तेही निश्चितें अभाग्य ॥ ६४ ॥ तुझिया कृपा तुझे भक्त । सुखसंपन्न अतिसमर्थ । संसारीं होती अतिविरक्त । हें नवल एथ नव्हे देवा ॥ ६५ ॥ तुझें चरणरज जे सेविती । पृथुजनकादि नृपती ।

प्रसन्न होतोस. १५० साधु तुझा महिमा जाणतात. तूं ज्ञान्यांचाहि अभिन्न आत्मा आहेस. हे भक्तप्रिय पुरुषोत्तमा ! तुझ्या सुखाचें प्रेम प्रमाणाचा विषय होत नाहीं. ५१ तुझ्या सेवेच्या आवडीनें भक्त आत्मसुखानें सुखी झाले आहेत. देहद्वंद्वांची व जन्म-मरणांचीं दुःखें स्वप्नांतहि त्यांच्यापाशीं येत नाहींत. ५२ तुझे भक्त तुझ्या भजनसुखानें विषयाविषयीं इतके विरक्त होतात कीं, ते सार्वभौम राज्यपदावर थुंकूनहि तें तुच्छतेनें टाकून देतात. ५३ राजहंस जसा डबक्याची उपेक्षा करितो तसे ते भक्त सगळ्या भोगवैभवासह स्वर्ग जरी आला तरी त्याची उपेक्षा करितात. ५४ ते भजनांत रंगले कीं, त्यांना तूं आत्मरूप करितोस. देहीं असतांनाच त्यांस विदेही करून सर्वांमध्यें समभावना ठेववितोस. ५५ हे श्रीकृष्णा ! असा तूं स्वामी आहेस. तूं सदा आपल्या भक्तांवर संतुष्ट असतोस. तुझी सेवा करणेंहि कठिण नाहीं. कशी म्हणशील तर ऐक ! ५६ तुझी सेवा करण्यासाठीं परदेशांत जावें लागत नाहीं. तुझ्या सेवेला काळ-वेळ नेमलेला नाहीं. तूं हृदयस्थ आत्माराम रात्रं-दिवस भक्तांच्या समीप असतोस. ५७ तुझ्या सेवेला धन लागत नाहीं. शरीरकष्ट करावे लागत नाहींत. तुझ्या चरणीं मन ठेविलें असतां तूं स्वानंदघन संतुष्ट होतोस. ५८ व भक्तांचें प्रपंचाचें वेड घालवितोस. त्रिपुटी मिथ्या असल्यामुळें ती त्रिगुणांसह अनायासें नाश पावते. ५९ असा तूं सुसेव्य, कृपाळु, दीनदयाळ स्वामी, आहेस. केवळ मंदमति मूर्खच भ्रांतीनें तुझी सेवा टाकितात. १६० निमेषोन्मेषाचे व्यापारहि तुझ्यामुळेंच चालतात. तुझ्या सेवेला विमुख होणारे पामरजन अभागी होत. ६१ तुझी सेवा केवल सुखस्वरूप आहे. तिची उपेक्षा करून जे मूर्ख विषयांचा पसारा सर्वकाळ इच्छितात, ६२ ज्या विषयाचा लेश सुद्धां असलेल्या सुखाचा नाश करितो आणि जन्म-मरणांच्या परंपरेनें असह्य दुःख भोगवितो, ६३ त्या विषयांचें फल देणारे इंद्र, महेंद्र हेहि कृपण असतात. त्यांना जे विषयस्वार्थासाठीं भजतात, तेहि खरोखर अभागीच होत. ६४ तुझ्या कृपेनें तुझे भक्त सुखसंपन्न व अति समर्थ होऊन संसाराविषयीं विरक्त झाल्यास त्यांत आश्चर्य नाहीं. ६५ हे श्रीकृष्णा ! तुझ्या चरणधुळीचें सेवन करणारे पृथु-जनकादिक जे श्रेष्ठ राजे त्यांना इंद्रादिक वंदन

त्यांसी इंद्रादिक वंदिती । पायां लागती ऋद्धिसिद्धि ॥ ६६ ॥ सुगमोपायें स्वरूपप्राप्ती । भाळे भोळे जन पावती । तैसा उपाय श्रीपती । कृपामूर्ती सांगावा ॥ ६७ ॥ आकल्प करितां तपःस्थिती । ज्या सिद्धींची नव्हे प्राप्ती । त्या सिद्धी भक्तां शरण येती । ऐसी श्रेष्ठ भक्ती पैं तुझी ॥ ६८ ॥ आणिक साधनें करितां । तुझे भजनीं ठेविल्या चित्ता । सर्व सिद्धी होती शरणागता । स्वभावतां भक्तांसी ॥ ६९ ॥ यापरी तुझे उपकार । भक्ताप्रति घडले अपार । त्यासी तैं घडे प्रत्युपकार । हरिचरणीं साचार जैं स्वयें विरे ॥ १७० ॥ तोंचि विरालेपण ऐसें । जेवीं प्रतिबिंब बिंबीं प्रवेशे । कां घटाकाशींचेनि आकाशें । होइजे जैसें महदाकाश ॥ ७१ ॥ ऐसें तुजमाजीं न विरतां । प्रत्युपकार न ये हाता । जो पुरवी सर्व स्वार्था । त्यासी विसरतां अधःपातू ॥ ७२ ॥

नैवोपयन्त्यपचितिं कवयस्तवेश ब्रह्मायुषाऽपि कृतमृद्धमुदः स्मरन्तः ।
योऽन्तर्बहिस्तनुभृतामशुभं विधुन्वन्नाचार्यचैत्यवपुषा स्वगतिं व्यनक्ति ॥ ६ ॥

तुजमाजीं न विसरतां साचार । ब्रह्मायु होऊनियां नर । योगयागें शिणतां अपार । प्रत्युपकार कदा न घडे ॥ ७३ ॥ असो सज्ञान ज्ञाते जन । करितां नानाविध साधन । तुझिया उपकारा उत्तीर्ण । अणुप्रमाण कदा नव्हती ॥ ७४ ॥ तो उपकार कोण म्हणसी । निजभक्तांच्या कल्मषांसी । सबाह्याभ्यंतर निर्दळिसी । उभयरूपेंसीं कृपाळुवा ॥ ७५ ॥ अंतरीं अंतर्यामिरूपें । बाह्य सद्गुरुस्वरूपें । भक्तांचीं सबाह्य पापें । सहित संकल्पें निर्दळिसी ॥ ७६ ॥ अंतर्यामी आणि सद्गुरु । उभयरूपें तूं करुणाकरू

करितात व ऋद्धि-सिद्धि त्यांच्या पायां पडतात. ६६ म्हणून हे श्रीपते ! ज्यायोगें भाळेभोळे लोक तरून जातील असा तुझ्या स्वरूपप्राप्तीचा सुलभ उपाय कृपा करून सांग. ६७ कल्पापर्यंत तपश्चर्या करूनहि ज्या सिद्धि प्राप्त होत नाहींत, त्या सिद्धि तुझ्या भक्तांना शरण येतात, अशी तुझी भक्ति श्रेष्ठ आहे. ६८ इतर साधनें आचरीत असतांहि तुझ्या भक्तांना भक्तीकडे चित्त ठेविल्यास त्या सर्व सिद्धि स्वभावतःच भक्तांना शरण येतात. ६९ याप्रमाणें तुझे भक्तांवर अपार उपकार आहेत. भक्त जेव्हां मीपणा नाहींसा करून हरिचरणीं लीन होतो, तेव्हांच त्याचा प्रत्युपकार घडतो. १७० तें लीन होणें असें आहे;–प्रतिबिंब जसें बिंबांत प्रवेश करितें किंवा घटांतील आकाश महाकाशांत जसें मिळतें, ७१ त्याप्रमाणें तुझ्याशीं एकरूप झाल्यावांचून उपकारांची फेड होत नाहीं. जो उपकार करितो त्याला विसरणें हा निव्वळ अधःपात आहे. १७२.

—अन्य भजनाची तर वार्ता राहोच; पण तूं केलेल्या उपकाराची निष्कृति तुझ्या ठिकाणीं आत्मनिवेदन केल्यानेंच होईल, दुसऱ्या कशानेंच होणार नाहीं—

ईश–हे ईश्वरा ! कृतं उपकारं स्मरंतः ऋद्धमुदः कवयः ब्रह्मायुषा अपि तव अपचितिं न एव उपयन्ति–तूं केलेलें उपकार आठवणारे व ज्यांचा परमानंद वृद्धि पावला आहे, असे ब्रह्मवेत्ते ब्रह्मदेवाच्या आयुष्यानेंहि तुझ्या उपकारांची फेड करण्यास समर्थ होत नाहींत. तो उपकारच सांगतात–यः अन्तर्बहिः आचार्यचैत्यवपुषा तनुभृतां अशुभं विधुन्वन् स्वगतिं व्यनक्ति–जो तूं बाहेर आचार्यदेहानें म्ह० गुरुरूपानें व आंत अंतर्यामिरूपानें प्राण्यांच्या विषयवासनांचें निरसन करणारा असा होत्साता निजरूप प्रकट करितोस. [त्या तुझ्या उपकाराची फेड ब्रह्मवेत्त्यांनाहि कधींच करितां येत नाहीं असा याचा भावार्थ] ६.

तुझ्यामध्यें लीन न होतां जो पुरुष ब्रह्मायु होऊन योग-याग करण्यांत थकून जातात, त्यांच्या हातून तुझा प्रत्युपकार कदापि घडत नाहीं. ७३ ज्ञानसंपन्न ज्ञानी लोक अनेक प्रकारचीं साधनें आचरितात; पण त्यांनीं उपकाराची अणुमात्रहि फेड होत नाहीं. ७४ 'तो उपकार कोणता !' असें जर विचारशील तर ऐक हे दयानिधे तूं आपल्या भक्तांच्या अंतर्बाह्य पातकांचा उभयरूपानें नाश करितोस. ७५ अंतर्यामीरूपानें अंतःकरणांतील पातक घालवितोस व सद्गुरूच्या रूपानें भक्ताच्या संकल्पासह बाह्य पातकांचें क्षालन करितोस. ७६ अंतर्यामि

निरसूनि भक्तभवभारू । निजनिर्धारू धरविसी ॥ ७७ ॥ निजनिर्धाराचें लक्षण । स्वयें विरे देहाभिमान । सहजें हारपे मीतूंपण । जन्मजरामरण मावळे ॥ ७८ ॥ गेलिया जन्मजरामरण । सहजें होती आनंदघन । ऐसे तुझिया कृपें जाण । उपकारें पूर्ण निजभक्त ॥ ७९ ॥ ऐसी आपुली स्वरूपस्थिती । भक्तां अर्पिसी कृपामूर्ती । तो तूं निजस्वामी श्रीपती । पूज्य त्रिजगतीं त्रिदशांसी ॥ १८० ॥ ऐसे तुझेनि निजप्रसादें । भक्त सुखी जाहले स्वानंदें । ते उरलेनि प्रारब्धें । सदा स्वानंदबोधें वर्तती ॥ ८१ ॥ ते देही असोनि विदेही । कर्म करूनि अकर्ते पाहीं । ऐसें उपकार भक्तांच्या ठायीं । कैसोनि उतरायी होतील ॥ ८२ ॥ तुज केवीं होइजे उत्तीर्ण । तुझेनि मनां मनपण । तुझेनि बुद्धीसी निश्चयो जाण । इंद्रियस्फुरण तुझेनी ॥ ८३ ॥ निमेषोन्मेषांचे व्यापार । तुझेनि चालती साचार । नीच नवे तुझे उपकार । उत्तीर्ण नर कदा नव्हती ॥ ८४ ॥ जें जें करावें साधन । तें सिद्धी पावे तुझे कृपेन । त्या तुज उत्तीर्णपण । सर्वथा जाण असेना ॥ ८५ ॥ यापरी करूनि उपकार । तुवां उद्धरिले थोर थोर । सुगमोपायें भवसागर । तरती भोळे नर तें सांग ॥ ८६ ॥ सुगमोपायें स्वरूपप्राप्ती । भाळे भोळे जन पावती । तैसा उपाय श्रीपती । कृपामूर्ति सांगावा ॥ ८७ ॥ तूं गेलिया निजधामा । दीन तरावया मेघश्यामा । सुगम उपायाचा महिमा । पुरुषोत्तमा मज सांग ॥ ८८ ॥ म्हणोनि घातिलें लोटांगण । मस्तकीं धरिलें श्रीचरण । तरावया दीन जन । सुगम साधन श्रीपती सांगिजो ॥ ८९ ॥ उद्धवें प्रार्थिला श्रीपती । अबळें उद्धरावया निश्चितीं । त्याचेनि धर्में त्रिजगतीं । त्यासी कृपामूर्ति तुष्टला ॥ १९० ॥ उद्धवें प्रार्थिला श्रीपती । तेणें सुखावला शुकही चित्तीं । उल्लासोनि स्वानंद स्थिती । म्हणे परीक्षिति सावध ॥ ९१ ॥ सुगम उपायस्थिती । तारावया त्रिजगती । उद्धवें विनविला श्रीपती । त्यासी कृपामूर्ति तुष्टला ॥ ९२ ॥ संसारतरणोपायबीज । ब्रह्मप्राप्तीचें ब्रह्मगुज । सुगमे साधे सहज निज । तें अधोक्षज

व सद्गुरु या रूपानें तूं करुणाकर आहेस. तूं भक्तांच्या संसारभाराचें निरसन करून त्यांच्याकडून आत्मनिश्चय धरवितोस. ७७ आत्मनिश्चयाचें लक्षण असें आहे-- देहाभिमान स्वतःच लीन होतो; 'मी-तूंपणा' सहज हरपून जातो; जन्म-जरा-मरण हीं मावळतात. ७८ जन्म-जरा-मरण हीं नाहींशीं होतांच भक्त सहज आनंदघन होतात. तुझ्या कृपेनें भक्तांवर असे पूर्ण उपकार होतात. ७९ अशी तूं आपली स्वरूपस्थिति भक्तांना अर्पण करितोस. तो तूं आमचा स्वामी कृपामूर्ति श्रीपति त्रिभुवनांत देवांसहि पूज्य आहेस. ८० अशा तुझ्या आत्मप्रसादानें भक्त स्वानंदानें सुखी झाले आहेत. ते उरलेल्या प्रारब्धाप्रमाणें निरंतर स्वानंदबोधांत रहातात. ८१ ते देहीं असून विदेही व कर्म करून अकर्ते असतात. एवढे थोरले उपकार तूं भक्तांवर करितोस तेव्हां ते तुझे उतरायी कसे होतील ! ८२ त्यांनीं तुझ्या उपकारांतून मुक्त कसें व्हावें ! तुझ्यामुळें मनाला मनपणा; तुझ्यामुळें बुद्धीचा निश्चय, तुझ्यामुळें इंद्रियस्फुरण. ८३ व निमिषोन्मेषाचे व्यापारहि तुझ्यामुळें चालतात. असे तुझे नित्य नवीन उपकार होत असतां पुरुष कदापि तुझे उतरायी होणार नाहींत. ८४ जेवढें साधन करावें तेवढें तुझ्या कृपेनेंच सिद्धीस जातें. अशा तुझें उतरायी होतां येणें शक्यच नाहीं. ८५ अशाप्रकारें उपकार करून तूं थोरा-थोरांचा उद्धार केलास; पण आतां भोळे जन कोणत्या सोप्या उपायानें हा भवसागर तरून जातील, तें सांग. ८६ हे कृपाळु श्रीकृष्णा ! भाळ्या-भोळ्या लोकांना स्वरूप-प्राप्ति होईल असा सोपा उपाय सांगावा. ८७ हे मेघश्यामा, पुरुषोत्तमा ! तूं निजधामाला गेल्यावर दीन जनांना तरून जाण्याचा सोपा उपाय मला सांगून ठेव. ८८ असें म्हणून उद्धवानें लोटांगण घातलें श्रीकृष्णाचे चरण मस्तकावर धारण केलें व म्हटलें कीं, हे श्रीपते ! अज्ञ जनांच्या उद्धाराचा सोपा उपाय मला सांग. ८९ अज्ञ-जनांचा उद्धार होण्यासाठीं व त्यांच्याच धर्मानें त्रिभुवनाचाहि उद्धार करण्यासाठीं उद्धवानें श्रीकृष्णाची प्रार्थना केली. तेव्हां कृपामूर्ति श्रीकृष्ण संतुष्ट झाला. १९० उद्धवानें श्रीपतीची प्रार्थना केलेली पाहून श्रीशुकाचार्य मनांतून आनं-दित झाला व स्वानंदाच्या उल्हासानें म्हणाला कीं, हे परीक्षिती राजा, सावधान हो. ९१ त्रिभुवनांतील अज्ञ जनांना तारणारा सोपा उपाय सांगण्यासाठीं उद्धवानें श्रीपतीला विनविलें, त्यांवर कृपामूर्ति श्रीहरि प्रसन्न झाला. ९२ संसार तरून

सांगेल ॥ ९३ ॥ अवघें उद्धरावया निश्चितीं । उद्धवें प्रार्थिला श्रीपती । त्याचेनि धर्में त्रिजगती । सुगमस्थितीं तरेल ॥ ९४ ॥ निजधामा गेलिया श्रीकृष्णनाथ । दीन तरावया समस्त । उद्धवें सेतु बांधिला एथ । ब्रह्मप्राप्त्यर्थ प्रश्नोक्ती ॥ ९५ ॥ उद्धवें प्रार्थूनि श्रीकृष्ण । उद्धरावया दीन जन । ब्रह्मप्राप्तीची पव्हे जाण । सुगम संपूर्ण घातली ॥ ९६ ॥ एवं उद्धवप्रश्नस्थितीं । शुक सुखावे वचनोक्तीं । तेंचि परीक्षितीप्रती । सुनिश्चिती सांगत ॥ ९७ ॥

श्रीशुक उवाच ॥ इत्युद्धवेनात्यनुरक्तचेतसा पृष्टो जगत्क्रीडनकः स्वशक्तिभिः ।
गृहीतशक्तित्रय ईश्वरेश्वरो जगाद सप्रेममनोहरस्मितः ॥ ७ ॥

जो ज्ञानियांचा शिरोमणी । जो ब्रह्मचाऱ्यां मुकुटमणी । योगियांमाजीं अग्रगणी । जो सिद्धासनीं वंदिजे ॥ ९८ ॥ जो ब्रह्मज्ञानाचा निजनिधी । जो स्वानंदबोधाचा उदधी । जो भूतदयेचा क्षीराब्धी । तो शुक स्वबोधीं बोलत ॥ ९९ ॥ पांडवकुळीं अगाध कीर्ती । कौरवकुळीं तुझेनि भक्ती । धर्मस्थापक त्रिजगतीं । ऐके परीक्षिति सभाग्या ॥ २०० ॥ जग जें भासे विचित्रपणें । तें जयाचें लीलाखेळणें । खेळणेंहि स्वयें होणें । शेखीं अलिप्तपणें खेळवी ॥ १ ॥ विचित्र भासे जग जाण । ज्याचेनि अंगें क्रीडे संपूर्ण । जग ज्याचें क्रीडास्थान । जगा जगपण ज्याचेनी ॥ २ ॥ ऐसा जगत्क्रीडनक श्रीकृष्ण । ईश्वराचा ईश्वर आपण । मायादि तिन्ही गुण । ज्याचेनि पूर्ण प्रकाशती ॥ ३ ॥ मायागुणीं गुणावतार । जे उत्पत्तिस्थितिक्षयकर । ब्रह्मा आणि हरि हर । तेही आज्ञाधार जयाचे ॥ ४ ॥ ऐशिया श्रीकृष्णाप्रती । उद्धवें सप्रेम विनंती । केली अतिविनीतस्थितीं । तेणें श्रीपति तुष्टला ॥ ५ ॥ बहुतीं प्रार्थिला श्रीकृष्ण । तो

जाण्याच्या उपायाचें बीज, ब्रह्मप्राप्तीचें गुह्य वर्म ज्या सोप्या उपायानें सहज साधेल तें श्रीकृष्ण आतां सांगेल. ९३ अज्ञ जनांचा उद्धार होण्यासाठीं उद्धवानें श्रीपतीची प्रार्थना केली. या भगवदुक्त धर्मानें सगळें त्रिभुवन सहजच तरेल. ९४ श्रीकृष्णनाथ निजधामाला गेल्यावर सगळ्या अज्ञ लोकांना तरून जाण्यासाठीं उद्धवानें ब्रह्मप्राप्तीच्या उपायविषयक प्रश्नमिषानें हा सेतुच बांधिला ९५ उद्धवानें श्रीकृष्णाची प्रार्थना करून दीन जनांचा उद्धार करण्यासाठीं ही ब्रह्मप्राप्तीची सोपी व संपूर्ण पाणपोयीच घातली आहे. ९६ याप्रमाणें उद्धवाच्या प्रश्नाचें वर्णन करीत असतां श्रीशुकाचार्यांस संतोष झाला व तो आतां त्याविषयींच परीक्षितीराजाला सांगत आहे. १९७.

श्रीशुकःउवाच–शुकाचार्य म्हणाले–इति उद्धवेन अत्यनुरक्तचेतसा पृष्टः ईश्वरेश्वरः जगत्क्रीडनकः स्वशक्तिभिः गृहीतशक्तित्रयः सप्रेममनोहरस्मितः जगाद–याप्रमाणें उद्धवानें अनुरक्त चित्तानें विचारलेला, ईश्वरांचाहि ईश्वर–(ईश्वरत्वाविषयीं हेतु–) जगत् हेंच ज्याच्या क्रीडेचें उपकरण आहे (अहोपण, जगाच्या सृष्ट्यादिकांनीं ब्रह्मेशादिक खेळतात ! उत्तर–) ज्यानें आपल्या सत्त्वादि शक्तींनीं तीन मूर्तींचें ग्रहण केलें आहे व ज्याचें स्मित प्रेमासह मनोहर आहे, असा भगवान् म्हणाला. [किंवा ' सप्रेम जगाद ' मोठ्या प्रेमानें बोलला असा अन्वय] ७.

जो ज्ञान्यांचा शिरोमणि, जो ब्रह्मचार्यांचा मुकुटमणि, जो योग्यांचा अग्रगणी, जो सिद्धांना वंद्य, ९८ जो ब्रह्मज्ञानाचा ठेवा, जो स्वानंदबोधाचा समुद्र, जो भूतदयेचा क्षीरसागर तो शुकाचार्य आपल्या अनुभवानें सांगूं लागला. ९९ पांडवकुलाची कीर्ति अगाध आहे. कौरवकुलावर तुझी भक्ति आहे. तूं त्रिभुवनांत धर्मसंस्थापक आहेस. यास्तव हे भाग्यवान् परीक्षिती राजा ! ऐक. २०० हें विचित्रपणानें भासणारें जगत् ज्याचें लीलाखेळणें आहे, जो स्वतः खेळणेंहि होतो व शेवटीं अलिप्तपणानें खेळवितो, १ हें विचित्र भासणारें जगत् ज्याच्यायोगें पूर्णपणें क्रीडा करीत असतें, हें जगत् ज्याचें क्रीडास्थान आहे, ज्याच्यामुळें जगाला ' जगत्पणा ' येतो, २ असा जगद्रूपानें नटून त्यांतच अनेक प्रकारच्या क्रीडा करणारा श्रीकृष्ण ईश्वराचाहि ईश्वर आहे. मायादि तिन्ही गुण त्याच्याचमुळें पूर्ण प्रकाशतात. ३ त्या मायागुणांचे अवतार उत्पत्ति-स्थिति-लय करणारे जे ब्रह्मदेव, विष्णु व रुद्र तेहि ज्याच्या आज्ञेंत रहातात. ४ अशा श्रीकृष्णाला उद्धवानें नम्रपणानें सप्रेम विनंति केली. त्यामुळें श्रीकृष्ण संतुष्ट झाला. ५ आतांपर्यंत पुष्कळांनीं श्रीकृष्णाची प्रार्थना केली होती; पण ती आपापल्या कार्यासाठीं होती, उद्धवानें सर्व मानवांवर उपकार करण्यासाठीं

आपुलाल्या कार्यार्थ जाण । उद्धवें केला विनित प्रश्न । जगदुद्धरण उपकारी ॥ ६ ॥ ऐकोनि उद्धवाची प्रश्नोक्ती । तोषें तोषला श्रीपती । सुगमोपायें ब्रह्मप्राप्ती । ते साधनस्थिती सांगेल ॥ ७ ॥ भाळे भोळे सात्विक जन । सवेग पावती समाधान । तो उद्धवप्रश्नें श्रीकृष्ण । सोपें ब्रह्मज्ञान सांगत ॥ ८ ॥ ज्ञानमार्गींचे कापडी । जीवें सर्वस्वें घालूनि उडी । उद्धवप्रश्नाचे आवडीं । ब्रह्म जोडे जोडी सुगमत्वें ॥ ९ ॥ लेऊनियां मोहममतेची बेडी । जे पडिले अभिमानबांदवडीं । त्याचीही सुटका धडफुडी । उद्धवें गाढी चिंतिली ॥ २१० ॥ उद्धवाचें भाग्य थोर । प्रश्न केला जगदुपकार । तेणें तुष्टला शार्ङ्गधर । अतिसादर बोलत ॥ ११ ॥ दीनोद्धाराचा प्रश्न । उद्धवें केला अतिगहन । तेणें संतोषोनि श्रीकृष्ण। हास्यवदन बोलत ॥ १२ ॥ कृष्णवदन अतिसुंदर । तेंही हास्ययुक्त मनोहर । अतिउल्हासें शार्ङ्गधर । गिरा गंभीर बोलत ॥ १३ ॥

श्रीभगवानुवाच ॥ हन्त ते कथयिष्यामि मम धर्मान् सुमङ्गलान् ।
यान् श्रद्धयाचरन्मर्त्यो मृत्युं जयति दुर्जयम् ॥ ८ ॥

जो प्रणवाचें सोलींव सार । जो ज्ञानाचें निजजिव्हार । जो चैतन्याचा चमत्कार । जो परात्पर परादिकां ॥ १४ ॥ तो मेघगंभीर गर्जोनी । स्वानंदें बोले शार्ङ्गपाणी । म्हणे उद्धवा धन्य धन्य वाणी। तुझ्या प्रश्नीं मी निवालों ॥ १५ ॥ भाळया भोळ्या ब्रह्मप्राप्ती । पावावया सुगमस्थितीं । ये अर्थी दादुगी माझी भक्ती । तिसी मी श्रीपति सदा वश्य ॥ १६ ॥ माझें करितां अनन्य भजन । मी सर्वथा भक्ताधीन । तेथ जाति गोत ज्ञातेपण । उंच नीच वर्ण मी न म्हणें ॥ १७ ॥ जेणें घडे भजन परम । ते सांगेन भागवतधर्म । जेणें निरसे कर्माकर्म । मरणजन्मच्छेदक ॥ १८ ॥ जे धर्म स्वयें आचरितां । समूळ

जगाच्या उद्धाराचा नम्र प्रश्न केला. ६ तो उद्धवाचा प्रश्न ऐकून श्रीपति अत्यंत संतुष्ट झाला. आतां तो सोप्या उपायानें ब्रह्मप्राप्ति होण्याचें साधन सांगेल. ७ ज्यायोगें भाळ्याभोळ्या सात्त्विक जनांचें सत्वर समाधान होईल तें सोपें ब्रह्मज्ञान उद्धवाच्या प्रश्नावरून श्रीकृष्ण सांगत आहे. ८ ज्ञानमार्गांतील प्रवासी जर जीवा-भावानें उडी टाकतील तर उद्धवाच्या प्रश्नाच्या आवडीनें त्यांनाहि सहज ब्रह्मप्राप्ति होईल. ९ जे मोह-ममतेची बेडी पायांत अडकवून अभिमानाच्या कारागृहांत पडले आहेत, त्यांचीहि सुटका करण्याचा उद्धवानें खरोखर हा फार उत्कृष्ट विचार केला. २१० उद्धवाचें भाग्य फार मोठें त्यानें जगावर उपकार करण्यासाठीं प्रश्न केला. त्यानें श्रीहरि संतुष्ट झाला व अत्यंत आदरानें बोलूं लागला. ११ उद्धवानें दीनोद्धाराचा जो अतिशय गहन प्रश्न केला त्यानें श्रीकृष्ण संतुष्ट होऊन हास्य वदनानें सांगूं लागला. १२ आधींच श्रीकृष्णवदन अत्यंत सुंदर, त्यांत त्यानें हास्य करितांच तें अधिकच मनोहर झालें व शारंगधर अत्यंत उल्हासानें गंभीर वाणीनें बोलूं लागला. २१३.

श्रीभगवान् उवाच—श्रीभगवान् म्हणाले—' हंत '—ठीक ठीक, बा प्रिय उद्धवा ! मर्त्यः यान् श्रद्धया चरन् दुर्जयं मृत्युं जयति—मनुष्य ज्यांचें श्रद्धेनें आचरण करून अन्य उपायांनीं दुर्जय असलेल्या मृत्यूला—संसाराला जिंकतो तान् मम सुमंगलान् धर्मान् ते कथयिष्यामि—त्या माझ्या सुमंगल—अतिशय मंगलरूप धर्मांचें मी तुला कथन करितों. ८.

जो प्रणवाचें सत्त्व, ज्ञानाचें हृदय, चैतन्याचा चमत्कार, परावाणीचाहि परात्पर १४ असा तो श्रीकृष्ण मेघ गंभीर वाणीनें गर्जना करून म्हणाला कीं, हे उद्धवा ! तुझी वाणी धन्यधन्य होय. तुझ्या प्रश्नानें मी आनंदित झालों. १५ भाळ्याभोळ्या लोकांना सहज ब्रह्मप्राप्ति करून देण्यास माझी भक्तिच समर्थ आहे. मी श्रीपति सदा तिच्या वश असतों. १६ माझें अनन्य भजन केलें असतां मी सर्वथा भक्ताच्या अधीन होतो. त्यांत मी जाति, गोत्र, विद्वत्ता, उंच-नीच वर्ण पहात नाहीं. १७ ज्यानें परम भजन घडतें, तो कर्म-अकर्माचा नाश करणारा व जन्म-मरणाचा छेद करणारा भागवत धर्म मी तुला सांगतों. १८ जो धर्म आचरिला असतां भवव्यथा समूळ खणली

उन्मळी भवव्यथा । ज्या धर्मांच्या स्वभावतां । सुखसंपन्नता साधकां ॥ १९ ॥ जे स्वयें धर्म स्ताविता । निरसी असत्यादि दोषकथा । जे सादरें धर्म ऐकतां । विषयावस्था निर्दळी ॥ २२० ॥ माझे धर्म अतिसुमंगळ । दोषदाहक कलिमळ । मंगळांचेंही परम मंगळ । भजन केवळ पैं माझें ॥ २१ ॥ श्रद्धेनें आचरतां माझे धर्म । माझ्या निजरूपीं उपजे प्रेम । तेणें हारपे भवभ्रम । मरणजन्म असेना ॥ २२ ॥ जो मृत्यु ब्रह्मयाचा ग्रास करी । हरिहरां मृत्यु मारी । मृत्यु दुर्जय संसारीं । सुरासुरीं कांपिजे ॥ २३ ॥ त्या मृत्यूचें खणोनि खत । पाडूनि कळिकाळाचे दांत । अद्वयभजनें माझे भक्त । सुखें नांदत संसारीं २४ ॥ जेणें निवारे दुर्जन मरण । ऐसें भजन म्हणसी कोण । ऐक त्याचेंही लक्षण । तुज मी संपूर्ण सांगेन ॥ २५ ॥ उद्धवा तूं माझा निजसखा । यालागीं निजभजनआवांका । आरंभूनि पूर्वपीठिका । संक्षेपें देखा सांगेन ॥ २६ ॥ कोटिशस्त्रें रुपल्या पाहें । तरी तो शूर वांचला राहे । तोचि वर्मीचेनि एके घायें । मरण लाहे तत्काळ ॥ २७ ॥ तेवीं करितां नाना साधन । अनिवार्य जन्ममरण । त्यासी माझें साक्षेपभजन । समूळ जाण निर्दळी ॥ २८ ॥ कृष्ण घनश्याम महाघन । उद्धवचातकालागीं जाण । वर्षला स्वानंदजीवन । तेणें त्रिभुवन सुखी होये ॥ २९ ॥ लोटलिया वर्षाकाळ । शारदीचें निवळी जळ । तेवीं सुखाचे सुखकल्लोळ । भजनें प्रबळ एकुणतिसावा ॥ २३० ॥ एकादशाचिया अंतीं । सुगमत्वें ब्रह्मप्राप्ती । तदर्थ उत्तमोत्तम भक्ती । स्वयें श्रीपति सांगत ॥ ३१ ॥

कुर्यात्सर्वाणि कर्माणि मदर्थं शनकैः स्मरन् । मय्यर्पितमनश्चित्तो मद्धर्मात्ममनोरतिः ॥ ९ ॥

जाते, ज्या धर्मानें साधक स्वभावतःच सुखसंपन्न होतात. १९ ज्या धर्मांचें स्तवन केलें असतां असत्यादि दोषांचें निरसन होतें, तो धर्म आदरानें ऐकला असतां विषयासक्तीचा नाश होतो, २२० माझे धर्म अतिशय मंगल व कलिमळाचे दोष जाळणारे आहेत. माझें भजन मंगलांचेंहि परम मंगल आहे. २१ श्रद्धेनें माझे धर्म आचरिले असतां माझ्या आत्मस्वरूपाविषयीं प्रेम उत्पन्न होतें, त्यानें भवभ्रम नाहींसा होतो व जन्म-मरण रहात नाहीं. २२ जो मृत्यु ब्रह्मदेवाचा एक घांस करून टाकितो, हरि-हरांसहि मारितो, जो संसारांत दुर्जय आहे, ज्याला सुर-असुर थरथरां कांपतात, २३ त्या मृत्यूचें भय खणून काढून, कळिकाळाचें दांत पाडून माझे भक्त अद्वय भजनानें संसारांत सुखानें नांदतात. २४ 'ज्यायोगें दुर्जय मरणाचेंहि निवारण होतें असें तुझें भजन कोठलें,' असें जर म्हणशील, तर त्याचेंहि मी तुला संपूर्ण लक्षण सांगतों. २५ हे उद्धवा ! तूं माझा प्रियसखा आहेस. यास्तव माझ्या भजनाचा प्रकार आरंभापासून थोडक्यांत सांगतों. २६ शस्त्राचे कोट्यवधि प्रहार झाले तरी शूर योद्धा त्यांतून वांचतो, पण तोच मर्मावर एक घाव बसतांच तत्काल मरण पावतो. २७ त्याप्रमाणें नाना साधनें जरी आचरिलीं, तरी जें जन्म-मरण चुकत नाहीं, त्याचाच माझें आदरयुक्त भजन समूळ नाश करितें. २८ घनश्याम श्रीकृष्णरूपी महामेघानें उद्धवरूपी चातकासाठीं स्वानंदजलाची वृष्टि केली व त्यायोगें त्रिभुवन सुखी झालें. २९ पावसाळा संपल्यावर शरदृतूंतील जल जसें तृप्त करितें, त्याप्रमाणें हा एकोणतिसावा अध्याय भजनानें समर्थ असल्यामुळें सुखाचा सुखकर तरंगच आहे. २३० एकादश स्कंधाच्या शेवटीं ब्रह्मप्राप्ति सुलभ व्हावी म्हणून श्रीकृष्ण स्वतः उत्तमोत्तम भक्ति सांगत आहे. २३१.

—ते धर्मच सांगतात—

मयि अर्पितमनश्चित्तः मद्धर्मात्ममनोरतिः स्मरन् सर्वाणि कर्माणि मदर्थं शनकैः कुर्यात्—माझ्या ठिकाणीं ज्यानें आपलें संकल्प-विकल्पात्मक मन व अनुसंधानरूप चित्त अर्पिलें आहे व त्यामुळें माझ्या धर्मांमध्येंच ज्याच्या जीवाची व मनाची रति आहे, अशा माझें स्मरण करणाऱ्या साधकानें सर्व कर्में माझ्यासाठीं हळूहळू करावीं. [सर्व कर्में भक्त्याप्रमाणें सावकाश करावींत.] ९.

देशाचारें कुलाचारें प्राप्तें । वृद्धाचारादि जें एथें । जें कां वेदोक्त नित्यनैमित्यें । कर्में समस्तें या नांव ॥ ३२ ॥ माझेनि उद्देशें कर्म जें एथ । या नांव साधारण मदर्थ । कर्मासबाह्य मज देखत । मुख्यत्वें मदर्थ आयास न करितां ॥ ३३ ॥ सकळ कर्म माझेनि प्रकाशे । कर्मक्रिया माझेनि भासे । ऐसें समूळ कर्म जेथ दिसे । तें अनायासें मदर्थ ॥ ३४ ॥ कर्मां आदी मी कर्मकर्ता । कर्मीं कर्मसिद्धीचा मी दाता । कर्मीं कर्मांचा मी फळभोक्ता । या नांव कृष्णार्पणता कर्मांची ॥ ३५ ॥ सहसा ऐसें नव्हे मन । तैं हें शनैःशनैः अनुसंधान । अखंड करितां आपण । स्वरूपीं प्रवीण मन होय ॥ ३६ ॥ मनासी नावडे अनुसंधान । तैं करावें माझें स्मरण । माझेनि स्मरणें मन जाण । धरी अनुसंधान मद्भजनीं ॥ ३७ ॥ भजनअभ्यासपरवडी । मनासी लागे निजात्मगोडी । तेथें बुद्धि निश्चयें दे बुडी । देहअहंता सोडी अभिमान ॥ ३८ ॥ माझ्या स्वरूपावेगळें कंहीं । मनासी निघावया वाडी नाहीं । ऐसें मन जडे माझ्या ठायीं । मदर्पण पाहीं या नांव ॥ ३९ ॥ ऐसें मद्रूपीं निमग्न मन । तरी आवडे माझें भजन । माझिया भक्तीस्तव जाण । परम पावन मद्भक्त ॥ २४० ॥ म्हणसी विषयनिष्ठ मन । कदा न धरी अनुसंधान । तेचि अर्थींचा उपाय पूर्ण । स्वयें श्रीकृष्ण सांगत ॥ ४१ ॥

देशान्पुण्यान् संश्रयेत मद्भक्तैः साधुभिः श्रितान् । देवासुरमनुष्येषु मद्भक्ताचरितानि च ॥ १० ॥

देश पावन कुरुक्षेत्र । अयोध्या देश अतिपवित्र । गंगायमुनांचें अंतर । पवित्र अपार अर्बुदाचळ ॥ ४२ ॥ कलापग्राम नंदीग्राम । पावन देश बदरिकाश्रम । पंचवटी श्रीरामाश्रम । पावन परम गौतमी-तट ॥ ४३ ॥ जेथ लागले श्रीरामचरण । पावन देश दंडकारण्य । मथुरा गोकुळ वृंदावन । परम पावन ब्रह्मगिरी ॥ ४४ ॥ पावन पांडुरंगक्षिती । जे कां दक्षिणद्वारावती । जेथ विराजे विठ्ठलमूर्ती । नामें गर्जती

देशाचारानें, कुळाचारानें किंवा वृद्धाचारानें झालेलें जें वेदोक्त नित्य-नैमित्तिकादि त्या सर्वांस कर्में असें म्हणतात. ३२ त्यांत जे माझ्या उद्देशाने कर्म करितात, त्याला सामान्यतः मदर्पण कर्म म्हणतात. कर्मांच्या आंत-बाहेर मीच आहें, अशी भावना ठेविल्यास कांहीं आयास न पडतां कर्म मदर्पण होतें. ३३ सगळें कर्म माझ्यामुळेंच प्रकाशित होतें. कर्मक्रिया माझ्यामुळेंच भासते. अशा दृष्टीनें जें समूळ कर्म पाहिलें जातें, तें सहज मदर्पणच होतें; ३४ मी कर्मांचा आदि; मी कर्मकर्ता; मी कर्मसिद्धीचा दाता; मी कर्मांतील कर्मभोक्ता; कर्मांतील कृष्णार्पणता आहे. ३५ मन एकाएकीं असें होत नाहीं; पण हळूंहळूं ध्यानानें त्याला स्थिर केलें असतां तें मन आत्मस्वरूपांत तल्लीन होतें. ३६ मनाला जर चिंतन आवडत नसले, तर माझें स्मरण करावें. माझ्या स्मरणानें मन मद्भजनांत तल्लीन होतें. ३७ सतत भजनाच्या संवयीनें मनाला आत्म्याची गोडी लागते, त्यांत बुद्धि खात्रीनें बुडी मारिते व अभिमानहि देहावरील अहंता सोडून देतो. ३८ माझ्या स्वरूपावांचून मनाला प्रवेश करावयास दुसरी जागाच रहात नाहीं. असें माझ्या ठिकाणीं मन जडणें यालाच मदर्पण म्हणतात. ३९ याप्रमाणें मन माझ्या स्वरूपांत निमग्न झालें म्हणजे त्याला माझें भजन आवडूं लागतें. माझ्या भक्तीमुळें माझे भक्त परम पावन होतात. २४० पण ‘ विषयासक्त मन कदापि एकाग्र होऊन चिंतन करणार नाहीं ’ असें जर म्हणशील तर त्याचा उत्तम उपाय श्रीकृष्ण स्वतः सांगत आहे. २४१.

पुण्यान् देशान् संश्रयेत–पुण्य प्रदेशांचा आश्रय करावा. (पुण्य प्रदेशाचें लक्षण–) मद्भक्तैः साधुभिः श्रितान्–माझे भक्त जे साधु त्यांनीं ज्याचा आश्रय केला आहे, (अशा पुण्य देशांचा आश्रय करावा.) देवासुरमनुष्येषु मद्भक्ता-चरितानि च–देव, असुर व मनुष्य यांतील माझ्या भक्तांनीं ज्याचें आचरण केलें आहे त्यांचा आश्रय करावा. १०.

कुरुक्षेत्र पावन देश आहे. अयोध्या अतिशय पवित्र देश आहे. गंगा-यमुना यांच्या मधला दुआब प्रान्त व अबूचा पहाड हीं अत्यंत पवित्र होत. ४२ काल्पी, नंदीग्राम, बदरीकाश्रम हे पावन देश आहेत. पंचवटींतील श्रीरामचंद्राचा आश्रम व गौतमीतीरावरील नाशिक हीं परम पावन होत. ४३ जेथें श्रीरामाचे पाय लागले तें दंडकारण्य; मथुरा, गोकुळ, वृंदावन हे पावन देश आहेत. ब्रह्मगिरि परम पावन आहे. ४४ पंढरपूर पावन आहे, त्यालाच दक्षिण द्वारका

पंढरी ॥ ४५ ॥ निर्दळी सकळ पापांसी । पंचक्रोशी जे कां काशी । पुण्य देश वाराणसी । साधकांसी अतिसाह्य ॥४६॥ पुण्यसरिता जेथ वाहती । तेही साधकां पावन क्षिती । गंगा यमुना सरस्वती । साबरमती वैतरणी ॥ ४७॥ गंडकी नर्मदा तपती । गोदावरी भीमरथी । कृष्णावेण्या तुंगा गोमती । पावन क्षिती श्रीशैल ॥ ४८ ॥ कावेरीचें उभय तीर । पवित्र क्षिती चिदंबर । सरिता प्रतीची पवित्र । जिचेनि जळें नर पावन ॥ ४९ ॥ कृतमाला पयस्विनी । अतिपवित्र ताम्रपर्णी । पवित्र क्षिती नैमिषारण्यीं । साधकां-लागोनी सुसेव्य ॥ २५० ॥ असो हें पवित्रतेचें महिमान । पावना पावन आहे आन । जेथें वसले भक्त सज्जन । तो देश पावन सर्वार्थी ॥ ५१ ॥ जे गांवीं वसती माझे भक्त । तत्संगें तो गांव पुनीत । जे देशीं वसले साधुसंत । तो देश पुनीत त्यांचेनी ॥ ५२ ॥ भक्तांचा वारा लागे जिकडे । अतिपवित्रता होय तिकडे । ते तत्संगती ज्यांसी घडे । पवित्रता जोडे तयांसी ॥ ५३ ॥ चंदनाचे संगतीवरी । सुवास होती आरीबोरी । त्यातें देवद्विज वंदिती शिरीं । तेवीं साधकां करी सत्संग ॥ ५४ ॥ जें केवळ काष्ठ कोरडें । संगें मोल पावले गाढे । त्याची श्रीमंतां चाड पडे । मस्तकीं चढे हरिहरांच्या ॥ ५५ ॥ जैं निजभाग्याची संपत्ती । तैंचि जोडे सत्संगती । सत्संगें पावन होती । जाण निश्चितीं साधक ॥ ५६ ॥ माझे स्वरूपीं ज्यांचें चित्त । अखंड जडलें भजनयुक्त । त्यांसीच बोलिजे मद्भक्त । तेचि संत सज्जन ॥ ५७ ॥ माझे भक्तांचें आचरित । सुर नर असुर वंदित । साधकींही तेंचि एथ । स्वयें निश्चित साधावें ॥ ५८ ॥ जे श्रेष्ठ विनटले भक्तीसी । नारद प्रल्हाद अंबरिषी । तेचि भक्ति अहर्निशीं । साधकीं सद्भावेंसीं साधावी ॥ ५९ ॥

पृथक् सत्रेण वा मह्यं पर्वयात्रामहोत्सवान् । कारयेद्गीतनृत्याद्यैर्महाराजविभूतिभिः ॥ ११ ॥

म्हणतात. तेथें विठ्ठलाची मूर्ति शोभत असून पंढरीच्या नांवाचा गजर चालतो. ४५ काशीची पंचक्रोशी सगळ्या पापांचें क्षालन करिते. पुण्य प्रदेश वाराणशी साधकांना अत्यंत साह्य करिते. ४६ गंगा, यमुना, सरस्वती, साबरमती, वैतरणी, गंडकी, नर्मदा, तापी, गोदावरी, भीमरथी, कृष्णा, वेण्या, तुंगा, गोमती या पुण्य नद्या जेथें वहातात, तो प्रदेश साधकाला पावन करितो. श्रीशैल हेंहि पावन क्षेत्र आहे. ४७-४८ कावेरीचे दोन्ही तीर व क्षेत्र चिदंबर हीं पवित्र आहेत. प्रतीची नदीच्या पवित्र जलानें लोक पावन होतात. ४९ कृतमाला, पयस्विनी, ताम्रपर्णी या अतिशय पवित्र आहेत. नैमिषारण्यांतील पवित्र क्षेत्रें साधकांना सेवन करण्यास योग्य आहेत. २५० हा पवित्रपणाचा महिमा राहो, पावना-पेक्षांहि पावन दुसरें एक स्थल आहे. जेथें सज्जन भक्त रहातात तो देश सर्व प्रकारें पावन आहे. ५१ ज्या गावांत माझे भक्त रहातात, तो गांव त्यांच्यामुळें पावन होतो आणि ज्या देशांत साधु-संत रहातात तो देश त्यांच्यायोगें पवित्र होतो. ५२ भक्तांचा वारा जेथें वहात असेल तो भाग अत्यंत पवित्र होतो. त्यांची संगति ज्यांस घडते त्यांस पवित्रता येते. ५३ चंदनवृक्षाच्या संगतीनें जशी बाभुळ-बोरीचीं झाडें सुवासानें युक्त होतात व त्यांना देव-ब्राह्मण मस्तकावर धारण करितात त्याप्रमाणें साधकाला सत्संग पावन करितो. ५४ जें केवळ वाळलेलें काष्ठ त्यालाहि संगतीमुळें मोठी किंमत चढते. श्रीमंतांना त्याची आवड उत्पन्न होते व तें हरि हरांच्या मस्तकावर चढते. ५५ जेव्हां आपले भाग्य उदयाला येते तेव्हांच सत्संगति घडते व साधक सत्संगतीनें पावन होतात, हें निश्चयानें जाण ५६ ज्यांचें चित्त माझ्या स्वरूपांत अखंड जडतें त्यांना मद्भक्त म्हणावें. तेच संतसज्जन होत. ५७ माझ्या भक्तांच्या आचरणाला सुर, नर व असुर वंदन करितात. यास्तव साधकानें हेंच निश्चयानें साधावें. ५८ नारद, प्रल्हाद, अंबरीष इत्यादि श्रेष्ठ भक्त ज्या भक्तींत सादर झाले, तीच भक्ति साधकानें रात्र-दिवस सद्भावानें साधावी. ५९.

मह्यं पृथक् सत्रेण वा गीतनृत्याद्यैः महाराजविभूतिभिः पर्वयात्रामहोत्सवान् कारयेत्-मला उद्देशून पृथक पृथक् किंवा पुष्कळांनीं एकत्र जमून गीत, नृत्य इत्यादिकांनीं व महाराजांच्या ऐश्वर्यांनीं एकादश्यादि पर्वें व यात्रा या प्रसंगीं महोत्सव करवावे. ११.

वार्षिकी यात्रा पर्वपूजा । भावें अर्पावी अधोक्षजा । छत्रचामरादि वोजा । गरुडध्वजांकित चिन्हीं ॥ २६० ॥ ऐशिया महाराजविभूती । देवासी अर्पाव्या श्रद्धास्थितीं । भजनालागी अहोरातीं । उल्हास चित्तीं अनिवार ॥ ६१ ॥ अश्वगजादिआरोहण । शेषशयन गरुडासन । महामहोत्सव नरयान । रथोत्सव जाण करावा ॥ ६२ ॥ टाळ घोळ निशाण भेरी । शंख मृदंग मंगलतुरी । नाद न समाय अंबरी । जयजयकारीं गर्जती ॥ ६३ ॥ तेथ गीतनृत्यपवाडे । कीर्तन करावें वाडेंकोडें । हुंबरी आखरी बागडें । देवापुढें धरावें ॥ ६४ ॥ तोंड करूनि वांकुडें । वाकुली दावावी देवाकडे । वर्णावे देवाचे पवाडे । रंगापुढें गर्जत ॥ ६५ ॥ गोपाळकाल्याचा विन्यास । रासक्रीडेचा उल्हास । गोपाळवेषाचा विलास । मनोहर वेष दावावा ॥ ६६ ॥ दावावी मालेखड्याची परी । झोंबी घ्यावी नानाकुसरी । दंडीं मुंडपीं उरीं शिरीं । परस्परीं हाणत ॥ ६७ ॥ मल्लविद्येच्या आसुडीं । थडक हाणोनियां गाढी । माळमर्दना परवडी । रंगीं गुढी उभवावी ॥ ६८ ॥ कुवलयापीड उन्मत्त । त्याचे उपटोनि गजदंत । गोपाळवेषें डुल्लत । रंगाआंत मिरवावें ॥ ६९ ॥ वानावी देवाची वाढीव । करावी देवाची भाटीव । ऐसे दावूनि हावभाव । महामहोत्सव करावा ॥ २७० ॥ असल्या सामर्थ्यवैभव । स्वयें करावे सकळ उत्सव । नातरी मिळोनियां सर्व । महामहोत्सव करावे ॥ ७१ ॥ ऐशिया अन्यय आवडीं । भजन करितां चढोवढी । माझिया भक्तीची लागली गोडी । जोडिलें जोडी हरिप्रेम ॥ ७२ ॥ सप्रेम भक्ति करितां जाण । तेणें मी भक्तांसी तुष्टमान । माझें अंतरंगभजन । मद्भक्त आपण स्वयें लाहे ॥ ७३ ॥ अंतरंगभक्ति म्हणसी कोण । तें भक्तीचें निजलक्षण । उद्धवाप्रती श्रीकृष्ण । स्वमुखें आपण सांगत ॥ ७४ ॥

आषाढी, कार्तिकी सारख्या वार्षिक यात्रा कराव्या, किंवा पर्वकाळीं गरुडध्वजांकित चिन्हानें युक्त छत्रचामरादिकांची पूजा भक्तीनें श्रीकृष्णाला अर्पण करावी. २६० असे सार्वभौम राजाच्या वैभवासारखे भोग मोठ्या श्रद्धेनें देवाला अर्पण करावेत. मनांत अहो-रात्र भजनाचा अनिवार उल्हास ठेवावा. ६१ देवाला अश्वावर, हत्तीवर, किंवा शेष, गरुड, इत्यादि वाहनांवर किंवा पालखींत बसवून जंगी मिरवणूक काढावी किंवा रथोत्सव करावा. ६२ टाळ, घोळ, पताका, भेरी, शंख, मृदंग मंगलतुरी इत्यादि मंगल वाद्यांचा नाद आकाशांत मावणार नाहीं असा मोठा करून जयजयकारांनीं गर्जना करावी. ६३ देवापुढें नृत्य, गीत, पोवाडे व कीर्तन आवडीनें करावें. हुंबरी, आखरी, बागडे इत्यादि खेळ खेळावेत. ६४ तोंड वांकडें करून देवाला वाकुल्या दाखवाव्या, गर्जना करून देवाचे गुणानुवाद गावेत. ६५ गोपालकाल्याची गंमत, रासक्रीडेचा खेळ व गोपाळांचा वेष घेऊन सोंगांचा सुंदर अभिनय करावा. ६६ आखाड्यांतील खेळाचे नाना प्रकार करावेत. नाना तऱ्हेनें झोंबी घ्यावी. परस्परांच्या दंडावर, छातीवर, मस्तकांवर टकरा घ्याव्यात. ६७ मल्लविद्येच्या चातुर्यानें परस्परांस जोरानें धडका द्याव्यात. एकमेकांचें मर्दन करून सभेंत विजयी व्हावें. ६८ उन्मत्त कुवलयापीड हत्तीचे दांत उपटून गोपाळाच्या वेषानें डुलत सभामंडपांत मिरवावें. ६९ देवाचा महिमा उत्कृष्ट प्रकारें वर्णावा. देवाची स्तुति करावी, अशा प्रकारें अभिनययुक्त महा महोत्सव करावा. २७० आपल्याला तेवढें द्रव्यसामर्थ्य असलें तर स्वतः सगळे उत्सव करावेत. किंवा सर्वांनीं मिळून महामहोत्सव साजरे करावेत. ७१ अशा अनन्य प्रीतीनें व चढाओढीनें माझ्या भक्तीची गोडी लागली असतां हरिप्रेम सहजच जोडतें. ७२ सप्रेम भक्ति केली असतां मी भक्तावर प्रसन्न होतों व त्या माझ्या भक्ताला स्वभावतःच माझें आत्मभजन लाभतें. ७३ 'अंतरंग भक्ति कोणती' असें जर विचारशील तर ऐक असें म्हणून श्रीकृष्ण आपल्या मुखानें भक्तीचें लक्षण उद्धवाला सांगत आहे. २७४.

मामेव सर्वभूतेषु बहिरन्तरपावृतम् । ईक्षेतात्मनि चात्मानं यथाखममलाशयः ॥ १२ ॥

भावें करितां माझी भक्ती । शुद्ध होय चित्तवृत्ती । तेणें आत्मदृष्टीची स्थिती । गुरु कृपा पावती मद्भक्त ॥ ७५ ॥ पाहतां निजात्मदृष्टीवरी । मी सर्व भूतांच्या अंतरीं । अंतरींच हा निर्धार धरीं । तंव भूतांबाहेरी मज देखे ॥ ७६ ॥ जो परावरादि अनंत । तो मी भूतांसबाह्य भगवंत । मी तोचि होय माझा भक्त । मिळोनि मजआंत मद्रूपें ॥ ७७ ॥ जैसजैशी माझी व्याप्ती । तैसतैशी भक्तांची स्थिती । जें जें देखें भूतव्यक्ती । तेथ सबाह्य प्रतीती मद्रूपें ॥ ७८ ॥ जेवीं घटामाजीं घटाकाश । तेंचि घटासबाह्य महदाकाश । तेवीं भूतांसबाह्य मी चिद्विलास । माझा रहिवास निजरूपें ॥ ७९ ॥ निश्चयेंसीं निजप्रतीति । भगवद्भाव सर्वां भूतीं । तेंचि भक्तांची भजती स्थिती । यथानिगुती हरि सांगे ॥ २८० ॥

इति सर्वाणि भूतानि मद्भावेन महाद्युते । सभाजयन्मन्यमानो ज्ञानं केवलमाश्रितः ॥ १३ ॥
ब्राह्मणे पुल्कसे स्तेने ब्रह्मण्येऽर्के स्फुलिङ्गके । अक्रूरे क्रूरके चैव समदृक्पण्डितो मतः ॥ १४ ॥

—तीन श्लोकांनीं अंतरंगभक्ति सांगतात—

अमलाशयः–ज्याचें चित्त शुद्ध आहे, अशा पुरुषानें, सर्वभूतेषु आत्मनि च आत्मानं मां एव ईक्षेत्–सर्व भूतांमध्यें व आपल्यामध्यें आत्म्याला म्ह० मलाच पहावें (पण एकाचीं सर्वांमध्यें वृत्ति कशी ? उत्तर–) बहिरन्तर–बाहेर व आंत पूर्ण असलेल्या मला (पण तें तरी कोणत्या कारणानें ? उत्तर–) अपावृतं–आवरणशून्य असल्यामुळें आंत-बाहेर पूर्ण अशा मला पहावें (तें अनावरणत्व तरी कोणत्या कारणानें ? उत्तर–) यथाखं-जसें आकाश असंग आहे तसा असंग, त्यामुळें अनावरण. (अनावरणामुळें आंत बाहेर पूर्ण व त्यामुळें सर्वत्र एकच असलेल्या मज आत्म्याला सर्व भूतांमध्यें व आपल्यामध्यें पहावें.) १२.

श्रद्धेनें माझी भक्ति केली असतां चित्तशुद्धि होते. त्यायोगें गुरुकृपेनें माझ्या भक्तांमध्यें आत्मदृष्टीची पात्रता येते. ७५ आत्मदृष्टीनें पाहिलें असतां सर्व भूतांच्या अंतःकरणांत मीच आहें; असा त्याचा निश्चय होतो व तो सर्व भूतांच्या बाहेरहि मलाच पहातो. ७६ श्रेष्ठ व कनिष्ट यांच्याहि पलीकडे असलेला जो मी अनंत भगवान् सर्वांना अतर्बाह्य व्यापून राहिलों आहें. तो मीच माझा भक्त होऊन, माझ्यांत मिळून मद्रूप होतों. ७७ जशी जशी माझी व्याप्ति प्रकट होते तशी तशी माझ्या भक्तांची स्थिति होते. तो जेवढा प्राणी पहातो, तेवढा त्याला सबाह्य मद्रूपानें प्रतीत होतो. ७८ घटामधील घटाकाश जसें घटाबाहेरील महदाकाश होतें, तसें भूतांच्या अंतर्बाह्य मी चैतन्यघन आत्मस्वरूपानें व्यापून रहातों. ७९ निश्चित आत्मानुभावानें सर्व प्राणिमात्रांत भगवद्भाव पहाणें, हेंच भक्तांचें भगवद्भजन होय. त्याचेंच यथार्थ वर्णन श्रीहरि आतां करीत आहे. २८०.

हे महाद्युते-हे अतिप्राज्ञ उद्धवा ! इति केवलं ज्ञानं आश्रितः सर्वाणि भूतानि मद्भावेन मन्यमानः सभाजयन्–याप्रमाणें केवल ज्ञानाचा आश्रय केलेला, सर्व भूतांना माझ्या भावानें मानणारा व त्यांची पूजा करणारा, (' अहो-पण, उत्तम, मध्यम व अधम यांमध्यें एकरूपानें पूजा करणें हें मूर्खत्वच आहे. कारण त्यांत पूज्यांच्या पूजेचा अतिक्रम होतो,' अशी आशंका घेऊन त्या ज्ञानदृष्टीचाच विस्तार करितात–) ब्राह्मणे पुल्कसे स्तेने ब्रह्मण्ये अर्के स्फुलिंगके अक्रूरे क्रूरके च एव समदृक् पंडितः मतः–ब्राह्मण, चांडाल, चोर, ब्राह्मणभक्त, सूर्य, किटाळ, अक्रूर व क्रूर यांमध्यें समदृष्टि ठेवणारा समब्रह्माला-मलाच पहाणारा पंडित मानलेला आहे. (ब्राह्मण व चांडाल यांचें जातितः, ब्राह्मणाचें धन हरण करणारा व त्यास तें देणारा यामध्यें कर्मतः, सूर्य व किटाळ यांमध्यें गुणतः आणि अक्रूर व क्रूर यामध्यें स्वभावतः असें चार प्रकारचे वैषम्य येथें दाखविलें आहे.)

उद्धवा तुझें भाग्य अमूप । तूं ज्ञाननिधि कैवल्यदीप । सर्व भूतीं माझें रूप । चित्स्वरूप सबाह्य ॥ ८१ ॥ यापरी गा सर्वभूतीं । माझ्या स्वरूपाची अनुस्यूती । लक्षोनि जो करी भक्ती । नानाव्यक्ती समभावें ॥ ८२ ॥ भिन्न रूप भिन्न नाम । भिन्न स्थिति भिन्न कर्म । जग देखतांही विषम । मद्भक्तां सम मद्भावो ॥ ८३ ॥ भूतें देखतांही भिन्न । भिन्नत्वा न ये ज्याचें ज्ञान । मद्भावें भजे समान । त्यासी सुप्रसन्न भक्ति माझी ॥ ८४ ॥ ज्यासी प्रसन्न माझी भक्ती । त्याचा आज्ञाधारक मी श्रीपती । जो भगवद्भावें सर्व भूतीं । सुनिश्चितीं उपासक ॥ ८५ ॥ आशंका॥ तुझी वेदाज्ञा तंव प्रमाण । अतिशयें पूज्य ब्राह्मण। उपेक्षावे असुरजन । चांडाळ जाण अतिनिंद्य ॥ ८६ ॥ कर्मभ्रष्ट जे जे लोक । त्यांचें पाहों नये मुख । हे वेदमर्यादा देख । तुवांचि निष्टंक नेमिली ॥ ८७॥ तेथ सर्व भूतीं समान । केवीं घडे भगवद्भजन ।ऐसा विकल्प कल्पील मन । तरी ऐक महिमान भक्तीचें ॥८८॥ जंव अंधारासी सबळ राती। तंवाचि प्रतिष्ठा दीपस्थिती । तेथ उगवल्या गभस्ती । दीपाची दीप्ति असतांचि नाहीं ॥ ८९ ॥ तेवीं जंववरी दृढ अज्ञान । तंवाचि वेदाज्ञा प्रमाण । ज्यासी माझें अभेदभजन । तयासी वेद आपण स्वयें वंदी ॥२९०॥ वेद बापुडा तो किती । ज्यासी माझी अभेदभक्ती । त्यासी मी वंदी श्रीपती । सदा वशवर्ती तयाचा ॥ ९१ ॥ अभेदभक्ती जेथ पुरी । मी नाटिकारू त्याचे घरीं । त्याचा संसार माझे शिरीं । योगक्षेम करीं मी त्याचा ॥ ९२ ॥ अभेदभक्तीचें महिमान । तिच्या पायां लागे आत्मज्ञान । तेथ वंद्यानिंद्य समसमान । विषमींही जाण विकारेना ॥ ९३ ॥

ज्यांचें वंदितां पदरज जाण । पवित्र होइजे आपण । ऐसे पुण्य पूज्य जे ब्राह्मण । त्यांचे हृदयीं चरण हरि वाहे ॥ ९४ ॥ ऐसे अतिवंद्य जे ब्राह्मण । आणि चांडाळांमाजीं निंद्य हीन । तो पुल्कसु द्विज-

---

हे उद्धवा ! तुझें भाग्य थोर आहे. तूं ज्ञानाचा ठेवा आणि कैवल्यदीप आहेस. सर्व भूतांतील सबाह्य चित्स्वरूप हेंच माझें रूप आहे. ८१ याप्रमाणें जो सर्व भूतांत माझें स्वरूप ओतप्रोत भरलेलें आहे अशा भावनेनें माझें भजन करितो, तो भिन्न-भिन्न व्यक्तींना समदृष्टीनें पहातो. ८२ भिन्न रूप, भिन्न नाम, भिन्न स्थिति, भिन्न कर्म यांनीं युक्त असलेलें हें विषम जगत् पहात असतांहि माझे भक्त सर्वांमध्यें सम मद्भाव ठेवितात. ८३ भिन्न-भिन्न प्राणी पाहत असूनहि ज्याच्या ज्ञानांत भेदभाव उपजत नाहीं, जो मद्भावानें सर्वांची समान सेवा करितो, त्यावर माझी भक्ति प्रसन्न होते. ८४ ज्यावर माझी भक्ति प्रसन्न होते त्याचा मी श्रीपति आज्ञाधारक होऊन रहातों. कारण तो सर्व भूतांत मद्भावना ठेवून निश्चयी उपासक असतो. ८५ (आशंका—) ' तुझ्या वेदाची आज्ञा प्रमाण मानावी, तर त्यांत असें म्हटलें आहे कीं, ब्राह्मण अतिशय पूज्य आहेत. असुरांची उपेक्षा करावी. चांडाळांना अत्यंत निंद्य समजावें ८६ कर्मभ्रष्ट लोकांचें मुखावलोकनहि करूं नये. अशी वेदमर्यादा तूंच निक्षून घातली आहेस. ८७ तेव्हां आतां सर्व प्राणि-मात्रांत समभाव ठेवून भगवद्भजन कसें घडणार ! ' असा विकल्प जर तुझ्या मनांत येईल तर भक्तीचा महिमा ऐक. ८८ जोंवर काळकभिन्न अंधारी रात्र असते तोंवरच दिव्याचें महत्त्व वाटतें; पण सूर्य उगवतांच दिव्याचा प्रकाश असून-नसून सारखाच होतो. ८९ त्याप्रमाणें जोंवर अज्ञान असतें, तोंवरच वेदाज्ञा प्रमाण आहे; पण ज्याला माझें अभेदभजन प्राप्त झालें त्याला वेद स्वतः आपण होऊनच वंदन करितो. २९० वेद तो बापडा कितीसा ! माझी अभेद भक्ति करणारांस मी श्रीपति वंदन करितों, व सर्वदा त्याच्या वश होऊन रहातों. ९१ ज्याच्यापाशीं पूर्ण अभेद भक्ति असते त्याच्या घरीं मी बिऱ्हाड करून रहातों व त्याच्या संसाराचा सगळा भार माझ्या शिरावर घेऊन मी त्याचा योगक्षेम चालवितों. ९२ अभेद भक्तीचा महिमा असा आहे कीं, आत्मज्ञान तिच्या पायीं लागतें. वंद्य-निंद्य समान दिसतात. विषमांतहि भेद दिसत नाहीं. २९३.

ज्यांच्या चरणधुलीला वंदन केलें असतां आपण पावन होतों, त्या पूज्य ब्राह्मणांचे चरण श्रीहरि श्रीवत्सलांछन-रूपानें हृदयावर वहातो. ९४ असे जे अतिवंद्य ब्राह्मण आणि चांडालांतील हीन पुल्कसासारखे जे निंद्य जीव या दोघां-

वरांसमान । हरिरूपें जाण भक्त देखे ॥९५॥ सुवर्णविष्णु सुवर्णश्वान । एक पूज्य एक हीन । विकूं जातां मोल समान । निंद्यवंद्य जाण आत्मत्वीं तैसें ॥ ९६ ॥ पुल्कस आणि ब्राह्मण । जातिभेदें विषमपण । आत्मदृष्टी पाहतां जाण । दोघे समान चिद्रूप ॥ ९७ ॥ जो बळेंचि ब्रह्मस्व चोरी । जो ब्राह्मणा अतिउपकारी । दोघे निजात्मनिर्धारीं । सद्रूपें करीं समसाम्य भक्तां ॥ ९८ ॥ जेवीं डावा उजवा दोनी हात । एक नरकीं एक पुण्यार्थ । हा कर्माकर्मविपरीतार्थ । समान निश्चित ज्याचे त्यासी ॥ ९९ ॥ तेवीं सर्वस्वें ब्राह्मणांचा दाता । कां जो ब्राह्मणांचा अर्थहरिता । दोहींसी कर्मांची विषमता । निजात्मता समान ॥ ३०० ॥ सूर्य आणि खद्योत । तेजविशेषें भेद भासत । निजात्म तेजें पाहतां तेथ । समसाम्य होत दोहींसी ॥ १ ॥ दावाग्नि आणि दिवा । भेद भासे तेजवैभवा । निजतेजें समानभावा । तेवीं तेजप्रभावा आत्मत्वें समता ॥ २ ॥ एक सत्त्ववृत्ती अतिशांत । कां जो क्रूर तामस क्रोधयुक्त । गुणवैषम्यें भेद भासत । आत्मत्वें निश्चित समसाम्य ॥ ३ ॥ कर्पूराग्नि सोज्ज्वळ फुडीं । राईसंगें तो तडफडी । तेवीं सत्त्वतमपरवडी । शांति आणि गाढी क्रोधावस्था ॥ ४ ॥ एक आपत्काळीं सर्वसत्ता । होय एकाचा प्राणरक्षिता । एक प्राणदात्याच्या घाता । प्रवर्ते क्रूरता कृतघ्न जो ॥ ५ ॥ हे पुण्यपापविषमता जाण । ऐसेही ठायीं भक्त सज्ञान । वस्तु देखती समसमान । उभयतां जाण निजात्मबोधें ॥ ६ ॥ वृक्षासी जो प्रतिपाळी । कां जो घाव घाली मूळीं । दोघांही समान पुष्पीं फळीं । तेवीं आत्ममेळीं पातक्यां घाली ॥ ७ ॥ द्विजांचें सोवळें धोत्र । कां मद्यपियाचें मलिन वस्त्र । सूत्रदृष्टीं समान सूत्र । मशक सृष्टिकर आत्मत्वीं तैसे ॥ ८ ॥ मशक आणि सृष्टिकर्ता । भजनीं समान मद्भक्तां । हे चौथे भक्तीची अवस्था । अपावो सर्वथा रिघों न शके ॥ ९ ॥ जेथूनि येवों रिघे अपावो । तेथेंचि देखती भगवद्भावो । तेव्हां अपाव

नाहि भक्त हरिरूपानें पहातो. ९५ सोन्याची विष्णूची प्रतिमा केली व सोन्याचा कुत्रा बनविला, तर आपण एकाला पूज्य व दुसऱ्याला हीन मानितो; परंतु बाजारांत ती दोन्हीं विकूं गेल्यास निंद्य व वंद्य अशा त्या दोहोंच्या सोन्याची किंमत जशी सारखीच होते. तसेंच आत्मस्वरूप आहे. ८९६ पुल्कस व ब्राह्मण हे जातिभेदानें विषम आहेत; पण आत्मदृष्टीनें पाहिल्यास दोघेहि चिद्रूपानें समान आहेत. ९७ जो बलात्कारानें ब्राह्मणांचें द्रव्यादि सर्वस्व चोरितो व जो ब्राह्मणांवर उपकार करितो ते दोघेहि माझ्या भक्तांना आत्मदृष्टीनें सम व मद्रूप दिसतात. ९८ डावा व उजवा हात एकाच देहाचा असतां एकाची नरकाकडे व दुसऱ्याची पुण्यकर्माकडे योजना होते. हा त्यांच्या कर्माकर्मांत जरी विपरीत भाव असला तरी ते दोन्ही हात ज्याचे त्याला जसे सारखेच वाटतात, ९९ त्याप्रमाणें ब्राह्मणांस सर्वस्व दान देणारा व ब्राह्मणांचें द्रव्यहरण करणारा या दोघांचें कर्म जरी विषम असलें तरी त्यांचें आत्मस्वरूप सारखेंच आहे. ३०० सूर्य आणि काजवा यांच्या तेजांत भेद दिसतो; पण आत्मदृष्टीनें पाहिलें असतां ते दोघेहि समान दिसतात. १ दावाग्नि आणि दीप यांच्या प्रकाशांत भेद भासतो; पण दोहोंतहि मूळ तेज सारखेंच असतें. याप्रमाणें तेजांतहि आत्मदृष्टीनें साम्यच आहे. २ एखादा सात्त्विक मनुष्य अतिशय शांत असतो व दुसरा तामसी अत्यंत क्रोधयुक्त असतो. गुणवैषम्यानें हे भेद भासतात; पण आत्मरूपानें ते दोघेहि समान असतात, ३ कापुराची ज्वाला सोज्वल असते; पण त्यांत मोहऱ्या टाकिल्या कीं; त्या जशा तडतड उडूं लागतात, त्याप्रमाणें सत्त्व आणि तम यांपासूनच शान्ति व भयंकर क्रोध उत्पन्न होतो. ४ कोणी संकटप्रसंगीं आपलें सर्वस्व वेंचून प्राणरक्षणकर्ता होतो, तर दुसरा एखादा कृतघ्न व क्रूर आपल्या प्राणदात्याचा घात करावयास प्रवृत्त होतो. ५ अशा पुण्यपापाच्या परस्पर वैचित्र्यांत ज्ञानी भक्त सम आत्मतत्त्व पहातात व ते दोघेहि आत्मदृष्टीनें सारखेच आहेत, असें मानितात. ६ जो वृक्षांची जोपासना करितो व जो त्याच्या मुळावर घाव घालितो त्या दोघांसहि वृक्ष जशीं सारखींच फल-पुष्पें देतो, त्याप्रमाणें माझा भक्त पातक्यांसहि आत्मस्वरूप मानितो. ७ ब्राह्मणाचें सोवळें धोतर किंवा मद्यप्याचें मलिन वस्त्र या दोहोंतील सुताकडे विणकराच्या दृष्टीनें पाहिल्यास तें जसें सारखेंच असतें, त्याप्रमाणें माझा भक्त डांस व ब्रह्मदेव या दोघांसहि समान समजतो. ८ माझ्या भक्तांना भजनामध्यें मशक व ब्रह्मदेव सारखेच आहेत. ही चवथ्या भक्तीची अवस्था आहे. तिच्यामध्यें अपाय प्रवेशच करूं शकत नाहीं. ९ कारण जेथून अपायाचा उद्भव होतो, तेथेंच ते भगवद्भाव

तोचि उपावो । मद्भक्तां पहा हो मद्भजनीं ॥ ३१० ॥ ईश्वर आणि पाषाण । भजनीं मद्भक्तां समान । हे भक्तीचें मुख्य लक्षण । चौथी भक्ती जाण या नांव ॥ ११ ॥ स्वकर्म धर्म वर्णाचार । करितांही निजव्यवहार । ज्यासी सर्वभूतीं मदाकार । तो भक्त साचार प्रिय माझा ॥ १२ ॥ ज्यासी सर्वभूतीं बुद्धि समान । तेचि भक्ति तेंचि ज्ञान । तेंचि स्वानंदसमाधान । सत्य सज्ञान मानिती ॥ १३ ॥ असो सज्ञानाची कथा । ज्यासी सर्व भूतीं समता । तो मजलाही मानला तत्त्वतां । मोक्ष सर्वथा वंदी त्यातें ॥ १४ ॥ योग याग ज्ञान ध्यान । सकळ साधनांमाजीं जाण । मुख्यत्वें हेंचि साधन । तेंचि निरूपण हरि सांगे ॥ १५ ॥

नरेष्वभीक्ष्णं मद्भावं पुंसो भावयतोऽचिरात् । स्पर्धाऽसूयातिरस्काराः साहंकारा वियन्ति हि ॥ १५ ॥

जो श्रोत्रिय सदाचार उत्तम । कां जो जातिस्वभावें अधम । कां अनाचारें अकर्म । येथें सद्भावें सम देखे जो वस्तु ॥ १६ ॥ चराचरीं भगवद्भावो । देखणें हा शुद्ध भावो । तरी नराच्याच ठायीं देवो । साक्षेपें पहा हो कृष्ण कां सांगे ॥ १७ ॥ मनुष्यांच्या ठायीं जाण । प्रकट दिसती दोषगुण । तेथ साक्षेपें आपण । ब्रह्म परिपूर्ण पहावें ॥ १८ ॥ चौऱ्यायशीं लक्ष योनी अपार । त्यांत त्र्यायशीं लक्ष नव्याण्णव सहस्र । नवशें नव्याण्णव योनी साचार । मुक्त निरंतर गुणदोषार्थीं ॥ १९ ॥ परी मनुष्ययोनीच्या ठायीं । दोष न देखे जो पाहीं । तोचि देहीं विदेही । अन्यथा नाहीं ये अर्थीं ॥ ३२० ॥ मनुष्यदेहीं ब्रह्मभावो । देखें तो सभाग्य पहा हो । चहूं मुक्तींचा तोचि रावो । जगीं निःसंदेहो तो एक ॥ २१ ॥ सर्व भूतीं भगद्भजन । ऐसें ज्यासी अखंड साधन । त्या नराचा देहाभिमान । क्षणार्धें जाण स्वयें जाये ॥ २२ ॥ जातां देहाचा अहंकार । रिघे सकुटुंब सपरिवार । स्पर्धा असूया तिरस्कार ।

पहातात. तेव्हां माझ्या भक्ताला भजनानें तो अपायच उपाय होतो. ३१० माझ्या भक्ताला भजनामध्यें ईश्वर आणि पाषाण समानच दिसतात. हेंच भक्तीचें मुख्य लक्षण आहे, यालाच चवथी भक्ति म्हणतात. ११ स्वतःच्या वर्णाश्रमाला विहित असलेलीं कर्मे व धर्म आचरणारा जो माझा भक्त व्यवहारांतहि सर्व भूतें मद्रूपच पहातो, तोच माझा खरोखर प्रिय होय. १२ सर्व प्राणिमात्राविषयीं सम बुद्धि ठेवणें, हीच भक्ति व हेंच ज्ञान होय. तेंच खरें स्वानंद समाधान आहे, असें ज्ञानी समजतात. १३ ज्ञानी लोकांची गोष्ट राहो; पण ज्याची सर्व भूतांमध्यें समता असते तो मलाहि खरोखर मान्य असतो. त्याला मोक्ष सर्वथा वंदन करितो. १४ योग, याग, ज्ञान, ध्यान या सर्व साधनांमध्यें हेंच मुख्य साधन आहे. आतां हरि याचेंच निरूपण करीत आहे. ३१५.

—मनुष्यांमध्यें ईश्वरदृष्टि करणाराला सद्यःफलविशेष सांगतात—

नरेषु अभीक्ष्णं मद्भावं भावयतः पुंसः साहंकाराः स्पर्धा-असूया-तिरस्काराः अचिरात् वियन्ति हि—मनुष्यांमध्यें सतत मद्भाव पहाणाऱ्या पुरुषाचे स्वतःविषयीं अहंकार, बरोबरीच्याशीं स्पर्धा, उत्तमाविषयीं असूया व हीनांचा तिरस्कार हे दोष सत्वर निश्चयानें जातात. १५.

सदाचारसंपन्न उत्तम श्रोत्रिय आणि जातिस्वभावधर्माप्रमाणें पातकी किंवा अनाचारानें दुष्कर्म करणारा या दोघांमध्यें सद्भावानें सम आत्मतत्त्व पहाणें १६ व चराचरामध्यें भगवद्भाव पहाणें, हीच शुद्ध भक्ति आहे. पण असें असतां श्रीकृष्ण 'मानवांतच देव आहे' असें आदरानें कां सांगतो ! १७ (उत्तर—) मनुष्यांतच गुण-दोष प्रकट होतात. म्हणून त्यांच्यांतच परिपूर्ण ब्रह्म पहावें. १८ एकंदर चौऱ्यांशी लक्ष योनि आहेत. त्यांतील त्र्यांयशी लक्ष नव्याण्णव हजार नउशें नव्याण्णव योनि गुण-दोषांपासून सर्वदा मुक्त आहेत; १९ परंतु मनुष्ययोनीमध्यें जो दोष पहात नाहीं, तोच खरोखर देहांत असूनहि विदेही आहे, यांत मुळींच संशय नाहीं. ३२० मनुष्यदेहांत जो ब्रह्मभाव पहातो तो खरोखर भाग्यवान् होय. तो चारी मुक्तींचा स्वामी होतो व जगांत निःसंदेह होऊन रहातो. २१ सर्व भूतांत भगवद्भाव पहाणें हें ज्याचें अखंड साधन असतें, त्या मनुष्याचा देहाभिमान अर्ध्या क्षणांत स्वतःच निघून जातो. २२ देहांतील अहंकार

येणेंसीं सत्वर समूळ निघे ।। २३ ।। देहीं ममता तोचि अभिमान । आपुल्या ज्ञानेंसीं समान । त्याचें निर्भर्त्सणें जें ज्ञान । स्पर्धा जाण या नांव ।। २४ ।। आपणाहूनि अधिक ज्ञान । ऐसें जाणोनि आपण । त्याचे गुणीं दोषारोपण । करणें ते जाण असूया ।। २५ ।। भाविक जे साधक जन । त्यांचें छळून सांडी साधन । धिक्कारूनि निर्भर्त्सी पूर्ण । तिरस्कार जाण या नांव ।। २६ ।। इत्यादि दोषसमुदावो । घेऊनि पळे अहंभावो । सर्वां भूतीं भगवद्भावो । देखतांच पहा हो तत्काळ ।। २७ ।। सर्व भूतीं समत्वें भजतां । हें श्रेष्ठ साधन तत्त्वतां । येणें पूर्ण ब्रह्म लाभे हाता । हे साधे अवस्था नरदेहीं ।। २८ ।। तत्काळ होइजे ब्रह्म पूर्ण । या प्राप्तीचें सुगम साधन । कोणाही न करवे जाण । लोकेषणा दारुण जनासी जो सांडी लोकेषणाची लाज । त्याचें तत्काळ होय काज । तेचिविखींचें निजगुज । येथें अधोक्षज सांगत ।। ३३० ।। सांडावी देहगर्वता । सांडावी समान अहंता । सांडावी श्रेष्ठत्वपूज्यता । ब्रह्मसायुज्यता तैं लाभे ।। ३१ ।। सांडावें ममतेचें काज । सांडावें योग्यतेचें भोज । सांडावी लौकिकाची लाज । ब्रह्मसायुज्य तैं लाभे ।। ३२ ।। सांडावा वर्णाभिमान । स्वयें सांडूनि जाणपण । अणुरेणूंसी लोटांगण । घालितां पूर्ण ब्रह्मप्राप्ती ।। ३३ ।।

विसृज्य स्मयमानान् स्वान् दृशं व्रीडां च दैहिकीम् । प्रणमेद्दण्डवद् भूमावाश्वचाण्डालगोखरम् ।। १६ ।।

सहृदां देखतां लोटांगण । घालतां हांसतील संपूर्ण । यालागीं विदेशीं आपण । घालावें लोटांगण । गोखरश्वानां ।। ३४ ।। ऐशी लौकिकाची लाज । धरितां सिद्धि न पवे काज । लोटांगणाचें निजभोज । नाचावें निर्लज्ज सुहृदांपाशीं ।। ३५ ।। सासु सासरा जांवयी । इष्ट मित्र व्याही भायी । ज्यांसी देखतांचि पाहीं । विरजे देहीं लाजोनी ।। ३६ ।। त्यांचिदेखतां आपण । लाज सांडोनियां जाण ।

जातांच स्पर्धा, असूया, तिरस्कार हीं सगळीं सहकुटुंब सहपरिवार त्याच्या मागोमाग सत्वर निघून जातात. २३ देहावरील ममता हीच अहंता व आपल्या ज्ञानाच्या बरोबरीनें ज्याचें ज्ञान असेल, त्याच्या ज्ञानाची निर्भत्सना करणें हीच स्पर्धा होय. २४ एखाद्यांत आपल्यापेक्षां अधिक ज्ञान असलेलें पाहून त्याच्या गुणांत दोष पहाणें ही असूया होय. २५ भाविक भोळ्या साधकांना फसवून त्यांचें द्रव्य लुबाडून घेणें व त्यांचा धिक्कार करून पूर्ण निर्भत्सना करणें याला तिरस्कार म्हणतात. २६ अहंकार या सर्व दोषांच्या समुदायाला घेऊन सर्वांभूतीं भगवद्भाव पहातांच तत्काल पळून जातो. २७ सर्व प्राणिमात्रांत समत्व पहाणें, हेंच खरोखर श्रेष्ठ साधन आहे. यानेंच पूर्ण ब्रह्म हातीं येतें. पण ही अवस्था मनुष्यजन्मांतच साधते. २८ तत्काळ पूर्ण ब्रह्म होण्याचें सुलभ साधन कोणालाहि आचरितां येत नाहीं. कारण लोकांना दारुण लोकैषणा असते. २९ जो लोकैषणेची लाज सोडितो त्याचें कार्य तत्काल होतें. श्रीहरि त्याविषयींचेंच हितगुज सांगत आहे. ३३० जेव्हां देहाचा गर्व टाकावा, सन्मानाची अहंता टाकावी, श्रेष्ठत्व व पूज्यता टाकावी, तेव्हां ब्रह्मसायुज्य लाभतें. ३१ जेव्हां ममतेचें कार्य सोडावें, मोठेपणाची हांव टाकावी व लौकिकाची चाड सोडावी तेव्हां ब्रह्मसायुज्याची प्राप्ति होते. ३२ वर्णाभिमान सोडून, स्वतःचें ज्ञातेपण टाकून अणु-रेणूपुढें लोटांगण घातलें असतां पूर्ण ब्रह्मप्राप्ति होते. ३३३.

—नन्तर अन्तर्यामीच्या दृष्टीनें सर्वांना प्रणाम करावा असें सांगतात—

स्मयमानान स्वान् दैहिकीं दृशं व्रीडां च विसृज्य आश्व-चाण्डाल-गो-खरं भूमौ दंडवत् प्रणमेत्—हंसणाऱ्या आपल्या मित्रांना ' मी उत्तम व हा नीच ' अशी देहसंबंधी दृष्टि व तिच्या योगानें प्राप्त होणारी लज्जा यांना सोडून कुत्रा, चांडाल, बैल व गाढव या प्राण्यांपर्यंत सर्वांपुढें भूमीवर दंडाप्रमाणें पडून प्रणाम करावा. १६.

आप्तेष्टांच्या समोर लोटांगण घातलें असतां ते सगळे आपल्याला हंसतील म्हणून निर्जन प्रदेशीं जाऊन गायी, गाढव व कुत्रें यांना लोटांगण घालावें, ३४ अशी लौकिकाची चाड धरल्यास कार्यसिद्धि होणार नाहीं. लोटांगणाची गर्दी करावी, इष्टमित्रांच्या पुढें निर्लज्जपणानें नाचावें. ३५ सासु, सासरा, जांवई, इष्ट मित्र, व्याही, बंधु यांना पहा-

चांडाळादि हीन जन । गो खर श्वान वंदावीं ।। ३७ ।। तेंही ऐसें गा वंदन । दंडाचे परी आपण । सर्व भूतां लोटांगण । भगवद्भावें जाण घालावें ।। ३८ ।। तेथ ब्रह्मवेत्ते ब्राह्मण । कां अंत्यजादि हीन जन । यांच्या ठायीं लोटांगण । सारिखें जाण सद्भावें ।। ३९ ।। गाय गाढव सूकर श्वान । यांच्याही ठायीं आपण । दंडवत लोटांगण । सद्भावें संपूर्ण घालावें ।। ३४० ।। साधावया निजकार्य पूर्ण । लोकलाज सांडीं खणोन । माशी मुंगी मुरकूट जाण । त्यांसीही लोटांगण दंडप्राय ।। ४१ ।। भावें वंदितां गोखररज । प्रकटे भगवद्भजनतेज । त्याजूनि स्वजनांची लाज । वंदी निजभोज लोटांगणेंसीं ।। ४२ ।। त्यजूनि संदेहविषमता । लोकलज्जे हाणोनि लाता । भगवद्बुद्धीं सर्व भूतां । घालावें तत्त्वतां लोटांगण ।। ४३ ।। म्हणसी ऐसें हें साधन । कोठवरी करावें आपण । तेंचि मर्यादानिरूपण । स्वयें श्रीकृष्ण सांगत ।। ४४ ।।

यावत्सर्वेषु भूतेषु मद्भावो नोपजायते । तावदेवमुपासीत वाङ्मनःकायवृत्तिभिः ॥ १७ ॥

आपुला देह घालोनि पुढें । जें जें भूत दृष्टी आतुडे । तेथ भगवद्भावें ठसा पडे । बाडेंकोडें निश्चित ।। ४५ ।। दृष्टीं पाहातां जें जें भासे । दृष्टि नातुडतां जें जें दिसे । तें तें ज्यासी अनायासें । भासे आपैसें चिद्रूप ।। ४६ ।। मनाचे कल्पने जें जें आलें । कां कल्पनातीत जें ठेलें । तें तें ज्यासी अनुभवा आलें । स्वरूप आपुलें मद्रूपत्वें ।। ४७ ।। कायिक कर्माचार । वैदिक लौकिक आचार । ते ज्यासी दिसती मदाकार । चराचर मद्रूपें ।।४८।। जागृतिस्वप्नसुषुप्तीसीं । देखिजे भोगिजे ज्या सुखासी । तें तें मद्रूप ज्यासी । निश्चयेंसीं ठसावे ।। ४९ ।। स्वाभाविक जे व्यापार । देहीं निपजती अपार । ज्यासी मद्रूपें साचार । निश्चयें निर्धार ढळेना ।। ३५० ।। ऐशी न जोडतां अवस्था । सर्व भूतीं भगवद्भावता । भजावें गा तत्त्वतां । निजस्वार्थालागूनी ।। ५१ ।। हे सांडूनि भजनावस्था । नाना साधनीं प्रयास

तांच लाज वाटते. ३६ ती सोडून त्यांच्या देखत चांडाळादि हीन जन, गायी, गाढव, कुत्रें यांस वंदन करावें. ३७ तेंहि वंदन असें करावें कीं, त्यांच्यापुढें साष्टांग दंडवत घालावा. सर्व भूतांपुढें भगवद्भावानें लोटांगण घालावें. ३८ त्यांत ब्रह्मवेत्ते ब्राह्मण किंवा हीन अंत्यज हा भेद न ठेवितां त्यांच्यापुढें भगवद्भावानें एकसारखेंच लोटांगण घालावें. ३९ गाय, गाढव, डुक्कर, कुत्रें यांच्याहि ठिकाणीं सद्भावानें दंडवत, लोटांगण घालावें. ३४० आपलें कार्य पुरतेपणें साधण्यासाठीं लोकलज्जा समूळ खणून टाकावी आणि माशी, मुंगी, डांस यांसहि दंडवत घालावा. ४१ गायी, गाढव यांच्या धुळीला भक्तिभावानें वंदन केलें असतां भगवद्भजनाचें तेज प्रकट होतें. ४२ म्हणून स्वजनाची लाज सोडून सर्वांपुढें लोटांगण घालून वंदन करावें. ४३ 'हें साधन कोठपर्यंत करावें' असें जर विचारशील तर त्याच्या मर्यादेचें निरूपण श्रीकृष्ण स्वतः करीत आहे. ३४४.

—याप्रमाणें पांच श्लोकांनीं सांगितलेल्या समदृष्टीचा अवधि पुढील दोन श्लोकांनीं सांगतात—

यावत् सर्वेषु भूतेषु मद्भावः न उपजायते तावत् वाङ्मनः-कायवृत्तिभिः एवं उपासीत—जोंवर सर्व भूतांमध्यें मद्भाव-माझी दृष्टि उत्पन्न होत नाहीं, तोंवर शरीर—वाक्—मन यांच्या वृत्तींनीं अशी उपासना करावी. १७.

आपला देह पुढें घालून जो जो प्राणी आपल्या दृष्टीच्या टप्प्यांत येईल त्यावर खरोखर भगवद्भावनेचाच ठसा उमटतो. ४५ दृष्टीनें पहातां जें भासतें, किंवा दृष्टीवांचून जें जें दिसतें, तें त्याला स्वभावतःच ज्ञानस्वरूप भासतें. ४६ मनाच्या कल्पनेंत जें येतें व कल्पनेच्या बाहेर जें असतें, तें मद्रूपानें आपलेंच स्वरूप आहे, असें त्याच्या अनुभवास येतें. ४७ देहानें होणारें कर्माचें आचरण, वैदिक, लौकिक आचार व चराचर हें ज्याला मद्रूपानें मदाकारच दिसतात, ४८ तो जागृति, स्वप्न व सुषुप्ति, यांत जें सुख पहातो किंवा भोगितो तें सगळें मद्रूपच आहे, असें त्याच्या मनावर ठसतें. ४९ किंवा देहांतील स्वाभाविक असंख्य व्यापार मद्रूपानेंच होतात, हा त्याचा निश्चय ढळत नाहीं. ३५० अशी अवस्था प्राप्त न होईल तर सर्व भूतांत भगवद्भावना ठेवून स्वार्थासाठीं भजन करावें ५१ हें भजन

करितां । माझ्या अनुभवाची वार्ता । न चढे हाता कल्पांतीं ॥ ५२ ॥ ऐसें जाणूनियां आपण । सर्व भूतीं भगवद्भजन । करावें निश्चयेंसीं जाण । हे आज्ञा संपूर्ण पैं माझी ॥ ५३ ॥ सांडोनि युक्तीची व्युत्पत्ती । धरितां भगवद्भाव सर्व भूतीं । येणेंचि माझी सुगम प्राप्ती । जाण निश्चितीं उद्धवा ॥ ५४ ॥ माझिये प्राप्तीचें सुगम साधन । उद्धवा तुवां पुशिलें जाण । सर्व भूतीं भगवद्भजन । तदर्थ जाण सांगीतलें ॥ ५५ ॥ हा ब्रह्मप्राप्तीचा उपाव पूर्ण । माझे जिव्हारींची निजखूण । सुगमप्राप्तीलागीं जाण । उत्तम साधन सांगीतलें ॥ ५६ ॥ येणें सुगम ज्ञानस्थिती । येणें सुगम माझी भक्ती । येणें सुगम माझी प्राप्ती । जाण निश्चितीं उद्धवा ॥ ५७ ॥ सर्व भूतीं ब्रह्मस्थिती । ज्यासी निश्चयें जाहली प्राप्ती । त्यासी उपरमे भजनवृत्ती । तेंचि श्रीपति सांगत ॥ ५८ ॥

सर्वं ब्रह्मात्मकं तस्य विद्ययाऽऽत्ममनीषया । परिपश्यन्नुपरमेत्सर्वतो मुक्तसंशयः ॥ १८ ॥

काया वाचा आणि चित्तें । सर्व भूतीं भजले मातें । त्यांसीं भगवद्रूप सर्व भूतें । सुनिश्चितें ठसावती ॥ ५९ ॥ तेव्हां मी एक एथें । भगवद्रूप पाहें सर्व भूतें । हेही वृत्ति हारपे तेथें । देखे सभोंवतें परब्रह्म ॥ ३६० ॥ परब्रह्म देखती वृती । तेही विरे ब्रह्माआंतौती । जेवीं घृतकणिका घृतीं । होय सुनिश्चितीं घृतरूप ॥ ६१ ॥ तेव्हां ब्रह्मचि परिपूर्ण । हेही स्फूर्ति नुरे जाण । गिळूनियां मीतूंपण । ब्रह्मीं ब्रह्मपण अहेतुक ॥ ६२ ॥ तेथें हेतू मातु दृष्टांतू । खुंटला वेदेंसीं शास्त्रार्थू । हारपला देवभक्तू । अखंड वस्तू अद्वयत्वें ॥ ६३ ॥ गेलिया दोराचें सापपण । दोर दोररूपें परिपूर्ण । हो कां भासतांही सापपण । दोरीं दोरपण अनसुट ॥ ६४ ॥ तेवीं प्रपंच सकारण । गेलिया ब्रह्मचि परिपूर्ण । कां दिसतांही प्रपंचाचें भान । ब्रह्मीं ब्रह्मपण अनुच्छिष्ट ॥ ६५ ॥ याचिलागीं सर्व भूतीं । करितां माझी भगवद्भक्ती । एवढी

सोडून अनेक साधनांचा प्रयास केला तरी माझ्या अनुभवाची प्राप्ति केव्हांहि हातीं येणार नाहीं. ५२ हें पूर्णपणें जाणून सर्व भूतांत भगवद्भाव ठेवून माझें भजन करावें. ही माझी पूर्ण आज्ञा आहे. ५३ उद्धवा ! युक्तीचें भाषण सोडून सर्व भूतांमध्यें ईश्वरभाव ठेविला असतां माझी प्राप्ति सहज होते, हें खात्रीनें जाण. ५४ उद्धवा ! तूं माझ्या प्राप्तीचें सुलभ साधन विचारिलेंस म्हणून मी 'भूतमात्रांत ईश्वरभाव ठेवून मला भजणें' हा उपाय सांगितला. ५५ हा ब्रह्मप्राप्तीचा पूर्ण उपाय आहे. ही माझ्या हृदयांतील आत्मखूण आहे. हेंच सुलभ ब्रह्मप्राप्तीसाठीं उत्तम साधन सांगितलें. ५६ उद्धवा ! याच्यायोगें माझें ज्ञान, माझी भक्ति व माझी प्राप्ति सुगम होते, हें निश्चित जाण. ५७ ज्याची सर्व प्राण्यांत ब्रह्मभावना निश्चित झाली त्याची भजनवृत्तीहि नाहींशी होते. तेंच आतां श्रीहरि सांगत आहे. ३५८.

तस्य आत्ममनीषया विद्यया सर्वं ब्रह्मात्मकं भवति—असें आचरण करणाऱ्या पुरुषाला सर्वत्र ईश्वरदृष्टीनें प्राप्त होणारी जी विद्या तिच्या योगानें सर्व ब्रह्मात्मकच होतें. वास्तव, परिपश्यन् मुक्तसंशयः सर्वतः उपरमेत्—सर्वतः ब्रह्मच पहाणाऱ्या व संशयरहित झालेल्या पुरुषानें सर्व कर्मांपासून निवृत्त व्हावें. १८.

कायावाचामनानें सर्व भूतांत मद्भाव ठेवून मला भजलें असतां, त्याला सर्व भूतें निश्चयानें मद्रूपच दिसूं लागतात. ५९ 'मी एक सर्व प्राण्यांना भगवद्रूप पहातों' ही वृत्तीहि नाहींशी होते व तो सभोंवार परब्रह्म पाहतो. ३६० तुपाच्या कण्या विरघळल्या म्हणजे त्या तुपाशीं जशा एकरूप होतात त्याप्रमाणें सर्वत्र परब्रह्म पहाणारी वृत्ति ब्रह्मामध्यें लीन होते. ६१ तेव्हां सर्वत्र परिपूर्ण ब्रह्मच भरलेलें आहे, ही स्फूर्तिहि उरत नाहीं. 'मीतूंपणाला' गिळून ब्रह्मामध्यें ब्रह्मस्वरूप निःकारण उरतें. ६२ तेव्हां हेतु, गोष्टी, दृष्टान्त, वेदासह शास्त्रार्थ हीं सारीं खुंटतात. देव-भक्त हें भान नाहींसे होतें व अद्वयपणानें एक अखंड परब्रह्म उरतें. ६३ दोरावरील सापाचा भ्रम गेला कीं, दोरी आपल्या मुळच्या स्वरूपांतच असते. किंवा साप भासत असला तरी दोरीचें स्वरूप विकाररहितच असतें. ६४ त्याप्रमाणें कारणांसह प्रपंच नाहींसा झाला तरी परिपूर्ण ब्रह्मच असतें; किंवा प्रपंचाचें भान होत असतांहि ब्रह्मामध्यें पूर्णब्रह्म कायम असतें. ६५ उद्धवा ! वास्तव सर्व भूतांत माझी भगवद्भक्ति केली असतां साधकाला एवढी प्राप्ति होते, हें तूं निश्चित

साधकांसी प्राप्ती । जाण निश्चितीं उद्धवा ॥ ६६ ॥ तत्काळ पावावया ब्रह्म पूर्ण । सांडूनियां दोषगुण सर्व भूतीं भगवद्भजन । हेंचि साधन मुख्यत्वें ॥ ६७ ॥ याही साधनावरतें । आणिक साधन नाहीं सरतें । हेंचि परम साधन येथें । मजही निश्चितें मानलें ॥ ६८ ॥

अयं हि सर्वकल्पानां सध्रीचीनो मतो मम । मद्भावः सर्वभूतेषु मनोवाक्कायकर्मभिः ॥ १९ ॥

सर्व भूतीं भगवद्दृष्टी । हेंचि भांडवल माझे गांठीं । येणें भांडवलें कल्पकोटी । करोनि सृष्टी मी अकर्ता ॥ ६९ ॥ मज पाहातां निजात्मपुष्टी । सर्व भूतीं भगवद्दृष्टी । हेचि भक्ति माझी गोमटी । ब्रह्मांडकोटी तारक ॥ ३७० ॥ हेचि भक्ति म्यां कल्पादी । सर्व भूतीं भगवद्बुद्धी । नाभिकमळीं त्रिशुद्धी । ब्रह्मा या विधीं उपदेशिला ॥ ७१ ॥ व्रत तप करितां दान । योग याग करितां ध्यान । वेदशास्त्रार्थें साधितां ज्ञान । माझ्या भक्तिसमान ते नव्हती ॥ ७२ ॥ नाना साधनांचिया कोटी । साधकीं साधितां आटाटी । माझ्या प्रेमाची नातडे गोठी । मद्भक्तभेटीवांचूनी ॥ ७३ ॥ माझिया भक्तांचिये संगतीं । साधकां लाभे माझी भक्ती । अभेदभजनें माझी प्राप्ती । जाण निश्चितीं उद्धवा ॥ ७४ ॥ सर्व भूतीं भगवद्भजन । करी तें ऐक पां लक्षण । विषमें भूतें देखतां जाण । मनीं भाव परिपूर्ण ब्रह्मत्वें ॥ ७५ ॥ दुष्ट दुरात्मा अनोळख । नष्ट चांडाळ अनामिक । तेथही ब्रह्मभाव चोख । हें मानसिक निजभजन ॥ ७६ ॥ भूतीं भगवंत परिपूर्ण । ऐसें जाणोनि आपण । भूतांसी लागे अतिदारुण । तें कठिण वचन बोलेना ॥ ७७ ॥ तेथें जातांही निजप्राण । भूतांचे न बोलवे दोषगुण । या नांव गा वाचिक भजन । उद्धवा जाण निश्चित ॥ ७८ ॥ जेणें भूतांसी होय उपकार । ते ते करी देहव्यापार । भेदितां निजजिव्हार । अपकारियां कर उचलीना ॥ ७९ ॥ स्वयें साहूनि अपकार । जो अपकारिया करी उपकार ।

जाण. ६६ पूर्णब्रह्माची तत्काल प्राप्ति होण्यासाठीं गुण-दोष टाकून सर्व भूतांत भगवद्भाव ठेवणें हेंच मुख्य साधन आहे. ६७ या साधनाहून दुसरें श्रेष्ठ साधन नाहीं. हेंच परम साधन होय. हें मलाहि पूर्णपणें मान्य आहे ३६८.

—' ब्रह्मज्ञानाचा हा एकच उपाय आहे कीं, आणखीहि उपाय आहेत,' अशी आकांक्षा झाली असतां ' दुसरे पुष्कळ उपाय आहेत; पण हा सर्वांत उत्तम उपाय आहे' असें सांगतात—

सर्वभुतेषु मनोवाक्कायकर्मभि यः मद्भावः अयं हि सर्वकल्पानां सध्रीचीनः मम मतः—सर्व भूतांमध्यें मन, वाक् व शरीर यांनीं होणाऱ्या कर्मांनीं जो मद्भाव तोच सर्व उपायांतील श्रेष्ठ उपाय म्हणून मला संमत आहे. १९.

सर्व प्राण्यांत ईश्वरदृष्टि ठेवणें हेंच माझ्यापाशीं भांडवल आहे. या भांडवलावरच मी कोट्यवधि सृष्टि निर्माण करून अकर्ताच राहिलों आहें. ६९ आत्मदृष्टीनें माझ्याकडे पाहिल्यास सर्वभूतांत भगवद्भाव ठेवणें, हीच माझी उत्कृष्ट भक्ति आहे. ती कोट्यवधि ब्रह्माण्डांना तारणारी आहे. ३७० सर्व भूतें भगवद्रूप पहावीं हीच माझी भक्ति मीं कल्पाच्या आरंभीं माझ्या नाभिकलांतून उपजलेल्या ब्रह्मदेवाला उपदेशिली. ७१ व्रत, तप, दान, योग, याग, ध्यान, वेद-शास्त्रार्थानें माझें ज्ञान, हीं सगळीं साधनें जरी साध्य केलीं तरी तीं माझ्या भक्तीसारखीं नव्हेत. ७२ कोट्यवधि साधनें जरी मोठ्या खटपटीनें आचरिलीं तरी माझ्या भक्तांची भेट झाल्यावांचून माझ्या प्रेमाची वार्ता सांपडत नाहीं. ७३ उद्धवा ! माझ्या भक्तांच्या संगतीनें साधकाला माझी भक्ति प्राप्त होते. ७४ अभेद भजनानें माझी प्राप्ति होते, हें तूं निश्चयानें जाण. ७४ सर्व भूतांत तो मद्भजन कसें करितो, त्याचें लक्षण ऐक. त्यानें विषम भूतें जरी पाहिलीं तर त्यांच्याविषयीं तो मनांत परिपूर्ण ब्रह्मभाव ठेवितो. ७५ दुष्ट, दुरात्मा, अनोळखी, ज्याचें नांवहि घेऊं नये असा पतित, नष्ट, चांडाल जरी असला तरी त्यांतहि शुद्ध ब्रह्मभाव ठेवणें हें मानसिक भजन होय. ७६ सर्व प्राण्यांत भगवान् परिपूर्ण भरलेला आहे, असें जाणून तो कोणाच्या मनाला टोंचेल असें मर्मभेदक कठोर भाषण करीत नाहीं. ७७ उद्धवा ! तो प्राण गेला तरी लोकांचें गुण-दोष बोलत नाहीं. यालाच वाचिक भजन म्हणतात, हें निश्चयानें जाण. ७८ ज्यायोगें भूतमात्रावर उपकार होतील असाच तो देहाचा व्यापार करीत असतो. त्याच्या मर्मावर जरी कोणीं आघात केला, तरी तो अपकार करणारांवर हात उचलीत नाहीं. ७९ स्वतः अपकार सहन करूनहि अपकार-

ऐसा ज्याचा शरीरव्यापार । तें भजन साचार कायिक ॥ ३८० ॥ यापरी काया वाचा मन । सर्व भूतीं भगवद्भजन । हेंचि मुख्यत्वें श्रेष्ठ साधन । भक्त सज्ञान जाणती ॥ ८१ ॥ ब्रह्मप्राप्तीचे परम कारण । हेंचि एक सुगम साधन । मजही निश्चयें मानलें जाण । देवकीची आण उद्धवा ॥ ८२ ॥ हा भजनधर्म अतिशुद्ध । येथें विघ्नांचा संबंध । अल्पही रिघों न शके बाध । तेंचि विशद हरि सांगे ॥ ८३ ॥

न ह्यङ्गोपक्रमे ध्वंसो मद्धर्मस्योद्धवाण्वपि । मया व्यवसितः सम्यङ्निर्गुणत्वादनाशिषः ॥ २० ॥

अनेक धर्म नाना शास्त्रार्थीं । मन्वादि मुखें बोलिले बहुतीं । परी सर्व भूतीं भगवद्भक्ती । श्रेष्ठ सर्वार्थीं साधकां ॥ ८४ ॥ ये भक्तीचें हेंचि श्रेष्ठपण । इचे पूर्वारंभीं जाण । साधकांपासी अल्पही विघ्न । बाधकपण धरूं न शके ॥ ८५ ॥ ये भक्तीचें निजलक्षण । पूर्वारंभीं हेंचि निर्गुण । एथ रिघावया विघ्न । दादुगेपण धरीना ॥ ८६ ॥ जेवीं गरुडाचे झडपेतळीं । होती सर्पांच्या चिरफळी । तेवीं ये भक्तीजवळी । विघ्नांची होळी स्वयें होये ॥ ८७ ॥ माझिया नामापुढें । विघ्न राहों न शके बापुडें । तें माझें भक्तीकडे । कोणते तोंडें येईल ॥ ८८ ॥ यापरी हे भक्तीसधर । उद्धवा तुझें भाग्य थोर । म्यां फोडूनि निजजिव्हार । साराचें सार सांगीतलें ॥ ८९ ॥ निष्काम जे माझी भक्ती । तेथ विघ्नांची न पडे गुंती । परब्रह्माची ब्रह्मस्थिती । सुलभत्वें प्राप्ती साधकां ॥ ३९० ॥ हेतुक अहेतुक कर्माचरण । तेंही करी जो कृष्णार्पण । ते उत्तम माझी भक्ति जाण । तेंचि निरूपण हरि सांगे ॥ ९१ ॥

कर्त्यावर उपकार करणें, असें ज्याच्या शरीराचें वर्तन असतें, तें कायिक भजन होय. ३८० याप्रमाणें काया-वाचा-मनानें सर्व भूतांत भगवद्भजन करणें हेंच सर्वांत श्रेष्ठ साधन आहे, असें ज्ञानी भक्त मानितात. ८१ उद्धवा! ब्रह्मप्राप्तीचें परम कारण असें हेंच एक सोपें साधन आहे. तें मलाहि निश्चित मान्य आहे, हें मी देवकीची शपथ वाहून सांगतों. ८२ हा भजनधर्म अत्यंत शुद्ध असून त्यांत विघ्नांची अल्पहि पीडा प्रवेश करूं शकत नाहीं. तेंच आतां हरि स्पष्ट करून सांगत आहे. ३८३.

——भगवद्धर्मलक्षण उपायाच्या श्रेष्ठत्वाचेंच पुढील दोन श्लोकांनीं उपपादन करितात——

अङ्ग उद्धव–अरे बाबा उद्धवा! अनाशिषः मद्धर्मस्य उपक्रमे सति अणुः अपि ध्वंसः न–निष्काम भागवतधर्मांचा आरंभ केला असतां वैगुण्यादिकांच्या योगानें यत्किंचित्‌हि नाश होत नाहीं. कारण, मया निर्गुणत्वात् सम्यक् व्यवसितः–मीच निर्गुणत्वामुळें हा धर्म चांगल्याप्रकारें निश्चित केला आहे. [मन्वादिकांच्या मुखानीं कसा तरी सांगितला नाहीं.] २०.

मनु, याज्ञवल्क्य इत्यादि पुष्कळ शास्त्रकारांनीं नानाप्रकारच्या शास्त्रांत अनेक धर्म सांगितले आहेत. परंतु साधकाला सर्व भूतांत भगवद्भक्ति हेंच सर्व प्रकारें श्रेष्ठ साधन आहे. ८४ या भक्तीचा श्रेष्ठपणा हाच आहे कीं, हिच्या आरंभापासूनच साधकाला अल्पहि विघ्न बाधूं शकत नाहीं. ८५ या भक्तीचें लक्षण असें आहे कीं, हिचा मूळ आरंभच निर्गुण आहे. त्यामुळें विघ्नाला तेथें प्रवेश करण्याचें धैर्यच होत नाहीं. ८६ गरुडानें झडप घालितांच सर्पाचे जसे तुकडे होतात, त्याप्रमाणें या भक्तीच्या पुढें विघ्नांचें स्वभावतःच भस्म होतें. ८७ माझ्या नांवापुढेंहि जर बापडें विघ्न उभें रहात नाहीं, तर मग तें माझ्या भक्तापाशीं कोणत्या तोंडानें येईल. ८८ उद्धवा! याप्रमाणें ही भक्ति समर्थ आहे. तुझें थोर भाग्य म्हणून मीं आपलें अंतःकरण खुलें करून तुला सारांतील सार असें आपलें गुह्य हृद्गत सांगितलें. ८९ माझ्या निष्काम भक्तींतहि विघ्नांची बडबड चालत नाहीं. साधकाला परब्रह्माची प्राप्ति सुलभपणानें होते. ३९० सकाम व निष्काम कर्माचरण जो कृष्णार्पण करितो तीहि माझी उत्तम भक्तीच होय. याचेंच निरूपण श्रीकृष्ण सांगतात. ३९१.

यो यो मयि परे धर्मः कल्पते निष्फलाय चेत् । तदायासो निरर्थः स्याद्भयादेरिव सत्तम ॥ २१ ॥

व्यवहारार्थ जो प्रयास केला । जो न फळतां व्यर्थ गेला । तोही जैं परब्रह्मीं अर्पिला । तैं मद्‌भजनीं लागला सद्भक्ती ॥ ९२ ॥ शिमगियाचा महासण । तेथ खेळ खेळला जो आपण । तोही केल्या कृष्णार्पण । तेहि भक्ति जाण मज अर्पे ॥ ९३ ॥ चोराभेणें लपतां वनीं । निधान आतुडे ज्यालागुनी । तेवीं व्यर्थ कर्म मदर्पणीं । तोही मद्भजनीं महालाभ ॥ ९४ ॥ नासलें तें सांडितां क्षितीं । तेंही लागे माझे भक्तीं । जरी ब्रह्मार्पण चित्तीं । साधक निश्चितीं दृढ मानी ॥ ९५ ॥ कडू भोंपळ्याची खिरी । उपेगा न ये श्वानसूकरीं । ते उल्हासें कृष्णार्पण करी । तेंही निर्धारीं ब्रह्मीं अर्पे ॥ ९६ ॥ जें हारपलें न दिसे । जें सहजें उडे काळवशें । तेंही लाविल्या मदुद्देशें । होय अनायासें मदर्पण ॥ ९७ ॥ सकळसारांचें सार पूर्ण । कर्ममात्र कृष्णार्पण । साक्षेपें करावें अर्पण । सद्‌बुद्धि संपूर्ण या नांव ॥ ९८ ॥

एषा बुद्धिमतां बुद्धिर्मनीषा च मनीषिणाम् । यत्सत्यमनृतेनेह मर्त्येनाप्नोति मामृतम् ॥ २२ ॥

अंतरीं विषयांची आसक्ती । वरीवरी ब्रह्मार्पण म्हणती । ते ठकले बहुतां अर्थी । तेंचि श्रीपति सांगत ॥ ९९ ॥ एक बुद्धिमंत हातीं । ते निजबुद्धी घेऊनि हातीं । शेखीं लागले विषयस्वार्थीं । ते ठकिले निश्चितीं देहममता ॥ ४०० ॥ एकांची बुद्धि अतिचोखडी । वेदशास्त्रीं व्युत्पत्ति गाढी । ते अभिमानें कडोविकडी । ठकिले पडिपाडीं ज्ञानगर्वें ॥ १ ॥ बुद्धिमंत अभ्यासी जन । अभ्यासें साधिती प्राणापान ।

सत्तम—हे श्रेष्ठा ! यः यः निरर्थः अपि आयासः सः अपि मयि परे निष्फालय कल्पते चेत् तत् धर्म एव स्यात् भयादेः इव—जो जो लौकिक व्यर्थ आयास तोहि मज परमात्म्याच्या ठिकाणीं निष्कामत्वानें जर अर्पण केला जाईल तर तोहि धर्मच होईल. जसें—भय, शोक इत्यादि कारणानें पळणें, ओरडणें इत्यादि जो क्लेश तोहि फलेच्छा सोडून मला अर्पण केल्यास धर्मच होतो. २१.

व्यवहारासाठीं केलेला प्रयास न फळतां व्यर्थ गेला. तो जर ब्रह्मार्पण केला असता तर सद्भक्तीनें माझ्या भजनींच लागला असता. ९२ शिमग्याच्या महासणांत जो खेळ खेळला असेल, तो जर कृष्णार्पण केला तर तीहि भक्ति मलाच अर्पण होते. ९३ चोराच्या भीतीनें वनांत लपावयास जावें, तों तेथें अनायासानें ठेवा सांपडावा, त्याप्रमाणें सहज केलेलें कर्महि जर मदर्पण केलें, तर माझ्या भजनाचा मोठा लाभच घडतो. ९४ नासलेला पदार्थ भूमीवर फेकून देतात; पण साधकानें दृढ निश्चयानें तोहि ब्रह्मार्पण केल्यास तो माझ्या भक्तींत जमा होतो. ९५ कडु भोपळ्याची खीर केली, तर ती कुत्रीं, डुकरेंहि खात नाहींत. पण ती जर उल्हासानें कृष्णार्पण केली तर तीहि ब्रह्मार्पण होते. ९६ जे हरवलेले पदार्थ सांपडत नाहींत, जें कालाच्या योगानें सहज उडून जातें तें जर मत्प्रीत्यर्थ योजिलें तर तेंहि अनायासानें मदर्पण होतें. ९७ सगळ्या सारांतील पूर्ण सार हेंच आहे कीं, प्रत्येक कर्म कृष्णार्पण करावें. तें आदरानें अर्पण करणें, यालाच सुबुद्धि म्हणतात. ३९८.

—वास्तव माझें भजनच विवेक व चातुर्य यांचें फल आहे असें आतां सांगतात—

यत् सत्यं अमृतं मां अनृतेन मर्त्येन इह आप्नोति एषा बुद्धिमतां बुद्धिः च मनीषिणां मनीषा—जें सत्य व अमृत अशा मला मिथ्या व विनाशी अशा मनुष्यदेहानें याच जन्मांत प्राप्त करून घेणें हाच विवेकी पुरुषाचा विवेक व चतुर पुरुषाचें चातुर्य आहे. २२.

मनांत विषयासक्ति ठेवून वरून ब्रह्मार्पण करणारे लोक अनेक प्रकारें फसले आहेत. तेंच आतां श्रीपति सांगत आहे. ९९ कोणी बुद्धिमान् असतात. ते आपली बुद्धि हातीं धरून विषयांच्या स्वार्थामागें लागतात. ते देहममता धरून फसले जातात. ४०० ज्या कोणाची बुद्धि मोठी तीव्र असते, ते वेद-शास्त्रांत प्रवीण होतात. पण पावलोपावलीं ज्ञानगर्वाच्या अभिमानानें तोंडघशी पडतात. १ कांहीं बुद्धिमान् अभ्यासी लोक अभ्यासानें प्राणापान साध्य करितात. ते योगरूपी

ते योगदुर्गीं रिघतां जाण । ठकिले संपूर्ण भोगसिद्धी ॥ २ ॥ एक मानिती कर्म श्रेष्ठ । वाढविती कर्मक-चाट । विधिनिषेधीं रोधिली वाट । बुडाले कर्मठ कर्मामाजीं ॥ ३ ॥ यापरी नानाव्युत्पत्ती । करितां ठकले नेणों किती । तैसी नव्हे माझी भक्ती । सभाग्य पावती निजभाग्यें ॥ ४ ॥ माझें सर्व भूतीं ज्यासी भजन । त्याचे बुद्धीची बुद्धी मी आपण । ते तूं बुद्धि म्हणसी कोण । कर्म ब्रह्मार्पण महाबुद्धी ॥ ५ ॥ सर्व भूतीं माझें भजन । सर्व कर्म मदर्पण । हे बुद्धीची महाबुद्धि जाण । येणें ब्रह्म पूर्ण स्वयें होती ॥ ६ ॥ चतुराचें चातुर्य गहन । या नांव बोलिजे गा आपण । मिथ्या देहें करूनि भजन । ब्रह्म सनातन स्वयें होती ॥ ७ ॥ आधीं मायाचि तंव वावो । मायाकल्पित मिथ्या देहो । तें देहकर्म मज अर्पितां पहा हो । ब्रह्म स्वयमेवो स्वयें होती ॥ ८ ॥ मिथ्या देहाचेनि भजनें । सत्य परब्रह्म स्वयें होणें । जेवीं कोंडा देऊनि आपणें । कण्यांच्या घेणें महाराशी ॥ ९ ॥ देतां फुटकी कांचवटी । चिंतामणी जडे गांठीं । कां इटेच्या साटोवाटीं । जोडे उठाउठी अव्हाशंख ॥ ४१० ॥ तेवीं मिथ्या देहींचें कर्माचरण । जेणें जीवासी दृढ बंधन । तें कर्म करितां मदर्पण । ब्रह्म परिपूर्ण स्वयें होती ॥ ११ ॥ अनित्य देहाचियासाठीं । नित्यवस्तूसी पडे मिठी । बुद्धिमंतीं बुद्धि मोठी । ज्ञानाची संतुष्टी या नांव म्हणिपे ॥ १२ ॥ निष्टंकित परमार्थ । स्वमुखें बोलिला श्रीकृष्णनाथ । तो कळसा आणोनियां ग्रंथ । उपसंहारार्थ सांगतू ॥ १३ ॥

एष तेऽभिहितः कृत्स्नो ब्रह्मवादस्य सङ्ग्रहः । समासव्यासविधिना देवानामपि दुर्गमः ॥ २३ ॥

संक्षेप आणि विस्तरें । सांडूनि नाना मतांतरें । म्यां सांगितलें निजनिर्धारें । ब्रह्मज्ञान खरें अतिशुद्ध ॥ १४ ॥ तुज सांगितलें करूनि सुगम । परि हें ब्रह्मादि देवां दुर्गम । जे आलोडिती आगम-निगम । त्यांसीही परम दुस्तर ॥ १५ ॥ तेथें नाना शास्त्रार्थ शब्दबोध । वस्तु नेणोनि करिती विवाद ।

किल्ल्यांत प्रवेश करूं लागले कीं, तेथें भोगसिद्धि त्यांस पुरतें ठकवितात. २ कोणी कर्म श्रेष्ठ मानून कर्माचा खटाटोप वाढवितात. विधि-निषेधांनीं त्याची वाट अडवून ठेविलेली असते. त्यामुळें ते कर्मठ कर्मांत बुडतात. ३ याप्रमाणें नानाप्रकारचीं साधनें आचरीत असतां कितीजण फसले आहेत त्यांची गणती नाहीं; पण माझी भक्ति तशी नाहीं. दैववानांस ती मोठ्या भाग्यानें प्राप्त होते. ४ जो सर्व भूतांत मद्भाव ठेवितो त्याच्या बुद्धीचीहि बुद्धि मीच आहें. ती बुद्धि कोणती असें जर विचारशील तर 'कर्म ब्रह्मार्पण करणें' हीच ती महाबुद्धि होय. ५ सर्व भूतांत माझें भजन आणि सगळें कर्म मदर्पण करणें ही बुद्धीचीहि महाबुद्धि आहे. तिच्या योगानें ते स्वतःच पूर्ण परब्रह्म होतात. ६ मिथ्या देहानें भजन करून स्वतः सनातन ब्रह्म होणें हेंच चतुर लोकांचें चातुर्य आहे. ७ आधीं मायाच मिथ्या आहे. तेव्हां मायेनें कल्पिलेला देहहि मिथ्याच आहे. पण तें देहाचें कर्म मला अर्पण केल्यास ते स्वतःच ब्रह्म होतात. ८ कोंडा देऊन कण्यांच्या मोठाल्या राशी घ्याव्या, तसे ते मिथ्या देहानें भजन करून स्वतः सत्य परब्रह्म होतात. ९ फुटकी कांच देऊन चिंतामणि गांठीला बांधावा, किंवा इटेच्या बदली जसा उजवा शंख घ्यावा ४१० त्याप्रमाणें ज्यायोगें जीवाला दृढबंधन होतें, तें मिथ्या देहाचें कर्माचरण मदर्पण केलें असतां ते स्वतःच परिपूर्ण ब्रह्म होतात. ११ अनित्य देहामुळेंच नित्य परब्रह्माची मिठी पडते. हीच बुद्धिमानांची श्रेष्ठ बुद्धि होय. यालाच ज्ञानाचा संतोष म्हणतात. १२ याप्रमाणें श्रीकृष्णनाथानें परम शुद्ध परमार्थ स्वमुखानें सांगितला. आतां ग्रंथ पुरा करण्यासाठीं उपसंहारार्थ सांगत आहेत. ४१३.

—पुढील दोन श्लोकांनीं महाप्रकरणार्थाचा उपसंहार करितात—

देवानां अपि दुर्गमः एषः ब्रह्मवादस्य कृत्स्नः संग्रहः समासव्यासविधिना ते अभिहितः-देवांनाहि दुर्ज्ञेय असलेला हा वेदवादाचा सर्व संग्रह संक्षेप व विस्तार या दोन्हीप्रकारें सांगितला. २३.

अनेक प्रकारचीं मतें सोडून मीं आपल्या स्वतःच्या निर्णयानें खरें व अतिशुद्ध ब्रह्मज्ञान कोठें संक्षेपानें व कोठें विस्तारानें सांगितलें. १४ मीं तुला हें सोपें करून सांगितलें. पण तें ब्रह्मदेवादिकांसहि दुर्लभ आहे. जे आगम-निगमादि शास्त्रें पालथीं घालितात, त्यांसहि तें अत्यंत अगम्य आहे. १५ ते परब्रह्माला जाणत नाहींत व अनेक प्रकारच्या

जेथ वेदांचा ब्रह्मवाद । होय निःशब्द 'नेति' वादें ॥ १६ ॥ तें हें आत्मज्ञानाचें निजसार । परमार्थाचें गुह्य भांडार । मज परमात्म्याचें जिव्हार । फोडूनि सुखसागर सांगितलें ॥ १७ ॥

अभीक्ष्णशस्ते गदितं ज्ञानं विस्पष्टयुक्तिमत् । एतद्विज्ञाय मुच्येत पुरुषो नष्टसंशयः ॥ २४ ॥

जेथ वेदशास्त्रांशीं बांकुडें । जें बोलीं बोलतां नातुडे । तेंचि ज्ञान म्यां तुजपुढें । निजनिवाडें सांगितलें ॥ १८ ॥ जें सांगितलें शुद्ध ज्ञान । तें नाना युक्तींकरूनी जाण । दृढतेलागीं निरूपण । पुनः-पुनः जाण तुज म्यां केलें ॥ १९ ॥ बहुत न लावितां खटपट । तुज न वाटतांही कष्ट । ज्ञान सांगितलें विस्पष्ट । जेणें होती सपाट संशय सर्व ॥ ४२० ॥ हें जाणितलिया ज्ञान । सर्व संशया होय दहन । साधकू होय ब्रह्मसंपन्न । स्वानंदपूर्ण सर्वदा ॥ २१ ॥ म्यां सांगितलें गुह्य ज्ञान । एकादशाचें निरूपण । याचें श्रवण पठण मनन । करी तो धन्य उद्धवा ॥ २२ ॥

सुविविक्तं तव प्रश्नं मयैतदपि धारयेत् । सनातनं ब्रह्मगुह्यं परं ब्रह्माधिगच्छति ॥ २५ ॥

ज्ञाते तरती हें नवल कोण । परी भाळे भोळे जे अज्ञान । त्यांसी उद्धरावया जाण । उद्धवें प्रश्न पुशिले ॥ २३ ॥ त्या प्रश्नानुसारें जाण । म्यां संतोषोनि आपण । सांगितलें गुह्य ज्ञान । परम कारण परब्रह्म ॥ २४ ॥ जेवीं वत्साचें हुंकारें । धेनु स्रवत चाले क्षीरें । तेवीं तुझेनि प्रश्नादरें । मी स्वानंद-भरें तुष्टलों ॥ २५ ॥ एथ न करितांही प्रश्न । होतां तानयाचें अवलोकन । कूर्मी नेत्रद्वारां आपण । अमृतपान करवीत ॥ २६ ॥ तेवीं उद्धवा तुझें अवलोकन । होतां माझें हृदयींचें ज्ञान । वोसंडलें गा परिपूर्ण । तें

शास्त्रार्थाच्या पोकळ शब्दज्ञानानें वाद करीत बसतात. वेदहि ज्या ब्रह्माचा वाद करण्यांत 'नेति' म्हणून निःशब्द होऊन बसले, १६ तें हें ब्रह्मज्ञानाचें सार, परमार्थाचें गुह्य भांडार, मज परमात्म्याचें हृदय मीं तुला सुखसमुद्र फोडून सांगितलें. ४१७.

विस्पष्टयुक्तिमत् ज्ञानं ते अभीक्ष्णशः गदितं—अति स्पष्ट युक्तीनें युक्त असें हें ज्ञान मीं तुला वारंवार सांगितलें. एतत् विज्ञाय पुरुषः नष्टसंशयः मुच्येत—हें जाणून सर्व संशयशून्य झालेला पुरुष मुक्त होतो. २४.

ज्याचें वेद-शास्त्रांशीं वांकडें, जें शब्दांनीं बोलतां येणें अशक्य, तेंच ज्ञान मीं तुला आपल्या निर्णयानें सांगितलें. १८ मीं जें शुद्ध ज्ञान तुला सांगितलें, तें दृढ ठसण्यासाठीं युक्ति-प्रयुक्तींनें पुनः पुनः सांगितलें. १९ फारशी खटपट केल्यावांचून, तुला कष्ट दिल्यावांचून मीं हें ज्ञान तुला स्पष्ट करून सांगितलें. त्यानें सगळे संशय दूर पळतील. ४२० हें ज्ञान जाणलें असतां सगळे संशय जळून जातात आणि साधक सर्वदा स्वानंदपूर्ण ब्रह्म-संपन्न होतो. २१ हे उद्धवा ! एकादश स्कंधाचें निरूपण करून मीं जें गुह्य ज्ञान तुला सांगितलें; त्याचें श्रवण पठण व मनन करणारा धन्य होय. ४२२.

—हें ज्ञान तर राहूं देच; पण याचें चिंतन, कथन, पठण व श्रवण यामध्यें तत्पर झालेल्या पुरुषालाहि हेंच फल प्राप्त होतें असें पुढील चार श्लोकांनीं सांगतात—

मया सुविविक्तं तव प्रश्नं एतत् अपि यः धारयेत् सः सनातनं ब्रह्मगुह्यं परब्रह्म अधिगच्छति—मी ज्याचें अगदीं स्पष्ट उत्तर दिलें आहे, अशा या तुझ्या प्रश्नाचें म्ह० आमच्या या प्रश्नोत्तररूप आख्यानाचेंहि जो अनुसंधान करील तो सनातन वेदांतीलहि रहस्य असें जें परब्रह्म त्याला प्राप्त होईल. २५.

ज्ञानी तरून जातील यांत आश्चर्य कसलें ! पण भाळ्या-भोळ्या अज्ञ जनांचा उद्धार करण्यासाठीं उद्धवानें प्रश्न केला. २३ त्याच्या प्रश्नानुसार मीं संतुष्ट होऊन आपलें गुह्य ज्ञान, परम कारण, जें परब्रह्म, ' तें सांगितलें. २४ वासराच्या हुंकारानें—हंबरण्यानें गाय जशी दुधाची धार सोडिते, त्याप्रमाणें हे उद्धवा ! तुझ्या प्रश्नांनीं मी स्वानंदभरानें संतुष्ट झालों. २५ कांसवी आपल्या पिलांचें जसें प्रेमदृष्टीनें पोषण करून त्यांस अमृतपान करविते, २६ त्याप्रमाणें हे उद्धवा ! तूं जरी प्रश्न केला नसतास तरी तुझ्या अवलोकनानें तुझा मनोदय जाणून माझ्या हृदयांतील ज्ञान

हें निरूपण म्यां केलें ॥ २७ ॥ येणें निरूपणमिसें । परमामृत सावकाशें । तुज म्यां पाजिलें अनायासें । स्वानंदरसें निजबोधू ॥ २८ ॥ सिंधु मेघा जळपान करवी । तेणें जळें मेघ जगातें निववी । तेवीं उद्धवाची ब्रह्मपदवी । जडमूढजीवीं उद्धरिजे ॥ २९ ॥ जेवीं वत्साचेनि प्रेमभरें । गाय दुभे तें घरासी पुरे । तेवीं उद्धवप्रश्नादरें । जग उद्धरे अनायासें ॥ ४३० ॥ तो हा प्रश्नोत्तरकथानुवाद । माझा तुझा ब्रह्मसंवाद । निरूपणीं एकादशस्कंध । हा अर्थावबोध जो राखे ॥ ३१ ॥ अथवा हें निरूपण । सार्थकें जो करी श्रवण । तें श्रोते वक्ते उभय जाण । ब्रह्म सनातन स्वयें होती ॥ ३२ ॥जगीं ब्रह्म असतां परिपूर्ण । मनबुद्धिइंद्रियां न दिसे जाण । जेथें वेदांसी पडिलें मौन । तें हें ब्रह्मज्ञान पावती ॥ ३३ ॥ ज्ञान पावलिया पुढती । कदा काळें नव्हे च्युती । हा एकादशार्थ धरितां चित्तीं । पदप्राप्ती अच्युत ॥ ३४ ॥ श्रोते वक्ते एकादशार्थीं । एवढी पदवी पावती । मा मद्भक्तांसी अतिप्रीतीं । जे उपदेशिती हें ज्ञान ॥ ३५ ॥ त्यांच्या फळाची फलप्राप्ती । ज्ञानोपदेशाची शुद्ध स्थिती । उद्धवालागीं अतिप्रीतीं । स्वमुखें श्रीपति सांगत ॥ ३६ ॥

य एतन्मम भक्तेषु संप्रदद्यात् सुपुष्कलम् । तस्याहं ब्रह्मदायस्य ददाम्यात्मानमात्मना ॥ २६ ॥

काया वाचा आणि चित्त । गृह दारा वित्त जीवित । निष्कामता मज अर्पित । अनन्य भक्त ते माझे ॥ ३७ ॥ ऐशिया भक्तांच्या ठायीं जाण । अवश्य उपदेशावें हें ज्ञान । त्याही उपदेशाचें लक्षण । पक्क परिपूर्ण तें ऐसें ॥ ३८ ॥ जेथ जेथ जाय साधकाचें मन । तेथ तेथ ब्रह्म परिपूर्ण । मन रिघावया तेथून । रितें स्थान असेना ॥ ३९ ॥ ऐसें करितां अनुसंधान । चैतन्यीं समरसे मन । त्यातें म्हणिजे पुष्कल ज्ञान । उपदेश पूर्ण या नांव ॥४४०॥ ऐसें समूळ ब्रह्मज्ञान । मद्भक्तांसी करी जो दान ।

उचंबळलें असतें व मीं त्यांचें परिपूर्ण निरूपण केलें असतें. २७ या निरूपणाच्या निमित्तानें मीं तुला जें परमामृत पाजिलें, तें स्वभावतःच स्वानंदरसपूर्ण आत्मज्ञान आहे. २८ समुद्र मेघांना जल देतो आणि मेघ तें जल जगाला देतात. त्याप्रमाणें उद्धवाची ब्रह्मपदवी जड, मूढ जीवांचा उद्धार करिते. २९ वासरावरील प्रेमानें गाय दूध सोडिते; पण तें दुभनें जसें सगळ्या घराला पुरतें, त्याप्रमाणें उद्धवाच्या प्रश्नानें जगाचा अनायासें उद्धार होईल. ४३० तो हा प्रश्नोत्तररूप कथेचा अनुवाद किंवा तुझा व माझा ब्रह्मसंवाद एकादशस्कंधांत निरूपिला आहे. हा अर्थ जो जाणील ३१ किंवा हें निरूपण जो अर्थासह श्रवण करील, ते श्रोते व वक्ते दोघेहि स्वतःच सनातन ब्रह्म होतील. ३२ जगांत परिपूर्ण ब्रह्म भरलेलें असतां तें मन, बुद्धि, इंद्रियें यांना दिसत नाहीं. वेदांनीं ज्याच्यापुढें मौन धरिलें, तें हें ब्रह्मज्ञान त्यांना प्राप्त होईल. ३३ एकदां हें ज्ञान प्राप्त झालें असतां तें कदाकाळींहि ढळत नाहीं. या एकादश स्कंधाचा अर्थ चित्तांत धरिला असतां अढळ परम पदाची प्राप्ति होते. ३४ या एकादश स्कंधाच्या अर्थाचे श्रोते व वक्ते एवढ्या थोर पदवीला प्राप्त होतात. यास्तव माझे जे भक्त अत्यंत प्रीतीनें त्या ज्ञानाचा उपदेश करितात, ३५ त्यांना कसली फलप्राप्ति होते ती व ज्ञानोपदेशाची शुद्ध स्थिति श्रीकृष्ण अत्यंत प्रेमानें उद्धवाला स्वमुखानें सांगत आहे. ४३६.

यः मम भक्तेषु एतत् सुपुष्कलं संप्रदद्यात्—जो माझ्या भक्तांमध्यें हें ज्ञान पूर्णपणें देतो, तस्य ब्रह्मदायस्य अहं आत्मना आत्मानं ददामि—त्या ब्रह्माचें दान करणाऱ्या ज्ञानोपदेष्ट्याला मी स्वतः आत्मस्वरूपाचें अर्पण करितों. २६.

जे काया, वाचा, चित्त, गृह, स्त्री, धन, जीवित मला निष्काम बुद्धीनें अर्पण करितात, ते माझे अनन्य भक्त होत. ३७ अशा भक्तांना या ज्ञानाचा अवश्य उपदेश करावा. त्या उपदेशाचें पक्कें व परिपूर्ण लक्षण असें आहे. ३८ साधकाचें मन जेथें म्हणून जातें, तेथें त्याला परिपूर्ण ब्रह्म दिसतें. तेथून मन निघण्यास रिकामी जागाच नसते. ३९ अशी चित्ताची एकाग्रता केली असतां मन चैतन्याशीं समरस होतें. त्यालाच पुष्कल ज्ञान म्हणतात. त्यालाच पूर्ण उपदेश असें नांव आहे. ४४० उद्धवा ! जो माझ्या भक्तांस अशा संपूर्ण ज्ञानाचें दान देतो, त्याच्या ब्रह्मऋणांत

त्याचा ब्रह्मऋणिया मी जाण। होय संपूर्ण उद्धवा ॥ ४१ ॥ त्याचिया उत्तीर्णत्वासी। गांठीं कांहीं नाहीं मजसी। मी निजस्वरूप अर्पीं त्यासी। अहर्निशीं त्यापाशीं मी तिष्ठें॥ ४२ ॥ जो शिष्यांसी दे ब्रह्मज्ञान। मी परमात्मा त्याअधीन। ब्रह्मदात्याच्या बोलां जाण। स्त्रीशूद्रजन मी उद्धरीं॥ ४३ ॥ देऊनियां परब्रह्म। जो भक्तांसी करी निष्कर्म। त्याचा अंकित मी पुरुषोत्तम। तो प्रिय परम मजलागीं ॥ ४४ ॥ जो ब्रह्मज्ञान दे मद्भक्तां। तयाहूनियां परता। मज आन नाहीं गा पढियंता। जाण तत्त्वतां उद्धवा ॥ ४५ ॥ तो आत्मा मी शरीर जाण। त्याचा देह मी होय आपण। त्याचे जें जें कर्माचरण। तें संपूर्ण मी होय॥४६॥ जैसा मी अवतारधारी। तैसाचि तोही अवतारी। त्या आणि मजमाझारीं। नाहीं तिळभरी अंतर ॥ ४७ ॥ जो या ब्रह्मज्ञानाचें करी दान। त्यासी मी यापरी आपण। करीं निजात्म-अर्पण। तरी उत्तीर्ण नव्हेचि ॥ ४८ ॥ यालागीं वर्ततांही शरीरीं। मी अखंड त्याची सेवा करीं। निजात्म अर्पण प्रीतीवाऱ्हीं। मी त्याच्या घरीं सर्वदा ॥ ४९ ॥ त्यातें जें जें जडभारी। तेंही मी वाहें आपुले शिरीं। माझी चैतन्यसाम्राज्यश्री। नांदे त्याचे घरीं सर्वदा ॥४५०॥ एकादशाचें ब्रह्मज्ञान। बोधूनि मद्भक्तां करी जो दान। त्यासी मी यापरी जाण। आत्मार्पण स्वयें करीं ॥ ५१ ॥ असो न साधवे ब्रह्मज्ञान। तरी या ग्रंथाचेंचि पठण। जो सर्वदा करी सावधान। तो परम पावन उद्धवा ॥ ५२ ॥

य एतत्समधीयीत पवित्रं परमं शुचि। स पूयेताहरहर्मां ज्ञानदीपेन दर्शयन् ॥ २७ ॥

निखळ जें कां ब्रह्मज्ञान। तो हा माझा तुझा संवाद जाण। जो सादरें करी पठण। सावधान श्रद्धाळू ॥ ५३ ॥ चढत्यावाढत्या परवडी। शुद्ध सात्विकी श्रद्धा गाढी। पदोपदीं नीच नवी गोडी। अद्भुत आवडी पठणाची ॥ ५४ ॥ वाचेचिया टवळ्याप्रती। श्रद्धास्नेहाची संपत्ती। निजजिव्हा करूनि वाती।

मी पूर्णपणें रहातों. ४१ त्याचें उतरायी होण्यास माझ्यापाशीं कांहींच नाहीं. मी त्याला आपलें आत्मस्वरूप अर्पण करून रात्रंदिवस त्याच्यापाशीं तिष्ठत बसतों. ४२ जो आपल्या शिष्यांना हें ब्रह्मज्ञान देतों, त्याच्या अधीन मी परमात्मा होतों. ब्रह्माचें दान करणाऱ्याच्या एका शब्दानें मी स्त्री शूद्रांचा उद्धार करितों. ४३ भक्ताला परब्रह्म देऊन त्याला निष्कर्म करणाऱ्या भक्तांचा मी पुरुषोत्तम अंकित होतों. तो मला परमप्रिय असतो. ४४ जो माझ्या भक्तांना ब्रह्मज्ञान देतो, त्याच्याहून दुसरा कोणीहि मला अधिक प्रिय नाहीं. ४५ तो आत्मा, मी शरीर; त्याचा देहहि मी स्वतःच होतों. त्याचें सगळें कर्माचरण मी होतों. ४६ मी जसा अवतार धारण केलेला, तसा तोहि अवतारी आहे. त्याच्यांत व माझ्यांत तीळभरहि अंतर नाहीं. ४७ जो या ब्रह्मज्ञानाचें दान करितो, त्याला मी याप्रमाणें आत्मा अर्पण करितों. तरीहि मी त्याचा कदापि उतरायी होत नाहीं. ४८ म्हणून देह धारण करीत असतांहि मी त्याची अखंड सेवा करितो. प्रेमास्तव मी त्याला आत्मसमर्पण करितों व मी त्याच्या घरीं सर्वदा असतों. ४९ त्याच्यावर जेवढें संकट येतें; तेवढें मी आपल्या शिरावर घेतों. माझी ज्ञानसाम्राज्यसंपत्ति त्याच्या घरीं सर्वदा नांदते. ४५० या अकराव्या स्कंधांतील ब्रह्मज्ञानाच्या उपदेशाचें दान जो माझ्या भक्तांना करितो, त्याला मी स्वतः आत्मसमर्पण करितों. ५१ उद्धवा! ज्याला हें ब्रह्मज्ञान साध्य करितां येत नाहीं, त्यानें या ग्रंथाचें सतत सावधानपणें पठण केल्यास तोहि पावन होतो. ४५२.

यः एतत् परमं पवित्रं शुचि समधीयीत सः ज्ञानदीपेन मां दर्शयन् अहरहः पूयेत—जो या परम पवित्र व शुद्ध ज्ञानाचें मोठ्यानें पठन करितो, तो ज्ञानदीपानें मला प्रदर्शित करणारा होत्साता प्रतिदिवशीं शुद्ध होतो. २७.

हा तुझा व माझा संवाद शुद्ध ब्रह्मज्ञान आहे, जो श्रद्धावान् सावधान चित्तानें व आदरानें त्याचें पठण करितो, ५३ जो उत्तरोत्तर वाढत्या प्रीतीनें शुद्ध सात्त्विक श्रद्धा दृढ करून नित्य नव्या गोडीनें पदोपदीं पठणाची अद्-भुत आवड धरितो, ५४ जो वाणीच्या टवळ्यांत श्रद्धेचें तेल घालून जिभेची वात लावून हा ज्ञानदीप प्रकाशितो; ५५

जो हे ज्ञानदीप्ती प्रकाशी ॥ ५५ ॥ एकादशाचे ज्ञानदीप्तीं । एकादश इंद्रियांच्या वाती । उजळूनि जे मज वोंवाळिती । ते पवित्र किती मी सांगूं ॥ ५६ ॥ यापरी जें ग्रंथपठण । तें माझें ज्ञान निरंजन । तेणें ज्ञानदीपें जाण । माझें स्वरूप पूर्ण प्रकाशी ॥ ५७ ॥ त्याचे लागले जे संगती । त्यांतें ब्रह्मादिक वंदिती । त्यांचेनि पावन त्रिजगती । जाण निश्चितीं उद्धवा ॥ ५८ ॥ असो ज्यांसी न टके पठण । तिंहीं श्रद्धेनें करितां श्रवण । त्यांसी न बाधी भवबंधन । तेंही निरूपण हरि सांगे ॥ ५९ ॥

य एतच्छ्रद्धया नित्यमव्यग्रः श्रृणुयान्नरः। मयि भक्तिं परां कुर्वन् कर्मभिर्न स बध्यते ॥ २८ ॥

असो न करवे अध्ययन । तरी श्रद्धायुक्त सावधान । करितां एकादशाचें श्रवण । कर्मबंधन बाधीना ॥ ४६० ॥ श्रवण केलें अतिश्रद्धेन । त्याहूनि दृढ व्हावें मनन । मननेंवीण तें नपुंसक जाण । ब्रह्मप्राप्ति पूर्ण फळेना ॥ ६१ ॥ संपलिया कथाश्रवण । मनींचें संपावें ना मनन । जैसें लोभियाचें धन । हृदयीं आठवण सर्वदा ॥ ६२ ॥ जैसें जैसें कीजे श्रवण । तैसें तैसें लागे मनन । मननानुसारें भजन । परा भक्ति जाण उद्बोधे ॥ ६३ ॥ आर्त जिज्ञासु अर्थार्थी । यांची सांडोनियां स्थिती । उल्हासे माझी चौथी भक्ती । जीतें परा म्हणती सज्ञान ॥ ६४ ॥ पराभक्तीचें माझें भजन । क्रियामात्रें निजात्मदर्शन । यालागीं मद्भक्तांसी जाण । कर्मबंधन बाधीना ॥ ६५ ॥ हें असो अतिगुह्य बोलणें । येणें एकादशाचेनि श्रवणें । मी तरेन हा विश्वास जेणें । अंतःकरणें दृढ केला ॥ ६६ ॥ दृढ विश्वास मानूनि पाहीं । जो लोधला श्रवणाविषयीं । माझी भक्ति त्याच्या ठायीं । दवडितां पाहीं घर रिघे ॥ ६७ ॥ ॥ घर रिघोन भक्ति निष्काम । भक्तांचें निर्दळी सकळ कर्म । या नांव परा भक्ति परम । विश्रामधाम श्रवणार्थ्यां ॥ ६८ ॥ एकादशाचें श्रद्धाश्रवण । करितां एवढा लाभ पूर्ण । श्रवणें उपजे

जो अकरा इंद्रियांच्या वाती उजळून एकादश स्कंधाच्या ज्ञानज्योतीनें मला ओवाळितो, तो किती पावन आहे म्हणून सांगूं ! ५६ अशा प्रकारचें जें ग्रंथपठण तेंच माझें ज्ञानरूपी स्वच्छ निरांजन आहे. त्या ज्ञानदीपानें माझें स्वरूप पूर्णपणें प्रत्ययास येतें. ५७ उद्धवा ! त्याची संगत धरणारांस ब्रह्मदेवादिक वंदन करितात. त्याच्यामुळें त्रिभुवन पावन होतें. हें निश्चित जाण. ५८ ज्याच्या हातून पठण होत नाहीं, त्यानें श्रद्धेनें श्रवण केलें असतां त्यांसहि भवबंधन बाधत नाहीं. तेंहि निरूपण आतां हरि करीत आहे. ४५९.

य नरः अव्यग्रः सन् श्रद्धया नित्यं एतत् शृणुयात् सः मयि परां भक्तिं कुर्वन् कर्मभिः न बध्यते—जो पुरुष अव्यग्र चित्तानें व श्रद्धेनें सतत याचें श्रवण करितो, तो माझ्या ठिकाणीं परम प्रीति करणारा कर्मांनीं बद्ध होत नाहीं. २८.

ज्याला या ग्रंथाचें अध्ययन करवत नसेल त्यानें श्रद्धेनें त्या एकादश स्कंधाचें सावधान मनानें श्रवण केलें असतां त्याला हें कर्मबंधन बाधत नाहीं. ४६० अतिशय श्रद्धेनें श्रवण केल्यावर त्याहूनहि दृढ मनन करावें. कारण मननावांचून तें फोल आहे. नुसत्या श्रवणानें ब्रह्मप्राप्ति पूर्णपणें फलद्रूप होणार नाहीं. ६१ लोभ्याच्या मनांत जशी द्रव्याची आठवण सदा असते, तसें कथाश्रवण संपल्यावरहि मनांतील मनन थांबवूं नये. ६२ जसें जसें श्रवण करावें, तसें तसें मननहि करावें. मननाच्या योगें भजनाची आवड लागते आणि माझी परा म्हणजे अभिन्नपणाची भक्ति उत्पन्न होते. ६३ आर्त, जिज्ञासु व अर्थार्थी यांची स्थिति टाकून माझी चौथी भक्ति प्राप्त होते. तिलाच ज्ञानी पराभक्ति म्हणतात. ६४ या पराभक्तीनें माझें भजन केलें असतां तत्काळ आत्मसाक्षात्कार होतो. म्हणून माझ्या भक्तांना कर्मबंधन बाधत नाहीं. ६५ हें अत्यंत गुह्य बोलणें राहो. या एकादश स्कंधाच्या श्रवणानें 'मी तरून जाईन' असा विश्वास ज्यानें आपल्या अंतःकरणांत दृढ केला ६६ व त्या दृढ विश्वासानें जो श्रवणांत तल्लीन झाला, त्याच्या घरीं माझी भक्ति हाकलून दिली तरी आपण होऊन येते. ६७ अशी ती भक्ति निष्काम भक्ताच्या घरीं जाऊन त्यांच्या सकळ कर्मांचा नाश करिते. हिलाच पराभक्ति म्हणतात. हीच श्रोत्यांचें परम विश्रांतिस्थान आहे. ६८ एकादश स्कंधाचें श्रद्धेनें श्रवण केलें असतां एवढा पूर्ण लाभ होतो. श्रवणानें माझें भजन उपजतें आणि भजनानें

माझें भजन । भजनें भक्तजन निर्मुक्त ॥ ६९ ॥ असो पां इतरांची वार्ता । म्यां तुज निरूपिली ज्ञानकथा । ते तुझिया निश्चितार्था । काय तत्त्वतां प्रबोधिली ॥ ४७० ॥

अप्युद्धव त्वया ब्रह्म सखे समवधारितम् । अपि ते विगतो मोहः शोकश्चासौ मनोभवः ॥ २९ ॥

उद्धवा तुझें देखोनि प्रेम । गुह्य ज्ञान अतिउत्तम । तुज म्यां निरूपिलें परब्रह्म । साङ्ग सुगम अतिशुद्ध ॥ ७१ ॥ हें ज्ञानाचें सोलींव ज्ञान । हें वेदाचें विसावतें स्थान । हेचि अविद्येची बोळवण । समाधान जीवशिवां ॥ ७२ ॥ ऐसें हें जें गुह्य ज्ञान । मनबुद्धिवाचे अगम्य जाण । तें म्यां तुज केलें निरूपण । श्रद्धा संपूर्ण देखोनी ॥ ७३ ॥ जेवीं सखा सख्याप्रती । आपुली वोपी निजसंपत्ती । तेवीं म्यां हे ब्रह्मस्थिती । तुझ्या हातीं वोपिली ॥ ७४ ॥ जैसें दिधलें श्रवणाच्या हातीं । तैसें प्रविष्ट जाहलें तुझिया चित्तीं । कीं माझारीं पडली कांहीं गुंती । विकल्पवस्ती विक्षेप ॥ ७५ ॥ म्यां निरूपिलें सार परम । तें तुज कळलें परब्रह्म । नसेल तरी हाचि उपक्रम । पुढती सुगम सांगेन ॥ ७६ ॥ चैतन्य ठसावोनि चित्तीं । जेथ आकळिली ब्रह्मस्थिती । तेथ मोहममतेची वस्ती । समूळ निश्चितीं नसावी ॥ ७७ ॥ आकळलें ब्रह्मज्ञान । त्याची हेचि बोळखण । संकल्पविकल्पविंदान । पुढती जाण उपजेना ॥ ७८ ॥ उपजेना मीतूंपण । उपजेना ध्येय ध्याता ध्यान । नुपजे त्यासी कर्मठपण । ब्रह्म परिपूर्ण जाणितल्या ॥ ७९ ॥ जेणें जाणितलें ब्रह्मज्ञान । त्यासी बाधीना कर्मबंधन । कर्माचें जें कर्माचरण । तें जाण आपण मायिक ॥ ४८० ॥ जेवीं छाया चळे पुरुषाचेनी । परी तियेचा लोभ पुरुष न मानी । तेवीं काया चाळी ब्रह्मज्ञानी । देहाभिमानी तो नव्हे ॥ ८१ ॥ जेवीं सूर्यापुढें आंधार । अर्ध क्षण न धरी धीर । तेवीं ब्रह्मज्ञानी कर्मादर । अणुमात्र उरेना ॥ ८२ ॥ कर्माचें जें कर्मबंधन । तो मनोजन्य संकल्प

भक्तजन मुक्त होतात. ६९ ही इतरांची गोष्ट राहो. पण तुझ्या मनांत दृढ ठसण्यासाठीं मीं जी ज्ञानकथा तुला सांगितली, त्याचा तुला तत्त्वतः बोध झाला का ! ४७०.

—सम्यक्ज्ञान उत्पन्न न झाल्यास मी पुनः उपदेश करीन, अशा आशयानें भगवान् विचरितात—

हे सखे उद्धव—त्वया ब्रह्म समवधारितं अपि—हे मित्रा उद्धवा ! तूं ब्रह्माचा पूर्णपणें निश्चय केलास का ! असौ ते मनोभवः मोहः शोकः च विगतः अपि—हा तुझ्या मनांतील अविवेक व संताप निवृत्त झाला का ! २९.

उद्धवा ! तुझें प्रेम पाहून मीं तुला हें सांग, शुद्ध, अतिशय सोपें, अत्युत्तम, गुह्य ज्ञान उपदेशिलें. ७१ हें ज्ञान ज्ञानाचा गाभाच; हें वेदांचें विश्रांतिस्थान; हें अज्ञानाची बोळवण करणारें व जीव-शिवांचें समाधान आहे. ७२ मन, बुद्धि व वाणी यांचा विषय न होणारें असें हें गुह्यज्ञान तुझी पूर्ण श्रद्धा पाहून मीं तुला सांगितलें. ७३ स्नेही जसा आपल्या जिवलग स्नेह्याला आपली संपत्ति अर्पण करितो, तशीं मीं ही ब्रह्मज्ञानाची ठेव तुझ्या हातीं दिली. ७४ मी जसें तुझ्या कानीं घातलें तसेंच्या तसेंच तें सगळें तुझ्या मनांत उतरलें ना ! किंवा मध्येंच कांहीं विकल्प-विक्षेप यांनीं घोंटाळा केला ! ७५ मीं जें परमसार तुला सांगितलें, तें परम ब्रह्म तुला कळलें ना ! जर कळलें नसेल, तर पुनः अधिक सोपें करून सांगतों, तें ऐक. ७६ मनांत चैतन्य ठसून ब्रह्मस्वरूप प्राप्त झालें कीं, तेथें मोह-ममतेची मुळींच वस्ती नसावी. ७७ संकल्प-विकल्पाचे विकार मनांत न उद्भवणें हीच ब्रह्मज्ञान दृढ झाल्याची खूण आहे. ७८ ब्रह्म पूर्णपणें जाणलें कीं, तेथें मी-तूंपणा उत्पन्न होत नाहीं; ध्येय, ध्याता, ध्यान व कर्मठपणा उपजत नाहीं. ७९ ज्यानें ब्रह्मज्ञान जाणलें, त्याला कर्मबंधन बाधत नाहीं. कर्माचें जें कर्मबंधन तें मुळीं मायिकच आहे. ४८० मनुष्याच्या हालचाली बरोबर त्याची छाया हलत असते. पण तिचा जसा कोणी लोभ धरीत नाहीं, त्याप्रमाणें ब्रह्मज्ञानी देहाला वागवितो. पण तो देहाभिमान धरीत नाहीं. ८१ अंधार जसा सूर्यापुढें अर्धाक्षणहि रहात नाहीं, त्याप्रमाणें ब्रह्मज्ञानी माणसाला कर्माचा अणुभरहि आदर नसतो. ८२ कर्माचें कर्मबंधन हा मनोजन्य संकल्प आहे. जेथें मनाचें मन-पणच नाहींसें

जाण । जेथें मनाचें मोडे मनपण । तेथें कर्माचरण निर्बीज ॥ ८३ ॥ वस्तु नित्य निर्विकल्प । तेथें नाहीं संकल्पविकल्प । हें परब्रह्माचें निजस्वरूप । हेंचि रूप स्वानुभवासी ॥ ८४ ॥ ऐसें ब्रह्म पावल्या स्वयमेवो । मी एक उद्धव होतों पहा हो । त्या उद्धवपणासी नाहीं ठावो । मा शोकमोहो तेथ कैंचा ॥ ८५ ॥ उद्धवपणाचिये वस्ती । शोकमोहांची उत्पत्ती । तें उद्धवपण नाठवे चित्तीं । जरी ब्रह्मप्राप्ति तुज जाहली ॥ ८६ ॥ ऐसें ऐकतां देवाचें वचन । उडालें उद्धवाचें उद्धवपण । जाहला स्वानंदीं निमग्न । बोलतेंपण बुडालें ॥ ८७ ॥ पावतां आपुली निजात्मता । उडाली उद्धवत्वाची अवस्था । बुडाली स्वदेहअहंता । निजनिमग्नता स्वानंदीं ॥ ८८ तेथें देवें पुशिला प्रश्न । त्याचें कोण दे प्रतिवचन । कृष्णेंसहित उद्धवपण । गिळोनि परिपूर्ण उद्धव जाहला ॥ ८९ ॥ देखोनि उद्धवाची अवस्था । हा ब्रह्म पावला निजात्मता । हें कळों सरलें कृष्णनाथा । त्या हृदयस्था काय न कळे ॥ ४९० ॥ शिष्य साचार अनुभव लाहे । तेणें सद्‌गुरु सुखाचा मेरु होये । जेवीं तानयाचे धणी माये । सुखावली राहे स्वानंदें ॥ ९१ ॥ सेवक विभांडितां परचक्र । तेणें रायासी संतोष थोर । गुढी उभारूनि साचार । करी निजगजर स्वानंदें ॥ ९२ ॥ तानयाचे लळे पुरवणे । हे व्याली तेचि वेदना जाणे । कां शिष्यासी स्वानुभव देणें । हें स्वयें जाणे सद्‌गुरु ॥ ९३ ॥ निजपुत्रें लाधल्या निधान । पिता संतोषे आपण । तेवीं उद्धवाचेनि अनुभवें जाण । स्वयें श्रीकृष्ण संतोषे ॥ ९४ ॥ कृष्णसुखें सुखरूप नित्यता । तोही शिष्यानुभवें सर्वथा । लाहे सुखाची परमावस्था । गुरुगम्यता अगम्य ॥ ९५ ॥ शिष्यासी उपदेश करितां । गुरूसी नसती सुखावस्था । तरी उपदेशपरंपरता । नव्हे तत्त्वतां इये लोकीं ॥ ९६ ॥ गुरु सांगे जैं उबगलेसाठीं । तैं ते शिष्यासी बोधेना गोष्टी । मा निजानुभवाची भेटी । केवीं निजदृष्टीं देखेल ॥ ९७ ॥ जेवीं बाळा लेणें लेववितां । तें नेणे परी सुखावे माता । तेवीं शिष्यासी अनुभव होतां ।

होतें, तेथें कर्माचरण निर्बीज होतें. ८३ परब्रह्म नित्य निर्विकल्प आहे. जेथें संकल्प-विकल्प नाहींत तेंच परब्रह्माचें मूळस्वरूप आहे आणि तेंच अनुभवाला येतें. ८४ स्वतःच असें ब्रह्मस्वरूप झाल्यावर मग 'मी एक उद्धव होतो' हा भाव नाहींसा होऊन त्या उद्धवपणाचा ठाव-ठिकाण लागत नाहीं. मग तेथें शोक-मोह कोठचा ! ८५ जोंपर्यंत तुझ्या मनांत उद्धवपणा आहे, तोंपर्यंत शोक-मोहाची उत्पत्ति आहे तुला एकदा ब्रह्मप्राप्ति झाली कीं, तें उद्धवपण मनांत आठवणारहि नाहीं. ८६ हें श्रीकृष्णाचे भाषण ऐकतांच उद्धवाचें उद्धवपण नाहींसें झालें. तो स्वानंदांत निमग्न झाला. त्याचें बोलणें खुंटलें. ८७ तो आत्मस्वरूपाला प्राप्त होतांच त्याचें उद्धवत्व नाहींसें झालें. स्वदेहावरील अहंकार-बुडाला व तो स्वानंदांत निमग्न झाला. ८८ तेव्हां श्रीकृष्णानें विचारलेल्या प्रश्नांचें उत्तर कोण देणार ! श्रीकृष्णासह उद्धवपणाला गिळून तो परिपूर्ण ब्रह्म झाला. ८९ उद्धवाची ही अवस्था पाहून 'हा आत्मस्वरूप ब्रह्माला प्राप्त झाला' हें श्रीकृष्णाला कळून चुकलें. त्या हृदयस्थाला काय कळत नाहीं. ! ४९० तान्हें बाळ तृप्त झालें असतां मातेला जसा सहज आनंद होतो, तसा शिष्य आत्मानुभव घेऊं लागला कीं, सद्‌गुरु सुखाच्या शिखरावर चढतो. ९१ सेवकांनीं परचक्राचा पराभव केला असतां राजाला अतिशय संतोष होतो व तो पताका, तोरणें उभारून आनंदाचा गजर करून सोडितो. ९२ किंवा आपल्या बाळाचे लाड कसे पुरवावेत, हें प्रसूतीच्या वेदना सोसून त्याला जन्म देणारी माताच जाणते. त्याप्रमाणें शिष्याला आत्मानुभव कसा द्यावा हें एक सद्‌गुरुच काय तो जाणें. ९३ पुत्राला संपत्ति मिळाली असतां त्याच्या पित्याला जसा संतोष होतो, तसा श्रीकृष्ण उद्धवाला आत्मप्रतीति येतांच संतुष्ट झाला. ९४ श्रीकृष्ण नित्य सुखस्वरूप आहे; पण तोहि शिष्याच्या आत्मसुखानें सुखाच्या परमावधीला पोंचला. हा गुरूचा अनुभव अगम्य आहे. ९५ शिष्याला उपदेश करण्यांत गुरूला जर सुख वाटलें नसतें, तर या लोकीं उपदेशपरंपरा इतकी टिकून राहिलीच नसती. ९६ गुरु जर कंटाळून उपदेश करील, तर शिष्याला त्यापासून कांहींच बोध होणार नाहीं. मग आत्मानुभवाची गोष्ट त्याच्या दृष्टीस तरी कोठून पडणार ९७

सुखावे तत्त्वतां सद्गुरुरावो ॥ ९८ ॥ ऐसा उद्धवाचा ब्रह्मभावो । देखोनि सुखावे कृष्णदेवो । माझा उद्धवो जाहला निःसंदेहो । यासी ब्रह्मानुभवो आकळिला ॥ ९९ ॥ उद्धवाची ब्रह्मनिष्ठता । अनुभवा आली निजात्मता । हें कळों सरलें श्रीकृष्णनाथा । परोपदेशार्थी शिकवित ॥ ५०० ॥ तूं पावल्या ब्रह्मज्ञान । तेथ शिष्योपदेशलक्षण । पात्रशुद्धीचें कारण । तेही ओळखण हरि सांगे ॥ १ ॥

नैतत्त्वया दाम्भिकाय नास्तिकाय शठाय च । अशुश्रूषोरभक्ताय दुर्विनीताय दीयताम् ॥ ३० ॥

शठ नास्तिक दंभयुक्त । अशुश्रूषु आणि अभक्त । ज्यांची स्थिती दुर्विनीत । ते शिष्य निश्चित त्यागावे ॥ २ ॥ जेणें लोकरूढी हो गहन । तें तें बाह्य कर्माचरण । विपुल धन आणि सन्मान । यदर्थीं जाण अतितृष्णा ॥ ३ ॥ ऐसें ज्यांचें दांभिक भजन । त्यांसी हें एकादशीचें ज्ञान । वोसणतां गा आपण । स्वप्नींही जाण नेदावें ॥ ४ ॥ मोहममतेचें आधिक्य । तेणें निर्दळिलें निजआस्तिक्य । वेदीं शास्त्रीं दृढ नास्तिक्य । देवचि मुख्य नाहीं म्हणती ॥ ५ ॥ नास्तिक्यवादाचिया बंडा । या ज्ञानाचा ढोरकोंडा । लागों नेदी त्यांचिया तोंडा । त्यांचा भाव कोरडा नास्तिक्यें केला ॥ ६ ॥ नास्तिक्यवादापुढें । ज्ञान कायसें बापुडें । अनीश्वर वादाचें बंद गाढें । तें त्यागावें रोकडें आस्तिक्यवादीं ॥ ७ ॥ अनन्यभावें न रिघे शरण । मिथ्या लावूनि गोडपण । धूर्तवादें घेवों पाहे ज्ञान । तेही शठ जाण त्यागावे ॥ ८ ॥ शठाची ऐसी निजमती । पुढिलांची हरूनि घे युक्ती । परी आपुली व्युत्पत्ती । पुढिलांप्रती सांगेना ॥ ९ ॥ काया वाचा आणि मन । जो गुरूसीं करी वंचन । जो गुरूचे पाहे दोषगुण । तोही शठ पूर्ण त्यागावा ॥ ५१० ॥ माझें अतिथोर महिमान । गुरुसेवा केवीं करूं आपण । सेवा न करी महिमेभेण ।

तान्ह्या बाळाला डागदागिन्यानें सजविलें असतां त्याला कांहीं तें कळत नाहीं; पण त्याच्या मातेला मात्र अतिशय आनंद होतो. त्याप्रमाणें शिष्याला आत्मसाक्षात्कार झाला असतां सद्गुरूला अत्यंत सुख होतें. ९८ उद्धवाला ब्रह्मस्वरूप झालेलें पाहून श्रीकृष्णदेवाला परम संतोष झाला. (व तो मनांत म्हणाला कीं,) माझा उद्धव आतां गतसंदेह झाला. त्यानें आत्मस्वरूप जाणलें. ९९ उद्धवाची ब्रह्मनिष्ठ स्थिति पाहून त्याला आत्मानुभव आल्याचें श्रीकृष्णाला कळून चुकलें. आतां त्याला परोपदेश करतां यावा म्हणून तो शिकवीत आहे. ५०० तूं ब्रह्मज्ञानसंपन्न झालास; तेव्हां शिष्याला उपदेश करण्याचा प्रकार आणि पात्रशुद्धीचें कारण म्हणजे शिष्याचा अधिकार सांगतों, ऐक. ५०१.

उद्धवाचा ज्ञाननिश्चय झाला आहे असें ताडून भगवान् म्हणतात—

त्वया एतत् दाम्भिकाय नास्तिकाय शठाय अशुश्रुषोः अभक्ताय दुर्विनीताय न दीयताम्—तूं हें ज्ञान दांभिक, नास्तिक, वंचक, श्रवणेच्छु नसलेला किंवा गुरूची शुश्रूषा न करणारा, अभक्त व उन्मत्त अशा लोकांस कधींहि देऊं नयेस. ३०.

लबाड, नास्तिक, दांभिक, सेवा न करणारा व गुरूचें न ऐकणारा, भक्तिहीन आणि उद्धट अशा शिष्यांचा त्याग करावा. २ ज्यायोगें लोकाची गर्दी जमा होईल, तें बाह्य कर्माचरण करणारे, मान, सन्मान व विपुल द्रव्य यांची अत्यंत तृष्णा असलेले. ३ जे दांभिक भक्त त्यांना हें एकादश स्कंधाचें ज्ञान आपण स्वप्नांत बरळत असताहि देऊं नये. ४ आत्मस्वरूपाचें विस्मरण, हा मोह व देहावरील आसक्ति ही ममता, यांनीं आस्तिकपणा नाहींसा केल्यामुळें वेद-शास्त्राविषयीं नास्तिकपणा उत्पन्न होऊन जे मुख्य देवच नाहीं असें म्हणतात, ५ त्या नास्तिकवादी बंडखोरांच्या तोंडांत या ज्ञानाचा भुसा सुद्धां पडूं देऊं नये. कारण नास्तिकपणानें त्यांचा भाव कोरडा झालेला असतो. ६ नास्तिक्यवादापुढें ज्ञान तें बापडें किती सें! अनीश्वरवादाचें बंड फार प्रबल आहे, तें भाविकांनीं समूळ टाकावें. ७ जे अनन्यभावानें शरण येत नाहींत, मिथ्याच गोड-गोड बोलून धूर्तपणानें ज्ञान घेऊं पहातात, त्या शठांचाहि त्याग करावा. ८ शठांची रीत अशी असते कीं, ते दुसऱ्याची युक्ति त्याला फसवून समजून घेतात; पण आपले विचार मात्र दुसऱ्याला कळूं देत नाहींत. ९ किंवा काया-वाचा-मनानें जो गुरूशीं प्रतारणा करितो, जो गुरूचे गुण-दोष पहातो, त्या शठाचाहि पूर्णपणें त्याग करावा ५१० ‘ माझी योग्यता फार मोठी आहे; मी गुरूची सेवा कशी करूं !’

तोही शिष्य जाण त्यागावा ॥ ११ ॥ सद्‌गुरुपासीं समर्थपण । जो आपली मिरवी जाणीव जाण । जो सेवा न करी गर्वें पूर्ण । तो शिष्य जाण त्यागावा ॥ १२ ॥ मी धनदानी अतिसमर्थ । नीचसेवेसी न लावीं हात । ऐसाही जो गर्वयुक्त । तोही निश्चित त्यागावा ॥ १३ ॥ जो लौकिक लाजेभेण । गुरुसेवा न करी आपण । ज्यासी लौकिकाचा अतिअभिमान । तोही शिष्य जाण त्यागावा ॥ १४ ॥ गुरुगृहींचें नीच कृत्य । न करी मानूनि मी समर्थ । तो मान्यताअभिमानयुक्त । जाण निश्चित त्यागावा ॥ १५ ॥ न करीं गुरुसेवा नीचवृत्ती । आम्हां अखंड ध्यान हेंचि गुरुभक्ती । ऐशी सेवावंचक ज्याची युक्ती । तोही निश्चितीं त्यागावा ॥ १६ ॥ नीच सेवा न करी आपण । म्हणे मागाल तें देईन धन । ऐसा धनगर्वी शिष्य आपण । सर्वथा जाण न करावा ॥ १७ ॥ धरूनि धनाची आस । गुरु शिष्यासी देत उपदेश । तें ब्रह्मज्ञान पडलें वोस । वाढले असोस धनलोभ ॥ १८ ॥ अथवा वेंचूनियां धन । जो घेईन म्हणे ब्रह्मज्ञान । ऐसा धनाभिमानी शिष्य जाण । सर्वथा आपण न करावा ॥ १९ ॥ यथाकाळें जाहली प्राप्त । गुरुसेवा जे कालोचित । न करी जो अशुश्रूषु म्हणत । तोही निश्चित त्यागावा ॥ ५२० ॥ करिता सद्‌गुरूची भक्ती । मी उद्धरेन निश्चितीं । ऐसा भाव नसे ज्याचे चित्तीं । तो शिष्य हातीं न धरावा ॥ २१ ॥ सद्‌गुरु तोचि ब्रह्ममूर्ती । ऐसा भाव नाहीं ज्याच्या चित्तीं । मूळींच विकल्पाची वस्ती । तोही शिष्य हातीं न धरावा ॥ २२ ॥ गुरूहोनि ब्रह्म भिन्न । ऐसें ज्याचें निश्चित ज्ञान । तें निश्चयेंसीं अभक्त जाण । त्यांसी शिष्य आपण न करावें ॥ २३ ॥ मनुष्य मानूनि सद्‌गुरूसी । जो उल्लंघी गुरुवचनासी । तो जाण पडला अपभ्रंशीं । त्या शिष्यासी त्यागावें ॥ २४ ॥ सद्‌गुरूहोनि अधिकता । शिष्य आपुली मानी पवित्रता । तो अभक्तांमाजी पूर्ण सरता । त्यासी तत्त्वतां त्यागावें ॥ २५ ॥ गुरूच्या ठायीं ब्रह्मस्थिती । ज्यासी श्रद्धा नाहीं चित्तीं । याचि नांव

असें म्हणून जो मोठेपणास बाध येईल या भीतीनें गुरुसेवा करीत नाहीं, तोहि शिष्य त्यागावा. ११ जो सद्‌गुरूपाशीं मोठ्या डौलानें आपलें शब्दज्ञान मिरवितो, जो पूर्ण गर्वामुळें सेवा करीत नाहीं तो शिष्य त्यागावा. १२ 'मी द्रव्य देण्यांत अति समर्थ आहे' असें म्हणून जो हलक्या कामाला हातहि लावीत नाहीं, अशा गर्विष्ठ शिष्याचाहि निश्चयानें त्याग करावा. १३ जो लौकिक लाजेच्या भीतीनें गुरुसेवा करीत नाहीं, ज्याला लौकिकाचा अतिशय अभिमान असतो त्या शिष्याचाहि त्याग करावा. १४ 'मी द्रव्यानें समर्थ आहें' असें मानून जो गुरूच्या घरांतील हलकें सलकें काम करीत नाहीं; तो अभिमान-मान्यतायुक्त शिष्य त्यागावा. १५ जो अनुदारवृत्तीनें गुरुसेवा करीत नाहीं, 'अखंड ध्यान हीच आमची गुरुभक्ति.' अशी सेवा चुकविण्याची युक्ति जो सांगतो तोहि शिष्य त्याज्य होय. १६ 'मी नीचसेवा करणार नाहीं. त्यासाठीं मागाल तें द्रव्य देईन' असा धनगर्वी शिष्य सर्वथा करूं नये १७ द्रव्याची हांव धरून जेव्हां गुरु शिष्याला उपदेश करूं लागले, तेव्हां ब्रह्मज्ञान ओसाड पडलें व अपार धनलोभ वाढला. १८ किंवा 'मी द्रव्य खर्च करून ब्रह्मज्ञान विकत घेईन' असें म्हणणारा धनाभिमानी शिष्य सर्वथा करूं नये. १९ प्रसंगीं प्राप्त झालेली गुरुसेवा जो करीत नाहीं त्याला अशुश्रूषु म्हणतात. त्याचाहि निश्चयानें त्याग करावा. ५२० 'सद्‌गुरूची भक्ति केल्यानेंच माझा उद्धार होईल' अशी श्रद्धा ज्याच्या चित्तांत नसते, असा शिष्यहि हातीं धरूं नये. २१ 'सद्‌गुरु ब्रह्मस्वरूप आहे.' असा भाव ज्याच्या मनांत नसतो, चित्तांत विकल्पाची पूर्ण वस्ती असते, असा शिष्य कदापि हातीं धरूं नये. २२ 'गुरूहून ब्रह्म भिन्न आहे' अशी ज्याची दृढ समजूत असते, तो निश्चयानें अभक्त जाणावा. त्याला कधींहि शिष्य करूं नये. २३ गुरूला सामान्य मनुष्य समजून जो त्याची आज्ञा मान्य करीत नाहीं तो मोठ्या मोहांत पडतो. अशा शिष्याचा अवश्य त्याग करावा. २४ जो स्वतःला सद्‌गुरुहूनहि अधिक पवित्र समजतो तो अभक्तांतील अग्रगण्य होय. त्याचाहि तत्त्वतः त्याग करावा. २५ उद्धवा 'सद्‌गुरूच परब्रह्म आहे' यावर श्रद्धा नसणें हीच अभक्ति होय, हें निश्चयानें

गा अभक्ती । जाण निश्चितीं उद्धवा ॥ २६ ॥ कां ये ग्रंथींचें ब्रह्मज्ञान । ज्यासी निश्चयें नाहीं जाण । त्यासी केव्हांही आपण । झणें विसरोन शिष्य करिसी ॥ २७ ॥ ये ग्रंथींची ब्रह्मस्थिती । वक्ता जो मी परब्रह्ममूर्ती । त्या माझ्या ठायीं नाहीं ज्याची भक्ती । तो शिष्य निश्चितीं त्यागावा ॥ २८ ॥ ये ग्रंथींचें आवडे ज्ञान । गुरूच्या ठायीं श्रद्धा पूर्ण । परी ज्याचें उद्धत वर्तन । तो शिष्य जाण त्यागावा ॥ २९ ॥ माझ्या निजमूर्ति संत सज्जन । माझे भक्त माझे जीवप्राण । त्यांचें जो करी हेळण । दुर्विनीतपण या नांव ॥ ५३० ॥ माझ्या भक्तांमाजील रंक जाण । त्याचे सर्वस्वें वंदावे चरण । हें ज्यासी नावडे संपूर्ण । दुर्विनीतपणा या नांव ॥ ३१ ॥ साधुसज्जनां भेटों जाये । शठ नम्रता वंदीं पाये । त्याचे गिवसोनि दोषगुण पाहे । दुर्विनीतता राहे ते ठायीं ॥ ३२ ॥ दुष्टबुद्धीची जे विनीतता । ती नांव बोलिजे दुर्विनीतता । ऐशी ज्या शिष्यांची अवस्था । ते जाण तत्त्वतां त्यागावे ॥ ३३ ॥ ऐसें हें ऐकोनि निरूपण । म्हणसी मी शिष्य न करीं जाण । जो शुद्ध उपदेशी ब्रह्मज्ञान । तो आत्मा जाण पैं माझा ॥ ३४ ॥ जो उपदेशी सत्पात्र पूर्ण । त्या सच्छिष्याचें लक्षण । तुज मी सांगेन निरूपण । ऐक सावधान उद्धवा ॥ ३५ ॥

एतैर्दोषैर्विहीनाय ब्रह्मण्याय प्रियाय च । साधवे शुचये ब्रूयाद्भक्तिः स्याच्छूद्रयोषिताम् ॥ ३१ ॥

उपदेशीं मुख्य अधिकारपण । धडधडीत वैराग्यपूर्ण । तेंहीं पिशाचवैराग्य नव्हे जाण । विवेकसंपन्न शास्त्रोक्त ॥ ३६ ॥ दिवस चारी वैराग्य केलें । सवेंचि विषयार्थी लागले । तेथ जें जें उपदेशिलें । तें सर्पा पाजिलें दुग्ध जैसें ॥ ३७ ॥ जेथ वैराग्य निघोनि जाये । तेथ ज्ञानाभिमान उरला राहे । तेणें अभिमानें करी काये । गुणदोष पाहे श्रेष्ठांचे ॥ ३८ ॥ नीच निंदी हेळसून । श्रेष्ठांचे पाहे दोषगुण । जेथ वैराग्य होय क्षीण । तेथें ज्ञानाभिमान चढे ऐसा ॥ ३९ ॥ उद्धवा जगीं दोनी अवस्था । वैराग्य कां

जाण. २६ किंवा या ग्रंथांतील ब्रह्मज्ञानाविषयीं ज्याचा निश्चय नाहीं, त्याला कदाचित् तूं चुकून आपला शिष्य करशील हो ! २७ या ग्रंथांतील ब्रह्मस्वरूपाचा, वक्ता साक्षात् परब्रह्म असा जो मी त्या मजवर ज्याची भक्ति नाहीं तो तो शिष्य अवश्य त्यागावा. २८ ज्याला या ग्रंथांतील ज्ञान आवडतें, ज्याची गुरूवर पूर्ण श्रद्धा असते, पण ज्याचें वर्तन उन्मत्तपणाचें असतें, तो शिष्य त्यागावा. २९ माझ्या साक्षात् मूर्तीच असे जे संत-सज्जन आणि मला जीव कीं प्राण असलेले जे माझे भक्त त्यांचा उपहास करणें, याला दुर्विनीतपणा म्हणतात. ५३० माझ्या भक्तांतील जे दरिद्री असतात, त्यांच्या चरणांना वंदन करणें, ज्याला मुळींच आवडत नाहीं, त्याला दुर्विनीत म्हणतात. ३१ जो शठ साधु-संतांना भेटावयास जाऊन मोठ्या नम्रतेनें त्यांच्या चरणांना वंदन करितो व त्यांचे गुण-दोष पहात बसतो, त्याच्या अंगीं दुर्विनीतत्व आहे, असें जाणावें. ३२ दुष्ट बुद्धीनें विनयाचें सोंग आणणें याला दुर्विनीतता म्हणतात. ज्या शिष्यांची अशी स्थिति असते, त्यांचा तत्त्वतः त्याग करावा. ३३ हें निरूपण ऐकून तूं म्हणशील कीं, मी शिष्यच करणार नाहीं. (पण असें म्हणूं नकोस, कारण—) जो शुद्ध ब्रह्माचा उपदेश करितो तो माझा आत्माच आहे, असें मी समजतों. ३४ आतां उपदेश करण्यास योग्य अशा सच्छिष्याचें लक्षण मी तुला सांगतों; तें हे उद्धवा! तूं लक्षपूर्वक ऐक. ५३५.

एतैः दोषैः विहीनाय ब्रह्मण्याय प्रियाय च साधवे शुचये शूद्र-योषितां भक्तिः स्यात् चेत् ताभ्यः ब्रूयात्—या दोषांनीं रहित असलेला, ब्राह्मणभक्त, प्रिय, साधु, शुचि व शूद्र आणि स्त्रिया यांच्या ठिकाणीं जर भक्ति असेल तर ते शूद्र व त्या स्त्रिया यांस हें ज्ञान सांगावें. ३१.

अंगीं तीव्र वैराग्य असणें हाच उपदेशाचा मुख्य अधिकार आहे. तेंहि क्षणिक स्मशानवैराग्य असतां कामां नये. विवेकसंपन्न शास्त्रोक्त वैराग्य असावें. ३६ नाहीं तर चार दिवस विरक्ति दाखविली कीं, पुनः लगेच विषयासक्ति आली. अशा शिष्याला उपदेश करणें म्हणजे सर्पाला दूध पाजणेंच होय. ३७ जेथें विरक्ति निघून जाते व ज्ञानाभिमान उरतो तेथें तो अभिमान श्रेष्ठांचें गुण-दोष पहात बसतो. ३८ कनिष्ठांचा उपहास करून त्यांची निंदा करितो व श्रेष्ठांचे गुण-दोष पहातो जेथें वैराग्य क्षीण होतें असा ज्ञानाभिमान वाढतो. ३९ हे उद्धवा ! या जगांत दोन अवस्था आहेत.

विषयासक्तता । तिसरे अवस्थेची कथा । जाण सर्वथा असेना ॥ ५४० ॥ जेथ विवेकें विषयो होय क्षीण । तेथ वैराग्य प्रबळे परिपूर्ण । जेथ विवेकेंसी वैराग्य क्षीण । तेथ विषयाचरण ज्ञानाभिमानें ॥ ४१ ॥ यालागीं होय जंव ब्रह्मज्ञान । तंव जो वैराग्य राखे पूर्ण । वैराग्यें गुरूसीं अनन्यशरण । तें अधिकारीरत्न उपदेशा ॥ ४२ ॥ गत श्लोकींचें दोषनिरूपण । आतां बोलिलों वैराग्यार्थ जाण । इंहीं दोषीं ज्यां रहित-पण । ते अधिकारी सच्छिष्य ॥ ४३ ॥ ज्यासी ब्रह्मत्वें ब्राह्मणभक्ती । अनन्यभावें भजे भूतीं । त्याची आंदणी भक्ती विरक्ती । तो जाण निश्चितीं अधिकारी ॥ ४४ ॥ गुरूचा पढियंताही पूर्ण । त्यापासीं असल्या अभक्तपण । त्यासी नव्हे ब्रह्मज्ञान । अनन्य भजन जंव न करी ॥ ४५ ॥ प्रिय आणि भजनशीळ । दोषरहित निर्मळ । त्यासी विरक्ति करूनि अढळ । उपदेशावें प्रांजळ हें गुह्य ज्ञान ॥ ४६ ॥ स्वदारा आणि स्वधन । यांचा लोभ ज्यासी संपूर्ण । ज्यांसी स्वर्ग ना मुक्तपण । जन्ममरण अनिवार ॥ ४७ ॥ परदारा परधन । सर्वथा नातळे ज्याचें मन । ऐसें ज्यापाशीं पवित्रपण । त्यासी हें ज्ञान उपदेशावें ॥ ४८ ॥ जो वैराग्याचा वोतिला । विवेकें पूर्ण वोसंडला । सद्‍गुरुसेवेसी जीवें विकला । चरणीं विनटला अनन्यत्वें ॥ ४९ ॥ सांडूनियां निजमहिमान । गुरुसेवेंलागीं आपण । ज्यासी आवडे रंकपण । ऐसा सेवेसी पूर्ण सद्भाव ॥ ५५० ॥ अमरश्रेष्ठ जे सुरवर । ते मानी सद्‍गुरूचे किंकर । सद्‍गुरूहूनियां थोर । हरिहर मानीना ॥ ५१ ॥ ज्यासी नाहीं गर्वमद । ज्यासी नाहीं कामक्रोध । ज्यासी नावडे विकल्पभेद । तो शिष्य शुद्ध परमार्थी ॥ ५२ ॥ काया वाचा मन धन । सांडूनि समर्थतामहिमान । जो सद्‍गुरूसी अनन्यशरण । तो सच्छिष्य जाण साधुत्वें ॥ ५३ ॥ सांडूनि लज्जा लौकिक । जो ब्रह्मज्ञानाचा याचक । सद्‍गुरुवचनार्थी चातक । तो आवश्यक उपदेशी ॥ ५४ ॥ जे कां द्विजन्म्यांबाहेरी । वेदें वाळूनि सांडिले दूरी । जे कां मंत्रार्थी अमंत्री । जे अनधिकारी

एक विरक्ति व दुसरी विषयासक्ति. यांपेक्षां तिसऱ्या अवस्थेचें कोठें नांवहि नाहीं. ५४० जेथें विवेकानें विषय क्षीण होतात तेथें परिपूर्ण तीव्र वैराग्य बाणतें व जेथें विवेकासह वैराग्य क्षीण होतें, तेथें ज्ञानाभिमानानें विषयसेवन घडतें. ४१ यास्तव ब्रह्मज्ञान होईपर्यंत जो पूर्ण वैराग्य राखतो व विरक्तीनें गुरूला अनन्य शरण जातो, तो उपदेशाचा श्रेष्ठ अधिकारी होय. ४२ गेल्या श्लोकांतील दोषांचें निरूपण वैराग्यासाठीं केलें. या दोषांनीं जो रहित असतो, तोच अधिकारी सच्छिष्य होय. ४३ जो ब्राह्मणांना ब्रह्मभावानें पूज्य मानितो, अनन्यभावानें भूतमात्रांची सेवा करितो, ज्याच्या विरक्ति व भक्ति आंदण दिलेल्या दासी होतात, तो निश्चयानें अधिकारी जाणावा. ४४ गुरूचा मोठा लाडका असला, तरी तो अभक्त असल्यास अनन्य भक्ति करीपर्यंत त्याला ब्रह्मज्ञान होत नाहीं. ४५ जो गुरूचा प्रिय, भक्तिमान्, दोष-रहित व निर्मल असेल त्याची विरक्ति दृढ करून त्याला हें गुह्यज्ञान प्रांजलपणें उपदेशावें. ४६ स्वस्त्री व स्वतःचें द्रव्य यांचा ज्याला पूर्ण लोभ असतो त्याला स्वर्ग नाहीं व मोक्षहि नाहीं. अनिवार जन्म-मरण मात्र भोगावें लागतें. ४७ परस्त्री आणि परद्रव्य यांस ज्याचें चित्त सर्वथा स्पर्श करीत नाहीं, असा जो पवित्र असतो, त्याला या ज्ञानाचा उपदेश करावा. ४८ जो वैराग्याचा मूर्तिमंत पुतळाच, जो विवेकानेंच परिपूर्ण; जो स्वतःला गुरुसेवेंत वाहून घेतो व त्याच्या चरणीं अनन्य भावानें नम्र होतो. ४९ स्वतःची थोरवी विसरून ज्याला गुरुसेवेसाठीं रंक होणें आवडतें, असा ज्याचा सेवेंत सद्भाव असतो, ५५० इंद्रासारखे जे श्रेष्ठ देव त्यांनाहि जो सद्‍गुरूचे दास समजतो, जो हरि-हरांसहि सद्‍गुरूहून श्रेष्ठ मानीत नाहीं, ५१ ज्याला गर्वमद नाहीं, ज्याला काम-क्रोध नाहीं, ज्याला विकल्प-भेद आवडत नाहीं, तोच शुद्ध परमार्थी शिष्य जाणावा. ५२ काया, वाचा, मन, धन व आपल्या योग्यतेची थोरवी हें सर्व सोडून जो सद्‍गुरूला अनन्य शरण जातो, तोच साधुत्वानें सच्छिष्य जाणावा. ५३ जो लौकिकलज्जा सोडून ब्रह्मज्ञानाचा याचक होतो, सद्‍गुरूचें वचन चातकाप्रमाणें झेलून घेतो त्याला अवश्य उपदेश करावा. ५४

श्रवणासी ॥ ५५ ॥ ज्यांसी नाहीं आश्रमधर्म। ज्यांसी नाहीं श्रौतकर्म। ज्यांसी नाहीं जपहोम। जे वर्णाधम अतिनीच ॥ ५६ ॥ ऐसे जे कां शूद्रजन। ऐकोनि ये ग्रंथींचें ज्ञान। निवाराया जन्ममरण। उपजे दारुण विरक्ती ॥ ५७ ॥ उबितांच एकसरें चित्तें। मनींहूनि बिटे विषयांतें। मग चित्तें वित्तें जीवितें। रिघे सद्गुरुतें अनन्यशरण ॥ ५८ ॥ गुरूसी पुसों नेणे प्रश्न। म्हणे निवारीं जन्ममरण। भावार्थें घाली लोटांगण। श्रद्धा संपूर्ण परमार्थीं ॥ ५९ ॥ ते होत कां शूद्रजन। त्यांसी उपदेशितां ब्रह्मज्ञान। उद्धवा कदा न लागे दूषण। हें सत्य वचन पैं माझें ॥ ५६० ॥ जे कां अपेक्षोनियां वित्त। चतुर्वर्णां उपदेशित। जे धनलोभें लोलुप एथ। नाहीं घेइजेत गुरुत्वें ॥ ६१ ॥ जेथ गुरूसीच सलोभता। तेथ शिष्याची बुडे विरक्तता। ऐशियाचा विरक्तीं उपदेश घेतां। परमार्थता अपघातू ॥ ६२ ॥ निर्लोभत्वें कृपेनें पूर्ण। सद्गुरु उपदेशी शूद्रजन। ऐसेनि करी जो दीनोद्धरण। तेथ न लागे दूषण उपदेशा ॥ ६३ ॥ जेणें तडफडूनि जाण। वैराग्यासी ये मरण। जेणें ज्ञात्यासी लागे दूषण। तो स्त्रीसंग आपण न करावा ॥ ६४ ॥ स्त्री देखतांचि अवचित्तीं। तत्काळ पाडी अधःपातीं। तिची जाहलिया संगती। कैंची धडगती सज्ञाना ॥ ६५ ॥ प्रमादीं पाडी सर्वार्थीं। हे प्रमदानामाची निजख्याती। तिची जाहलिया नित्य संगती। कैवीं परमार्थी तरतील ॥ ६६ ॥ जियेचें देखतां वदन। कामू मोकली कटाक्षबाण। तेथ कायसा उपदेश जाण। आली नागवण परमार्था ॥ ६७ ॥ उद्धवा तुज हेंचि मागतों जाण। नको स्त्रियांसी संभाषण। नको स्त्रियांचें अवलोकन। नको स्त्रीवचन कानीं घेऊं ॥ ६८ ॥ नको नको स्त्रियांसीं मात। नको नको स्त्रियांसीं एकांत। नको नको स्त्रियांसीं संगत। निंद्य लोकांत सर्वार्थीं ॥ ६९ ॥ नको नको स्त्रियांचा अनुवाद। नको नको स्त्रियांचा संवाद। नको नको स्त्रियांसीं करूं बोध। मिथ्या प्रवाद अंगीं वाजे ॥ ५७० ॥ स्वभावें सात्त्विक

जे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य यांच्या पलीकडे असलेले, वेदांनीं ज्यांना वगळून दूर सारिलें, जे मंत्राच्या अर्थाचे अधिकारी नाहींत, जे श्रवणाचेहि अधिकारी नाहींत, ५५ ज्यांना आश्रमधर्म नाहीं, श्रौतकर्म नाहीं, जप-होम नाहीं, जे अत्यंत हीन वर्णामुळेंहि नीच. ५६ अशा शूद्र लोकांनाहि या ग्रंथांतील ज्ञान ऐकून जन्म-मरणांचें निवारण करण्यासाठीं तीव्र विरक्ति उत्पन्न होते. ५७ व त्यांना विषयांचा मनापासून तिटकारा येतो आणि ते चित्त, वित्त व जीवित यांसह सद्गुरूला अनन्य शरण येतात. ५८ ते गुरूला प्रश्न कसा विचारावा हें जाणत नाहींत. भावार्थानें त्याला लोटांगण घालितात आणि म्हणतात कीं, माझ्या जन्म-मरणांचें निवारण कर. अशी त्यांची परमार्थावर पूर्ण श्रद्धा असते. ५९ हे उद्धवा ! असे लोक जातीनें शूद्र जरी असले, तरी त्यांना माझ्या ब्रह्मज्ञानाचा लोकांना उपदेश करण्यांत कदापि दोष लागत नाहीं. हें माझें वचन तूं सत्य समज. ५६० जे द्रव्यलोभानें चातुर्वर्ण्याच्या लोकांना उपदेश करितात, ते या लोकीं धनलोलुप जाणावे. त्यांना गुरूची पदवी देऊं नये. ६१ जेथें गुरूलाच लोभ असतो तेथें शिष्याची विरक्ति बुडून जाते. विरक्तानें अशांकडून उपदेश घेतल्यास त्याच्या परमार्थाची हानि होते. ६२ जो सद्गुरु निर्लोभ वृत्ति ठेवून केवल पूर्ण दयेनें शूद्रांना उपदेश करून दीनोद्धार करितो, त्याला उपदेश करण्यांत दोष लागत नाहीं. ६३ ज्यायोगें वैराग्याला तडफडून मरण येतें, ज्ञानी माणसांना दोष लागतो, तो स्त्रीसंग कदापि करूं नये ६४ स्त्रीचें अकस्मात् दर्शन जरी घडलें, तरी तत्काल अधःपात होतो. मग तिची संगति धरल्यावर सज्ञान माणसाची धडगत कोठची ! ६५ सर्व प्रकारें प्रमादांत म्हणजे दोषांत टाकणारी म्हणूनच प्रमदा हें नांव प्राप्त झालें आहे. तिची जर नित्य संगति घडली तर साधक परमार्थांत कसे तरणार ! ६६ जिचें मुख दिसतांच काम कटाक्षाचे बाण सोडितो, तेथें उपदेश काय करणार ! परमार्थ पुरता नागविला जातो. ६७ हे उद्धवा ! मी तुझ्यापाशीं हेंच मागतों कीं, तूं स्त्रियांशीं संभाषण करूं नकोस, स्त्रियांकडे पाहूं नकोस व स्त्रियांचा शब्द कानीं पडूं देऊं नकोस. ६८ नको नको, स्त्रियांचें नांव नको, त्यांच्याशीं एकान्त नको व त्यांची संगत नको. तो सर्वप्रकारें निंद्य आहे. ६९ स्त्रियांचा अनुवाद व संवाद नको. त्यांना उपदेश करूं नकोस. अरे बाबा ! त्यांत मिथ्या लोकापवाद व्यर्थ अंगाशीं यावयाचा ! ५७० एखादी बिचारी सात्त्विक स्त्री सहज जरी परमार्थाच्या गोष्टी सांगावयास आली तरी त्यांतहि इष्ट-

वनिता । गोष्टी सांगो आली परमार्था । तोचि विकल्प तत्त्वतां । सुहृदां समस्तां परिकल्पे ॥ ७१ ॥ यालागीं प्रमदा जाण । सर्वथा त्यागावी आपण । प्रमदासंगतीं ब्रह्मज्ञान । सर्वथा जाण वाढेना ॥ ७२ ॥ ॥ आशंका ॥ उपदेशीं त्याज्य स्त्रिया जरी । तरी मागिली थोरथोरीं । उपदेशिल्या कैशापरी । ऐक निर्धारीं सांगेन ॥ ७३ ॥ श्रेष्ठ याज्ञवल्क्य पाहीं । तेणें उपनिषदांच्या ठायीं । उपदेशिले मैत्रेयी । नानायुक्तीं पाहीं प्रबोधें ॥ ७४ ॥ स्वयें नारद महामुनी । प्रल्हादाची निजजननी । इंद्रापासूनि सोडवूनि । ब्रह्मज्ञानीं उपदेशी ॥ ७५ ॥ अवतरोनि कपिलमुनी । बैसोनियां सिद्धासनीं । देवहूती लागोनी । ब्रह्मज्ञानीं प्रबोधी ॥ ७६ ॥ जो योगियांचा मुकुटमणी । कैलासपति शूळपाणी । भव उपदेशी भवानी । ब्रह्मज्ञानीं निजबोधें ॥ ७७ ॥ इतरांची गोठी कायशी । तुवांचि गा हृषीकेशी । उपदेशिलें यज्ञपत्न्यांसी । ऐसें म्हणसी उद्धवा ॥ ७८ ॥ असो देखोनियां सद्भावा । उपदेश करूं म्हणशी कणवा । तरी तो अधिकार वोळखावा । ऐक उद्धवा सांगेन ॥ ७९ ॥ स्त्रीपुरुषअवलोकन । जयाचे दृष्टी समसमान । ऐसें अनुभवी जो परिपूर्ण । तोचि स्त्रियांसी जाण उपदेशी ॥ ५८० ॥ तोही अधिकार न पाहतां । उपदेश न करिती सर्वथा । त्याही उपदेशाची कथा । ऐक तत्त्वतां सांगेन ॥ ८१ ॥ ज्यां ज्या निंदिल्या वनिता । त्यामाजीं सभाग्या सात्त्विकता । सांडूनियां विषयावस्था । जे परमार्थी उद्यत ॥ ८२ ॥ त्यजूनियां प्रपंचाची हांव । नावडे विषयाचें नांव । वैराग्यें उठला सद्भाव । घेऊनि धांव परमार्थीं ॥ ८३ ॥ अतिथि आणि पतिपुत्रांसी भोजनीं समता नित्य जिची । अनलोभ नाहीं मानसीं । परमार्थी तिसी अधिकारू ॥ ८४ ॥ जन्ममरणनिवारणीं । जीवामनाची नित्य काचणी । माझी भवपाशच्छेदनीं । धर्मदाता कोणी मिळता का ॥ ८५ ॥ सद्गुरु प्राप्तीची अतिआर्त । काया वाचा चित्त वित्त । कुरवंडी करूनि सांडित । परमार्थार्थ सद्भावें ॥ ८६ ॥ यापरी निजपरमार्था । सद्भावें जे विनटे वनिता । तिसी उद्धवा हें उपदेशितां । दोष सर्वथा

मित्रादि सर्वांच्या मनांत विकल्प उभा रहातो. ७१ म्हणून स्त्रियांचा सर्वथा त्याग करावा. स्त्रियांच्या संगतींत ब्रह्मज्ञान सर्वथा वाढत नाहीं. ७२ (आशंका-) स्त्रिया जर उपदेशाला अपात्र आहेत, तर मग प्राचीन थोर-थोर ज्ञात्यांनीं त्यांना उपदेश कसा केला ! त्यांचाहि प्रकार सांगतो. ऐक. ७३ उपनिषदांत श्रेष्ठ याज्ञवल्क्य ऋषीनें आपली ब्रह्मवादिनी ' पत्नी जी मैत्रेयी तिला नाना प्रकारच्या युक्तींनीं आत्मबोध केला आहे. ७४ महामुनि नारदानें प्रल्हादाची माता जी कयाधु तिला इंद्रापासून सोडवून ब्रह्मज्ञानाचा स्वतः उपदेश केला. ७५ कपिलमुनीनें अवतार घेऊन सिद्धासनावर बसून आपली माता जी देवहुती तिला ब्रह्मज्ञान उपदेशिलें. ७६ सगळ्या योग्यांचा मुकुटमणि, कैलासपति शूळपाणि श्रीशंकरानेंहि पार्वतीला आत्मबोधानें ब्रह्मज्ञानाचा उपदेश केला. ७७ इतरांच्या गोष्टी कशाला ! हे श्रीकृष्णा ! तूं स्वतःच यज्ञपत्न्यांना ब्रह्मज्ञान उपदेशिलें आहेस. ७८ उद्धवा ! असें जर तूं म्हणशील आणि ' सद्भक्ति पाहून त्यांसहि कृपा करून उपदेश करावा, ' असें जर म्हणत असशील, तर अगोदर अधिकारी कसा ओळखावा, तें सांगतों ऐक. ७९ हे उद्धवा ! ज्याच्या दृष्टीला स्त्री-पुरुष ही दोघेंहि समान दिसतात, ज्यानें असा पूर्ण अनुभव घेतला आहे, त्यानेंच स्त्रियांना उपदेश करावा. ५८० परंतु त्यानेंहि अधिकार न पहातां सर्वथा उपदेश करूं नये. त्या उपदेशाचाहि प्रकार तुला सांगतों, ऐक. ८१ जी ज्या स्त्रियांची निंदा केली, त्यांच्यामध्यें जी भाग्यशाली, सात्त्विक, विषयासक्ति सोडून परमार्थाविषयीं उत्सुक असेल. ८२ प्रपंचाची हाव टाकून विषयाचें नांव सोडून, विरक्तीनें सद्भाव उमजून जिच्या मनानें परमार्थाकडे धांव घेतली असेल. ८३ जी अतिथि व पति-पुत्र यांच्या भोजनांत नित्य समभाव ठेवणारी, जिच्या मनांत अनलोभ नाहीं, तीच परमार्थाची अधिकारिणी आहे. ८४ ' माझ्या भवपाशाचा छेद करणारा कोणी धर्मदाता भेटेल कां ! ' अशी जन्म-मरण निवारण्यासाठीं जिच्या मनाला व जीवाला नित्य तळमळ लागलेली असते. ८५ जी सद्गुरुप्राप्तीसाठीं अतिशय उत्सुक असते; जी परमार्थासाठीं भक्तिभावानें काया, वाचा, मन, धन, चित्त व वित्त ओवाळून टाकिते, ८६ हे उद्धवा ! याप्रमाणें जी स्त्री परमार्थासाठीं सद्भावानें युक्त असते, तिला ब्रह्माचा उपदेश केला

लागेना ।। ८७ ।। क्षत्रिय वैश्य स्त्री शूद्रजन । यांची सच्छ्रद्धा दृढ पाहून । उपदेशितां ब्रह्मज्ञान । दोषनिर्दळण शिष्याचें ।। ८८ ।। उपदेशितां ब्रह्मज्ञान । जैं गुरूसीच लागे दूषण । तैं शिष्यासी उद्धरी कोण । हें व्याख्यान अबद्ध ।। ८९ ।। पहावया पात्रशुद्धता । मी बोलिलों दोषवार्ता- । वांचूनि ब्रह्मज्ञान उपदेशितां । दोष सर्वथा असेना ।। ५९० ।। हें ज्ञान जाणितल्या पाठीं । जाणणेंचि सरे सृष्टीं । संसारासी पडे तुटी । तेथ दोषाची गोठी असेना ।। ९१ ।।

नैतद्विज्ञाय जिज्ञासोर्ज्ञातव्यमवशिष्यते । पीत्वा पीयूषममृतं पातव्यं नावशिष्यते ।। ३२ ।।

ये ग्रंथींचें जाणितल्या ज्ञान । मुमुक्षु जे साधक जन । त्यांसी जाणावया आन । जाणितेपण उरेना ।। ९२ ।। जेवीं केलिया अमृतपान । पुढें प्राशनासी नुरे आन । तेवीं जाणितल्या हें ज्ञान । ज्ञातव्य ज्ञातेपण समूळ नुरे ।। ९३ ।। आशंका ।। धर्मार्थकाममोक्षांप्रती । साधनें असती नेणों किती । तुवां हें एकचि श्रीपती । कैशा रीतीं प्रतिपादिलें ।। ९४ ।। उद्धवा साधनें जीं आनान । तीं अभक्त शोधिती आपण । माझ्या भक्तांसी गा जाण । मीच साधन सर्वार्थीं ।। ९५ ।।

ज्ञाने कर्मणि योगे च वार्तायां दण्डधारणे । यावानर्थो नृणां तात तावांस्तेऽहं चतुर्विधः ।। ३३ ।।

असतां सर्वथा दोष लागत नाहीं. ८७ क्षत्रिय, वैश्य, स्त्री आणि शूद्र यांची दृढ श्रद्धा पाहून ब्रह्मज्ञान उपदेशिलें असतां शिष्याचे दोष समूळ नाहींसे होतात. ८८ 'ब्रह्मज्ञानाचा उपदेश केला असतां गुरूलाच दोष लागेल. मग शिष्याचा उद्धार कोण करणार !' हें बोलणेंच मुळीं विपरीत आहे. ८९ उपदेश करण्यास पात्राची शुद्धता पहाण्यासाठीं मीं हें विवेचन केलें. या दोषांनीं रहित असणारांस ब्रह्मज्ञानाचा उपदेश केल्यास सर्वथा दोष लागत नाहीं. ५९० हें ज्ञान जाणल्यानंतर सृष्टीमध्यें जाणावयाचें असें उरतच नाहीं. संसाराची तूट पडते व दोषांची वार्ताहि उरत नाहीं.. ५९१.

—या ज्ञानानें पुरुष कृतार्थ होतो, असें सांगतात—

एतत् विज्ञाय जिज्ञासोः ज्ञातव्यं न अवशिष्यते पीयूषं अमृतं पीत्वा पातव्यं न अवशिष्यते–हें ज्ञान संपादन करून जिज्ञासूला जाणण्याचें असें कांहीं अवशिष्ट रहात नाहीं. मधुर अमृत प्राशन केल्यावर प्यावयाचें असें कांहींच पेय उरत नाहीं. ३२.

या ग्रंथातील ज्ञान जाणल्यानंतर मुमुक्षु साधकांना जाणावयाचें असें दुसरें कांहींच बाकी उरत नाहीं. ९२ अमृतपान केलें असतां मग प्राशन करण्यास योग्य असें दुसरें कांहीं जसें रहात नाहीं, त्याप्रमाणें हें ज्ञान एकदां जाणलें कीं, मग ज्ञातव्य व ज्ञातेपणा हीं समूळ नाहींशीं होतात. ९३ (आशंका) हे श्रीपते ! धर्म-अर्थ-काम-मोक्ष यांसाठीं इतकीं साधनें आहेत कीं, त्यांची गणति नाहीं. असें असतां तूं हें एकच साधन कसें सांगतोस ९४ (उत्तर) उद्धवा ! जीं निरनिराळीं अनेक साधनें आहेत, त्यांना अभक्त आपण होऊन शोधितात. पण माझ्या भक्तांना सर्व प्रकारें मीच साधन आहें. ५९५.

—'अहोपण भिन्न भिन्न फलांचीं साधनें पुष्कळच ज्ञात आहेत,' असें उद्धव म्हणेल, म्हणून भगवान 'अभक्तांना जरी अनेक ज्ञातव्य पदार्थ असले तरी भक्ताला मीच एक ज्ञातव्य आहे म्हणून तूं मदेकशरण हो' असें सांगतात—

तात–अरे बा उद्धवा ! ज्ञाने कर्मणि योगे च वार्तायां दंडधारणे नृणां यावान् अर्थः तावान् ते अहं चतुर्विधः–ज्ञान कर्म, योग, वार्ता व दंडनीति यांमध्यें पुरुषांना जेवढें फल मिळतें तेवढा तो तुझा चतुर्विध पुरुषार्थ मीच आहें. [ज्ञानादिकांमध्यें धर्मादि जेवढा चतुर्विध पुरुषार्थ आहे तेवढा तो तुझा सर्वहि मीच आहें. त्यांतील ज्ञानामध्यें मोक्ष, विहित कर्मांमध्यें धर्म, स्वाभाविक कर्मांमध्येंच काम, योगामध्यें अणिमादि सिद्धि, कृष्यादि वार्तेमध्यें अर्थ, दंडनीतीमध्यें ऐश्वर्य यांचा कामामध्यें अन्तर्भाव होतो व त्यामुळें पुरुषार्थांच्या चातुर्विध्यामध्यें विरोध येत नाहीं.] ३३.

मोक्षालागीं ज्ञान साधन । धर्मालागीं स्वधर्माचरण । स्वामित्वालागीं दंडधारण । अर्थोद्यम जाण जीविकावृत्ती ।। ९६ ।। इहामुत्र कामभोग । तदर्थ करिती योगयाग । चहूं पुरुषार्थी हा चांग । साधन प्रयोग अभक्तां ।। ९७ ।। ऐसें शोधितां साधन । सहसा सिद्धि न पवे जाण । अनेक विकळता दूषण । माजीं छळी विघ्न देवांचें ।। ९८ ।। तैसें मद्भक्तांसी नव्हे जाण । माझें करितां अनन्य भजन । चारी पुरुषार्थ येती शरण । पायां सुरगण लागती ।। ९९ ।। उद्धवा जे मज अनन्यशरण । त्यांचा धर्म अर्थ मी आपण । त्यांचा काम तोही मीचि जाण । मोक्ष संपूर्ण मी त्यांचा ।। ६०० ।। अभक्तां भोगक्षयें पुनरावृत्ती । भक्तांसी भोग भोगितां नित्यमुक्ती । एवढी माझ्या भक्तीची ख्याती । जाण निश्चितीं उद्धवा ।। १ ।। ऐशी ऐकतां देवाची मात । उद्धव प्रेमें वोसंडला अद्भुत । तेणें प्रेमें लोधला कृष्णनाथ । हर्षें बोलत तेधवां ।। २ ।। उद्धवा तुझे चारी पुरुषार्थ । तो मी प्रत्यक्ष श्रीभगवंत । ऐसें बोलोनि हर्षयुक्त । हृदयाआंत आलिंगी ।। ३ ।। हर्षें देतां आलिंगन । कृष्ण विसरला कृष्णपण । उद्धव स्वानंदनिमग्न । उद्धवपण विसरला ।। ४ ।। कैसें अभिनव आलिंगन । दोघांचें गेलें दोघपण । पूर्ण चैतन्यपरिपूर्ण । स्वानंदघन स्वयें झाले ।। ५ ।। तेथ विरोनि गेला हेतू । वेदेंसहित बुडाली मातू । एकवटला देवीं भक्तू । एकीं एकांतू एकत्वें ।। ६ ।। तेथ मावळले धर्माधर्म । क्रियेसहित उडालें कर्म । भ्रम आणि निर्भ्रम । दोहींचें नाम असेना ।। ७ ।। भेद घेऊनि गेला अभेदा । बोध घेऊनि गेला निजबोधा । आनंद लाजला आनंदा । ऐशिया निजपदा उद्धव पावे ।। ८ ।। मी जाहलों परब्रह्म । हाही मुख्यत्वें जेथ भ्रम । कृष्णालिंगनाचा हा धर्म । जाहला निरुपम निजवस्तू ।। ९ ।। यावरी कृष्ण सर्वज्ञ । सोडोनियां आलिंगन । ऐक्यबोधें उद्धवासी जाण । निजभक्तपण प्रबोधी ।। ६१० ।। तेव्हां उद्धव

मोक्षाचें साधन ज्ञान; धर्माचें साधन स्वधर्माचरण; स्वामित्वाचें साधन दंडधारण व उपजीविकेचें साधन द्रव्यार्जनाचा उद्योग होय. ९६ यालोकीं व परलोकीं सुखोपभोग प्राप्त होण्यासाठीं योग-याग करितात. असा हा चार पुरुषार्थांसाठीं अभक्तांच्या साधनांचा प्रकार आहे. ९७ अशीं साधनें आचरिते वेळीं त्यांत सहसा सिद्धि प्राप्त होत नाहीं. उलट अनेक प्रकारचे विक्षेप व विघ्नें येतात. ९८ त्यांत देवहि विघ्न करून त्यांना पीडा देतात. पण माझ्या भक्तांची स्थिति तशी नाहीं. माझें अनन्य भजन केलें असतां चारी पुरुषार्थ शरण येतात व देवांचा समुदाय त्यांच्या पायां पडतो. ९९ उद्धवा ! जे मला अनन्य शरण येतात त्यांचा धर्म, अर्थ मी स्वतःच आहें. त्यांचा कामहि मीच आणि परिपूर्ण मोक्षहि मीच. ६०० अभक्तांना पुण्य-भोग सरतांच पुनः जन्म-मरणपरंपरा भोगावी लागते. पण माझे भक्त भोग भोगून नित्य मुक्त असतात. उद्धवा ! एवढी माझ्या भक्तांची ख्याति आहे, हें निश्चयानें जाण. १ श्रीकृष्णाचें हें भाषण ऐकून उद्धवाला प्रेमाचें अनिवार भरतें आलें त्या प्रेमानें श्रीकृष्णनाथहि गहिंवरला व हर्षानें बोलला कीं, २ 'हे उद्धवा ! मी भगवान्‌च तुझे चारी पुरुषार्थ आहें.' असें बोलून श्रीकृष्णानें मोठ्या आनंदानें उद्धवाला हृदयाशीं धरून आलिंगिलें. ३ आनंदानें आलिंगन देतांच श्रीकृष्ण आपलें कृष्णपण विसरला व उद्धव स्वानंदांत निमग्न होऊन आपलें उद्धवपण विसरला. ४ त्यांच्या आलिंगनाचा प्रभाव काय विलक्षण पहा ! त्या दोघांचें द्वैत गेलें व ते स्वतःच स्वानंदपूर्ण ब्रह्मरूप झाले. ५ तेथें हेतु विरून गेला. वेदासहित बोलणें बुडून गेलें. देवांमध्यें भक्त मिळून गेला. ते दोघेहि एकत्वानें एकरूप झाले. ६ त्यावेळीं, धर्म-अधर्म मावळले, क्रियेसह कर्म उडालें; भ्रम व निर्भ्रम यांचें नांवहि उरलें नाहीं. ७ भेद अभेदाला घेऊन गेला; बोध आत्मबोधाला घेऊन गेला व आनंद आनंदाला लाजला, अशा आत्म-पदाला उद्धव प्राप्त झाला. ८ 'मी परब्रह्म झालों' हाहि मुख्यत्वें भ्रमच आहे. कृष्णाच्या आलिंगनाचा गुणच असा विलक्षण होता कीं, उद्धव तत्काल निरुपम ब्रह्मस्वरूप झाला. ९ तेव्हां सर्वज्ञ श्रीकृष्णानें आलिंगन सोडवून ऐक्य बोधानें त्याला त्याच्या भक्तपणाची जाणीव करून दिली. ६१० तेव्हां उद्धवाला मोठें आश्चर्य वाटलें. तो अतिशय

चमत्कारिला । अतिशयें चाकाटला । परम विस्मयें दाटला । तटस्थ ठेला तें काळीं ॥ ११ ॥ मग म्हणे निजात्मता । स्वतःसिद्ध जवळी असतां । जनांसी न कळे सर्वथा । साधकांच्या हाता चढे केवीं ॥ १२ ॥ तें उद्धवाचें मनोगत । जाणोनियां श्रीकृष्णनाथ । तदर्थींचा सुनिश्चित । असे सांगत उपाय ॥ १३ ॥

मर्त्यो यदा त्यक्तसमस्तकर्मा निवेदितात्मा विचिकीर्षितो मे ।
तदाऽमृतत्वं प्रतिपद्यमानो मयाऽऽत्मभूयाय च कल्पते वै ॥ ३४ ॥

जें बोलिलीं धर्मकाममोक्षार्थ । तें सांडूनि साधनें समस्त । जे अनन्यभावें मज भजत । विश्वासयुक्त मज भावें ॥ १४ ॥ त्यांसी हे स्वरूपस्थिती । जे त्वां भोगिली आत्मप्रतीती । ते तत्काळ होय प्राप्ती । जाण निश्चितीं उद्धवा ॥ १५ ॥ धर्मार्थकामवासना । असोनि लागल्या मद्भजना । तेही परवूनियां जाणा । सायुज्यसदना मी आणीं ॥ १६ ॥ भक्तांसी स्वधर्मकर्मावस्था । तेही लाविल्या भजनपंथा । स्वधर्म कर्मीं अकर्मात्मता । माझिया मद्भक्ता उद्बोधीं मी ॥ १७ ॥ भक्त वांछी भोगकाम । भोग भोगोनि होय निष्काम । ऐशिया निजबोधाचें वर्म । मी आत्माराम उद्बोधीं ॥ १८ ॥ भक्त मागे अर्थसंपन्नता । त्याचे गांठीं धनसंचयता । माझी षड्गुणसमर्थता । बोळंगे तत्त्वतां त्यापाशीं ॥ १९ ॥ सर्व भूतीं माझी भक्ती । भक्त भजे अनन्यप्रीतीं । तैं चारी मुक्ती शरण येती । मद्भक्तां मुक्ती स्वतःसिद्ध ॥ ६२० ॥ वैद्य धडफुडा पंचानन । रोगियांची वासना पोखून । मागे तें देऊनि अन्न । बांचवी रसज्ञ रसप्रयोगें ॥ २१ ॥ तेवीं धर्मअर्थकामवासना । भक्तांच्या पोखूनियां जाणा । मी आणीं सायुज्यसदना । तेही विवंचना सांगितली ॥ २२ ॥ नाना साधनाभिमान । सांडूनियां ये जो मज शरण । त्यासीही स्वरूपप्राप्ति पूर्ण । उद्धवा जाण सुनिश्चित ॥ २३ ॥ भक्त सकाम जरी चित्तीं । तो जैं

चकित व अत्यंत विस्मित झाला व क्षणभर स्तब्ध होऊन मौन धरून बसला. ११ व मनांत म्हणाला कीं, आत्मस्वरूप इतकें जवळ असतांहि जर लोकांना कळत नाहीं तर मग ते साधकांच्या हातीं कसें येतें ! १२ उद्धवाचें मनोगत ओळखून श्रीकृष्णनाथानें त्याविषयीं निश्चित उपाय सांगितला. ६१३.

यदा मर्त्यः त्यक्तसमस्तकर्मा सन् मे निवेदितात्मा भवति तदा असौ मे विचिकीर्षितः अमृतत्वं प्रतिपद्यमानः मया आत्मभूयाय च कल्पते वै–जेव्हां हा मर्त्य, ज्यानें सर्व कर्मांचा त्याग केला आहे असा होत्साता, ज्यानें मला आत्मनिवेदन केलें आहे, असा होतो, तेव्हां तो मला विशेषरूपानें करण्यास इष्ट होतो. त्यामुळें मोक्षाला प्राप्त होणारा तो माझ्याशीं ऐक्य पावण्यास, मत्समान ऐश्वर्यास योग्य होतो हें तूं निश्चयानें जाण. ३४.

उद्धवा ! धर्म-अर्थ-काम-मोक्ष यांसाठीं सांगितलेलीं सगळीं साधनें सोडून मला अनन्यभावानें, विश्वासानें व भक्तीनें जे शरण येतात, १४ त्यांना तूं आतां अनुभविलेली आत्मप्रतीति तत्काल येते व ब्रह्मस्वरूपाची प्राप्ति होते. १५ धर्म-अर्थ-काम यांची वासना असूनहि माझी भक्ति केल्यास मी त्यांच्या वासना पूर्ण करून त्यांना सायुज्यपदाला पोंचवितों. १६ भक्तांना स्वधर्मकर्मांची आवड असूनहि ते जरी माझ्या भक्तिमार्गाला लागले, तरी स्वधर्मकर्मांतहि अकर्म असल्याचें मी दाखवून देतों. १७ भक्त जेव्हां सुखोपभोगाची इच्छा करितो, तेव्हां त्याला सुखोपभोग घेऊन निष्काम होण्याचें वर्म मी आत्माराम सांगतों. १८ भक्त धनराशी मागूं लागल्यास मी त्याला माझें षड्गुणैश्वर्य अर्पण करितों. १९ भक्तानें सर्वांभूतीं मद्भाव ठेविला व अनन्य प्रीतीनें माझें भजन केलें तर चारी मुक्ति त्याला शरण येतात. कारण माझ्या भक्तांची मुक्ति स्वतःसिद्धच असते. २० वैद्य जर आपल्या विद्येंत प्रवीण असला, तरच तो रोग्याला त्याची इच्छा पूर्ण करून, मागेल तो पदार्थ खावयास देऊन आपल्या चातुर्यानें औषधींच्या अद्भुत प्रयोगानें वांचवितो. २१ त्याप्रमाणें मी भक्तांच्या धर्म-अर्थ-काम-मोक्ष या चारी इच्छा पूर्ण करून त्यांना सायुज्यपदाला कसें आणतों, त्याचेंहि व्याख्यान केलें. २२ उद्धवा ! नानाप्रकारच्या साधनांचा अभिमान सोडून जे मला शरण येतात, त्यांस पूर्ण ब्रह्मज्ञान होतें, हें तूं अगदीं निश्चित समज. २३ भक्त मनांतून जरी सकाम असला तरी त्यानें अनन्य

करी अनन्यभक्ती । तैं काम पुरवूनि मी दें मुक्ती । भक्तां अधोगती कदा न घडे ।। २४ ।। बाळकें थाया घेऊनि कांहीं । मिठी घातल्या मातेच्या पायीं । धन वेंचोनि अर्थी देही । परी जीवें कांहीं मारीना ।। २५ ।। तेवीं माझी करितां अनन्यभक्ती । जो जो काम भक्त वांछी चित्तीं । तो तो पुरवूनि मी दें मुक्ती । परी अधोगतीं पडों नेदीं ।। २६ ।। देखोनि बाळकाची व्यथा । जेवीं सर्वस्वीं कळवळी माता । तेवीं निजभक्तांची अवस्था । मजही सर्वथा सहावेना ।। २७ ।। काम पुरवूनि द्यावया मुक्ती । काय माझे गांठीं नाहीं शक्ती । मी भक्तकैवारी श्रीपती । त्यासी अधोगती कदा न घडे ।। २८ ।। माझें नाम अवचटें आल्या अंतीं । रंक लाहे सायुज्यमुक्ती । मा माझी करितां अनन्यभक्ती । भक्तां अवगती मग कैंची ।। २९ ।। माझा भक्त जयाकडे कृपें पाहे । तोही माझी भक्ति लाहे । मा मद्भक्तां अवगति होये । हा बोलू न साहे मजलागीं ।। ६३० ।। सोसूनियां गर्भवासासी । म्यां मुक्त केला अंबऋषी । विदारूनि हिरण्यकशिपूसी । प्रल्हादासी रक्षिलें ।। ३१ ।। चक्र घेऊनियां हातीं । म्यां गर्भीं रक्षिला परीक्षिती । तो मी भक्तांसी अधोगती । कदा कल्पांतीं होऊं नेदीं ।। ३२ ।। माझिये भक्तीचेनि नांवें । तृण तेंही म्यां उद्धरावें । भक्तां केवीं अवगति पावे । जे जीवेंभावें मज भजले ।। ३३ ।। काया वाचा मन धन । अवंचूनि अनन्यशरण । त्याचा भोग मोक्षही जाण । मी श्रीकृष्ण स्वयें सोशी ।। ३४ ।। असा अनन्यभक्तीचा महिमा । सांगतां उत्साह पुरुषोत्तमा । तेणें उद्धवासी लोटला प्रेमा । स्वेद रोमा रवरवित ।। ३५ ।। ऐकोनि भक्तीचें महिमान । देखोनि उद्धवाचें प्रेम पूर्ण । श्रीशुक सुखावला आपण । स्वानंदपूर्ण डोलत ।। ३६ ।। हरिखें म्हणे परीक्षिती । धन्य हरिभक्त त्रिजगतीं । ज्यांसी सर्वार्थी मुक्ती । स्वमुखें श्रीपति बोलिला ।। ३७ ।। जैसें भक्तीचें महिमान । तैसेंचि उद्धवाचें प्रेम गहन । तैं उद्धवाचें प्रेमलक्षण । श्रीशुक आपण सांगत ।। ३८ ।।

भक्ति केली असतां, मी त्याची सकामता पुरवून त्याला मुक्ति देतों. माझ्या भक्तांचें केव्हांहि पतन होत नाहीं. २४ लहान बाळानें कांहीं हट्ट धरून जर मातेच्या पायाला मिठी घातली तर त्याची माता पैसे खर्चून त्याला ती वस्तु आणून देते, त्याचा कांहीं जीव घेत नाहीं. २५ त्याप्रमाणें माझी अनन्य भक्ति केली असतां, भक्ताच्या मनांत जी जी इच्छा असेल, ती ती पुरवून मी त्याला मोक्ष देतों; पण त्याचा अधःपात होऊं देत नाहीं. २६ बाळाची व्यथा पाहून मातेला जसा कळवळा येतो, तशी माझ्या भक्तांची दुःखस्थिति मलाहि सर्वथा सहन होत नाहीं. २७ भक्तांची इच्छा पुरवून त्यांना मुक्ति देण्याचें माझ्या अंगी सामर्थ्य नाहीं कीं काय ! मी भक्तांचा कैवारी श्रीपति त्यांना कदापि अधोगतीला जाऊं देत नाहीं. २८ मरणसमयीं अकस्मात् जरी माझें नांव उच्चारिलें, तरी तो रंकहि जर सायुज्यमुक्तीला प्राप्त होतो, तर मग माझी अनन्य भक्ति करणारे भक्त अवगतीला कसे जातील ! २९ माझा भक्त ज्याच्याकडे कृपादृष्टीनें पहातो, त्यालाहि माझी भक्ति लाभते. 'माझ्या भक्तांची अवगति होते' हे शब्दहि मला सहन होत नाहींत. ६३० ज्या मीं गर्भवास सोसून अंबरीषाला मुक्त केलें; हिरण्यकश्यपूचें विदारण करून प्रल्हादाचें रक्षण केलें; ३१ हातांत चक्र घेऊन परीक्षितीला गर्भांत रक्षिलें, तो मी माझ्या भक्तांची अधोगति कल्पांतींहि होऊं देणार नाहीं. ३२ माझ्या भक्तीसाठीं मी तृणाचाहि जर उद्धार करितों तर मग मला जीवाभावानें भजणाऱ्या भक्तांची अधोगति कशी संभवते ! ३३ काया, वाचा, मन व धन यांच्यायोगें जे निष्कपटपणानें मला अनन्य शरण येतात, त्यांचा भोग व मोक्ष मी श्रीकृष्ण स्वतः सोशितों. ३४ असा अनन्य भक्तीचा महिमा सांगत असतां पुरुषोत्तमाचा उत्साह अत्यंत वाढला. त्यामुळें उद्धवाला प्रेमाचा गहिंवर आला, रोमांच उभे राहिले व घाम सुटला. ३५ भक्तीचा महिमा ऐकून व प्रेमपूर्ण झालेल्या उद्धवाला पाहून श्रीशुकाचार्यांला अत्यंत संतोष झाला व तो स्वानंदानें डोलूं लागला. ३६ तो मोठ्या आनंदानें म्हणाला कीं, हे परीक्षिति राजा ! श्रीहरीनें आपल्या मुखानें ज्यांना सर्वप्रकारें मुक्ति सांगितली ते हरिभक्त त्रिभुवनांत धन्य होत. ३७ जसा भक्तीचा अगाध महिमा, तसेंच उद्धवाचें प्रेमहि अपार होतें. उद्धवाच्या प्रेमाचें लक्षण श्रीशुकाचार्य आपण होऊन सांगत आहेत. ६३८.

श्रीशुक उवाच ॥ स एवमादर्शितयोगमार्गस्तदोत्तमश्लोकवचो निशम्य ।
बद्धाञ्जलिः प्रत्युपरुद्धकण्ठो न किञ्चिदूचेऽश्रुपरिप्लुताक्षः ॥ ३५ ॥
विष्टभ्य चित्तं प्रणयावघूर्णं धैर्येण राजन् बहु मन्यमानः ।
कृताञ्जलिः प्राह यदुप्रवीरं शीर्ष्णा स्पृशंस्तच्चरणारविन्दम् ॥ ३६ ॥

जो ज्ञानियांचा ज्ञाननिधी । जो निजबोधाचा उदधी । जो आनंदाचा क्षीराब्धी । तो श्रीशुक स्वानंदीं तोषला बोले ॥ ३९ ॥ ऐक बापा परिक्षिती । श्रवणसौभाग्यचक्रवर्ती । ज्यातें सुर नर असुर वानिती । ज्याची कीजे स्तुति महासिद्धी ॥ ६४० ॥ ज्यातें वेद नित्य गाती । योगिवृंदीं वानिजे कीर्ती । तेणें श्रीकृष्णें स्तविली भक्ती । परम प्रीतीं अचुंबित ॥ ४१ ॥ अनन्यभक्तीपरतें सुख । आन नाहींच विशेख । सर्व सारांचें सार देख । मद्भक्ति चोख सुरवरां ॥ ४२ ॥ भक्तियोगाचा योगमार्ग । समूळ सप्रेम शुद्ध साङ्ग । स्वमुखें बोलिला श्रीरंग । तें उद्धवें चांग अवधारिलें ॥ ४३ ॥ ऐकतां भक्तीचें निरूपण । उद्धवाचें द्रवलें मन । नयनीं अश्रु आले पूर्ण । स्वानंदजीवन लोटलें ॥ ४४ ॥ शरीर जाहलें रोमांचित । चित्त जाहलें हर्षयुक्त । तेणें कंठीं बाष्प दाटत । स्वेदकण येत सर्वांगीं ॥ ४५ ॥ प्राण पांगुळला जेथींचा तेथ । शरीर मंदमंद कांपत । नयन पुंजाळले निश्चित । अर्धोन्मीलित ते जाहले ॥ ४६ ॥ औत्सुक्याचे अतिप्रीतीं । स्वानंदीं समरसे चित्तवृत्ती । उद्धवदेहाची विरतां स्थिती । प्रारब्धें निश्चितीं तें राखिलें ॥ ४७ ॥ जळीं नाव उलथतां पूर्ण । जेवीं दोर राखे आवरून । तेवीं मावळतां उद्धवपण । प्रारब्धें जाण राखिलें ॥ ४८ ॥ धैर्याचेनि अतिसामर्थें । आवरूनि प्रेमाचें भरितें । मी कृतकृत्य जाहलों एथें । हेंही निश्चितें मानिलें ॥ ४९ ॥ श्रीकृष्णें उद्धरिलें मातें । ऐशिया मानूनि उपकारातें । काय उतरायी होऊं मी यातें । ऐसें निजचित्तें विचारी

श्रीशुकः उवाच—शुकाचार्य म्हणाले—एवं आदर्शितयोगमार्गः सः तदा उत्तमश्लोकवचः निशम्य—याप्रमाणें भगवानांनीं ज्याला योगमार्ग पूर्णपणें दाखविला आहे असा तो उद्धव श्रीकृष्णाचें वचन ऐकून, बद्धाञ्जलिः प्रत्युपरुद्धकण्ठः अश्रुपरिप्लुताक्षः न किंचित् ऊचे—हात जोडून ज्याचा कंठ बाष्पांनीं दाटून आला आहे व नेत्र अश्रूंनीं भरून आले आहेत असा होत्साता कांहीं बोलूं शकला नाहीं. राजन्—हे राजा ! प्रणयावघूर्णं चित्तं धैर्येण विष्टभ्य बहु मन्यमानः कृताञ्जलिः शीर्ष्णा तच्चरणारविंदं स्पृशन् यदुप्रवीरं प्राह—प्रीतीनें क्षुब्ध झालेल्या चित्ताला धैर्यानें स्थिर करून स्वतःला कृतार्थ मानणारा उद्धव हात जोडून व मस्तकानें त्याच्या चरणकमलाला स्पर्श करून श्रीकृष्णाला असें बोलला. ३५–३६.

जो ज्ञान्यांचाहि ज्ञाननिधि, जो आत्मबोधाचा सागर, जो आनंदाचा समुद्र तो श्रीशुकाचार्य स्वानंदानें संतुष्ट होऊन बोलला. ३९ हे श्रवणसौभाग्यचक्रवर्ति परीक्षितिराजा ! ऐक बाबा ! सुर, नर, असुर ज्याचें वर्णन करितात, महासिद्ध ज्याचें स्तवन करितात, ६४० वेद ज्याचें नित्य गायन करितात, योगिवृंद ज्याची कीर्ति गातात, त्या श्रीकृष्णानें परम प्रीतीनें अपूर्व भक्तीची स्तुति केली. ४१ अनन्य भक्तीपेक्षां दुसरें अधिक सुखच नाहीं. सगळ्या सारांचें सार अशा माझ्या भक्तीला देवादिकहि श्रेष्ठ मानितात. ४२ भक्तियोगाचा सांग व शुद्ध योगमार्ग श्रीकृष्णानें समूळ सप्रेम सांगितला. तो उद्धवानें उत्तम प्रकारें ऐकला. ४३ भक्तीचें निरूपण ऐकून उद्धवाचें मन द्रवलें. नेत्रांतून आनंदाश्रु वाहूं लागले ४४ शरीरावर रोमांच उभे राहिले. चित्ताला आनंदाचें भरतें आलें. त्यामुळें कंठ दाटून आला. सर्वांगाला घाम सुटला. ४५ श्वासोच्छ्वास मंद झाला. शरीराला मंद कंपला सुटला. नेत्रांवर झांप येऊन ते अर्धोन्मीलित झाले. ४६ औत्सुक्याच्या अतिप्रीतीनें चित्तवृत्ति स्वानंदांत एकरूप झाली. उद्धव देहस्थिति विसरण्याच्या बेतांत आला; पण इतक्यांत प्रारब्धानेंच त्याला वांचविलें. ४७ जलामध्यें नौका पूर्णपणें पालथी होत असतां दोर जसा तिला धरून ठेवितो, त्याप्रमाणें उद्धवपण मावळण्याच्या बेतांत आलें असतां, प्रारब्धानें त्याला राखिलें. ४८ नंतर त्यानें मोठ्या धैर्यानें प्रेमाचें भरतें आवरून 'मी कृतकृत्य झालों' असें मानिलें. ४९ 'श्रीकृष्णानें माझा उद्धार केला, या त्याच्या उपकाराचा मी उतरायी कसा होऊं' असा तो मनांत विचार करूं लागला. ६५० गुरूला चिंतामणि द्यावा, तर

॥ ६५० ॥ गुरूसी चिंतामणि देवों आतां । तो चिंता वाढवी चिंतिलें देतां । गुरूंनीं दिधले अचिंत्यार्था । तेथें उत्तीर्णता कदा न घडे ॥ ५१ ॥ गुरूसी कल्पतरू देवों जातां । तो कल्पना वाढवी कल्पिलें देतां । गुरूनें दिधली निर्विकल्पता । त्यासी उत्तीर्णता तेणें नव्हिजे ॥ ५२ ॥ गुरूसी देवों स्पर्शमणी । तो स्पर्शें धातु करी सुवर्णी । ब्रह्मत्व गुरुचरणस्पर्शनीं । त्यासी नव्हे उत्तीर्णी परीसही देतां ॥ ५३ ॥ गुरूसी कामधेनु देऊं आणोनी । ते कामना वाढवी अर्थ देऊनी । गुरु निष्काम निर्गुणदानी । त्याचे उत्तीर्णी कामधेनु नव्हे ॥ ५४ ॥ त्रिभुवनींची संपत्ति चोख । गुरूसी देतां ते मायिक । जेणें दिधली वस्तु अमायिक । त्यासी कैसेनि लोक उतरायी होती ॥ ५५ ॥ देहें उतरायी होऊं गुरूसी । तंव नश्वरपण या देहासी । नश्वरें अनश्वरासी । उत्तीर्णत्वासी कदा न घडे ॥ ५६ ॥ जेणें अव्हाशंख दिधला आवडीं । त्यासी देऊनि फुटकी कवडी । उत्तीर्णत्वाची वाढवी गोडी । तैसी परवडी देहभावा ॥ ५७ ॥ जीवें उतरायी होऊं गुरूसी । तंव मिथ्यात्वची जीवित्वासी । जेणें दिलें सत्य वस्तूसी । मिथ्या देतां त्यासी लाजेना ॥ ५८ ॥ जेणें दिधलें अनर्घ्य रत्नासी । वंध्यापुत्र देवें केला त्यासी । तेवीं मिथ्यात्व जीवभावासी । उत्तीर्णत्वासी कदा न घडे ॥ ५९ ॥ काया वाचा मन धन । गुरूसी अर्पितां जीवप्राण । कदा नव्हे जें उत्तीर्ण । हें उद्धवें संपूर्ण जाणितलें ॥ ६६० ॥ जेथें अणुमात्र नाहीं दुःख । ऐसें दिधलें निजसुख । त्या गुरूसी उतरायी देख । न व्हावें निःशेख शिष्यांसी ॥ ६१ ॥ यालागीं मौनेचि जाण । उद्धवें घातलें लोटांगण । श्रीकृष्णाचे श्रीचरण । मस्तकीं संपूर्ण वंदिले ॥ ६२ ॥ मागां श्रीकृष्णें पुशिले पहा हो । उद्धवा तुझा गेला शोकमोहो । तेणें उद्धवासी जाहला विस्मयो । उत्तर द्यावया ठावो न घडेचि ॥ ६३ ॥ आतां वंदोनि श्रीचरण । कृतांजली धरोनि जाण । उत्तर द्यावया

तो चिंतिलेली वस्तु देऊन अधिक चिंता वाढवितो; पण गुरूनें जें चिंतारहित आत्मस्वरूप दिलें आहे, त्याचें उतरायी कदापि होतां येत नाहीं. ५१ गुरूला जर कल्पतरु द्यावा तर तो कल्पिलेल्या वस्तु देऊन कल्पना वाढवीत असतो, पण गुरूनें जी निर्विकल्पता दिली आहे, तिची फेड त्यानें होत नाहीं. ५२ गुरूला परीस द्यावा तर तो स्पर्शानें लोखंडाचें सोनें बनवितो; पण गुरुचरणाच्या स्पर्शानें ब्रह्मत्व प्राप्त होतें. तेव्हां परीस देऊनहि त्याचें उतरायी होतां येत नाहीं. ५३ गुरूला कामधेनु आणून द्यावी, तर ती इच्छा पुरवून कामना वाढविते; पण गुरु निर्गुणाचें दान देऊन निष्काम करितो. तेव्हां कामधेनूनें त्याचें उतरायी होतां येत नाहीं. ५४ सगळ्या त्रिभुवनाची संपत्ति जरी गुरूला दिली, तरीहि ती मिथ्या मायिक आहे. ज्यानें अमायिक आत्मवस्तु दिली, त्याचे उतरायी लोक कसे होणार ! ५५ देह देऊन गुरूचें उतरायी व्हावें, तर देहाला नश्वरपणा आहे. तेव्हां शाश्वताच्या मोबदल्यांत नश्वर वस्तु दिल्यानें उपकाराची फेड होत नाहीं. ५६ ज्यानें मोठ्या आवडीनें उजवा शंख दिला, त्याला त्याच्या बदली फुटकी कवडी देऊन आपलें प्रत्युपकाराचें औदार्य व्यक्त करण्यासारखाच हा देहभाव आहे. ५७ जीव अर्पण करून गुरूचें उतरायी व्हावें तर जीवाला मिथ्यात्व आहे. ज्यानें सत्य ब्रह्म वस्तु दिली त्याला मिथ्या देण्यांत लाज नाहीं का वाटत ! ५८ ज्यानें अमूल्य रत्न दिलें, त्याला वंध्यापुत्र देऊं करावा, त्याप्रमाणें जीवाभावाला मिथ्यात्व असल्यामुळें त्यानें उपकाराची फेड होत नाहीं. ५९ एकंदरींत काया, वाचा, मन, धन, जीव, प्राण हीं सर्व जरी गुरूला अर्पण केली तरी त्याचें उतरायी होणें कदापि शक्य नाहीं, हें उद्धवानें पूर्णपणें जाणलें. ६६० जेथें अणुमात्र दुःख नाहीं असें आत्मसुख ज्यानें दिलें, त्या गुरूचें शिष्याला पूर्णपणें उतराई कदापि होतां येत नाहीं. ६१ म्हणून उद्धवानें मौन धरून श्रीकृष्णापुढें लोटांगण घातलें आणि त्याच्या पुढें जाऊन शिरसा वंदन केलें. ६२ ‘उद्धवा ! तुझा शोक मोह गेला ना !’ असें श्रीकृष्णानें मागें एकादा प्रश्न विचारिलें होतें. पण त्यावेळीं उद्धवाला विस्मय वाटला व त्याला उत्तर देण्याचें भान राहिलें नाहीं.

आपण । श्रीकृष्णवदन अवलोकी ॥ ६४ ॥ जेवीं सेवितां चंद्रकर । चकोर तृप्तीचे दे ढेंकर । तेवीं उद्धव कृष्णसुखें अतिनिर्भर । काय प्रत्युत्तर बोलत ॥ ६५ ॥

उद्धव उवाच ॥ विद्रावितो मोहमहान्धकारो य आश्रितो मे तव सन्निधानात् ।

विभावसोः किंनु समीपगस्य शीतं तमो भीः प्रभवन्त्यजाद्य ॥ ३७ ॥

जो सकळदेवचूडामणी । जो यादवांमाजीं अग्रगणी । जो अविद्यारात्रीचा तरणी । जो शिरोमणि ब्रह्मवेत्त्यां ॥ ६६ ॥ ऐशिया श्रीकृष्णाप्रती । स्वानंदाचिये निजस्फूर्ती । उद्धवें सांगतां निजस्थिती । त्यामाजीं करी स्तुती आद्यत्वें हरीची ॥ ६७ ॥ मज तंव विचारितां । ब्रह्मा सर्वांचा आदिकर्ता । तोही नारायणनाभीं तत्त्वतां । होय जन्मता अजनामें ॥ ६८ ॥ तें कमळानभि नारायण । हें मायाशबल ब्रह्म जाण । ते मायेचें तूं आद्यकारण । आद्यत्व पूर्ण तुज साजे ॥ ६९ ॥ अविद्येच्या महारात्रीं । अडकलों होतों मोहअंधारीं । तेथूनि काढावया बाहेरीं । आणिकांची थोरी चालेना ॥ ६७० ॥ तेथ तुझेनि वचन-भास्करें । नासोनि शोकमोहअंधारें । मज काढिलें जी बाहेरें । चमत्कारें सन्निधीं तुझ्या ॥ ७१ ॥ तुझिये सन्निधीपाशीं । ठाव नाहीं अविद्येसी । तेथ मोहममता कैंची ग्रासी । हृषीकेशी तूं असतां ॥ ७२ ॥ अंधारीं राती अतिगहन । तेथ शीतें पीडिला जो संपूर्ण । त्यासी आतुडलिया हुताशन । शीत तम जाण तत्काळ पळे ॥ ७३ ॥ तो अग्नि सेवितां स्वयें सदा । शीततमांची भयबाधा । पुढती बाधों न शके कदा । तेवीं गोविंदा सन्निधि तुझी ॥ ७४ ॥ तेवीं शोकमोहममतेशीं । माया जन बांधे भवपाशीं । ते तुझिये सन्निधिपाशीं । जातो आपैसीं हारपोनी ॥ ७५ ॥ मरणजन्मांचे अपाये । मागां अनेक सोशिले

---

६३ म्हणून आतां तो त्याच्या चरणांना वंदन करून, हात जोडून उत्तर देण्यासाठीं श्रीकृष्णमुखाकडे पाहूं लागला. ६४ चकोर जसा चंद्रकिरणांच्या सेवनानें तृप्त होतो, तसा उद्धव श्रीकृष्णाच्या सुखानें पूर्ण आनंदित होऊन काय प्रत्युत्तर देत आहे, तें पहा. ६६५.

उद्धवः उवाच–उद्धव म्हणाला, यः मोहमहान्धकारः मे आश्रितः (आसीत्) सः तव सन्निधानात् विद्रावितः–ज्या मोहरूपी महा अंधकाराचा मीं आश्रय केला होता, तो तुझ्या सांनिध्यानेंच घालविला. अजाद्य–हे ब्रह्मदेवाच्याहि जनका ! विभावसोः समीपगस्य शीतं तमः भीः प्रभवन्ति किंनु–सूर्य किंवा अग्नि यांच्या समीप गेलेल्या पुरुषाला थंडी, अंधकार किंवा भीति हीं पीडा देण्यास समर्थ होतात काय ! ३७.

जो सर्व देवांतील श्रेष्ठ, यादवांतील प्रमुख, अविद्यारूपीरात्रीचा सूर्य, ब्रह्मवेत्त्यांतील शिरोमणि, ६६ अशा श्रीकृष्णाला स्वानंदपूर्ण उत्साहानें उद्धव आपली स्वतःची स्थिति सांगत असतांहि प्रामुख्यानें हरीची स्तुति करूं लागला. ६७ मला विचाराअंतीं असें वाटतें कीं, ब्रह्मदेव सर्वांचा आदिकर्ता आहे. कारण तो नारायणाच्या नाभी-पासून जन्मल्यामुळें त्याला जन्मतःच अज हें नांव प्राप्त झालें. ६८ तो कमलनाभि नारायणच मायाशबल ब्रह्म आहे. तूं मायेचें आदिकारण आहेस. तुला आद्यपणा पूर्णपणें शोभतो. ६९ मी अविद्येच्या काळोख्या रात्रीं अंधारांत अडकून पडलों होतों. तेथून मला बाहेर काढण्याचें दुसऱ्या कोणांतहि सामर्थ्य नव्हतें. ६७० पण तुझ्या उपदेश-रूपी सूर्यानें शोक-मोहरूपी अंधाराचा नाश करून मला त्यांतून मोठ्या चमत्कारानें तुझ्या देखतच बाहेर काढिलें. ७१ तुझ्या समीप अविद्या उभी सुद्धां रहात नाहीं मग तूं श्रीकृष्ण जवळ असतां मला मोह-ममता कशी ग्रासणार ! ७२ काळोख्या रात्रीं दाट अंधकारांत एखादा मनुष्य थंडीनें अतिशय काकडला असतां, त्याला जर अकस्मात् अग्नि सांपडला तर त्याच्या थंडीचें निवारण होऊन अनायासें अंधारहि नाहींसा होतो ७३ व त्यानें तोच अग्नि जवळ बाळगिल्यास त्याला पुढें कधींच थंडी व अंधार यांची भीति रहात नाहीं. तसें तुझें सान्निध्य आहे. ७४ याप्रमाणें माया लोकांना शोक-मोह-ममतारूपी संसारपाशानें बांधते. पण सर्व पाश तुझ्या सांनिध्यानें आपोआप गळून जातात. ७५ जन्म-मरणाची व्यथा मागें अनेक वेळां ज्यांनीं सोशिली आहे, त्यांना तुझें सान्निध्य घडतांच

स्वयें । ज्यासी तुझी सन्निधि होये । त्यासी तें भये समूळ मिथ्या ॥ ७६ ॥ तुझे सन्निधीपाशीं जाण । समूळ मायेचें निर्दळण । तेचि अर्थीचें निरूपण । उद्धव आपण सांगत ॥ ७७ ॥

प्रत्यर्पितो मे भवताऽनुकम्पिना भृत्याय विज्ञानमयः प्रदीपः ।
हित्वा कृतज्ञस्तव पादमूलं कोऽन्यत्समीयाच्छरणं त्वदीयम् ॥ ३८ ॥

तुझी सन्निधिमात्र देख । समूळ अज्ञानासी घातक । हेंचि मुख्यत्वें आवश्यक । भक्त सात्विक जाणती ॥ ७८ ॥ असो इतरांची गोष्टी । ज्यांही अनुभविलें निजदृष्टीं । अविद्या निरसावया सृष्टीं । सत्संगती लाठी सर्वार्थीं ॥ ७९ ॥ सत्संगाहीमाजीं जाण । तुझी संगती अतिपावन । तुवां उद्धरावया दीन जन । हें निजात्मज्ञान प्रकाशिलें ॥ ६८० ॥ माझें निमित्त करूनि जाण । उद्धरावया दीन जन । त्यांचें निरसावया अज्ञानघन । ज्ञानदीप पूर्ण प्रज्वाळिला ॥ ८१ ॥ उपदेशार्थ श्रद्धास्थिती । हेंचि टवळें पैं निश्चितीं । तेथें बोधिकां ज्या निजात्मयुक्ती । तेंचि टवळ्यांप्रती स्नेह पूर्ण ॥ ८२ ॥ विवेक वैराग्यधारण । हेंचि तेथील वाती जाण । तेथ प्रज्वळिला ज्ञानघन । चित्प्रभापूर्ण महादीप ॥ ८३ ॥ वैराग्य तेंचि वैराग्यधारण । जेथ ज्ञानदीपू प्रज्वळे पूर्ण । आशा तेचि माल्हवण । गडद संपूर्ण पडे तेथें ॥ ८४ ॥ तो दीप कर्णद्वारीं ठेविला । तंव सबाह्य प्रकाश जाहला । अज्ञानअंधार निर्दळिला । स्वयें प्रबळला सद्रूपें ॥ ८५ ॥ तेणें सबाह्यप्रकाशें । तुझी पदवी प्रकटली दिसे । ऐसें निजरूप हृषीकेशें । अनायासें मज अर्पिलें ॥ ८६ ॥ तुवां अंतर्यामित्वें आपुलें । स्वरूप पूर्वींच मज दिधलें । तें तुवांच माझारीं आच्छादिलें । भजन आपुलें प्रकटावया ॥ ८७ ॥ तुझ्या निजभजनाचें लक्षण । सर्व भूतीं भगवद्भजन । तेणें तूं साचार संतोषोन । अर्पिसी ज्ञान अर्पिलेंचि पुढती ॥ ८८ ॥ वाढवूनि निजभजन । माझें मज

त्यांचें भय समूळ मिथ्या होतें. ७६ तुझ्या सांनिध्यानें मायेचें समूळ निरसन होतें. उद्धव आतां याच अर्थाचें निरूपण करीत आहे. ६७७.

—जरी तुझ्या सानिध्यानेंच माझा मोह गेला आहे तरी—

अनुकंपिना भवता मे भृत्याय विज्ञानमयः प्रदीपः प्रत्यर्पितः—दया करणाऱ्या तुजकडून मज भृत्याला स्वमायेनें हरण करून नेलेला प्रदीप पुनः समर्पण केला गेला आहे. तव कृतज्ञः कः त्वदीयं पादमूलं हित्वा अन्यत् शरणं समीयात्—तुझे उपकार जाणणारा कोण बरें, तुझ्या चरणमूलाला सोडून दुसऱ्या कोणाला शरण जाईल ! ३८.

तुझें सान्निध्य अज्ञानाचें समूळ विघातक आहे. याचीच मुख्यत्वें करून आवश्यकता आहे. हें सात्त्विक भक्तांना ठाऊक आहे. ७८ इतरांच्या गोष्टी राहोत. मीं स्वतः याचा अनुभव घेतला आहे. अविद्येचा नाश करण्यास सृष्टींत सत्संगतीच समर्थ आहे. ७९ सत्संगतींतहि तुझी संगति तर अत्यंत पावन आहे. तूं अज्ञ जनांचा उद्धार करण्यासाठीं आपलें ब्रह्मज्ञान प्रकाशिलेंस. ६८० माझें निमित्त करून दीनांच्या उद्धारासाठीं व त्यांचें गाढ अज्ञान घालविण्यासाठीं तूं ज्ञानदीप पूर्णपणें प्रज्वलित केलास. ८१ उपदेशासाठीं श्रद्धा उत्पन्न करणें हें टवळें; आत्मबोध हेंच त्या टवळ्यांतील तेल; ८२ विवेक-वैराग्य धारण करणें हीच वात; तिनें तूं ज्ञानघन, चित्प्रभापूर्ण ज्ञानदीप प्रज्वलित केलास. ८३ नैराश्य हेंच वैराग्यधारण आहे. त्यानेंच ज्ञानदीप पूर्णपणें प्रज्वलित होतो. आशा हेंच दीप मालवणें होय. आशेचा उद्भव होतांच ज्ञान नाहींसें होऊन गाढ अंधकार पसरतो. ८४ पण तो दीप कर्णरूपी दारांत ठेविला असतां त्याचा प्रकाश आंत व बाहेर पडतो व ज्ञानरूपी अंधकाराचा नाश तो स्वतः चिद्रूपानें पूर्ण प्रकाश पावतो. ८५ त्याच्या अंतर्बाह्य प्रकाशानें तुझें स्वरूप व्यक्त झालेलें मला दिसलें. अशाप्रकारें श्रीकृष्णानें आत्मस्वरूप मला अनायासें अर्पण केलें. ८६ तूं अंतर्यामित्वानें आपलें स्वरूप मला पूर्वींच दिलें होतेंस. तें तूंच आपलें भजन प्रकट करण्यासाठीं पुनः आच्छादिलेंस. ८७ सर्व भूतांत भगवद्भाव ठेवणें, हा जो तुझ्या भजनाचा प्रकार त्यानें तूं सर्वप्रकारें संतुष्ट होऊन पूर्वींचेंच ज्ञान वारंवार अर्पण केलेंस. ८८ आत्मभजन वाढवून माझेंच ज्ञान

अर्पिसी ज्ञान । या नांव प्रत्यर्पण । साधु सज्ञान बोलती ॥ ८९ ॥ वाढवूनि अर्पिली भक्ती । माझें ज्ञान दिधलें माझें हातीं । दिधलें तेथ माया पुढती । विकल्पवृत्ती स्पर्शेना ॥ ६९० ॥ जे दिधली स्वरूपस्थिती । ते आच्छादेना कदा कल्पांतीं । यापरी गा श्रीपती । कृपा निश्चितीं तुवां केली ॥ ९१ ॥ यापरी तूं अतिकृपाळू । निजदासांलागीं मवाळू । त्या तुज सांडूनियां बरळू । आनासी गोवळू भजों धांवे ॥ ९२ ॥ त्यजूनि स्वामी हृषीकेशू । आना भजेल तो केवळ पशू । पशूंहीमाजीं तो रासभेशू । ज्यासी नाहीं विश्वासू हरिभजनीं ॥ ९३ ॥ तुवां जनांसी केला उपकारू । इंद्रियां पाटवें ज्ञानाधिकारू । तो उपकार विसरे जो नरू । तो जाण साचारू कृतघ्न ॥ ९४ ॥ जे जाणती तुझ्या उपकारातें । ते काया वाचा चित्तें वित्तें । कदा न भजती आनातें । तें मज निश्चितें मानलें ॥ ९५ ॥ मज निमित्त करूनियां जाण । जें त्वां प्रकाशिलें निजात्मज्ञान । तेणें जगाचें उद्धरण । श्रवणमननकीर्तनें ॥ ९६ ॥ यापरी कृपाळु पूर्ण । माझें छेदिलें भवबंधन । तेचि अर्थीचें निरूपण । उद्धव आपण स्वयें सांगे ॥ ९७ ॥

> वृक्णश्च मे सुदृढः स्नेहपाशो दाशार्हवृष्ण्यन्धकसात्वतेषु ।
> प्रसारितः सृष्टिविवृद्धये त्वया स्वमायया ह्यात्मसुबोधहेतिना ॥ ३९ ॥

तुवां मायेनें सृजिले जन । ते सृष्टि व्हावया वर्धमान । स्त्री पुत्र सुहृद सज्जन । हा स्नेह पूर्ण वाढविला ॥ ९८ ॥ मी जन्मलों यादवकुळांत । तेथ वृष्णि अंधक सात्वत । इत्यादि सुहृद समस्त । अतिस्नेहयुक्त आप्तत्वें ॥ ९९ ॥ तें सुहृदस्त्रीपुत्रस्नेहबंधन । या स्नेहपाशाचें छेदन । माझें बाळपणीं त्वां केलें जाण । जैं खेळतां तुझें ध्यान मज लागलें ॥ ७०० ॥ जेवीं वोडंबरी खेळतां खेळ । मोहिनी विद्या प्रेरी प्रबळ । ते विद्येचें आवरावया बळ । शकता केवळ खेळवितां ॥१॥ तेवीं तुझी स्वमाया जाण । जे कां सदा तव अधीन । तिचे स्नेहपाश दारुण । तेणें बांधोनि जन अतिबद्ध केले ॥ २ ॥ ते माझे

मला अर्पण केलेंस. यालाच ज्ञानी साधु प्रत्यर्पण म्हणतात. ८९ माझी भक्ति वाढवून माझेंच ज्ञान माझ्या हातीं दिलेंस. तें ज्ञान मिळाल्यामुळें मला आतां माया व विकल्पवृत्ति स्पर्शीहि करीत नाहींत. ६९० तूं जें आत्मस्वरूप मला दिलेंस तें कल्पांतींहि आच्छादित होणारें नाहीं. हे श्रीपते ! याप्रमाणें तूं कृपा केलीस ९१ असा जो तूं अतिशय कृपाळु आणि आपल्या भक्तांविषयीं सदय आहेस. त्या तुला सोडून मूढ अज्ञ जन इतरांना भजावयास धांवतात. ९२ पण, स्वामी हृषीकेशी श्रीकृष्णाला टाकून इतराला भजणारा केवळ पशु होय. ज्याचा हरिभजनावर विश्वास नाहीं, तो पशूंतीलहि गाढवांचा राजाच होय. ९३ तूं लोकांवर जो उपकार केला आहेस. त्यांना अव्यंग इंद्रियें देऊन ज्ञानाधिकार दिला आहेस तो उपकार जो मनुष्य विसरतो, तो खात्रीनें कृतघ्न जाणावा. ९४ ज्यांना तुझ्या उपकाराची जाणीव आहे ते काया, वाचा, मन व धन यांनीं इतरांस कदापि भजत नाहींत, हें मला निश्चयानें मान्य आहे. ९५ तूं मला निमित्त करून जें आत्मज्ञान प्रकट केलेंस, त्याच्या श्रवण-मनन-कीर्तनानें जगाचा उद्धार होईल. ९६ याप्रमाणें तूं पूर्ण कृपाळु होऊन माझें भवबंधन तोडून टाकिलेंस. उद्धव याचेंच आणखी अधिक निरूपण करीत आहे. ६९७.

किं च दाशार्हवृष्ण्यन्धकसात्वतेषु त्वया स्वमायया सृष्टिविवृद्धये यः मे सुदृढः स्नेहपाशः प्रसारितः सः आत्मसुबोधहेतिना वृक्णः च—आणि दाशार्ह, वृष्णि, अंधक व सात्वत यांच्या ठिकाणीं तूं आपल्या मायेनें सृष्टीच्या वृद्धीसाठीं जो माझ्या चित्तांत सुदृढ स्नेहपाश पसरला होतास, तो आत्मतत्त्वज्ञानरूपी शस्त्रानें तूंच तोडिलास. ३९.

तूं मायेनें लोक उत्पन्न केलेस आणि सृष्टीची वाढ होण्यासाठीं स्त्री, पुत्र, सुहृद्, सज्जन यांच्यावरील स्नेह पूर्णपणें वाढविलास. मी यादवकुळांत जन्मलों. त्यांतील वृष्णि, अंधक, सात्वत इत्यादि माझे सर्व सोयरे-धायरे आप्तपणामुळें मला अत्यंत प्रिय होते. ९९ त्या सुहृद्-स्त्री-पुत्रांवरील माझा स्नेहपाश तूं बाळपणींच तोडून टाकिलास व तुझ्याशीं खेळतांना मला तुझा ळळा लागला. ७०० गारुडी आपल्या खेळांत मोहिनी विद्या पसरून नजरबंदी करितो. त्या विद्येचा प्रभाव आवरण्यास तो खेळ करणाराच तेवढा समर्थ असतो. १ तशीच तुझी माया आहे. ती निरंतर तुझ्या अधीन असते. तिनें आपल्या भयंकर स्नेहपाशानें लोकांना बद्ध केलें

स्नेहपाश जाण । त्वां पूर्वींच छेदिले आपण । जैं मज होतें बाळपण । तैंचि कृपा पूर्ण मज केली ॥ ३ ॥ तें भवबंधछेदितें जें शस्त्र । तुवां निजयुक्ती फोडोनि धार । सतेज करूनियां खडतर । मजलागीं स्वतंत्र अर्पिलें ॥ ४ ॥ येणें शस्त्रबळें मी जाण । छेदूं शकें जगाचें बंधन । एवढी मजवरी कृपा पूर्ण । केली आपण दयालुत्वें ॥ ५ ॥ संसार दुःखरूप जो कां एथें । तो सुखरूप जाहला मातें । ऐशिये कृपेचेनि हातें । मज निश्चितें उद्धरिलें ॥ ६ ॥ मी कृतकृत्य जाहलों एथें । परी कांहींएक मागेन तूतें । ते कृपा करावी श्रीकृष्णनाथें । म्हणोनि चरणातें लागला ॥ ७ ॥

नमोऽस्तु ते महायोगिन् प्रपन्नमनुशाधि माम् । यथा त्वच्चरणाम्भोजे रतिः स्यादनपायिनी ॥ ४० ॥

न घडे ते घडवी आपण । नाथिलें दावी विंदान । जित्या मेल्या लावूनि लग्न । नांदवी संपूर्ण निजमाया ॥ ८ ॥ जे योगियांसी अतिदुस्तर । जिणें नाडिले स्रष्टा शंकर । ते माया तुझी किंकर । तूं परात्पर महायोगी ॥ ९ ॥ त्या तुझ्या कृपेस्तव जाण । मी कृतकृत्य जाहलों आपण । न देखें भव-भयादि दुःखभान । स्वानंदनिमग्न सर्वदा ॥ ७१० ॥ दृश्य द्रष्टा दर्शन । नाहीं त्रिपुटी नाहीं गुण । हारपलें मीतूंपण । स्वानंदपूर्ण निजबोधें ॥ ११ ॥ निजबोधें स्वानंदपूर्ण । हेंही बोल मायिक जाण । परादि-वाचां पडिलें शून्य । यालागीं मौन वेदवादा ॥ १२ ॥ कार्य कारण कर्तव्यता । मज उरली नाहीं सर्वथा । तरी कांहींएक श्रीकृष्णनाथा । तुज मी आतां मागेन ॥ १३ ॥ जेवीं कां बाळकाचा थाया । कळवळोनि पुरवी माया । तेवीं माझे वचना या । श्रीकृष्णराया अवधारीं ॥१४॥ हें अंतींचें माझें मागतेपण । देवें अवधारावें सावधान । वंदूनियां श्रीकृष्णचरण । अगम्य विंदान मागत ॥१५॥ मज थोर भ्रम होता चित्तीं । गोड असेल

आहे. २ ते माझे स्नेहपाश तूं स्वतः पूर्वींच तोडिले होतेस. जेव्हां मी लहान होतों तेव्हां बाळपणींच तूं मजवर पूर्ण कृपा केलीस. ३ भवबंधाचा छेद करणाऱ्या त्या शस्त्राला तूं आपल्या युक्तीनें तीक्ष्णधार पाजवून सतेज केलेंस आणि मला स्वातंत्र्य दिलेंस. ४ आतां या शस्त्राच्या साह्यानें मी जगाचें बंधन सोडूं शकेन, एवढी तूं मजवर मोठ्या दयालुत्वानें कृपा केलीस. ५ हा जो या लोकींचा दुःखरूप संसार तो मला सुखाचा झाला व अशा कृपेच्या हातानें तूं माझा खात्रीनें उद्धार केलास. ६ मी तर या जन्मींच कृतकृत्य झालों आहें; पण मी तुझ्यापाशीं एक देणगी मागतों, तेवढी श्रीकृष्णनाथानें मला कृपा करून द्यावी, असें म्हणून त्यानें श्रीकृष्णाचे चरण धरिले. ७०७.

याप्रमाणें तूं मजवर जरी पुष्कळ उपकार केले आहेस तरी मी आतां तुला एवढीच प्रार्थना करितों—

महायोगिन्–हे महायोगिन्, **ते नमः अस्तु**–तुला नमस्कार असो. **यथा त्वच्चरणाम्भोजे अनपायिनी रतिः स्यात् तथा प्रपन्नं मां अनुशाधि**–ज्याप्रकारें तुझ्या चरणकमलाच्या ठिकाणीं, मुक्तीमध्येंहि निवृत्त न होणारी रति जडेल, तशाप्रकारें शरण आलेल्या मला उपदेश कर. ४०.

तुझी माया न घडणारें घडवितें, नसलेल्या गोष्टीचा चमत्कार दाखविते, चैतन्य व जड देह यांचें लग्न लाविते आणि त्या सर्वांना नांदविते. ८ जी योग्यांनाहि अति दुस्तर, जिनें ब्रह्मदेव व शंकर यांनाहि नाडिलें, ती माया तुझी आज्ञांकित दासी आहे. असा तूं परात्पर महायोगी आहेस. ९ त्या तुझ्या कृपेमुळेंच मी कृतकृत्य झालों. मला भव-भयादि दुःखाचें भानहि राहिलें नाहीं. मी निरंतर स्वानंदांत निमग्न झालों. ७१० दृश्य, द्रष्टा, दर्शन ही त्रिपुटी व त्रिगुण हीं दोन्हीं नाहींशीं झालीं. मीतूंपणा लोपला व मी आत्मज्ञानानें स्वानंदपूर्ण झालों. ११ मी आत्मज्ञानानें स्वानंदपूर्ण आहें हें बोलणेंहि मिथ्या आहे. कारण परादि चारी वाणींची गति खुंटली. तेव्हां वेदवादानें मौन धरिलें. १२ कार्य, कारण व कर्तव्यता हीं मला सर्वदा उरलीं नाहींत. तरी आतां हे श्रीकृष्णनाथा ! मी तुझ्यापाशीं कांहीं मागतों. १३ बाळाचा हट्ट त्याची माता जशी कळवळून पुरविते तसें श्रीकृष्णराया ! माझें वचन ऐक. १४ माझें हें शेवटलें मागणें देवानें लक्षपूर्वक ऐकावें. असें म्हणून उद्धवानें श्रीकृष्णाचे चरण धरिले व अगम्य मागणी केली.

जीवन्मुक्ती । तेथ न देखें तुझी भक्ती । कोरडी मुक्ति मज न लगे ॥ १६ ॥ सद्गुरुकृपावचनोक्तीं । शिष्य-तत्काळ लाहे मुक्ती । त्या तुज सद्गुरूची राहे भक्ती । जळो ती मुक्ति मज न लगे ॥ १७ ॥ यालागीं तुज शरण । मागुतेन मी आलों जाण । सायुज्याहीवरी पूर्ण । तुझें गुरुभजन मज देईं ॥ १८ ॥ मागां बहुतीं केली भक्ती । म्हणसी त्यांसी म्यां दिधली मुक्ती । परी मुक्तीवरती भक्ती । नाहीं भजप्रती मागितली ॥ १९ ॥ मागां जिहीं जिहीं केली भक्ती । त्यांसी त्वां ठकविलें देऊनि मुक्ती । ते ठकडेपण श्रीपती । न चले मजप्रती सर्वथा ॥ ७२० ॥

सं०श्लोक ॥ आत्मारामाश्च मुनयो निर्ग्रन्था अप्युरुक्रमे । कुर्वन्त्यहैतुकीं भक्तिमित्थंभूतगुणो हरिः

ज्यांची अहंकारशून्य वृत्ती । जाहले आत्माराम सहजगती । तेही अहेतुक भक्ति करिती । ऐशी स्वरूपस्थिती पैं तुझी ॥ २१ ॥ तेथ त्यजोनियां तुझी गुरुभक्ती । मुक्ति मागणें हेचि भ्रांती । असो तुझी न लगे मुक्ती । तुझी गुरुभक्ती मज देईं ॥ २२ ॥ ज्यासी आकळली निजमुक्तता । म्हणसी त्यासी भक्ती नेदवे आतां । हे मजसी बोलों नको कथा । तुझी समर्थता मी जाणें ॥ २३ ॥ तूं न घडे तें घडविसी । न चळे तें चाळविसी । नव्हे तें तूं होय करिसी । नाहीं सामर्थ्यासी मर्यादा ॥ २४ ॥ अगम्य सामर्थ्याची गणना । बुडत्या तारूनि पाषाणां । त्यावरी तारिसी वानरसेना । सेतुबंधनां श्रीरामा ॥ २५ ॥ केवळ जे कां वनचर । पालेखाईर वानर । चारी मुक्ती त्यांच्या किंकर । त्यांसी सुरवर वंदिती स्वयें ॥ २६ ॥ केवळ जे कां व्यभिचारिणी । शेखीं ज्या घुरटा गौळणी । मोक्ष लागे त्यांच्या चरणीं । ये ब्रह्मा लोटांगणीं चरणरजासी ॥ २७ ॥ तूं परमात्मा परमेश्वर । हें नेणती गौळणी वानर । तरी तुझें त्यांसी भजनमात्र । फळलें साचार परब्रह्मत्वें ॥ २८ ॥ ऐसें अगाध तुझें भजन । अगम्य

---

१५ माझ्या मनाला मोठा भ्रम होता कीं, जीवन्मुक्ति अतिशय उत्कृष्ट असेल. पण त्यांत तुझी भक्ति दिसत नाहीं. ती कोरडी मुक्ति मला नको. १६ सद्गुरूच्या कृपायुक्त भाषणानेंच शिष्याला तत्काळ मुक्ति लाभते. पण त्यामुळें तुज सद्गुरूची भक्ति करणें राहून जातें, अशा प्रकारची जळो ती मुक्ति. मला ती नको. १७ यास्तव मी तुला पुनः शरण आलें आहें. सायुज्य मुक्तीहूनहि श्रेष्ठ असें तुझें गुरुभजन मला दे. १८ ' पूर्वी पुष्कळांनीं भक्ति केली व त्यांस मीं मुक्ति दिली. पण त्यांतील कोणीहि मुक्तीवरील भक्ति अजूनपर्यंत मागितली नव्हती ' १९ असें जर म्हणशील तर ज्यांनीं ज्यांनीं भक्ति केली, त्यांना तूं मुक्ति देऊन ठकविलेंस; पण आतां बाबा श्रीकृष्णा ! माझ्या-पाशीं तुझा तो लपडाव चालणार नाहीं बरें ! ७२०.

आत्म्यामध्येंच रममाण झालेले व ग्रंथरहित असे मुनींहि सर्वशक्तिमान् हरीची निष्काम भक्ति करितात. कारण हरि अशा लोकोत्तर गुणांनीं युक्त आहे.

ज्यांची वृत्ति अहंकारशून्य होऊन जे स्वभावतःच आत्मस्वरूपाला प्राप्त झाले आहेत, तेहि माझी निष्काम भक्ति करितात. असें तुझें आत्मस्वरूप आहे. २१ तेव्हां तुझी गुरुभक्ति सोडून मुक्ति मागणें ही केवल भ्रांति आहे. तें असो; पण मला तुझी मुक्ति नको. मला निष्काम गुरुभक्ति दे. २२ ' ज्याला एकदां मुक्ति देऊन टाकिली, त्याला आतां परमभक्ति देववत नाहीं,' असें जर म्हणशील तर या गोष्टी मला मुळींच सांगू नकोस. कारण तुझें सामर्थ्य मी पूर्णपणें जाणतों. २३ तूं न घडणारें घडवितोस; न हलणारें हलवितोस; नसलेलें अस्तित्वांत आणितोस. असें तुझें सामर्थ्य अमर्याद आहे. २४ तुझ्या सामर्थ्याची मोजदाद करणें अगम्य आहे. हे श्रीरामा ! तूं सेतु बांधण्यासाठीं बुडते दगड तरावयास लाविलेस आणि त्यावरून वानरसेनेला तारिलेंस. जे केवल वनचर, झाडाचा पाला खाणारे वानर त्यांच्या चारी मुक्ति किंकर झाल्या व श्रेष्ठ देव स्वतः होऊन त्यांस वंदन करूं लागले. २६ ज्या केवल व्यभिचारिणी, गवाळ्या गौळणी त्यांच्याहि पायाशीं मोक्ष आला व त्यांच्या चरणधुळीपुढें ब्रह्मदेव लोटांगण घालूं लागला. २७ तूं परमात्मा परमेश्वर आहेस, हें गौळणींना व वानरांना ठाऊक नव्हतें. तरी तुझ्या नुसत्या भजनानेंच त्यांना परब्रह्माची प्राप्ती झाली. २८ असें तुझें भजन अलौकिक आहे. तुझ्या भजनाचा महिमा अगाध आहे. तुझें देवपण भक्तीच्या अधीन

भजनाचें महिमान । भक्तिअधीन तुझें देवपण । मा मोक्षासी कोण अधिकाई ॥ २९ ॥ भक्तीच्या पोटीं जन्मली मुक्ती । वाढली मुक्ती भक्तीतें घाती । ऐसी जे कां मुक्ती मातृहंती । तिसी मी सर्वार्थी नातळे ॥ ७३० ॥ फिटे मुक्तीचें दूषण । जेणें ते होय अतिपावन । तें मी सांगेन विंदान । ऐक सावधान श्रीकृष्णा ॥ ३१ ॥ जोडल्याही मुक्तपण। मज द्यावें तुझें गुरुभजन । तेणें मुक्तिही होय पावन । म्हणोनि लोटांगण घातलें ॥ ३२ ॥ मस्तकीं धरिले श्रीचरण । उद्धव सर्वथा न सोडी जाण । तेणें ठकाच जाहला श्रीकृष्ण । त्यासीं संपूर्ण तुष्टला ॥ ३३ ॥ जाणोनि आपुलें मुक्तपण । मी न सांडीं तुझें निजभजन । ऐशी कृपा करीं पूर्ण । म्हणोनि श्रीचरण न सोडी ॥ ३४ ॥ मुक्तता मानल्या संपूर्ण । तैं राहों न शके सद्गुरुभजन । हेंही बाधों न शके विघ्न । तैशी भक्ति निर्विघ्न मज सांग ॥ ३५ ॥ कोटिजन्में शिणतां जाण । म्हणसी नातुडे मुक्तपण । त्या मोक्षा नांव ठेविसी विघ्न । मूर्ख संपूर्ण मज म्हणसी ॥ ३६ ॥ जेणें सुटे तुझें सद्गुरुभजन । तें मी मानीं परम विघ्न । तुझे भक्तिवीण मुक्तपण । अलवणी मज जाण गोविंदा ॥ ३७ ॥ माझी न मोडे नित्यमुक्तता । अहेतुक चालवीं भक्तिपंथा । ऐसी कृपा करीं श्रीकृष्णनाथा । झणीं संकोचता मानिसी ॥ ३८ ॥ म्हणसी म्यां दिधली नित्यमुक्ती । ते माझी मजपाशीं सिद्ध होती । दिधली म्हणा हे मिथ्या वदंती । वाउगी ख्याती दातृत्वाची ॥ ३९ ॥ माझी स्वस्तःसिद्ध नित्यमुक्तता । त्यावरी भक्ति मी मागें आतां । ते देशील तरी तूं साचार दाता । उदारता या नांव ॥ ७४० ॥ ते संतोषोनि भक्ति देतां । उल्हास न देखों तुझ्या चित्ता । थोर मांडली कृपणता । कृष्णनाथा मजलागीं ॥ ४१ ॥ जे सांडवी सद्गुरुभक्ती । आम्हां न लगे तुझी जीवन्मुक्ती । मुक्ति म्हणणें हेंही भ्रांती । ऐक श्रीपति सांगेन ॥ ४२ ॥ मुळींच मुख्य नाहीं बद्धता । तेथ कैंची काढिली मुक्तता । मिथ्या मुक्ति नातळे सर्वथा । माझी गुरुभक्तता मज देईं ॥ ४३ ॥ मागें ज्यांसी त्वां

आहे. मग मोक्षांतच काय अधिक आहे! २९ भक्तीपासूनच मुक्तीचा जन्म झाला. भक्तीवरच मुक्ति वाढली व शेवटीं तीच भक्तीचा घात करण्यास प्रवृत्त झाली. अशी जी मातृहत्या करणारी मुक्ति तिला मी स्पर्शेहि करणार नाहीं. ७३० ज्यायोगें मुक्तीला लागलेलें हें दूषण नाहींसें होईल, अशी एक अत्यंत पवित्र युक्ति मी तुला सांगेन. ती हे श्रीकृष्णा! तूं सावधान चित्तानें ऐक. ३१ मुक्ति प्राप्त झाली तरीहि मला गुरुभजन द्यावें, म्हणजे त्यायोगें मुक्तिहि पावन होईल. असें म्हणून उद्धवानें लोटांगण घातलें. ३२ त्यानें श्रीहरीचे चरण मस्तकावर धारण केले, ते तो कांहीं केल्या सोडीना. तेव्हां श्रीकृष्ण आश्चर्यचकित होऊन त्यावर पूर्ण संतुष्ट झाला. ३३ 'माझें मुक्तपण जाणूनहि मी तुझें भजन कदापि सोडणार नाहीं. तरी माझ्यावर ही कृपा कर' असें म्हणून उद्धव श्रीकृष्णचरण सोडीना. ३४ मुक्ति पूर्णपणें लाधल्यावर सद्गुरुभजन राहूं शकत नसलें तर ज्यांत हेंहि विघ्न बाधणार नाहीं, अशी निर्विघ्न भक्ति मला सांग. ३५ 'कोट्यवधि जन्म प्रयास करूनहि जी मुक्ति मिळत नाहीं. त्या मुक्तीला तूं नांवें ठेविनेस' असें म्हणून तूं मला मूर्ख ठरविशील. ३६ पण हे गोविंदा! ज्यायोगें सद्गुरुभजन सुटतें, त्याला मी परम विघ्नच समजतों. तुझ्या भक्तीवांचून असलेली मुक्ति मला अळणी वाटते. ३७ हे श्रीकृष्णनाथा! माझ्या नित्यमुक्ततेचा भंग न होतां निष्काम भक्तिमार्ग चालीव. अशी मजवर कृपा कर. इतका संकोच कां मानितोस! ३८ तूं म्हणशील कीं, तुला नित्यमुक्ति दिली; तर ती माझी माझ्यापाशीं सिद्धच होती. मग दिली हें बोलणेंच मुळीं व्यर्थ आहे. ती दातृत्वाची मिथ्या प्रौढी आहे. ३९ नित्यमुक्तता माझी स्वतःसिद्ध आहे. त्यावर मी जी भक्ति आतां मागत आहे, ती जर देशील तर तूं खरा दाता. त्यालाच औदार्य म्हणतां येईल. ७४० परंतु प्रसन्न होऊन भक्ति देण्याचा तुझ्या मनाचा उल्हास दिसून येत नाहीं. हे कृष्णनाथा! तूं माझ्याशीं हा फारच कृपणपणा मांडला आहेस. ४१ ज्याच्या योगें गुरुभक्ति सुटते, ती तुझी जीवन्मुक्ति मला मुळीं नकोच. हे श्रीकृष्णा! मुक्ति म्हणणें हाहि भ्रमच आहे. तेंहि सांगतों, ऐक. ४२ मुळांतच जेथें बद्धता नाहीं, तेथें मुक्तता कोठून काढलीस! त्या तुझ्या मिथ्या मुक्तीला सर्वथा मी स्पर्शेहि करणार नाहीं. माझी आपली गुरुभक्ति मला दे. ४३ पूर्वी तूं ज्यांना मुक्ति दिलीस ते

दिधली मुक्ती । ते ठकिले ठकिले याच रीतीं । तैसें चाळवूं नको श्रीपती । मोक्षावरील भक्ति मज देईं ॥ ४४ ॥ म्हणोनि घातलें लोटांगण । धांवोनि धरीले दोनी चरण । प्रेमें बोसंडला श्रीकृष्ण । उद्धवासी संपूर्ण तुष्टला ॥ ४५ ॥ मोक्षाहीवरील गुरुभक्ती । उद्धवें मागीतली नाना युक्तीं । जे जे चालली उपपत्ती । तेणें सुखें श्रीपती सुखावला ॥ ४६ ॥ सुखें सुखावली कृष्णमूर्ती । डोलो लागला स्वानंदास्थितीं । तेणें संतोषें भक्तिमुक्ती । उद्धवाहातीं अर्पिली ॥ ४७ ॥ जगीं उद्धवाचें शुद्ध पुण्य । जगीं उद्धवाची धन्य धन्य । ज्यालागीं सर्वस्वें श्रीकृष्ण । मोक्षावरील गुरुभजन स्वानंदें देत ॥ ४८ ॥ गुरु ब्रह्म दोनी अभिन्न । हेंही सद्गुरु प्रबोधी पूर्ण । यालागीं मोक्षावरील गुरुभजन । नव्हे दूषण सच्छिष्या ॥ ४९ ॥ मागिलां निजभक्तां- प्रती । स्वानंदें तुष्टला श्रीपती । तिहीं मागीतली निजमुक्ती । त्यांसी हे स्थिती अतर्क्य ॥ ७५० ॥ उद्धवें थोर केली ख्याती । मुक्तीचे माथां बाइली भक्ती । अगम्य मागितली स्थिती । हे श्रीपति अर्पित ॥ ५१ ॥ उद्धवा मुक्तीवरील जे भक्ती । ते मज अवतारांची अवतारशक्ती । येणें उत्पत्ति स्थिति प्रलय अंतीं । करूनि श्रीपती मी अलिप्त ॥ ५२ ॥ येणेंचि बळें म्यां तत्त्वतां । कर्मे करूनि मी अकर्ता । भोग भोगूनि अभोक्ता । जाण सर्वथा येणें योगें ॥ ५३ ॥ हा योग न कळे ज्यासी । दुःखरूप संसार त्यासी । हा अखंड योग मजपाशीं । मी संसारेंसीं सुखरूप ॥ ५४ ॥ हा योग सदाशिव जाणे । कां म्यां जाणिजे नारायणें । इतरांचें जें जाणणें । तें अगम्यपणें रिघेना ॥ ५५ ॥ ऐसी श्रीकृष्ण सांगे गुह्य गोष्टी । ते स्थिति बाणली उद्धवाचे पोटीं । दोघां निजबोधें एकगांठी । भजनकसवटी कळों सरली ॥ ५६ ॥ मुक्तीसीं भक्तीची हातवटी । ते उद्धवासी कळली गोष्टी । तो उल्हास न माये पोटीं । स्वानंदपुष्टी कोंदला ॥ ५७ ॥ जेवीं बाळकाच्या थायाकारणें । माता लेववी निजभूषणें । तेवीं उद्धवालागीं श्रीकृष्णें । अवतारस्थिति देणें

बिचारे सगळे असेच फसले. मला आतां तूं अशा चाळवण्या दाखवूं नकोस. ज्ञानोत्तर भक्ति मला दे. ४४ असें म्हणून उद्धवानें पुनः लोटांगण घातलें व धांवत जाऊन श्रीहरीचे दोन्ही चरण धरिले. तेव्हां श्रीकृष्णाला प्रेमाचें पूर्ण भरतें आलें व तो उद्धवावर अत्यंत संतुष्ट झाला. ४५ उद्धवानें नाना युक्ति- प्रयुक्तीनें जे विवेचन केलें व ज्ञानोत्तर श्रेष्ठ भक्ति मागितली त्यानें श्रीपति प्रसन्न झाला. ४६ श्रीकृष्ण अशा प्रकारें आनंदानें आत्मानंदांत डोलूं लागला व त्यानें प्रसन्न होऊन भक्ति व मुक्ति दोन्हीं उद्धवाला अर्पण केल्या. ४७ जगांत उद्धवाचेंच पुण्य शुद्ध. जगांत उद्धव धन्य धन्य होय. म्हणूनच श्रीकृष्णानें सर्वस्वानें त्याला मोक्षाहूनहि श्रेष्ठ गुरुभजन स्वानंदानें दिलें. ४८ गुरु व ब्रह्म हे दोघे भिन्न नाहींत. याचाहि सद्गुरु पूर्ण उपदेश करितो. म्हणून सच्छिष्याला मोक्षावरील गुरुभजनानें दूषण लागत नाहीं. ४९ पूर्वींच्या भक्तांवर श्रीपति आनंदानें प्रसन्न झाला व त्यांनीं फक्त मुक्ति मागितली. ती त्यांना दिली. त्यांना ही भक्ति अतर्क्यच होती. ७५० पण उद्धवानें तर मोठी मातच उडविली. मुक्तीच्या शिरावर भक्ति बसविली व अगम्य स्थिति मागितली. ती श्रीकृष्णानें त्याला अर्पण केली व म्हटलें कीं, ५१ उद्धवा! मुक्तीहूनहि श्रेष्ठ असलेली भक्ति माझ्या अवतारांतील अवतारशक्ति आहे. तिच्या योगें मी उत्पत्ति, स्थिति व लय करून शेवटीं अलिप्त रहातों. ५२ तिच्याच सामर्थ्यानें या योगामुळें कर्मे करून अकर्ता, भोग भोगून अभोक्ता असतों. ५३ हा भक्तियोग ज्याला कळत नाहीं, त्याला संसार दुःखरूप होतो. हा अखंड योग मजपाशीं असल्यामुळें मी संसारांत असूनहि पूर्ण सुखस्वरूप आहें. ५४ हा भक्तियोग एक सदाशिव जाणें किंवा मी नारायण जाणें. तो अगम्य असल्यामुळें इतरांचा त्यांत प्रवेशच होत नाहीं. ५५ अशी श्रीकृष्णानें गुह्य गोष्ट सांगितली असतां ती स्थिति उद्धवाच्या मनांत ठसली. आत्मज्ञानानें दोघांची एकात्मता झाली. त्याला भजनाची कसोटी कळली. ५६ मुक्तीला भक्तीचाच पूर्णपणें आधार आहे. ही गोष्ट उद्धवाला कळली. त्याचा आनंद पोटांत मावेनासा झाला व तो त्या स्वानंदानें व्यापून गेला. ५७ बाळाचे लाड पुरविण्यासाठीं माता जशी त्याला वस्त्रभूषणांनीं सजविते, त्याप्रमाणें श्रीकृष्णानें उद्धवाला अवतारस्थिति दिली. ५८ मनाचा विषय न होतां, बुद्धीलाहि न कळतां व शेवटीं गगना-

निश्चित ॥ ५८ ॥ मनाचे नाइकती कान । बुद्धीचें न देखती नयन । शेखीं गगनातेंही चोरून । उद्धवासी श्रीकृष्ण निजस्थिति अर्पी ॥ ५९ ॥ जे ब्रह्मवेत्त्यांसी नाकळे । जे वेदानुवादा न कळे । ते स्थिति उद्धवासी गोपाळें । कृपाबळें अर्पिली ॥ ७६० ॥ पूर्वी श्रीकृष्णें पुसतां पहा हो । उद्धरलों म्हणे उद्धवो । आतां मागे भजनभावो । हा गूढाभिप्रावो हरि जाणे ॥ ६१ ॥ मुक्तीवरील मागतां भक्ती । श्रीकृष्णाची अवतार-शक्ती । मायानियंतृत्वाची पूर्ण स्थिती । उद्धवाचे हातीं स्वयें आली ॥ ६२ ॥ जाणोनि मायेचें मिथ्यात्व पूर्ण । तिचें प्रेरण आणि अवरण । हें मायानियंतृत्वलक्षण । उद्धवासी श्रीकृष्ण स्वयें अर्पी ॥ ६३ ॥ जैसें बुद्धिबळांचे पोटीं । पूर्व कर्म नसतां गांठीं । राजा प्रधान पशु प्यादा उठी । निर्धारितां दृष्टीं काष्ठ एक ॥ ६४ ॥ एकचि काष्ठ दोही भारीं । तेथ कोण कोणाचा वैरी । वैर नसतांही झुंजारीं । मारामारी अचेतनां ॥ ६५ ॥ म्हणती हस्ती घोडा प्रधान मेला । तेथ काय त्यांचा प्राण गेला । प्यादा होता तो प्रधान जाहला । तो काय पावला गजांतलक्ष्मी ॥ ६६ ॥ जीव नसतां निर्धारीं । मारिलें म्हणती निजगजरीं । एका जीत एका हारी । तें ज्ञान सारी नेणती ॥ ६७ ॥ सारी निमाल्यापाठीं । कोण धर्मात्मा चढे वैकुंठीं । कोण पडे नरकसंकटीं । बद्धमुक्तगोठी समूळ मिथ्या ॥ ६८ ॥ एवं बुद्धिबळांचिया परी । ज्यासी निजदृष्टि संसारीं । तोचि अवतारांचा अवतारी । जाण तो निर्धारीं भगवंत ॥ ६९ ॥ समूळ मिथ्या जाणे वेदोक्ती । समूळ मिथ्या जाणे बंधमुक्ती । हें जाणोनि आचरे जो वेदविहितीं । तेचि निजभक्ती मुक्ती-वरी ॥ ७७० ॥ करूनि संसारनिवृत्ती । बहुत पावले नित्यमुक्ती । त्यांही हे दुर्गम भक्ती । अतर्क्य स्थिती तर्केंना ॥ ७१ ॥ ऐशी ज्यापाशीं माझी स्थिती । तोचि मोक्षावरील करी भक्ती । इतरांसी हे अतर्क्य गती । जाण निश्चितीं उद्धवा ॥ ७२ ॥ उद्धव पावला अगाध गती । त्यासी सर्वज्ञ लोकोपकारार्थीं । वांचवावया ब्रह्मशापाहातीं । उपाय श्रीपति स्वयें योजी ॥ ७३ ॥ नारदासी ब्रह्मज्ञान । त्यासीही दक्षशापबंधन । एके ठायीं न राहे

पासूनहि चोरून शेवटीं श्रीकृष्णानें उद्धवाला आपली भक्ति अर्पण केली. ५९ जी ब्रह्मवेत्त्यांच्या प्रतीतीला येत नाहीं, वेदानुवादांना कळत नाहीं, ती स्थिति गोपाळानें केवल कृपाबलानें उद्धवाला दिली. ७६० पूर्वीं श्रीकृष्णानें विचारिलें असतां 'मी उद्धरलों' असें उद्धव म्हणाला होता व आतां त्यानें भक्ति मागितली. यांतील गूढ रहस्य एक हरीच काय तो जाणे. ६१ मुक्तीच्या वरची भक्ति मागतांच मायेचें नियमन करणारी जी श्रीकृष्णाची अवतार-शक्ति ती उद्धवाच्या हातीं सहज आली. ६२ मायेचें मिथ्यात्व पूर्णपणें जाणून तिची प्रवृत्ति व आवरण हें माया-नियंतृत्वाचें लक्षण उद्धवाला श्रीकृष्णानें स्वतः अर्पण केलें. ६३ बुद्धिबळाच्या खेळांत पूर्वकर्मांचा संचय पदरीं नसतांच राजा, प्रधान, हत्ती, घोडे, प्यादे हे उठतात. निराळ्या विचारानें त्यांच्याकडे पाहिल्यास तें सगळें एक काष्ठच असतें. ६४ दोन्हीं पक्षांत एकच काष्ठ असतां कोण कोणाचा वैरी ! पण तें अचेतनहि वैर नसतां [illegible]शीं झुंजतात व मारामारी करितात. ६५ 'हत्ती, घोडा, प्रधान मेला' असें म्हणतात. तेव्हां त्यांचा काय [illegible] प्राण जातो ! प्यादा होता तो प्रधान झाला, म्हणजे त्याला काय गजान्तलक्ष्मी प्राप्त झाली ! ६६ निर्जी-[illegible] 'मारिलें' अशी मोठी गर्जना करून बोलतात. एक जिंकतो एक हरतो; पण तें ज्ञान बुद्धिबळांतील [illegible] नसतें. ६७ खेळ आटोपल्यानंतर त्यांतील कोणता महात्मा वैकुंठाला चढतो व कोण नरकांत पडतो ! [illegible]च्या गोष्टी समूळ मिथ्या आहेत. ६८ याप्रमाणें बुद्धिबळासारखीच ज्याची संसाराविषयीं दृष्टि असते, [illegible]चाहि अवतार भगवान् आहे, हें निश्चित जाणावें. जो वेदोक्ति समूळ मिथ्या समजतो, ६९ [illegible] मिथ्या मानितो व हें जाणूनहि जो वेदविहित मार्गानें चालतो, तीच मुक्तीच्याहि वरली भक्ति होय. ७७० [illegible] लोक संसारांतून निवृत्त होऊन नित्यमुक्त झाले आहेत; पण त्यांना ही भक्ति दुर्गम आहे. त्या [illegible] कल्पनाहि नाहीं. ७१ उद्धवा ! जो माझ्या या स्थितीला पोंचला आहे, तोच मोक्षाच्यावरची [illegible]. इतरांना ती गति अतर्क्य आहे, हें खात्रीनें समज. ७२ उद्धव अगाध स्थितीला पोंचला. सर्वज्ञ श्रीकृष्णानें [illegible]च्या शापापासून वांचवून लोकांवर उपकार करण्यासाठीं स्वतः एक उपाय योजिला. ७३

जाण । करी परिभ्रमण शापार्थ ॥ ७४ ॥ ब्रह्मशाप अतिदारुण । हें जाणोनियां श्रीकृष्ण । उपदेशूनि ब्रह्मज्ञान । उद्धवा आपण दूर दवडी ॥ ७५ ॥ उद्धव जन्मला यादववंशीं । यादव निमती ब्रह्मशापेंसीं । तेथ वांचवावया उद्धवासी । बदरिकाश्रमासी स्वयें धाडी ॥ ७६ ॥ ब्रह्मशापाचेनि आघातें । यादव निमती स्वगोत्रघातें । उद्धवा वांचवावया तेथें । बदरिकाश्रमातें हरि प्रेरी ॥ ७७ ॥ उद्धवासी जें झालें ज्ञान । त्याहूनि बदारिकाश्रम पावन । हें सर्वथा न घडे जाण । ब्रह्मशापाभेण पळवित ॥ ७८ ॥ उद्धवा- ऐसें अनर्घ्य रत्न । ज्यासी माझी स्थिति जाहली संपूर्ण । त्यासी वांचवावया श्रीकृष्ण । पाठवी आपण बदरिकाश्रमा ॥ ७९ ॥

श्रीभगवानुवाच ॥ गच्छोद्धव मयाऽऽदिष्टो बदर्याख्यं ममाश्रमम् ।
तत्र मत्पादतीर्थोदे स्नानोपस्पर्शनैः शुचिः ॥ ४१ ॥
ईक्षयाऽलकनन्दाया विधूताशेषकल्मषः । वसानो वल्कलान्यङ्ग वन्यभुक् सुखनिःस्पृहः ॥ ४२ ॥
तितिक्षुर्द्वन्द्वमात्राणां सुशीलः संयतेन्द्रियः । शान्तः समाहितधिया ज्ञानविज्ञानसंयुतः ॥ ४३ ॥
मत्तोऽनुशिक्षितं यत्ते विविक्तमनुभावयन् । मय्यावेशितवाक्चित्तो मद्धर्मनिरतो भव ॥
अतिव्रज्य गतीस्तिस्रो मामेष्यसि ततः परम् ॥ ४४ ॥

नारद एवढा ब्रह्मज्ञानी, पण त्याला दक्षाच्या शापामुळें एका ठिकाणीं रहातां येत नव्हतें. शापाच्या योगानें तो सगळ्या त्रिभुवनांत संचार करीत हिंडत होता. ७४ असा ब्रह्मशाप मोठा भयंकर आहे, हें जाणून श्रीकृष्णानें उद्धवाला ब्रह्मज्ञानाचा उपदेश करून स्वतःच त्याला दूर पाठविलें. ७५ उद्धव ज्या यादववंशांत जन्मला, ते यादव ब्रह्मशापानें मरण पावतील. तेव्हां उद्धवाला वांचविण्यासाठीं त्यानें स्वतः त्याला बदरिकाश्रमाला धाडिलें. ७६ ब्रह्मशापाच्या आघातानें यादव परस्परांच्या हातून मरतील, यास्तव उद्धवाला त्यांतून वांचविण्यासाठीं हरि त्याला बदरिकाश्रमीं जाण्याची प्रेरणा करीत आहे. ७७ उद्धवाला जें ज्ञान झालें होतें, त्याहून बदरिकाश्रम पवित्र होता, असें मुळींच नाहीं. पण केवल ब्रह्मशापाच्या भीतीमुळें श्रीकृष्ण त्याला तेथें पळवीत आहे. ७८ उद्धवासारखें अमूल्य रत्न कीं ज्याला आपली परिपूर्ण प्राप्ति झाली, त्याला वांचविण्यासाठीं श्रीकृष्ण आपण होऊन बदरिकाश्रमाला पाठवीत आहे. ७७९.

तेव्हां उद्धवाच्या प्रार्थनेचा अंगीकार करून ‘ असें जरी आहे तरी माझ्या आज्ञेनें तूं लोकसंग्रहार्थ एवढें कर ’ असें भगवान् सांगतात—

श्रीभ० उ० भगवान् म्हणाले—हे अङ्ग उद्धव **मया आदिष्टः बदर्याख्यं मम आश्रमं गच्छ**—बाबा उद्धवा ! माझ्याकडून प्रेरणा केला गेलेला तूं माझ्या बदरिकानांवाच्या आश्रमाला जा. **तत्र मत्पादतीर्थोदे स्नानोपस्पर्शनैः शुचिः**— तेथें माझ्या चरणांच्या तीर्थोदकांत स्नान, आचमन इत्यादिकांनीं शुचि होऊन, ४१ **अलकनन्दायाः ईक्षया विधूताशेष- कल्मषः सन्**—व स्नान-आचमनांनीं शुद्ध होण्यापूर्वींच मत्पादतीर्थोदकभूत गंगेच्या दर्शनानें ज्याचें सर्व पाप निवृत्त झालें आहे, असा होत्साता, **वल्कलानि वसानः**—वल्कलांचें परिधान करणारा, **वन्यभुक्**—वनांतील कंदमूलादि भक्षण करणारा, **सुखनिःस्पृहः**—विषयसुखासाठीं निःस्पृह होत्साता, ४२, **द्वंद्वमात्राणां तितिक्षुः**—शीतोष्णादि द्वंद्वांना सहन करणारा, **सुशीलः**— आर्जवादि धर्मांनीं युक्त, **संयतेन्द्रियः**—जितेंद्रिय, **शान्तः**—शांतचित्त, **समाहितधिया ज्ञानविज्ञानसंयुतः**—एकाग्रचित्तानें शास्त्रज्ञान व अनुभवज्ञान यांनीं युक्त होत्साता, ४३, **यत् ते मत्तः अनुशिक्षितं**—तूं जें मजपासून शिकलास, **तत् विविक्तं अनुभावयन्**—त्याचा चांगला विचार करून अनुभव घेणारा, **मयि आवेशितवाक्चित्तः**—माझ्या ठिकाणीं ज्यानें आपलें चित्त व वाणी अर्पिलीं आहेत असा होत्साता, **मद्धर्मनिरतः भव**—भागवतधर्मांत रत हो. **ततः परं तिस्रः गतीः अतिव्रज्य मां एष्यसि**—त्यानंतर त्रिगुणात्मक तीन गतींचें अतिक्रमण करून तूं मलाच प्राप्त होशील. ४४.

गंभीरगिरा बोले श्रीकृष्ण। उद्धवा तुज जाहलें ब्रह्मज्ञान। तुटलें स्नेहपाशबंधन। तरी ममाज्ञा करीं गमन बदरिकाश्रमा॥ ७८०॥ त्या बदरिकाश्रमाचें माहिमान। लोकसंग्रहार्थ संपूर्ण। तरावया जड मूढ जन। स्वमुखें श्रीकृष्ण सांगत॥ ८१॥ तो बदरिकाश्रम माझें स्थान। तेथ नित्य माझें अनुष्ठान। तया स्थानाचें दूरदर्शन। करी निर्दळण कलिकल्मषा॥८२॥ ज्या पर्वताचें स्पर्शन। मानवां करी परम पावन जें बदरीचें नामस्मरण। विभांडी दारुण महादोषां॥ ८३॥ तेथेंही माझें पादोदक। अलकनंदा पवित्र देख। जिचेनि स्पर्शमात्रें लोक। होती अलौकिक पावन॥ ८४॥ जेथ श्रद्धायुक्त करितां स्नान। जीवाचें तुटे भवबंधन। ज्यासी घडे आचमन। तो उद्धरे जाण पितरेंसीं॥ ८५॥ ऐसें बदरिकाश्रम माझें जाण। अतिशयें परम पावन। म्हणसी कैं केलें तें त्वां स्थान। ऐक तें कथन उद्धवा॥ ८६॥ रजोगुणें स्रजिले जन। ते जाहले भोगकर्मीं प्रवीण। भोगासक्तीं बुडतां पूर्ण। दों रूपीं जाण अवतरलों॥ ८७॥ तम निरसी रविचंद्र पूर्ण। तैसा मी जाहलों नरनारायण। बदरिकाचलामाजीं जाण। केला संपूर्ण नित्योदयो॥ ८८॥ भज्यपूज्यत्वें मी नारायण। नररूपें मीचि भक्त जाण। तेथ भक्ति वैराग्य ज्ञान। म्यां आचरोन प्रकाशिलें॥ ८९॥ तो बदरिकाश्रम माझें स्थान। तेथें सर्वदा मी आपण। अद्यापि करितो अनुष्ठान। भक्तिज्ञानवैराग्यें॥ ७९०॥ नरनारायणस्थितीं। मी अवतरलों जे पर्वतीं। तेथ तोडिले बोरीऐशी मागुती। माझी निजभक्ती फांपाइली॥ ९१॥ यालागीं बदरिकाश्रम। त्या स्थळासी म्यां ठेविलें नाम। तेथें फिटेल भवभ्रम। यापरी परम पावन तें स्थळ॥९२॥ त्या बदरिकाश्रमाप्रती। तुवां जावें गा निश्चितीं। ऐसें उद्धवा कल्पिसी चित्तीं। मज काय तीर्थीं विवंचू॥ ९३॥ मोक्षाहीवरील भक्ती। तुवां अर्पिली माझे हातीं। तेणें मी जाहलों अतिकृतार्थी। म्हणसी मज तीर्थीं चाड नाहीं॥ ९४॥ तुज माझी आज्ञा प्रमाण। अवश्य तेथें करावें गमन। उद्धवें धरोनियां मौन। मस्तकीं

धीर व गंभीर वाणीनें श्रीकृष्ण म्हणाला कीं, हे उद्धवा! तुला ब्रह्मज्ञान झालें, तुझा स्नेहपाशबंध तुटला, यास्तव आतां माझ्या आज्ञेनें बदरिकाश्रमाला जा. ७८० श्रीकृष्ण लोकसंग्रहासाठीं व जडमूढ जनांना तारण्यासाठीं त्या बदरिकाश्रमाचा महिमा स्वमुखानें सांगत आहे. ८१ तो बदरिकाश्रम हें माझें स्थान आहे. तेथें नित्य माझी वस्ती आहे. त्या स्थानाचें दुरून जरी दर्शन घेतलें तरी सगळ्या महादोषांचा नाश होतो. ८२ ज्या पर्वताचा स्पर्श मनुष्यांना परम पावन करितो, जें बदरिकाश्रमाचें नामस्मरण भयंकर पातकांना हांकून लावितें, ८३ तेथेंहि माझ्या चरणाचें तीर्थ पवित्र अलकनंदा नांवाच्या नदीरूपानें वहात आहे. तिच्या केवळ स्पर्शानेंच लोक अत्यंत पावन होतात; ८४ तेथें श्रद्धायुक्त स्नान केलें असतां जीवांचें भवबंधन तुटतें. ज्याला त्या जलाचें आचमन घडतें, तो पितरांसह उद्धरून जातो. ८५ असा माझा बदरिकाश्रम अतिशय परम पावन आहे. 'तूं तें स्थान केव्हां निर्माण केलेंस!' असें जर म्हणशील तर उद्धवा! तोहि वृत्तान्त ऐक. ८६ मीं रजोगुणानें जे लोक उत्पन्न केले, ते भोगकर्मांत प्रवीण झाले व भोगासक्तींत पूर्ण बुडाले, तेव्हां मी दोन रूपांनीं अवतरलों. ८७ चंद्र व सूर्य अंधाराला जसें पूर्णपणें घालवितात तसा मी नर-नारायणरूपानें बदरिकाचल पर्वतावर प्रकट झालों. ८८ भजनास व पूजनास योग्य असा नारायण मी झालों व नररूपानें मीच भक्त झालों. तेथें भक्ति, वैराग्य व ज्ञान हीं मीं स्वतः आचरून प्रकाशिलीं. ८९ असा तो बदरिकाश्रम माझें स्थान आहे. तेथें मी स्वतः भक्ति-ज्ञान-वैराग्यानें अद्यापि सतत अनुष्ठान करीत असतों. ७९० ज्या पर्वतावर मी नर-नारायणरूपानें अवतरलों, तेथें तोडिलेल्या बोरीप्रमाणें माझी भक्ति वृद्धिंगत होते. ९१ म्हणून मीं त्या स्थलाला 'बदरिकाश्रम' हें नांव दिलें. तेथें भवभ्रम नाहींसा होतो. अशा प्रकारें तें स्थळ परम पावन आहे. ९२ त्या बदरिकाश्रमाला तूं अवश्य जा. तूं असें जर म्हणशील कीं, 'मला तीर्थांची काय गरज! ९३ मोक्षाच्याहि पलीकडली भक्ति तूं माझ्या हातीं दिलीस. त्यानें मी अत्यंत कृतार्थ झालों आहें. मला आतां तीर्थांची आवड राहिली नाहीं.' ९४ तर तूं माझी आज्ञा प्रमाण मानून

वचन वंदिलें ॥ ९५ ॥ सद्भावें करूनि नमन । घेतां बदरिकाश्रमदर्शन । तो नर होय नारायण । एवढें महिमान त्या स्थळाचें ॥ ९६ ॥ उद्धवा तुझ्या ठायीं पूर्ण ज्ञान । ज्ञान असोनि माझें भजन । तुझेनि चरण-स्पर्शें जाण । होईल पावन बदरिकाश्रम ॥ ९७ ॥ ऐसें ऐकोनि श्रीकृष्णवचन । उद्धवासी आलें रुदन । धावोनि वंदिले श्रीचरण । सर्वथा गमन करीन आतां ॥ ९८ ॥ ब्रह्मशापाचें निर्दळण । उद्धवाचें चुकवावया जाण । श्रीकृष्णें प्रबोधोनि पूर्ण । करवी गमन बदरिकाश्रमा ॥ ९९ ॥ उद्धव ज्ञानियांचें ज्ञानरत्न । त्यासी वांचवूनि श्रीकृष्ण । विस्तारावया निजज्ञान । करवी गमन बदरिकाश्रमा ॥ ८०० ॥ चुकवावया ब्रह्मशाप दारुण । उद्धवासी विशाळीं गमन । अन्यथा जाहलिया ब्रह्मज्ञान । कृष्ण तीर्थाटन नेमीना ॥ १ ॥ उद्धवासी भवबंधन । बाळपणींचि नाहीं जाण । हें जाणोनियां श्रीकृष्ण । ब्रह्मशापाभेण तीर्था धाडी ॥ २ ॥ तीर्थयात्रेचा अभिप्रावो । हाचि निश्चितें निजभावो । जाणोनियां देवाधिदेवो । मोकली उद्धवो बदरिकाश्रमा ॥ ३ ॥ उद्धवा तुज गेलिया तेथ । थोर लोकसंग्रह होईल एथ । तुझेनि धर्में निश्चित । दीन समस्त उद्धरती ॥ ४ ॥ म्हणसी पावल्या तें तीर्थ । म्यां कैसें वसावें तेथ । तेही अर्थीं लोकहितार्थ । तुज इत्यर्थ सांगेन ॥ ५ ॥ उद्धवा तुझें जें आचरण । तोचि जनांसी उपदेश जाण । यालागीं वैराग्य भक्ति ज्ञान । स्वधर्माचरण सांडूं नको ॥ ६ ॥ त्रिभुवनामाजीं सर्वथा । उद्धवा मज नाहीं कर्तव्यता । तोही मी लोकसंग्रहार्था । होय वर्तता निजधर्मीं ॥ ७ ॥ तूं ऐसें म्हणसी आतां । त्रैलोक्य असे तुझ्या माथां । यालागीं लोकसंग्रहार्था । तूं होसी वर्तता स्वधर्मकर्मीं ॥ ८ ॥ मी निजधामा जातों आपण । यालागीं माझी स्थिती पूर्ण । ते पूर्णता तुज म्यां अर्पिली जाण । लोकसंग्रहार्थ पूर्ण तूं विरक्त होईं ॥ ९ ॥ अभेदभक्ति वैराग्य ज्ञान । स्वयें आचरोनि आपण । देखीं लावावे इतर जन । लोकसंग्रह जाण या नांव ॥ ८१० ॥ उद्धवा माझिये ज्ञानप्राप्ती । तूं वंद्य जाहलासी त्रिजगतीं । तुझी

अवश्य तेथें जा. तेव्हां उद्धवानें मौन धरून श्रीहरीचें वचन शिरसा मान्य केलें. ९५ सद्भावानें वंदन करून बदरिकाश्रमाचें दर्शन घेतलें असतां तो मनुष्य नारायणच होतो; असें त्या स्थलाचें माहात्म्य आहे. ९६ उद्धवा ! तुला पूर्ण ज्ञान प्राप्त झालें आहे. ज्ञान असून त्यांत माझ्या भजनाची जोड मिळाली आहे. तेव्हां तुझ्या चरणस्पर्शानेंच बदरिकाश्रम पावन होईल. ९७ हें श्रीकृष्णाचें वचन ऐकून उद्धवाला रडूं कोसळलें. त्यानें धांवत जाऊन श्रीकृष्णाच्या पूज्य चरणांना वंदन केलें व तो म्हणाला कीं, मी आतां अवश्य तेथें जाईन. ९८ ब्रह्मशापानें होणाऱ्या नाशापासून उद्धवाचा घात चुकविण्यासाठीं श्रीकृष्णानें त्याला पूर्ण उपदेश करून बदरिकाश्रमाला पाठविलें. ९९ उद्धव ज्ञान्यांतील श्रेष्ठ ज्ञानी होता. त्याला वांचवून आपल्या आत्मज्ञानाचा प्रसार करण्यासाठीं श्रीकृष्णानें त्याला बदरिकाश्रमास पाठविलें. ८०० भयंकर ब्रह्मशाप चुकविण्यासाठीं श्रीकृष्णानें उद्धवाला बदरिकाश्रमीं जाण्यास सांगितलें. इतरांना ब्रह्मज्ञान जरी सांगितलें, तरी श्रीकृष्ण त्यांना कांहीं तीर्थयात्रेला पाठवीत नसे. १ पण उद्धवाला बाळपणापासूनच भवबंधन नाहीं. हें जाणूनहि श्रीकृष्णानें ब्रह्मशापाच्या भीतीनें त्याला तीर्थास पाठविलें. २ तीर्थयात्रेंतील त्याचा आशय हाच होता. हें जाणून देवाधिदेवानें उद्धवाला बदरिकाश्रमाला धाडिलें. ३ उद्धवा ! तूं तेथें गेल्यानंतर तुझ्यापाशीं लोकांची गर्दी जमेल. तुझ्या धर्मानें सगळ्या अज्ञ लोकांचा उद्धार होईल ४ 'त्या तीर्थक्षेत्रीं गेल्यानंतर मीं तेथें कसें रहावें !' असें जर विचारशील तर त्या विषयींहि लोकहितार्थ मी तुला नियम सांगतों, ते ऐक. ५ उद्धवा ! तुझें आचरणच लोकांना उपदेशाप्रमाणें होईल, म्हणून तूं वैराग्य-भक्ति-ज्ञान व स्वधर्माचरण सर्वथा सोडूं नकोस. ६ उद्धवा ! मला सगळ्या त्रिभुवनांत कसलेंहि कर्तव्य उरलेलें नसतां मी देखील लोकसंग्रहासाठीं स्वधर्मानें वागत आहें. ७ यावर तूं जर असें म्हणशील कीं, सगळ्या त्रैलोक्याची जबाबदारी तुझ्या शिरावर आहे. म्हणून तुला लोकसंग्रहासाठीं स्वधर्म-कर्मांत वागावें लागतें. ८ तर मी आतां निजधामाला चाललों, म्हणून माझी पूर्ण स्थिति मीं तुला अर्पण केली आहे. यास्तव लोकसंग्रहासाठीं तूं विरक्त हो. ९ अभेदभक्ति, वैराग्य व ज्ञान हें आपण स्वतः आचरून इतर लोकांना कित्ता घालून द्यावा. यालाच लोकसंग्रह म्हणतात. ८१० उद्धवा ! माझ्या ज्ञानप्राप्तीनें तूं त्रिभुवनांत वंद्य

जे आचरती स्थिती । तेचि लोकीं समस्ती करिजेल ॥ ११ ॥ आतां तुझेनि मिसें जाण । साडे तीं श्लोकींचें निरूपण । लोकसंग्रहार्थ सांगेन । तैसेंचि वर्तन करावें तुवां ॥ १२ ॥ तुज पावलिया बदरिकाश्रमातें । तेथ विद्यमान बहुत तीर्थें । परी अलकनंदा मुख्य तेथें । जे नाशी दोषांतें दर्शनमात्रें ॥ १३ ॥

करूनि अलकनंदेचें स्नान । करावें विध्युक्त तीर्थविधान । मग तेथें वसावें आपण । वसतें लक्षण तें ऐक ॥ १४ ॥ त्यजूनि वस्त्रें आभरण । करावीं वल्कलें परिधान । करूनि वनफळें भोजन । रहावें आपण अनुद्वेग ॥ १५ ॥ आपुली पूर्ण निस्पृहता । दावावी लोकसंग्रहार्था । निजसुखें तेथें असतां । द्वंद्वसहिष्णुता दावावी ॥ १६ ॥

तूं ज्ञानविज्ञानसंपन्न । तुज द्वंद्वबाधा न बाधे जाण । तरी द्वंद्वसहिष्णुता पूर्ण । दावावी आपण लोकहितार्थी ॥ १७ ॥ तुज नाहीं विषयासक्तता । तरी नेमावें इंद्रियार्थां । प्रकट करावी सुशीलता । निजशांतता दावावी ॥ १८ ॥ निजबुद्धीचें समाधान । सहजें प्रकटवावें आपण । मजपासूनि जें प्राप्त ज्ञान । त्याचें अनुसंधान दावावें ॥ १९ ॥

या स्थितीं तुज वसतां जाण । बहुसाल तुज येतील शरण । तूं पावलासि माझें ज्ञान । हें सर्वही जन जाणती ॥ ८२० ॥ पावोनियां ब्रह्मज्ञान । स्वयें उद्धरला आपण । न करी जो दीनोद्धारण । हे भंडपण ज्ञात्याचें ॥ २१ ॥ एक पावोनि ब्रह्मज्ञान । शिष्य उपदेशी आपण । बोध न करवे परिपूर्ण । ते निष्ठाहीन निर्वीर्य ॥ २२ ॥ शिष्य बोधेंवीण चरफडी । गुरु गुरुपणें बडबडी । घरींच्या घरीं चुकामुकी गाढी । हे बोधपरवडी अबद्ध ॥ २३ ॥ परचित्तप्रबोधवृत्ती । हे सामान्य नव्हे स्थिती । ब्रह्मज्ञानाची पूर्ण निष्पत्ती । या नांव निश्चितीं उद्धवा ॥ २४ ॥ स्वयें तरोनि जनां तारी । हे ज्ञानाची अगाध थोरी । ते

ज्ञाला आहेस. यास्तव तूं जें आचरण करशील त्याचेंच सर्व लोक अनुकरण करतील. ११ आतां तुझ्या निमित्तानें पुढील साडेतीन श्लोकांनीं लोकसंग्रहाचें निरूपण करितों, तसें तूं वर्तन ठेव. १२ तूं बदरिकाश्रमीं गेल्यावर तेथें अनेक तीर्थें आहेत; पण त्या सर्वांत मुख्य अलकनंदा आहे. ती भागीरथीच होय. तिच्या नुसत्या दर्शनानेंच दोषांचा नाश होतो. ८१३.

भागीरथीचें स्नान करून शास्त्रोक्त तीर्थविधान करावें व मग आपण तेथें रहावें. तो रहाण्याचा प्रकार ऐक. १४ वस्त्रेंभूषणें काढून टाकून वल्कलें धारण करावींत. वनांतील फळांवर निर्वाह करून समाधानानें रहावें. १५ लोकांना उदाहरण घालून देण्यासाठीं आपण पूर्ण निस्पृहता ठेवावी. तेथें समाधानानें रहात असतां शीतोष्ण-सुख-दुःखादि द्वंद्वांविषयीं सहनशीलता दाखवावी. ८१६.

तूं ज्ञान-विज्ञानसंपन्न आहेस. तुला द्वंद्वबाधा बाधत नाहीं. तरीहि आपण लोकांच्या हितासाठीं द्वंद्व-सहिष्णुता दाखवावी. १७ तुला विषयासक्ति नाहीं, तरीहि इंद्रियनिग्रह दाखवावा. सौजन्य प्रकट करून अत्यंत शांतता दाखवावी. १८ आत्मबुद्धीचें समाधान सहज व्यक्त करावें आणि माझ्यापासून तुला जें ज्ञान प्राप्त झालें आहे त्याचें सतत चिंतन करावें. ८१९.

अशा स्थितींत तूं राहूं लागतांच अनेक प्रकारचे लोक तुला शरण येतील. तुला माझें ज्ञान प्राप्त झालें आहे, असें सगळे लोक जाणतील. ८२० ब्रह्मज्ञानानें स्वतःचा उद्धार केल्यावर अज्ञजनांचा उद्धार न करणें हा ज्ञात्याचा हीनपणा आहे. २१ कोणी ब्रह्मज्ञान संपादन केल्यावर शिष्याला त्याचा उपदेश करितात; पण त्यांस पूर्णपणें बोध करितां येत नाहीं. ते निरुपयोगी व निःसत्त्व होत. २२ शिष्य बोध न झाल्यामुळें चडफडत असतो. आणि गुरु आपल्या गुरुपणाच्या गुर्मीत बडबडत असतो. अशी घरांतल्या घरांत चुकामूक होत असते. हा उपदेशाचा प्रकारहि अयोग्यच होय. २३ उद्धवा! दुसऱ्याच्या चित्तावर उपदेश ठसविणें ही सामान्य गोष्ट नाहीं. यालाच ब्रह्मज्ञानाची पूर्ण प्राप्ति म्हणतात. २४ उद्धवा! स्वतः तरून लोकांना तारणें हीच ज्ञानाची अगाध थोरवी आहे.

म्यां दिधली तुझ्या करीं । जन उद्धरीं उद्धवा ॥ २५ ॥ शिष्यसुक्षेत्रीं ब्रह्मज्ञान । ज्याचे नव्हे वर्धमान । तंववरी नाहीं पूर्णपण । उद्धवा जाण निश्चित ॥ २६ ॥ जेवीं पिकलिया वृक्षाप्रती । पक्षी तुष्टले स्वयें येती । तेवीं निडारली ब्रह्मस्थिती । तेथ शिष्य पावती स्वानंद ॥ २७ ॥ बोलें उपदेशिती ब्रह्मज्ञान । बोध नव्हे तें निर्वीर्य जाण । तें तूं म्हणसी कासेन । ऐक सांगेन उद्धवा ॥ २८ ॥ अनुभवा आलें ब्रह्मज्ञान । तेणें अंगीं ये जाणपण । तेथ संचरे ज्ञानाभिमान । तेणें वीर्य क्षीण ज्ञानाचें ॥ २९ ॥ जंव जंव ज्ञाता निरहंकार । तंव तंव ज्ञानासी वीर्य थोर । त्याची होतां कृपामात्र । बोध साचार शिष्यासी ॥ ८३० ॥ तुज फावलें माझें ज्ञान । उपदेशिसी शिष्यजन । ते तुज देतील सन्मान । तरी तूं ज्ञानाभिमान धरूं नको ॥ ३१ ॥ सद्‌गुरूसी सर्वां भूतीं । सर्वदा ब्रह्मप्रतीती । तेथ शिष्यासी ये भूतव्यक्ती । काय ब्रह्मस्थिती पळाली ॥ ३२ ॥ यालागीं शिष्यीं नीचपण । सर्वथा न देखावें आपण । शिष्य देखावा ब्रह्म पूर्ण । हें मुख्य लक्षण गुरूचें ॥ ३३ ॥ तेचि निरभिमान स्थिती । उपदेशीं शिष्यांप्रती । निरभिमानापरती । दशा त्रिजगतीं असेना ॥ ३४ ॥ तेचि उपदेशलक्षण । वाचेसी माझें नामकीर्तन । शरीरीं माझें नित्य भजन । मद्रूपीं मननिमग्नता ॥ ३५ ॥ ज्ञानी म्हणतां न धरी श्लाघ । मूर्ख म्हणतां न धरी राग । स्वयें रहावें अनुद्वेग । हे दशा चांग ज्ञात्याची ॥ ३६ ॥ शिष्य देतील सन्मान । तो नेघें म्हणतां अपक्वपण । घेतां आला ज्ञानाभिमान । हेंही विघ्न ज्ञात्यासी ॥ ३७ ॥ शिष्य देतील सन्मान । तो अनुद्वेग घ्यावा आपण । परी न धरावा मानाभिमान । हें मुख्य लक्षण ज्ञात्याचें ॥ ३८ ॥ तुज माझ्या ज्ञानाची पूर्ण प्राप्ती । तेचि एकांतीं लोकांतीं । नित्य निरभिमान-स्थिती । स्वानंदस्फूर्ती सर्वदा ॥ ३९ ॥ एवं नित्य निरभिमान । भक्तियुक्त वैराग्य ज्ञान । स्वयें आच-

---

ती मीं तुझ्या हातीं दिली आहे. तरी आतां लोकांचा उद्धार कर. २५ जोंवर शिष्यरूपी उत्तम शेतांत ब्रह्मज्ञान ठसवितां येत नाहीं, तोंवर ज्ञान पूर्णतेला पोंचलें नाहीं, असें निश्चयानें जाणावें. २६ पिकलेल्या फळांनीं युक्त असलेल्या वृक्षावर पक्षी मोठ्या आनंदानें स्वतःच जसे लोटतात, त्याप्रमाणें ब्रह्मज्ञान पूर्णत्वास पोंचलें म्हणजे शिष्य सहजच स्वानंदाला प्राप्त होतात. २७ उद्धवा ! शब्दांनीं ब्रह्मज्ञानाचा उपदेश करणें म्हणजे तो खरा उपदेश नसून केवळ फोल आहे. तो कसा म्हणशील तर ऐक. २८ ब्रह्मज्ञानाचा अनुभव आला कीं, अंगीं जाणतेपणा येतो. त्यानें ज्ञानाभिमान वाढतो व त्यामुळें ज्ञानाचें सामर्थ्य क्षीण होतें. २९ ज्ञानी जों जों निरहंकार होतो, तों तों ज्ञानाचें सामर्थ्य अधिक वाढतें. त्याची कृपा होतांच शिष्याला तत्त्वतः बोध होतो. ८३० उद्धवा ! तुला माझें ज्ञान प्राप्त झालें आहे, तूं शिष्यसमुदायास उपदेश करशील, ते तुझा सन्मान करतील. पण तूं ज्ञानाभिमान धरूं नकोस. ३१ सद्‌गुरूला सर्व भूतांत सर्वदा ब्रह्माची प्रतीति येत असतां शिष्य तेवढा भिन्न दिसतो; तेव्हां त्याच्यांतील तेवढें ब्रह्मत्व काय पळालें ! यास्तव शिष्याला केव्हांही हीन लेखूं नये. ३२ शिष्याला पूर्ण ब्रह्म समजणें हेंच गुरूचें मुख्य लक्षण आहे. ३३ तीच निरभिमान स्थिति शिष्याला उपदेशावी. निर-भिमानासारखी उत्कृष्ट स्थिति त्रिभुवनांत दुसरी कोणतीच नाहीं. ३४ तो उपदेश मनांत ठसल्याचें हेंच लक्षण कीं, वाणीनें माझें नामकीर्तन, देहानें माझें नित्यभजन व माझ्या स्वरूपांत मन निमग्न ठेवणें. ३५ कोणी ज्ञानी म्हटलें तरी त्यानें फुगून जाऊं नये किंवा कोणी मूर्ख म्हटल्यास त्याचा राग धरूं नये. स्वतः समाधानानें रहावें, हीच ज्ञात्याची उत्कृष्ट स्थिति आहे. ३६ शिष्यानें केलेल्या सत्काराचा स्वीकार न करावा तर गुरूकडे अपक्वपणा येतो. बरें स्वीकार करावा, तर ज्ञानाभिमान दिसतो. हेंहि ज्ञात्याला एक विघ्नच आहे. ३७ यास्तव शिष्यांनीं केलेल्या सन्मानाचा स्वस्थ चित्तानें स्वीकार करावा; परंतु त्यांत मानाभिमान धरूं नये. हें ज्ञात्याचें मुख्य लक्षण आहे. ३८ तुला माझ्या ज्ञानाची पूर्ण प्राप्ति झाली आहे. तरी एकांतांत किंवा जनसमूहांत सारख्याच निरभिमानानें रहा. सर्वदा आनंदस्फूर्ति राहूं दे. ३९ याप्रमाणें नित्य निरभिमान होऊन आपण स्वतः भक्तियुक्त वैराग्य व ज्ञान यांचें स्वतः

रोनि आपण । शिष्यसज्जन उपदेशिजे ॥ ८४० ॥ तुज जे शिष्य येती शरण । ते नीच न म्हणावे आपण । हें गुरुत्वाचें पूर्णपण । शिष्यही पूर्ण पूज्यत्वें देखे ॥ ४१ ॥ जेवीं तानयालागीं माता । तेवीं शिष्याचिया निजस्वार्था । गुरूसी कळवळा तत्त्वतां । शुद्ध सद्‌गुरुता या नांव ॥ ४२ ॥ शिष्यलक्षण-प्रकार । मागां सांगितला विचार । तो जेथ देखसी अधिकार । तेथ साचार उपदेशीं ॥ ४३ ॥ तुज जें शिकविलें प्रस्तुत । तें शिष्योपदेशसंग्रहार्थ । तूं ठायींचा गुणातीत । तुज हें समस्त स्पर्शेना ॥ ४४ ॥

यापरी ज्ञान उपदेशितां । तुझी न मोडे गुणातीतता । ज्यांसी उपदेशिसी तत्त्वतां । तेही त्रिगुणां-वस्था जिंकिती ॥ ४५ ॥ पूर्वोक्त उपदेशयुक्तीं । जे शिष्य सर्वदा वर्तती । ते त्रिगुणांची त्रिविध वृत्ती । अतिक्रमिती गुरुकृपां ॥ ४६ ॥ त्रिगुणांचे त्रिविधपण । दृश्य द्रष्टा आणि दर्शन । जागृति सुषुप्ति आणि स्वप्न । ज्ञेय ज्ञाता ज्ञान साक्षेपें ॥ ४७ ॥ कार्य कर्म आणि कर्ता । भोज्य भोजन आणि भोक्ता । शत्रु मित्र उदासीनता । या त्रिगुणावस्था बाधक ॥ ४८ ॥ तेथ येणें उपदेशें जाण । सच्छिष्यीं करून माझें भजन । त्रिगुणत्रिपुटी निर्दळून । माझें स्वरूप पूर्ण स्वयें होती ॥ ४९ ॥ माझिया स्वरूपाप्रती । नाहीं गुण ना गुणवृत्ती । भक्त मद्भावें गुणातीतीं । सहज पावती स्वानंद ॥ ८५० ॥ ऐसा आज्ञापिला उद्धवो । त्याचे अवस्थेचा अभिप्रावो । परीक्षितीप्रती पहा हो । स्वयें शुकदेवो सांगत ॥ ५१ ॥

श्रीशुक उवाच ॥ स एवमुक्तो हरिमेधसोद्धवः प्रदक्षिणं तं परिसृत्य पादयोः ।
शिरो निधायाश्रुकलाभिरार्द्रधीर्न्यषिञ्चदद्वन्द्वपरोऽप्यपक्रमे ॥ ४५ ॥

आचरण करून शिष्य-सज्जनांना त्याचाच उपदेश करावा. ८४० तुला जे शिष्य शरण येतील, त्यांना कधींहि नीच मानूं नकोस. शिष्यांना पूर्ण पूज्यत्वानें पहाणें हेंच गुरूचें पूर्णपण आहे. ४१ मातेला जसा तान्ह्या बाळाचा कळवळा येतो तसा शिष्याच्या स्वार्थासाठीं गुरूला कळवळा वाटणें यालाच शुद्ध सद्‌गुरुपणा म्हणतात. ४२ शिष्य-लक्षणप्रकाराचें निरूपण मागें केलेंच आहे. तो अधिकार तुला ज्याच्यामध्यें दिसून येईल त्याला उपदेश कर. ४३ मी तुला हें जें आतां शिकविलें तें शिष्योपदेशानें लोकसंग्रह करण्यासाठीं आहे. तूं मूळचाच गुणातीत आहेस. तुला हें स्पर्शहि करणार नाहीं. ८४४.

याप्रमाणें ज्ञानाचा उपदेश केला असतां तुझा गुणातीतपणा कायम राहील आणि ज्यांना उपदेश करशील तेहि त्रिगुणावस्थांना जिंकितील. ४५ पूर्वी केलेल्या उपदेशानुसार जे शिष्य सर्वदा वागतात ते तीन गुणांच्या त्रिविध वृत्तीचें गुरुकृपेनें उल्लंघन करितात. ४६ त्रिगुणांचा त्रिविधपणा असा असतो. दृश्य, द्रष्टा, दर्शन; जागृति, स्वप्न, सुषुप्ति; ज्ञेय, ज्ञाता, ज्ञान; ४७ कार्य, कर्म, कर्ता; भोज्य, भोजन, भोक्ता; शत्रु, मित्र, उदासीनता या त्रिगुणावस्था बाधक आहेत. ४८ या माझ्या उपदेशानुसार सच्छिष्यानें माझें भजन करून त्रिगुणत्रिपुटींचा नाश करावा, म्हणजे ते स्वतःच माझ्या पूर्ण स्वरूपाला प्राप्त होतील. ४९ माझ्या स्वरूपाला गुण व गुणवृत्ति नाहींत. त्यामुळें भक्त मद्भा-वानें गुणातीत होऊन सहज स्वानंदाला प्राप्त होतात. ८५० अशी श्रीकृष्णानें उद्धवाला आज्ञा केली. त्याच्या त्या अवस्थेचें वर्णन श्रीशुकदेव परीक्षितीला सांगत आहेत. ८५१.

श्रीशुकः उवाच–शुकाचार्य म्हणाले–हरिमेधसा एवं उक्तः सः उद्धवः तं प्रदक्षिणं परिसृत्य पादयोः शिरः निधाय–ज्ञानानें जो संसाराचें हरण करितो तो 'हरिमेधाः'–श्रीकृष्ण त्याच्याकडून असें बोलला गेलेला तो उद्धव त्याला प्रदक्षिणा करून व त्याच्या दोन्ही चरणांवर मस्तक ठेवून अद्वंद्वपरः अपि अपक्रमे आर्द्रधीः अश्रुकलाभिः न्यषिञ्चत्–सुख–दुःखादि द्वंद्वापासून सर्वथा मुक्त झालेला असूनहि कृष्णाला सोडून जावयाच्या वेळीं ज्याचें चित्त आर्द्र झालें आहे असा तो (उद्धव) अश्रूंच्या धारांनीं त्याच्या चरणांस अभिषेक करिता झाला. ४५.

जो निजमोक्षें नित्य निष्काम । जेणें अनुभविलें परब्रह्म । त्या श्रीशुकासी अतिसंभ्रम । उद्धवाचें प्रेम वर्णावया ।। ५२ ।। तो शुक म्हणे परीक्षिती । उद्धव आज्ञापिला श्रीपती । त्याच्या प्रेमाची अद्भुत स्थिती । ते मी तुज प्रती सांगेन ।। ५३ ।। उद्धव जरी जाहला गुणातीत । तरी गुरुचरणीं प्रेम अद्भुत । ज्यासी सद्गुरु श्रीकृष्णनाथ । मूर्तिमंत परब्रह्म ।। ५४ ।। त्यजूं न शके हरिपदा । हरीचें ठायीं पूर्ण श्रद्धा । यालागीं जाण हरिमेधा । बोली प्रबुद्धा उद्धवातें ।। ५५ ।। जो आवडीं करी हरीचें ध्यान । त्याचे ध्यानेंसीं हरि हरी मन । जो विवंचि हरीचें समाधान । त्याचे बुद्धीचें हरण हरि करी ।। ५६ ।। जो करी हरिचिंतन । त्याचे चित्ताचें करी हरि हरण । जो करी हरीचें स्मरण । त्याचा संसार पूर्ण हरि हरी ।। ५७ ।। ऐशिया हरीच्या ठायीं सर्वदा । पावलियाही मुक्तिपदा । उद्धवाची सप्रेम श्रद्धा । यालागीं हरिमेधा त्यासी म्हणती ।। ५८ ।। जे पावले गुणातीतीं । त्यांसी आवडे ज्याची भक्ती । तेणें श्रीकृष्णें उद्धवाप्रती । प्रयाण निश्चितीं नेमिलें ।। ५९ ।। दूरी प्रयाण बदरिकाश्रम । मागुता न भेटे पुरुषोत्तम । तो प्रयाणकाळ-उपक्रम । जाहला सप्रेम उद्धवासी ।। ८६० ।। सर्वदा सुखदुःखातीत । उद्धव जाहलासे निश्चित । तोही प्रयाणकाळीं प्रेमयुक्त । प्रदक्षिणा करीत श्रीकृष्णा ।। ६१ ।। चरणीं मस्तक ठेवितां जाण । आनंदाश्रु लोटले नयन । तेणें श्रीकृष्णाचें चरणक्षाळण । जाहलें संपूर्ण पदद्वया ।। ६२ ।।

सुदुस्त्यजस्नेहवियोगकातरो नशक्नुवंस्तं परिहातुमातुरः ।
कृच्छ्रं ययौ मूर्धनि भर्तृपादुके बिभ्रन्नमस्कृत्य ययौ पुनः पुनः ॥ ४६ ॥

जो आत्ममुक्त असल्यामुळें नित्य, निष्काम, परब्रह्माचा अनुभवी त्या शुकाचार्याला उद्धवाच्या प्रेमाचें वर्णन करण्याची अत्यंत आवड उत्पन्न झाली. ५२ तो शुकाचार्य म्हणाला–हे परीक्षिति राजा! श्रीकृष्णानें उद्धवाला आज्ञा केली. त्याच्या प्रेमाची अद्भुत स्थिति मी तुला सांगतो. ५३ उद्धव जरी गुणातीत होता, तरी त्याचें गुरु-चरणांवर अद्भुत प्रेम होतें. तो सद्गुरु श्रीकृष्णनाथाला मूर्तिमंत ब्रह्म समजत होता. ५४ तो हरिचरण सोडूं शकला नाहीं. त्याची हरीवर पूर्ण श्रद्धा होती. म्हणून त्या ज्ञानसंपन्न उद्धवाला 'हरिमेधा' असें म्हणतात. ५५ जो आवडीनें हरीचें ध्यान करितो, त्याच्या मनाचें ध्यानासह हरि हरण करितो. ५६ जो हरीच्या समाधानाचा विचार करितो त्याच्या बुद्धीचें हरि हरण करितो. ५७ जो हरीचें चिंतन करितो त्याच्या चित्ताचें हरि हरण करितो. जो हरीचें स्मरण करितो, त्याच्या संसाराचें हरि पूर्ण हरण करितो. अशा हरीवर, मुक्तिपदाला पोंचल्यावरहि, उद्धवाची सप्रेम श्रद्धा होती. यास्तव त्याला हरिमेधा असें म्हणतात. ५८ जे गुणातीत झाले त्यांसहि ज्या हरीची भक्ति आवडते, त्या श्रीकृष्णानें उद्धवाचें प्रयाण निश्चित केलें. ५९ बदरिकाश्रमाचें दूरचें प्रयाण, त्यांत श्रीकृष्णाची पुनः भेट होणार नाहीं, या विचारानें उद्धवाला त्या प्रयाणप्रसंगीं गहिंवर आला. ८६० उद्धव जरी सर्वथा सुख-दुःखातीत झाला होता, तरी प्रयाणकाळीं त्याचें हृदय प्रेमानें भरून आलें. ६१ त्यानें श्रीकृष्णाला प्रदक्षिणा करून त्याच्या चरणांवर मस्तक ठेविलें. तेव्हां त्याच्या नेत्रांतून आनंदाश्रु वाहूं लागले. त्यानें श्रीकृष्णाच्या दोन्ही चरणांना स्नान घातलें. ८६२.

सुदुस्त्यजस्नेहवियोगकातरः तं परिहातुं नशक्नुवन् आतुरः कृच्छ्रं ययौ–ज्यांतील स्नेह अत्यंत अत्याज्य आहे अशा कृष्णाशीं होणाऱ्या वियोगास भ्यालेला व त्यामुळेंच त्याला सोडण्यास असमर्थ होऊन विव्हल होत्साता तो मोठ्या कष्टाला प्राप्त झाला. त्यानंतर भर्तृपादुके मूर्धनि बिभ्रत् पुनः पुनः नमस्कृत्य ययौ–श्रीकृष्णानेंच कृपाकरून दिलेल्या दोन पादुका मस्तकावर धारण करणारा, अति आग्रहानें केलेल्या श्रीकृष्णाच्या आज्ञेनें त्याला, पुनः पुनः नमस्कार करून गेला. [तिसऱ्या अध्यायाच्या आरंभीं 'श्रीकृष्णाचा चरणवियोग सहन करण्यास असमर्थ होत्साता मी त्याच्या मागोमाग गेलों' असें जें वर्णन केलें आहे, त्याच्या अनुसार बद्रिकाश्रमास जाणारा उद्धव भगवानांची प्रभासयात्रा ऐकून हळूंहळूं त्याच्या मागून गेला आणि आपल्या कुळाचा नाश करून एकान्तांत बसलेल्या भगवानाला पाहून त्याचवेळीं आलेल्या मैत्रेयासह पुनः भगवानांनीं कृपा करून उपदेशिलेल्या तत्त्वाचें आकलन करून त्याच्या आश्रयानें तो बदरिकाश्रमास गेला, असें जाणावें.] ४६.

आणिकाचा स्नेह अतिबाधक । त्यातें सांडवी वेदविवेक । तैसा कृष्णस्नेह नव्हे देख । तो सुखदायक स्नेहाळुवा ॥ ६३ ॥ उद्धवासी स्वाभाविक । गुरु परब्रह्म दोनी एक । इतरांसी भावनात्मक । उद्धवासी देख स्वतःसिद्ध ॥ ६४ ॥ ऐसा श्रीकृष्णस्नेहो आवश्यक । उद्धवासी सुखदायक । त्या कृष्णासी सांडितां देख । आत्यंतिक विव्हळ ॥ ६५ ॥ निःशेष निमाली विषयावस्था । जरी वृद्ध जाहली पतिव्रता । तरी त्यागावा निजभर्ता । हें तिशीं सर्वथा नावडे ॥ ६६ ॥ तेवीं अनुभवूनि परमार्था । उद्धव पावला जीवन्मुक्तता । तरी सद्गुरु श्रीकृष्ण त्यागितां । अतिविव्हळता गुरुप्रेमें ॥ ६७ ॥ स्नेहें द्वेषें सकामेंसीं । जे जे वेधले श्रीकृष्णासी । ते ते पावले परमानंदासी । त्या श्रीकृष्णासी त्यजी कोण ॥ ६८ ॥ अविधीं रातले श्रीकृष्णासी । ते वंद्य जाहले ब्रह्मादिकांसी । मा उद्धव विकला गुरुप्रेमासी । केवीं श्रीकृष्णासी त्यजील ॥ ६९ ॥ ज्यासी परब्रह्मत्वें गुरुभक्ती । त्यासी तृणप्राय जीवन्मुक्ती । जाहलीही मुक्ति उपेक्षिती । विकिले गुरुभक्ती अनन्यत्वें ॥ ८७० ॥ उल्लंघूं नये सद्गुरुवचन । करावें बदरिकाश्रमीं गमन । श्रीकृष्णप्रेमा पढिये पूर्ण । तो सर्वथा जाण निघों नेदी ॥ ७१ ॥ ऐसें उभयतां अतिसंकट । उद्धवा वोढवले दुर्घट । श्रीकृष्णप्रेमें उतटे पोट । न देखे वाट बदरीची ॥ ७२ ॥ त्यागोनि जावें जरी कृष्णनाथा । तरी हा निजधामा जाईल आतां । मग मी न देखें मागुता । यालागीं अवस्था अनावर ॥ ७३ ॥ जलदनवघनतनु । श्याम राजीवलोचनू । आनंदविग्रही श्रीकृष्णू । ब्रह्म परिपूर्ण पूर्णत्वें ॥ ७४ मुकुटकुंडलें मेखळा । तिलक रेखिला पिंवळा । पदक एकावळी गळां । कंठीं तेजागळा कौस्तुभ ॥ ७५ ॥ वाकीअंदुवांचा गजर । चरणीं गर्जत तोडर । विद्युत्प्राय पीतांबर । तेणें शार्ङ्गधर शोभत ॥ ७६ ॥ कांसे विराजे सोनसळा । आपाद रुळे वनमाळा । घवघवीत घन-

---

श्रीकृष्णेतरांचा स्नेह अतिबाधक असतो. म्हणून वेदान्तज्ञान त्याचा त्याग करावयास सांगतें. पण श्रीकृष्णाचा स्नेह तसा नव्हता. तो प्रेमळ व सुखदायक होता. ६३ उद्धवाला गुरु व परब्रह्म दोन्हीं एकच होती. इतरांचें तें काल्पनिक ऐक्य असतें; पण उद्धवाला तें स्वभावतःच लाभलें होतें. ६४ असा श्रीकृष्णावरील स्नेह उद्धवाला अत्यंत सुखदायक होता. त्या श्रीकृष्णाला सोडून जातेवेळीं तो अतिशय विव्हल झाला. ६५ पतिव्रता स्त्री वृद्ध झाली, तिची विषयासक्ति निःशेष नाहींशी झाली तरी पतीचा त्याग करण्यास तिला जसें सर्वथा आवडत नाहीं. ६६ त्याप्रमाणें उद्धव परमार्थाचा अनुभव घेऊन जीवन्मुक्त झाला होता, तरीहि तो सद्गुरु श्रीकृष्णाला सोडून जातेवेळीं गुरुप्रेमामुळें अत्यंत विव्हल झाला. ६७ प्रेमानें, द्वेषानें किंवा विषयेच्छेनें जे जे श्रीकृष्णापाशीं आले, ते ते सगळे परमानंदाला प्राप्त झाले. त्या श्रीकृष्णाचा कोण त्याग करणार ! ६८ जे अविधीनें श्रीकृष्णाशीं रत झाले तेहि ब्रह्मदेवादिकांस वंद्य झाले, मग उद्धवानें तर स्वतःस गुरुप्रेमाला विकून घेतलें होतें. तो श्रीकृष्णाला कसा सोडील ! ६९ ज्याला गुरुभक्ति परब्रह्मतुल्य वाटली, ज्यानें जीवन्मुक्ति तृणप्राय लेखली, ज्यानें प्राप्त झालेल्या मुक्तीचीहि उपेक्षा केली तो उद्धव गुरुभक्तीला अनन्यपणें विकलेला होता. ८७० सद्गुरुवचनाचें उल्लंघन करूं नये, बदरिकाश्रमी गमन करावें हें खरें; पण अत्यंत आवडत्या श्रीकृष्णावरील गाढ प्रीति त्याला तेथून सर्वथा पाय उचलूं देईना. ७१ असें दोहों बाजूंनीं उद्धवावर मोठें दुर्धर संकट ओढवलें. त्याचें अंतःकरण श्रीकृष्णाच्या प्रेमानें भरून आलें. तो बदरिकाश्रमाची वाट धरीना. ७२ श्रीकृष्णनाथाला सोडून जावें, तर हा आतां निजधामाला जाईल; मग पुनः माझ्या दृष्टीसहि पडणार नाहीं. या विचारानें त्याची अवस्था मोठी कठिण झाली. ७३ जलानें पूर्ण भरलेल्या नवीन मेघाप्रमाणें ज्याचा देह नील वर्ण आहे असा कमलनयन, आनंदमूर्ति श्रीकृष्ण पूर्णत्वानें परिपूर्ण ब्रह्म आहे. ७४ मुकुट, कुंडलें, मेखला, कपाळीं केशरी तिलक, गळ्यांत पदकानें युक्त असलेला मोत्यांचा एक सर व कौस्तुभ, ७५ दंडावर वाकी, पायांत अंदुव, तोडर यांचा झणत्कार, विजेसारखा झळकणारा पिंवळा पितांबर यांनीं श्रीकृष्ण शोभतो. ७६ कंबरेपासून शोभणारा पितांबर, पायांपर्यंत रुळणारी वनमाला यांनीं घवघवीत दिसणाऱ्या श्रीकृष्णाला डोळ्यानें

सांवळा । देखतां डोळां जीवू निवे ॥ ७७ ॥ ऐसें श्रीकृष्णदर्शन । पुढती न देखें मी आपण । यालागीं उद्धव जाण । प्रेमें संपूर्ण विव्हळ ॥ ७८ ॥ उद्धव पावला परब्रह्म पूर्ण । त्यासी सगुणाची अवस्था कोण । कृष्णप्रभाप्रकाशें चिद्घन । आत्मवस्तु संपूर्ण श्रीकृष्ण ॥ ७९ ॥ घृत थिजलें का विघुरलें । परी घृतपणा नाहीं मुकलें । तेवीं सगुणनिर्गुणत्वें मुसावलें । परब्रह्म संचलें श्रीकृष्ण ॥ ८८० ॥ त्याज्य सगुण पूज्य निर्गुण । हेही दशा आरती जाण । ज्यासी ब्रह्मरूप तृणपाषाण । त्यासी त्याज्य सगुण कदा नव्हे ॥ ८१ ॥ एवं सगुण आणि निर्गुण । उद्धवासी समसमान । गुरुत्वें कृष्णीं प्रेम गहन । तो त्यागितां पूर्ण विव्हळता ॥ ८२ ॥ आज्ञा नुल्लंघवे सर्वथा । म्हणोनि निघावें बदरीतीर्था । तंव श्रीकृष्णासी सांडूनि जातां । परमावस्था उद्धवीं ॥ ८३ ॥ उद्धव प्रयाणअवसरीं । लोळणी घाली पायांवरी । चरण आलिंगी हृदयीं धरी । जावया दूरीं धीर नव्हे ॥ ८४ ॥ मज एथोनि गेलिया आतां । मागुती न देखें श्रीकृष्णनाथा । तेणे अनिवार अवस्था । पाऊल सर्वथा न घालवे ॥ ८५ ॥ मी निवालों कृष्णचरणामृतीं । मज चाड नाहीं महातीर्थीं । त्याहीमाजी अदृष्टगती । अंतीं श्रीपति त्यागवी ॥ ८६ ॥ सप्रेम चळचळां कांपत । कंठ जाहला सद्गदित । बाष्पें क्षणक्षणां स्फुंदत । स्वेदरोमांचित उद्धव ॥ ८७ ॥ गमनालागीं अतिउद्यत । पायां लागोनि पऱ्हा जात । सवेंचि येऊनि पायां लागत । विगुंतलें चित्त हरिप्रेमीं ॥ ८८ ॥ पुढती नमन पुढती गमन । पुढती घाली लोटांगण । पुढती वंदी श्रीकृष्णचरण । सर्वथा जाण निघवेना ॥ ८९ ॥ देखोनि उद्धवाचा भावो । परमानंदें तुष्टला देवो । यासी माझ्या ठायीं अतिस्नेहो । गुरुत्वें पहा हो अनन्य ॥ ८९० ॥ कृपा उपजली यदुनायका । आपुले चरणींच्या पादुका । उद्धवासी दिधल्या देखा । तेणें निजमस्तका ठेविल्या ॥ ९१ ॥ पादुका ठेवितांचि शिरीं । मी जातों कृष्णापासूनि

पहातांच जीव शांत होतो. ७७ असें हें श्रीकृष्णदर्शन यापुढें मला घडणार नाहीं, म्हणून उद्धव अत्यंत प्रेमानें व्याकुल झाला. ७८ उद्धव पूर्ण ब्रह्माला प्राप्त झाला होता. त्याला सगुणपणाची काय गरज ! कृष्णाच्या तेजानें प्रकाशणारे परिपूर्ण ज्ञानस्वरूप स्वतः श्रीकृष्णच होता. ७९ तूप थिजलें किंवा वितळलें तरी तें जसें आपल्या तूपपणाला मुकत नाहीं, त्याप्रमाणें सगुण-निर्गुण एकरूप होऊन श्रीकृष्णांत परब्रह्म सांठविलेलें होतें. ८८० सगुण त्याज्य व निर्गुण पूज्य ही वृत्तिहि कचीच आहे. ज्याला गवत व दगड हीं दोन्ही ब्रह्मरूप दिसतात, त्याला सगुणरूप कदापि त्याज्य वाटणार नाहीं. ८१ याप्रमाणें उद्धवाला सगुण आणि निर्गुण सारखींच होतीं. त्याचें श्रीकृष्णावरील गुरुप्रेम अपार होतें, म्हणून तो त्याला सोडून जातेवेळीं विव्हल झाला. ८२ श्रीकृष्णाची आज्ञा तर सर्वथा अमान्य करवत नाहीं; म्हणून बदरितीर्थाला जाण्यास निघावें तर श्रीकृष्णाला सोडून जाणें उद्धवाला अत्यंत कष्टप्रद झालें. ८३ उद्धवानें जातेवेळीं श्रीकृष्णाच्या चरणांवर लोळण घेतली. त्यांचे चरण हृदयाशीं धरिले, आलिंगिले. दूर जाण्यास त्याचा धीर होईना. ८४ मी आतां एकदां येथून गेलों कीं, मग पुनः श्रीकृष्णनाथ कधींहि दिसणार नाहीं. या विचारानें त्याची चित्तवृत्ति अत्यंत व्याकुळ झाली व त्याच्यानें तेथून पाय काढवेना. ८५ मी श्रीकृष्णचरणामृतानें तृप्त झालों आहें. मला आतां महातीर्थांची हौसहि राहिलेली नाहीं. असें असतां शेवटीं दैवाची गति श्रीपतीची व माझी ताटातूट करवीत आहे. ८६ तो प्रेमभरानें थरथरां कांपूं लागला. त्याचा कंठ दाटून आला, तो क्षणोक्षणीं स्फुंदूं लागला. याप्रमाणें उद्धव रोमांचित होऊन घामानें भिजला. ८७ तो जाण्यासाठीं निघाला. एकदां पाया पडून पलीकडे जावें, पुनः येऊन पायां पडावें. याप्रमाणें त्याचें चित्त हरीच्या प्रेमांत गुंतलें. ८८ पुनः नमस्कार करावा, पुनः जावें, पुनः परत येऊन लोटांगण घालावें. पुनः श्रीकृष्णचरणांना वंदन करावें. याप्रमाणें त्याच्यानें कांहीं केल्या निघवेना. ८९ उद्धवाचा भाव पाहून श्रीकृष्ण परमानंदानें संतुष्ट झाला. त्यानें मनांत म्हटलें कीं, याचा माझ्यावर अत्यंत स्नेह आहे. याची गुरुभक्ति अनन्य आहे. ८९० श्रीकृष्णाच्या मनांत दया उपजली व त्यानें आपल्या पायांतील पादुका उद्धवाला दिल्या. त्यानें त्या तत्काल आपल्या मस्तकावर धारण केल्या. ९१ त्यानें पादुका मस्तकावर ठेवितांच ' मी श्रीकृष्णा-

दूरी। हें नाठवे उद्धवाभीतरीं । ऐशियापरी प्रबोधिला ॥ ९२ ॥ पादुका ठेवितांचि माथां । स्वयें उपशमें अवस्था । नमस्कारोनि श्रीकृष्णनाथा । होय निघता तदाज्ञा ॥ ९३ ॥ त्रिवार करोनि प्रदक्षिणा । अवलोकून कृष्णवदना । नमस्कारोनि श्रीचरणा । उद्धव कृष्णाज्ञा निघाला ॥ ९४ ॥ तृतीयस्कंधींचें निरूपण । उद्धवासी विदुरदर्शन । दोघां पडिलें आलिंगन । कुशल संपूर्ण पुशिलें ॥ ९५ ॥ तेथ सांगतां कृष्णनिधन । उद्धव नव्हेचि दीनवदन । तें विदुरासी कळलें चिह्न । हा ब्रह्मज्ञान पावला ॥ ९६ ॥ मरता गुरु रडता चेला । दोहींचा बोध वाया गेला । साच मानी जो या बोला । तोही ठकला निश्चित ॥ ९७ ॥ यासी तुष्टली श्रीकृष्णकृपामूर्ती । निमाला मोहममतावृत्ती । पावला परमानंद प्राप्ती । स्वानंद स्थितीं डुल्लत ॥ ९८ ॥ शब्द नातळोनि बोल बोले । पृथ्वी नातळोनि सहजें चाले । असोनि नामरूपमेळें । नामरूपा नातळे हा एक ॥ ९९ ॥ हा रसेंवीण सुरस चाखे । डोळ्यांवीण आपण पैं देखें । इंद्रियांवीण सोलींव सुखें । निजात्मतोखें हा भोगी ॥ ९०० ॥ निर्विकल्पनिजबोधेंसीं । त्यावरी भक्तिज्ञानवैराग्येंसीं । स्थिती देखोनि उद्धवापाशीं । विदुर मानसीं निवाला ॥ १ ॥ मग तो विनवी उद्धवासी । तुज तुष्टला हृषीकेशी । तूं पावलासि ब्रह्मज्ञानासी । तें मज उपदेशीं सभाग्या ॥ २ ॥ उद्धव म्हणे धन्य धन्य। तुज अंतीं स्मरला श्रीकृष्ण । तुज सांगावया ब्रह्मज्ञान। मैत्रेयासी जाण आज्ञापिलें ॥ ३ ॥ कृष्ण मज जरी आज्ञा देता । तरी मी तत्काळ बोध करिता । तुज सद्गुरु परमार्थी । जाण सर्वथा मैत्रेय ॥ ४ ॥ ऐकतां उद्धवाचें वचन । विदुर गहिंवरला पूर्ण । काय बोलिला आपण । सावधान अवधारा ॥ ५ ॥ हें तृतीयस्कंधींचें निरूपण । प्रसंगें एथें आलें जाण । विदुर बोलिला अतिगहन । तेंचि वचन अवधारा ॥ ६ ॥

पासून दूर जात आहे ' याचें त्याला मानच राहिलें नाहीं. अशाप्रकारें श्रीकृष्णानें त्याला उपदेश केला. ९२ पादुका मस्तकावर ठेवतां अशीं उद्धव स्वभावतःच शांत झाला व श्रीकृष्णाला नमस्कार करून त्याच्या आज्ञेनें निघाला. ९३ त्यानें श्रीकृष्णाला तीन वेळां प्रदक्षिणा केली. प्रेमानें त्याचें मुखावलोकन केलें, त्याला नमस्कार केला व त्याची आज्ञा घेऊन तो निघाला. ९४ तिसऱ्या स्कंधांत निरूपण केलें आहे कीं, उद्धवाची विदुराशी भेट झाली. तेव्हां दोघांनीं परस्परास आलिंगन दिलें. एकमेकांचें क्षेम-कुशल विचारिलें. ९५ त्यावेळीं विदुराला कृष्ण-निधनाचे वृत्त सांगत असतां उद्धवाचें मुख म्लान झालें नाहीं. तें पाहून विदुरानें ओळखिलें कीं, याला ब्रह्मज्ञान झालें आहे. ९६ मरणारा गुरु व रडणारा शिष्य असले म्हणजे दोघांचेंहि ज्ञान वायां गेलें. जो हें बोलणें खरें समजतो, तोहि खात्रीनें ठकला, असें समजावें. ९७ श्रीकृष्णाची कृपाळु मूर्ति याच्यावर प्रसन्न झाली खास. म्हणूनच याच्या मोह व ममता या वृत्ति मावळल्या. याला परमानंदप्राप्ति झाली व त्यामुळेंच हा स्वानंदांत डुलत आहे. ९८ शब्दांना स्पर्श न करितां हा बोलतो. पृथ्वीला न शिवतां हा सहज चालतो. नाम-रूपांत राहून नाम-रूपाला स्पर्शहि करीत नाहीं. ९९ हा रसावांचून रुचि चाखितो. डोळ्यावांचून स्वतःच पहातो. इंद्रियावांचून हा आत्मसंतोषानें परमसुख भोगितो. ९०० निर्विकल्प आत्मबोधाशिवाय भक्ति-ज्ञान-वैराग्य यांनीं युक्त अशी ही उद्धवाची स्थिति पाहून विदुर मनांत संतुष्ट झाला व त्यानें उद्धवाला विनंति केली कीं, हे भाग्यवान् उद्धवा ! श्रीकृष्ण तुझ्यावर प्रसन्न झाला. १ व तुला ब्रह्मज्ञान प्राप्त झालें. त्या ज्ञानाचा मला उपदेश कर. २ उद्धव म्हणाला कीं धन्य, धन्य, तूं धन्य आहेस. श्रीकृष्णानें अंतसमयीं तुझी आठवण केली व त्यानें मैत्रेयाला तुला उपदेश करण्याची आज्ञा केली. ३ श्रीकृष्णानें मला जर आज्ञा केली असती तर मीं तत्काळ तुला उपदेश केला असता. आतां मैत्रेयच तुझा परमार्थांतील सद्गुरु आहे. ४ हें उद्धवाचें भाषण ऐकून विदुर पूर्णपणें गहिंवरला व काय बोलला तें लक्षपूर्वक ऐका. ५ हें तिसऱ्या स्कंधांतील निरूपण प्रसंगानें येथें सांगावें लागलें. विदुर अत्यंत गहन वचन बोलला, तेंच आतां ऐका. ९०६.

क्वाहं कीटकवत्तुच्छः क्व च कारुण्यवारिधिः । तेनाहं स्मारितोऽस्म्यद्य मुमूर्षुः केशवं यथा ॥ १ ॥

विदुर म्हणे मी मशक । रंकांमाजीं अतिरंक । त्या मज स्मरे यदुनायक । कृपा अलोलिक दासांची ॥ ७ ॥ नाठवीच देवकीवसुदेवांसी । नाठवीच बाळिभद्रपांडवांसी । तो आठवी मज दासीपुत्रासी । हृषीकेशी कृपाळु ॥ ८ ॥ जेवीं मरता स्मरे नारायण । तेवीं अंतीं मज स्मरला कृष्ण । यापरी भक्तप्रतिपाळु जाण । कृपासिंधु पूर्ण श्रीकृष्ण ॥ ९ ॥ आशंका ॥ द्वारकेसी असतां श्रीकृष्ण । तैंचि उद्धवें केलें गमन । त्यासी प्रभासींचें कृष्णनिधन । म्हणाल संपूर्ण अदृश्य ॥ ९१० ॥ उद्धवविदुरसंवाद-खूण । येचि अर्थांचें निरूपण । समूळ सांगेन कथन । तें सावधान अवधारीं ॥ ११ ॥ उद्धव जातां मार्गीं आपण । अवचितीं जाहली आठवण । न पाहतां कृष्णनिधन । मी कां गमन करितों हें ॥ १२ ॥ कृष्णचरित्र अतिगोड । तें सांडूनि तीर्थीं काय चाड । ऐसा विचार करूनि दृढ । श्रद्धेनें प्रौढ श्रद्धाळु ॥ १३ ॥ परतोनि कृष्णापाशीं जातां । तो मज राहों नेदी सर्वथा । कृष्णामागें कळों नेदितां । आला गुप्तता प्रभासेंसीं ॥ १४ ॥ तेथेंही राहोनियां गुप्त । पाहों लागला कृष्णचरित । तंव यादवकुळाचा घात । देखिला समस्त उद्धवें ॥ १५ ॥ कुळ निर्दळूनि एकला । कृष्ण अश्वत्थातळीं बैसला । तेथ जराव्याधें बाण विंधिला । चरणीं लागला मृगशंका ॥ १६ ॥ चरणीं लागतांचि घावो । थोर सुखें सुखावला देवो । कृतकार्य जाहलें निःसंदेहो । निजधामा पहा हो जावया ॥ १७ ॥ बाण लागतां भलतेयांसी । घायें होती कासाविसी । ते दशा नाहीं श्रीकृष्णासी । देहत्व त्यासी अतिमिथ्या ॥ १८ ॥ जेवीं घाय लागतां छायेसी । पुरुष नव्हे कासाविशी । तेवीं व्याधें विंधितां बाणेंसीं । ग्लांती कृष्णासी असेना ॥ १९ ॥ ते संधीं मैत्रेय आला । त्यासी ज्ञानोपदेश केला ।

अर्थ- तुच्छ कीटकतुल्य मी कोठें ! व तो कृपासागर श्रीकृष्ण कोठें ! मरणसमयीं मनुष्य जसें नारायणाचें स्मरण करितो तसा मी त्याच्याकडून स्मरण केला गेलों. १.

विदुर म्हणाला कीं, मी डासाप्रमाणें तुच्छ, रंकातीलहि अतिरंक, त्या माझें श्रीकृष्णानें स्मरण केलें. ही त्याची या दासावर अलौकिक कृपा झाली. ७ ज्या कृपाळु श्रीहरीनें वसुदेव-देवकीचे स्मरण केलें नाहीं, बळराम-पांडवांची आठवण केली नाहीं, त्यानें मज दासीपुत्राचें स्मरण केलें. ८ मरणसमयीं नारायणाचें जसें स्मरण करावें, तशी श्रीकृष्णानें अंतीं माझी आठवण केली. असा श्रीकृष्ण भक्तांवर कृपा करणारा, पूर्ण कृपासागर आहे. ९ (आशंका--) श्रीकृष्ण द्वारकेंत असतांनाच उद्धवानें तेथून तीर्थाला प्रयाण केलें होतें. मग प्रभासांत घडलेलें श्रीकृष्णनिधन त्याला पूर्णपणें अज्ञात कसें असणार ! असें जर म्हणाल, ९१० तर त्या विषयीं उद्धव-विदुरसंवाद हें प्रमाण आहे. त्याचें सविस्तर कथन करितों, तें सावधान चित्तानें ऐका. ११ उद्धव मार्गानें जात असतां त्याला अकस्मात आठवण आली कीं, श्रीकृष्णनिधन न पहातांच मी कां जात आहें ! १२ श्रीकृष्णचरित्र अत्यंत रसाळ आहे. तें सोडून तीर्थांत काय गोडी आहे ! असा दृढ विचार करून तो श्रद्धावान् अत्यंत श्रद्धेनें चालला. त्यानें मनांत म्हटलें कीं, १३ मी परत श्रीकृष्णापाशीं गेलों, तर तो मला तेथें सर्वथा राहूं देणार नाहीं. म्हणून कृष्णाला कळूं न देतां त्याच्या मागोमाग तो गुप्तपणें प्रभासास गेला. १४ तेथेंहि गुप्तपणानें राहून श्रीकृष्णचरित्र पाहूं लागला. तेव्हां उद्धवानें यादवकुलाचा समूळ घात झालेला पाहिला. १५ सगळ्या कुलाचा संहार करून एकटा श्रीकृष्ण अश्वत्थ वृक्षाखालीं बसला व तेथें जराव्याधानें श्रीकृष्ण चरणाला हरिण समजून वेध केला. १६ चरणाला बाण लागतांच देवाला परम आनंद झाला. तो निजधामाला जाण्यास कृतकार्य झाला होता, १७ इतर सामान्य माणसाला बाण लागला असता तर त्याचा प्राण कासावीस झाला असता; पण श्रीकृष्णाची स्थिति तशी नव्हती. तो देहपणालाच अत्यंत मिथ्या समजत होता. १८ आपल्या छायेवर घाव बसला तर मनुष्य जसा कासावीस होत नाहीं, त्याप्रमाणें व्याधानें वेध केला, तरी श्रीकृष्णाला व्यथा झाली नाहीं, १९ त्या संधीस तेथें मैत्रेय आला. त्याला श्रीकृष्णानें ज्ञानोपदेश केला.

ते काळीं विदुर आठवला । कृपा कळवळला श्रीकृष्ण ।। ८२० ।। आजि येथें विदुर असतां । तरी मी ब्रह्म उपदेशिता । मैत्रेया तुज सांगतों आतां । त्यासी तूं तत्त्वतां उपदेशीं ।। २१ ।। पावोनि कृष्णगुह्यज्ञान । मैत्रेयासी परम समाधान । तो म्हणे कलियुग धन्य धन्य । ब्रह्मवादी जन बहुसाल होती ।। २२ ।।

सर्वे ब्रह्म वदिष्यन्ति सम्प्राप्ते च कलौ युगे । नैव तिष्ठन्ति मैत्रेय शिश्नोदरपरायणाः ।। २ ।।

वादकर्त्वें कलियुगाप्रती । बहुसाल ब्रह्मवादी होती । परी न राहती ब्रह्मस्थिती । जाण निश्चितीं मैत्रेया ।। २३ ।। वदूनियां ब्रह्मज्ञान । होती शिश्नोदरपरायण । जिव्हा शिश्न जो आवरी जाण । तया ब्रह्मज्ञान कलियुगीं ।। २४ ।। ऐकोनि मैत्रेयसंवादासी । उद्धव आला श्रीकृष्णापाशीं । प्रदक्षिणा करूनि त्यासी । मग पायांसी लागला ।। २५ ।। ऐकून मैत्रेयाचें ज्ञान । देखोनि कृष्णाचें निर्याण । उद्धव निघाला आपण । तें ऐक लक्षण परीक्षिती ।। २६ ।।

ततस्तमन्तर्हृदि सन्निवेश्य गतो महाभागवतो विशालाम् ।
यथोपदिष्टां जगदेकबन्धुना ततः समास्थाय हरेरगाद्गतिम् ।। ४७ ।।

जगाचें विश्रामधाम । जो पुरुषांमाजीं पुरुषोत्तम । तो हृदयीं धरोनि आत्माराम । उद्धव सप्रेम निघाला ।। २७ ।। कृष्णाची पूर्ण कृष्णस्थिती । हृदयीं धरोनि सुनिश्चितीं । उद्धव विशालतीर्थाप्रती । स्वानंदगतीं निघाला ।। २८ ।। उद्धव स्वानंदास्थितिपूर्ण । जेथें जेथें करी गमन । ते ते लोक होती पावन । भक्तिज्ञानवैराग्यें ।। २९ ।। जैसी जैसी विवेकविरक्ती । तैसतैशा बोधकशक्ती । उपदेशित ज्ञानभक्ती । चालिला त्रिजगती उद्धरितू

त्या वेळीं त्याला विदुराची आठवण झाली व तो कृपेनें कळवळला. ९२० आज जर विदुर तेथें असता तर मीं त्याला ब्रह्माचा उपदेश केला असता. तरी हे मैत्रेया ! तुला मी सांगतों कीं, विदुराला तत्त्वतः उपदेश कर. २१ श्रीकृष्णाच्या गुह्य ज्ञानाला प्राप्त होऊन मैत्रेयाला परम समाधान वाटलें. तो म्हणाला कीं, धन्य धन्य कलियुग कारण त्यांत पुष्कळ ब्रह्मवेत्ते होतील. ९२२.

अर्थ—कलियुग प्राप्त झालें असतां सगळेंच ब्रह्म बोलूं लागतील. पण हे मैत्रेया ! स्पर्श व रस या दोन विषयांत आसक्त झालेले ते ब्रह्माचें अनुष्ठान करणार नाहींत. २.

श्रीकृष्ण म्हणाला, हे मैत्रेया ! कलियुगांत वाद करणारे ब्रह्मवादी हवे तेवढे होतील, पण त्यांची ब्रह्मस्वरूपस्थिति टिकणार नाहीं. २३ ब्रह्मज्ञान सांगून ते केवळ पोटभरू व विषयासक्त होतील. त्यांतील जो जिव्हालोलुपता व कामासक्ति यांस स्वाधीन ठेवील, त्यालाच कलियुगांत ब्रह्मज्ञान लाभेल. २४ हा मैत्रेय-श्रीकृष्णसंवाद ऐकून उद्धव श्रीकृष्णाजवळ आला व त्याला प्रदक्षिणा करून त्याच्या पायां पडला. २५ हे परीक्षिति राजा ! मैत्रेयाचें ज्ञान ऐकून व श्रीकृष्णाचें निर्याण पाहून उद्धव तेथून निघाला. तो वृत्तान्त आतां सांगतों. ऐक. ९२६.

ततः विशालां गतः सन् तत् समास्थाय—त्यानंतर बदरिकाश्रमास गेलेला होत्साता तेथें चित्ताचें स्थैर्य करून, महाभागवतः—तो महाभगवद्भक्त उद्धव, तं अन्तर्हृदि निवेश्य हरेः गतिं अगात्—त्यालाच आपल्या अंतःकरणांत धारण करून हरीच्या गतीला प्राप्त झाला. (ती गति कशी ! उत्तर–) जगदेकबंधुना यथोपदिष्टां—त्या जगाच्या एकबंधूनें पूर्वीं (श्लो. ३४–४४.) सांगितलेल्या गतीला तो प्राप्त झाला. ४७.

जो जगाचें विश्रांतिस्थान, पुरुषांतील पुरुषोत्तम, त्या आत्मरामाला प्रेमानें हृदयांत धरून उद्धव निघाला. २७ श्रीकृष्णाचें परिपूर्ण आत्मस्वरूप हृदयांत धारण करून उद्धव बदरिकाश्रमाला स्वानंदानें व त्वरित गतीनें गेला. २८ उद्धवाच्या परिपूर्ण स्वानंदस्थितीमुळें तो जेथें जेथें गेला, तेथील लोक भक्ति, ज्ञान व वैराग्य यांनीं पावन झाले. २९ विवेकयुक्त वैराग्य जसें जसें त्याच्या अंगीं बाणत गेलें, तसा तसा तो ज्ञानशक्तीच्या द्वारां ज्ञानोपदेश करीत त्रिभुवनाला

॥ ९३० ॥ ज्यांसी उद्धवासी जाहली भेटी । त्यांसी हरिभजनीं पडे मिठी । भवभय पडों नेदी दृष्टीं । बोधक जगजेठी उद्धव ॥ ३१ ॥ जे जे भगवद्भक्ति करित । ते ते भागवत म्हणिपत । मुक्तीही वरी भजनयुक्त । महाभागवत उद्धव ॥ ३२ ॥ उद्धवें आदरिली जे भक्ती । तिची किंकर नित्यमुक्ती । यालागीं महाभागवतस्थिती बोलिजे निश्चितीं उद्धवा ॥ ३३ ॥ निजशांतता अतिनिर्मळ । आत्मानुभवें अतिप्रांजळ । मोक्षाहीवरी भजनशीळ । भक्त विशाळ उद्धव ॥ ३४ ॥ ऐशी उद्धवाची विशाळता । तोही पावला विशालतीर्था । विशाल म्हणावयाची कथा । ऐक आतां सांगेन ॥ ३५ ॥ जेथ श्रद्धामात्रें चित्तशुद्धी । स्मरणमात्रें निर्विकल्प बुद्धी । नारायणनामें मोक्षसिद्धी । विशाल या विधी बदरिकाश्रम ॥ ३६ ॥ जेथ जनहिता नारायण । अद्यापि करितो अनुष्ठान । मोक्षमार्गींची प्राप्ति पूर्ण । यापरी विशालपण बदरिकाश्रमा ॥ ३७ ॥ जेथ अल्प तप फळे प्रबळ । अल्प ध्यानें आकळे सकळ । अल्प विरक्तीं मोक्ष केवळ । ऐसें फळे विशाळ बदरिकाश्रम ॥ ३८ ॥ जो अंतर्यामीं गोविंदू । जो जगाचा सुहृद बंधू । जो आत्माराम प्रसिद्धू । ज्याचेनि निजबोधू उद्धवा ॥ ३९ ॥ जैसा कृष्णें केला उपदेशू । तैसा बदरिकाश्रमीं रहिवासू । उद्धवें केला निवासू । तोचि जनांसी विश्वासू परमार्थनिष्ठे ॥ ९४० ॥ जैसी उद्धवाची स्थिती गती । जैशी उद्धवाची ज्ञानशक्ती । जैसी उद्धवाची विरक्ती । तोचि जनांप्रती हितोपदेश ॥ ४१ ॥ जेथें गुरूसी विषयासक्ती । तेथें शिष्यासी कैंची विरक्ती । जेथ गुरूसी अधर्मप्रवृत्ती । तेथ शिष्यासी निवृत्ति कदा न घडे ॥ ४२ ॥ यालागीं उद्धवाचें आचरित । तेंचि आचरती जन समस्त । एवं परोपकारार्थ । उद्धव विरक्त बदरिकाश्रमीं ॥ ४३ ॥ जैसें शिकवूनि गेला कृष्णनाथ । तैसेंचि उद्धव आचरत । त्याचेनि धर्में जन समस्त । जाहले विरक्त परमार्थी ॥४४॥ परब्रह्म ब्रह्मप्राप्ती । दृढ करूनि गेला श्रीपती । तेचि उद्धवासी ब्रह्मप्राप्ती । आहोरात्रीं अखंड ॥ ४५ ॥ बैसतां घालूनि आसन ।

उद्धरीत चालला. ९३० ज्याची उद्धवाशीं भेट झाली, त्याला हरिभजनाचा छंद लागून भवभय त्याच्या दृष्टीसहि पडेनासें झालें. ३१ याप्रमाणें उद्धव जगांतील श्रेष्ठ उपदेशक झाला. जे भगवद्भक्ति करितात त्यांस भागवत असें म्हणतात. ३२ परंतु उद्धव मुक्त होऊन भगवद्भक्ति करीत होता, म्हणून तो महाभागवत होय. उद्धवानें जी भक्ति स्वीकारिली होती, तिची नित्यमुक्ति दासीच होय. म्हणून उद्धवाच्या स्थितीला महाभागवतस्थिति म्हणतात. ३३ उद्धवाची शांति अत्यंत निर्मल, तो आत्मानुभावानें अत्यंत सरळ व मोक्षाच्याहि वर भजनशील होता. यास्तव तो विशाल भक्त होय. ३४ अशी उद्धवाची थोरवी होती. तो विशाल तीर्थाला पोंचला. बदरिकाश्रमास विशालतीर्थ कां म्हणतात, तीहि कथा सांगतों, ऐक. ३५ तेथें केवल श्रद्धेनेंच चित्तशुद्धि होते, स्मरणानेंच बुद्धि निर्विकल्प होते, नारायणनांवाचा उच्चार करितांच मोक्षसिद्धि होते. म्हणून त्या बदरिकाश्रमाला विशाल म्हणतात. ३६ तेथें नारायण लोकांच्या हितासाठीं अद्यापि अनुष्ठान करितो, तेथें मोक्षमार्गाची पूर्ण प्राप्ति होते, म्हणून बदरिकाश्रमाला विशालपणा आला. ३७ तेथें अल्प तपाचें विपुल फल मिळतें, अल्प ध्यानानें परिपूर्ण ज्ञान होतें, अल्प विरक्तीनें साक्षात् मोक्ष मिळतो असें बदरिकाश्रमाचें विशाल फल आहे. ३८ जो अंतर्यामी गोविंद, जो जगाचा सुहृद् व बंधु, जो प्रसिद्ध आत्माराम, त्याच्यापासून उद्धवाला आत्मज्ञान प्राप्त झालें. ३९ उद्धवाला कृष्णानें जसा उपदेश केला होता, तसाच तो बदरिकाश्रमीं राहिला. त्याच्या परमार्थनिष्ठेमुळें लोकांचा त्याच्यावर विश्वास बसला. ९४० उद्धवाची हाल-चाल, त्याची ज्ञानशक्ति, त्याची विरक्ति जशी होती, तसाच लोकांना हितोपदेश झाला. ४१ जेथें गुरूलाच विषयासक्ति, तेथें शिष्याला विरक्ति कोठची ! जेथें गुरूची अधर्माकडे प्रवृत्ति, तेथें शिष्याला निवृत्ति कदापि घडणार नाहीं. ४२ यास्तव उद्धव जसा वागत होता, तसेंच सर्व लोक आचरण करूं लागले. याप्रमाणें परोपकारासाठीं उद्धव बदरिकाश्रमीं विरक्त होऊन राहिला. ४३ श्रीकृष्णनाथ त्याला जसें शिकवून गेला होता, तसेंच त्यानें आचरण ठेविलें. त्याच्या अनुकरणानें सगळे लोक विरक्त परमार्थी झाले. ४४ साक्षात् परब्रह्म श्रीपति उद्धवाची ब्रह्मप्राप्ति दृढ करून गेला होता. ती ब्रह्मप्राप्ति उद्धवानें रात्र-दिवस अखंड ठेविली होती. ४५ आसन घालून बसलें असतां किंवा जात-येत असतां उद्धवाचें ब्रह्मपण सर्वथा ढळत

कां करितां गमनागमन । उद्धवाचें ब्रह्मपण । सर्वथा जाण मोडेना ॥ ४६ ॥ विरक्ती आणि भोगासक्ती । दोनी देहावरी दिसती । या दोहींहूनि परती । परब्रह्मस्थिती उद्धवीं ॥ ४७ ॥ विरक्तीमाजीं नव्हे विरक्त । भोगीं नव्हे भोगासक्त । या दोहींहून अतीत । ब्रह्म सदोदित उद्धव ॥ ४८ ॥ तेथ प्रारब्धक्षयें जाण । त्या देहासी येतां मरण । उद्धव ब्रह्मीं ब्रह्म पूर्ण । जन्ममरण तो नेणे ॥ ४९ ॥ देहींचा देहात्मभावो । निर्दळूनि निःसंदेहो । उद्धवासी ब्रह्मानुभवो । श्रीकृष्णें पहा हो दृढ केला ॥ ९५० ॥ ऐशिया उद्धवासी देहांतीं । विदेहकैवल्याची प्राप्ती । म्हणणें हें परीक्षिती । दृढ भ्रांती वक्त्याची ॥ ५१ ॥ घडितां मोडितां कांकण । घडमोडी नेणें सुवर्ण । तेवीं देहासीच जन्ममरण । उद्धव परिपूर्ण परब्रह्म ॥ ५२ ॥ उद्धवासी देहीं वर्ततां । तो नित्यमुक्त विदेहता । त्यासी देहांतीं विदेहकैवल्यता । हे समूळ वार्ता लौकिकी ॥ ५३ ॥ देह राहो अथवा जावो । हा ज्ञात्यासी नाहीं संदेहो । त्यासी निजात्मता ब्रह्मभावो । अखंड पहा हो अनुस्यूत ॥ ५४ ॥ देहासी दैव वर्तवी जाण । देहासी दैव आणी मरण । ज्ञाता ब्रह्मीं ब्रह्म पूर्ण । जन्ममरण तो नेणे ॥ ५५ ॥ देह असो किंवा जावो । आम्ही परब्रह्मचि आहों । दोरीं सापपण वावो । दोरचि पहा हो जेवीं होय ॥ ५६ ॥ जेथ मृगजळ आटलें । तेथें म्हणावें कोरडें जाहलें । जेव्हां होतें पूर्ण भरलें । तेव्हांही ओलें असेना ॥ ५७ ॥ तेवीं देहाची वर्तती स्थिती । समूळ मिथ्या प्रतीती । त्या देहाचे देहांतीं । विदेहकैवल्यप्राप्ती नवी न घडे ॥ ५८ ॥ यापरी बदरिकाश्रमाप्रती । उद्धवें बहुकाळ करूनि वस्ती । त्याचि निजदेहाचे अंतीं । भगवद्गती पावला ॥ ५९ ॥ पावला हेही वदंती । लौकिक जाण परीक्षिती । तो परब्रह्मचि आद्यंतीं । सहजस्थिती पावला ॥ ९६० ॥ उद्धवाची भगवद्भक्ती । आणि निदानींची निजस्थिती । तेणें शुक संतोषला चित्तीं । कृष्णकृपा निश्चितीं वर्णित ॥ ६१ ॥

नव्हतें. ४६ विरक्ति व भोगासक्ति हे दोन्ही धर्म देहाचे आहेत. उद्धवाची ब्रह्मस्थिति या दोहोंच्याहि पलीकडे होती. ४७ उद्धव विरक्तीविषयीं कधीं विरक्त नव्हता. भोगामध्यें भोगासक्त नव्हता. तो या दोहोंच्या अतीत अखंड परब्रह्म होता. ४८ प्रारब्धाचा क्षय झाल्यावर त्याच्या देहाला मरण आलें, तरी उद्धव ब्रह्मामध्यें पूर्णब्रह्म होता. तो जन्ममरण जाणत नव्हता. ४९ उद्धवाच्या देहांतील देहात्मभाव निःशेष घालवून श्रीकृष्णानें त्याचा ब्रह्मानुभव दृढ केला. ९५० हे परीक्षिति राजा ! अशा उद्धवाला देहपातानंतर परब्रह्मप्राप्ति होईल, असें म्हणणें हा बोलणाराचाच भ्रम होय. ५१ सोन्याचें कांकण घडलें किंवा मोडलें तरी सोन्यांत जसा कांहींच बदल होत नाहीं, त्याप्रमाणें देहालाच जन्म-मरण आहे. उद्धव परिपूर्ण परब्रह्म होता. ५२ उद्धव देहांत असतांच नित्यमुक्त विदेही झाला होता. त्याला देह सोडिल्यावर विदेहकैवल्य मिळेल, हें बोलणेंच मुळीं लौकिक आहे. ५३ देह राहो किंवा जावो, त्यांत ज्ञात्याला कांहींच बंधन नाहीं. त्याची ‘ मीच परब्रह्म ’ ही भावना अखंड असते. ५४ देहाला दैवच वागवितें आणि दैवच मरण देतें. ज्ञानी परब्रह्मांत पूर्ण ब्रह्म असतो. तो मरण जाणत नाहीं. ५५ ‘ देह राहो किंवा जावो, आम्ही परब्रह्म आहोंत ’ असा त्याचा निश्चय असतो. दोरीवरील मिथ्या सापाचा भ्रम गेला कीं, ती दोरीच दिसूं लागते. ५६ किंवा मृगजळाचा भास नाहींसा होतांच, ती भूमि कोरडी झाली असें म्हणावें; पण जेव्हां जल भासत होतें तेव्हांहि ती ओली नव्हतीच. ५७ त्याप्रमाणें देह वर्तत असतांहि त्याचा मिथ्याच अनुभव येत असतो. तो देह सोडिल्यानंतर विदेह कैवल्याची प्राप्ति नवीन घडत नाहीं. ५८ याप्रमाणें उद्धव बदरिकाश्रमांत पुष्कळ कालपर्यंत राहून देह सोडिल्यानंतर भगवत्पदाला प्राप्त झाला. ५९ हे परीक्षिते ! तो ब्रह्मभावाला पोंचला हें बोलणेंहि लौकिकच आहे. कारण जो आरंभापासून अखेरपर्यंत परब्रह्मच होता, तो आपल्या स्वाभाविक स्वरूपांत मिळाला. ९६० उद्धवाची भगवद्भक्ति व त्याची अंतकालची अवस्था पाहून श्रीशुक मनांत संतोषला व श्रीकृष्णकृपेचें वर्णन करूं लागला. ९६१.

य एतदानन्दसमुद्रसंभृतं ज्ञानामृतं भागवताय भाषितम् ।
कृष्णेन योगेश्वरसेविताङ्घ्रिणा सच्छ्रद्धयाऽऽसेव्य जगद्विमुच्यते ॥ ४८ ॥

जे योगेश्वर योगस्थिती । जे पावले जीवन्मुक्ती । तेही कृष्णचरण सेविती । ऐशी पूज्य मूर्ती श्रीकृष्णाची ॥ ६२ ॥ पदीं रंगले सनकादिक । संत सज्जन अनेक । ब्रह्मादिक तेथें रंक । ऐसा श्रेष्ठ देख श्रीकृष्ण ॥ ६३ ॥ तेणें श्रीकृष्णें स्वानंदस्थिती । प्रकट केली निजभक्ती । अतिकृपा उद्धवाप्रती । स्वमुखें श्रीपति बोलिला ॥ ६४ ॥ भगवद्भक्ति तोचि महासागर । तेथें निजधैर्य तोचि मंदर । गुरुशिष्य-युक्ति सुरासुर । मथनतत्पर साटोपें ॥ ६५ ॥ भाव विश्वास दोनी मांदिरीं । बोध रविदोर दृढ धरी । प्रत्यगावृत्तिअभ्योसेंकरी । मंथन निर्धारीं मांडिलें ॥ ६६ ॥ तेथ मंथनीं प्रथमदृष्टीं । 'अहं ज्ञाता' हें हालाहल उठी । तें विवेकशिवें धरिलें कंठीं । पुढती अहं नुठी गिळिलें तैसें ॥ ६७ ॥ निरभिमानें मथूनि मथित । काढिलें भक्तिसारामृत । तें उद्धवालागीं श्रीकृष्णनाथ । कृपेनें निश्चित अर्पिलें ॥ ६८ ॥ धर्म अर्थ काम मुक्ती । चहूं पुरुषार्थांहीवरती । कृष्णें सारामृत निजभक्ती । उद्धवाहातीं अर्पिली ॥ ६९ ॥ निजबो-धाचें पात्र जाण । निजानुभवें आसावून । तेथें हें सारामृत भरोन । करविलें प्राशन उद्धवासी ॥ ९७० ॥ तेणें उद्धव निवाला । त्रिविधतापें सांडवला । परम सुखें सुखावला । परब्रह्मीं जडला ब्रह्मत्वें ॥ ७१ ॥ भक्तिसारामृतप्राशन । उद्धवें करोनियां जाण । पावला परम समाधान । ऐसा कृपाळु जाण श्रीकृष्ण ॥ ७२ ॥ कृष्णउद्धवसंवाद पूर्ण । भक्तिसारामृत गुह्यज्ञान । याचें जो करी सेवन । श्रवण-मननिदिध्यासें ॥ ७३ ॥ ऐसें जो करी कथासेवन । त्याभेणें पळे भवबंधन । स्वप्नीं न देखे जन्ममरण । हाही नव्हे जाण नवलावो ॥ ७४ ॥ जे लागोनि त्याचे संगती । दृढावले ये कथेचे भक्ती । त्यांसी

योगेश्वरसेविताङ्घ्रिणा कृष्णेन भागवताय भाषितं एतत् आनंदसमुद्रसंभृतं सच्छ्रद्धया आसेव्य यः वर्तते सः विमुच्यते [इति किं वक्तव्यं तत्संगात्] जगत् [अपि विमुच्यते]–योगेश्वरानीं ज्याच्या चरणाचें सेवन केलें आहे, अशा कृष्णानें भगवद्भक्ताला सांगितलेलें हें भगवद्भक्तिमार्गांत सांठविलेलें ज्ञानामृत जो सात्त्विक श्रद्धेनें थोडेसेंहि सेवन करीत रहातो, तो मुक्त होतो ! हें काय सांगावें ! त्याच्या संगतीनें जगत्‌हि मुक्त होतें. ४८.

योगधारणेनें मुक्त झालेले जे श्रेष्ठ योगी व जीवन्मुक्त, तेहि श्रीकृष्णचरणांची सेवा करितात. अशी श्रीकृष्णाची मूर्ति पूज्य आहे. ६२ त्याच्या चरणीं सनकादिक अनेक संत-सज्जन रमतात. ब्रह्मादिकहि त्याच्यापुढें रंक होतात. असा श्रीकृष्ण श्रेष्ठ आहे. ६३ त्या श्रीकृष्णानें स्वानंदस्थितीनें आपली भक्ति प्रकट केली आणि अत्यंत कृपालुत्वानें त्यानें ती उद्धवाला सांगितली. ६४ भगवद्भक्ति हाच महासागर होय. त्यांत धैर्य हाच मंदराचल; गुरु-शिष्यांची युक्ति हेच मंथन करण्यांत तत्पर असलेले सुर-असुर; ६५ भाव आणि विश्वास या मंथनदोऱ्या; बोध हाच दोरीला दृढ धरणारा खांब; स्वस्वरूपाच्या अभ्यासानें त्यांनीं मंथन आरंभिलें. ६६ त्या मंथनांतून आरंभालाच 'मी ज्ञाता' हें ज्ञानाभिमानरूपी हलाहल विष निघालें. तें विवेकरूपी शंकरानें प्राशन केलें. त्याला गिळलेलें पाहून अहंकार पुनः जागृत झाला नाहीं. ६७ नंतर निरभिमानानें मंथन करून त्यानें भक्तिसारामृत काढिलें. तें श्रीकृष्णानें प्रसन्न होऊन उद्धवाला अर्पण केलें. ६८ धर्म-अर्थ-काम-मोक्ष या चारी परुषार्थांच्या वरची ज्ञानोत्तर श्रेष्ठ भक्ति श्रीकृष्णानें उद्धवाच्या हातांत अर्पण केली. ६९ आत्मबोधाचें पात्र आत्मानुभवानें दृढ करून व त्यांत हें सारामृत भरून उद्धवाकडून प्राशन करविलें. ९७० त्यानें उद्धव तृप्त झाला व त्रिविध तापांतून सुटला. तो परम सुखानें संतुष्ट झाला आणि ब्रह्मरूप होऊन परब्रह्मांत मिळाला. ७१ हें भक्तिसारामृत प्राशन करून उद्धव परम सुखी झाला. श्रीकृष्ण असा परम कृपाळु आहे. ७२ या कृष्ण-उद्धवसंवादयुक्त भक्तिसारामृत गुह्य ज्ञानाचें जो श्रवण, मनन व निदिध्यासन यांच्यायोगें सेवन करितो, ७३ किंवा जो अशाप्रकारें कथासेवन करितो त्याच्या भीतीनें भवबंधन पळून जातें. तो स्वप्नांतहि जन्म-मरण पहात नाहीं. पण हे गुरुराया ! हेंहि मोठेंसें आश्चर्य नाहीं. ७४

भवभयाची प्राप्ती । न बाधी कल्पांतीं कुरुराया ॥ ७५ ॥ ज्यासी या कथेची श्रद्धा पूर्ण । ज्यासी या कथेचें अनुसंधान । ज्यासी ये कथेचें अनुष्ठान । तो उद्धरी जाण जगातें ॥ ७६ ॥ जो सूर्याचे घरीं राहिला । त्यासी रात्रीचा यावा ठेला । मा जो त्याचे गांवींच वसला । तोही मुकला रात्रीसी ॥ ७७ ॥ सूर्यासी रात्रीच नाहीं । मा दिवस उगवे कंहीं । तेवीं स्वरूपाच्या ठायीं । बंधमोक्ष पाहीं असती मिथ्या ॥ ७८ ॥ तेवीं ये कथेचें अनुष्ठान । न घडोनि ज्यातें घडे श्रवण । त्यासीही भवबंधन । सर्वथा जाण बाधेना ॥ ७९ ॥ असो न घडे कथाश्रवण । जो हें आवडीं करी पठण । त्याचे दुःखदोषाचें दहन । श्लोकश्लोकीं जाण होतसे ॥ ९८० ॥ नव्हे श्रवणपठणआटाटी । या ग्रंथींच्या निरूपणगोष्टी । जेणें बांधल्या जीवाच्या गांठीं । तो वंद्य सृष्टीं सुरनरां ॥ ८१ ॥ ये कथेची ज्यांसीं प्रीती । ये कथेची ज्यांसी भक्ती । त्यांची आवडे ज्यासी संगती । त्यातें वंदिती यमकाळ ॥ ८२ ॥ जे कथेची श्रद्धा संपूर्ण । तेचि कथेचें मुख्य सेवन । जो श्रद्धेनें करी श्रवण मनन । त्यापाशीं श्रीकृष्ण परता नव्हे ॥ ८३ ॥ भाळ्या-भोळ्या ऐकतां गोष्टी । ज्यासी या कथेची श्रद्धा उठी । कृष्ण प्रकटोनि त्याच्या पोटीं । छेदी उठाउठी भवपाश ॥ ८४ ॥ यापरी श्रद्धाळुवां जाण । कृपाळु स्वामी श्रीकृष्ण । यालागीं श्रीशुक आपण । करी मनन अतिश्रद्धा ॥ ८५ ॥

भवभयमपहन्तुं ज्ञानविज्ञानसारं निगमकृदुपजह्रे भृङ्गवद्वेदसारम् ।
अमृतमुदधितश्चापाययद्भृत्यवर्गान्पुरुषमृषभमाद्यं कृष्णसंज्ञं नतोऽस्मि ॥ ४९ ॥

जे त्याच्या संगतीनें या भक्तींत रंगले, त्यांसहि भवभय कल्पांतींहि बाधत नाहीं. ७५ ज्याची या कथेवर पूर्ण श्रद्धा असते, जो या कथेचें सतत चिंतन करितो, जो या कथेचें अनुष्ठान करितो तो जगाचा उद्धार करितो. ७६ जो सूर्याच्या घरीं राहिला त्याला रात्र म्हणजे काय हें ठाऊकच नसतें, मग जो त्याच्या गांवींच जाऊन राहिला, तो रात्रीला मुकणारच. ७७ सूर्याला रात्रच जर नाहीं, मग दिवस उगवणार कसा ! याप्रमाणें आत्मस्वरूपामध्यें बंध-मोक्ष मिथ्या आहेत. ७८ त्याप्रमाणें या कथेचें अनुष्ठान जरी घडलें नाहीं व नुस्तें श्रवण जरी घडलें, तरी त्याला भवबंधन सर्वथा बाधत नाहीं. ७९ तेंहि राहो. कथाश्रवण जरी घडलें नाहीं, तरी जो याचें आवडीनें पठण करितो, त्याचे दुःखादि दोष प्रत्येक श्लोकाबरोबर जळून जातात. ९८० श्रवण-पठणाचीहि दगदग होत नसली तर या निरूपणाच्या गोष्टी जो आपल्या गांठीला सांठवून ठेवील, तोहि जगामध्यें देव-मानवांनाहि वंद्य होईल. ८१ या कथेची ज्याला प्रीति असते, तिच्यावर ज्याची भक्ति असते, आणि ज्याला तिची संगति आवडते त्याला यम व काळहि वंदन करितो. ८२ या कथेवर पूर्ण श्रद्धा असणें हेंच कथेचें मुख्य सेवन आहे. जो याचें श्रद्धेनें श्रवण-मनन करितो त्याच्यापासून श्रीकृष्ण दूर नाहीं. ८३ भाळ्याभोळ्या गोष्टी ऐकून ज्याची कथेवर श्रद्धा बसेल, त्याच्या मनांत श्रीकृष्ण प्रकट होऊन तत्काल त्याच्या भवपाशाचा छेद करील. ८४ याप्रमाणें श्रद्धावानावर स्वामी श्रीकृष्ण अत्यंत कृपा करितो. यास्तव श्रीशुकाचार्य स्वतः अत्यंत श्रद्धेनें या कथेचें मनन करूं लागले. ९८५.

—याप्रमाणें ज्यानें उपदेश केलेला आहे त्या जगद्गुरूला श्रीशुकाचार्य प्रणाम करितात—

भवभयं अपहन्तुं यः निगमकृत् वेदसारं ज्ञान-विज्ञानसारं भृङ्गवत् उपजह्रे—संसार व जरा—रोगादिनिमित्त भय यांचा नाश करण्यासाठीं जो वेदकर्ता वेदाचें ज्ञान-विज्ञानरूप श्रेष्ठ सार भ्रमराप्रमाणें हरण करिता झाला, उदधितः च अमृतं उपजह्रे—आणि क्षीरसागरापासून अमृत काढिता झाला भृत्यवर्गान् अपाययत् च—आणि आपल्या भृत्यवर्गास तें पाजविता झाला, तं आद्यं पुरुषं ऋषभं कृष्णसंज्ञं नतः अस्मि—त्या आद्य पुरुषाला, कृष्णसंज्ञक श्रेष्ठाला मी नमस्कार करितों. [निवृत्तिमार्गीयांचें संसार हें भय आणि प्रवृत्तिमार्गीयांना जरा-रोगादिनिमित्तानें प्राप्त होणारें भय घालविण्यासाठीं ज्यानें ज्ञान-विज्ञानरूप वेदसार हें एक अमृत व क्षीरसागरातील दुसरें अमृत काढून त्या त्या योग्य अधिकाऱ्यांना दिलें, त्याला मी नमस्कार करितों. भ्रमर जसा पुष्पाला पीडा न देतां त्यांतील रसांचे सेवन करितो, त्याप्रमाणेंच भगवानानें स्वकृत वेदाला बाध न येईल अशा रीतीनें ज्ञान-विज्ञानरूप अमृत त्यांतून काढिलें व क्षीरसागराची हानि न करितां त्यांतून देवांना अभीष्ट असलेलें अमृत काढून दिलें, असा भावार्थ] ४९.

संसारभयें त्रासले । जे कृष्णासी शरण आले । त्यांचें भवभय हरावया वहिलें । जेणें मथन केलें वेदार्था ॥ ८६ ॥ मथूनि उपनिषद्धार । काढिलें ज्ञानविज्ञानसार । ज्यालागीं शिणले ज्ञाते नर । तयांसी पैल मेर ठाकेना ॥ ८७ ॥ म्हणसी निगम मथितां । वेदासी जाहली परम व्यथा । कृष्ण वेदाचा आदिकर्ता । तो दुःख सर्वथा हों नेदी ॥ ८८ ॥ जेवीं स्वयें वांसरूं गायी दुहितां । बाहला न लगे सर्वथा । तेवीं श्रीकृष्ण वेद मथितां । वेदासी व्यथा बाधीना ॥ ८९ ॥ जो सर्वज्ञ हृषीकेश । वेदार्थसार राजहंस । तेणें नेदितां दुःखलेश । वेदसारांश काढिला ॥ ९९० ॥ एवं वेदार्थनिजमथित । ज्ञानविज्ञानसारामृत । कृष्णें काढूनि इत्थंभूत । भृत्यहितार्थ कृपा अर्पी ॥९१॥ जेवीं अळुवारपणें षट्पद । काढी सुमनमकरंद । तेवीं मथूनियां वेद । श्रीकृष्णें सार शुद्ध काढिलें ॥ ९२ ॥ यापरी श्रीकृष्णनाथ । भक्तकृपाळ कृपावंत । काढूनि वेदसारामृत । निजभृत्यां देत निर्भय ॥ ९३ ॥ ऐसें वेदसारामृत पूर्ण । भृत्यासी पाजूनि श्रीकृष्ण । निजभक्तांचें जन्ममरण । निर्दळी संपूर्ण भवभय ॥ ९४ ॥ जगाचें माया मुख्य कारण । कृष्ण मायेचें निजकारण । जें स्वरूप सच्चिदानंदघन । त्यासी संज्ञा श्रीकृष्णनामाची ॥ ९५ ॥ घेऊनि मायामनुष्यनट । पुरुषांमाजीं पुरुषश्रेष्ठ । पूर्ण ज्ञानें ज्ञाननिष्ठ । वंदनीं वरिष्ठ श्रीकृष्ण ॥ ९६ ॥ त्यासी काया वाचा आणि मन । सर्वार्थीं अनन्यशरण । यापरी श्रीशुक आपण । करी मनें नमन श्रीकृष्णा ॥ ९७ ॥ ऐसें श्रीशुकें केलें नमन । तेणें परीक्षिती सप्रेम पूर्ण । भक्तकृपाळु एक श्रीकृष्ण । दुसरा जाण असेना ॥ ९८ ॥ उद्धव पावला परम निर्वाण । सरलें ज्ञानकथानिरूपण । जगीं श्रेष्ठ भगवद्भजन । भक्तांअधीन श्रीकृष्ण ॥ ९९ ॥ जें जें भक्ताचें मनोगत । तें तें पुरवी श्रीकृष्णनाथ । शेखीं निजपदही देत । कृपा समर्थ भक्तांची ॥ १००० ॥ निजधामा

जे संसारभयाला त्रासून श्रीकृष्णाला शरण आले, त्यांचें भवभय घालविण्यासाठीं त्यानें सत्वर वेदार्थाचें मंथन केलें. ८६ उपनिषदांच्या राशींचें मंथन करून त्यांतून ज्ञान-विज्ञानांचें सार काढिलें. श्रेष्ठ विद्वान् ज्ञाते त्याच्यासाठीं थकले, तरी त्यांना कांहीं पैलतीर सांपडलें नाहीं. ८७ 'शास्त्राचें मंथन करण्यानें वेदाला अतिशय व्यथा झाली असेल आणि कृष्ण तर वेदांचा मूळ कर्ता, तो त्यांस दुःख कसें होऊं देईल!' ८८ असें जर म्हणशील तर वासरूं जेव्हां स्वतः पिऊं लागतें, तेव्हां कांहीं गायीला पायदोर घालून बांधावें लागत नाहीं. ८९ त्याप्रमाणें श्रीकृष्णानें स्वतःच मंथन केल्यामुळें वेदाला व्यथा झाली नाहीं. जो सर्वज्ञ, वेदान्तसारराजहंस श्रीहरि, त्यानें वेदाला तिळभरहि दुःख न देतां वेदांचा सारांश काढिला. ९९० याप्रमाणें वेदार्थाचें मंथन करून, ज्ञान-विज्ञान-सारामृत काढून श्रीकृष्णानें तें भक्तकल्याणास्तव परम कृपेनें सढळ हातानें अर्पण केलें. ९१ भ्रमर जसा अतिशय जपून फुलांतील मध काढितो, तसें श्रीकृष्णानें वेद मंथून त्यांतून शुद्ध सार काढिलें. ९२ याप्रमाणें भक्त-कृपाळु दयाघन श्रीकृष्णनाथानें वेदसारामृत काढून तें निर्भयपणें आपल्या दासांना दिलें. ९३ भक्तांना असें पूर्ण वेदसारामृत पाजून श्रीकृष्णानें त्यांचें जन्म-मरण व भवभय यांचा पूर्णपणें नाश केला. ९४ जगाचें मुख्य कारण माया आहे. मायेचें मूळकारण श्रीकृष्ण आहे. जें सच्चिदानंदघन स्वरूप त्यालाच श्रीकृष्ण हें नांव आहे. ९५ मायेनें मनुष्याचा वेष घेणारा पुरुषांतील श्रेष्ठ पुरुष, पूर्ण ज्ञानानें ज्ञाननिष्ठ, असा श्रीकृष्ण वंद्य आहे. ९६ त्या श्रीकृष्णाला काया-वाचा-मनानें अनन्य शरण जाऊन श्रीशुकाचार्यानें मनानेंच नमन केलें. ९७ श्रीशुकानें असा नमस्कार केलेला पाहून परीक्षितिराजा अत्यंत प्रेमानें बोलला कीं, भक्तकृपाळु एक श्रीकृष्णच आहे. दुसरा कोणीहि दिसत नाहीं. ९८ उद्धव परम निर्वाणाला गेला. आतां ज्ञानकथानिरूपण संपलें. जगांत भगवद्भजन श्रेष्ठ होय. कारण श्रीकृष्ण भक्ताधीन आहे. ९९ श्रीकृष्णनाथ भक्तांचें जे जे मनोरथ असतील ते ते पूर्ण करितो आणि शेवटीं त्यांस आत्मपद देतो; अशी त्याची भक्तांवर अगाध कृपा असते. १००० श्रीकृष्ण निजधामाला जाण्यास निघाला, त्यावेळीं उद्धवानें जर हे प्रश्न विचारिले नसते, तर श्रीकृष्णानें हें

निघतां श्रीकृष्ण । उद्धव न करितां हे जरी प्रश्न । तरी हें परमामृतकथन । सर्वथा श्रीकृष्ण न बोले ॥ १ ॥ यालागीं उद्धवाचा महाथोर । जगासी जाहला उपकार । भक्तिज्ञानवैराग्यसार । ज्याचेनि शार्ङ्गधर स्वयें बदला ॥ २ ॥ उद्धवाचेनि धर्में जाण । भवाब्धि तरे त्रिभुवन । ऐसें बोलविलें ब्रह्मज्ञान । जें गुह्य भजन सप्रेम ॥ ३ ॥ उपेक्षूनि चारी मुक्ती । जगीं थोराविली हरिभक्ती । एवढी उद्धवें केली ख्याती । त्रिजगती तरावया ॥ ४ ॥ एकादशाचेनि मावे । घातली भक्तिमुक्तिपव्हे । एवढी कीर्ति केली उद्धवें । । जडजीवें तरावया ॥ ५ ॥ धेनूच्या ठायीं क्षीर पूर्ण । हाता न ये वत्सेंवीण । तेवीं श्रीष्कृणाचें पूर्ण ज्ञान । उद्धवें जाण प्रकट केलें ॥ ६ ॥ कृष्णोद्धवसंवादकथन । तें अतिशयें ज्ञानघन । तेथ मी अपुरतें दीन । केवीं व्याख्यान करवलें ॥ ७ ॥ कृष्णोद्धवज्ञानधन । त्याचें करावया व्याख्यान । साह्य जाहला जनार्दन । जो सर्वज्ञ सर्वार्थी ॥ ८ पदपदार्थसंगती । ज्ञानाची परिपाकस्थिती । वैराग्ययुक्त भक्तिमुक्ती । हेही व्युत्पत्ती मी नेणें ॥ ९ ॥ माझें जें कां मीपण । तेंही जाहला जनार्दन । तेव्हां पदपदार्थव्याख्यान । कर्ता जाण तो एक ॥ १०१० ॥ तो एक एकपणाचेनि भावें । ऐक्यता पावला स्वभावें । एका जनार्दन या नांवें । हा ग्रंथ देवें विस्तारिला ॥ ११ ॥ माझे बुद्धीचीही बुद्धी । जनार्दन जाहला अर्थावबोधीं । कवित्वयुक्तपदबंधीं । बदता त्रिशुद्धी जतार्दन ॥ १२ ॥ माझें मीपण रूप कर्म गुण । मूळीं पाहतां मिथ्या जाण । परी तेंही जाहला जनार्दन । ऐसें एकपण पढियंतें ॥ १३ ॥ ॥ १३ ॥ नांवें भावें एकपण । यालागीं तुष्ट जाहला जनार्दन । तेणें माझ्या नांवाऐसें जाण । जगीं एकपण प्रकाशिलें ॥ १४ ॥ एका या नामाचें कौतुक । जनार्दनासी आत्यंतिक । तेणें तो मजशीं जाहला एक । मी तूं देख म्हणताही ॥ १५ ॥ एका या नांवाचें कौतुक । जनार्दनासी ऐसें देख । एकत्वें प्रकाशी अनेक । अनेकीं एक अविकारी ॥ १६ ॥ नांवें एक भावें एक । त्यासी देवाचें सर्वदा ऐक्य । मग तो एकानेक । भिन्नत्व देख असेना ॥ १७ ॥ हें एकत्व जंव न ये हाता । तंव न लभे देवाची

परमामृतकथा [illegible] वास्तव उद्धवाचा जगावर फार मोठा उपकार झाला आहे. ज्याच्यामुळें श्रीकृष्णानें भक्ति-ज्ञान-वैराग्य[illegible] या उद्धवाच्या या उपकारामुळें त्रिभुवनाला भवसागर तरून जातां येईल. जें गुह्य सप्रेम भजन तें हें [illegible] सांगितलें. ३ चारी मुक्तींची उपेक्षा करून जगांत हरिभक्ति पसरविली. उद्धवानें जड जीवांना [illegible] ख्याति केली. ४ एकादश स्कंधाच्या रूपानें भक्ति-मुक्तीची पाणपोयी घातली. उद्धवानें जड-जीवांना [illegible] वढी कीर्ति केली. ५ गायीचें दूध वासरावांचून जसें पूर्णपणें हातीं येत नाहीं, त्याप्रमाणें श्रीकृष्णाचें [illegible] प्रकट केलें. ६ कृष्ण-उद्धवसंवादकथन अत्यंत ज्ञानपूर्ण आहे. त्याच्यापुढें मी केवल दीन, अस[illegible] त्याचें व्याख्यान कसें करवेल. ७ कृष्ण व उद्धव यांच्या ज्ञानरूपी धनाचें व्याख्यान करा[illegible] जनार्दनच सहाय झाला. ८ पद व पदांचा अर्थ यांचा संबंध मला कळत नाहीं. ज्ञानाची [illegible] नाहीं. ९ वैराग्ययुक्त भक्ति-मुक्ति यांचाहि प्रकार मला माहीत नाहीं. माझें जें मीपण [illegible] पद-पदार्थांचें व्याख्यानकर्ता तोच एक आहे, असें समज. १०१० तो एक एकप[illegible] ऐक्य पावला आहे. म्हणून देवानें एका-जनार्दन या नांवानें या ग्रंथाचा विस्तार केला. ११ जनार्दनानें [illegible] ऊन अर्थाचा बोध केला. कवितायुक्त ग्रंथरचना करणारा खरोखर जनार्दनच होय. १२ माझें [illegible] वास्तविक मिथ्याच आहे; पण तेंहि जनार्दन झाला. त्याला एकपण फार प्रिय आहे. १३ [illegible] वनेंतील एकपणा पाहून जनार्दन संतुष्ट झाला आणि त्यानें माझ्या नांवाप्रमाणें जगांत ऐक्य प्रक[illegible] जनार्दनाला एका या नांवाचें अत्यंत कौतुक वाटतें. त्यामुळें मी-तूं म्हणत असतांहि तो माझ्याशीं [illegible] जनार्दनाला ' एका ' या नांवाचें इतकें कौतुक आहे कीं, तो एकत्वानें अनेकांना प्रकाशितो. अनेक[illegible] प्रकटवितो. १६ जो नांवानें एक व भावनेनेंहि एक त्याचें देवाशीं सर्वदा ऐक्य अस[illegible] अनेक हें भिन्नत्व पहात नाहीं. १७ हें एकत्व जोंवर हातीं येत नाहीं, तोंवर देवाची

प्रसन्नता । एकत्वावांचूनि सर्वथा । अकर्तात्मता कळेना ॥ १८ ॥ जंव कर्तव्याचा अहंभावो । तंव सर्वथा न लभे देवो । अहंपाशीं बद्धतेसी ठावो । मुक्तता पहा हो तत्त्यागें ॥ १९ ॥ नामरूपें एकपण । हेंचि माझें अनुष्ठान । तेणें तुष्टला जनार्दन । माझें मीपण तो जाहला ॥ १०२० ॥ जेवीं बाहुल्यांचें खेळणें । तेथ रुसणें आणि संतोषणें । हें खेळवित्याचें करणें । बाहुली नेणे तो अर्थ ॥ २१ ॥ तेवीं माझेनि नांवें कविता । करून जनार्दन जाहला वक्ता । यालागीं हे ग्रंथकथा । साधुसंतां पढियंती ॥ २२ ॥ देहअहंता ग्रंथ करितां । एकही वोवी न ये हाता । येथ जनार्दन जाहला कर्ता । ग्रंथ ग्रंथार्था तेणें आला ॥ २३ ॥ देखोनि मराठी गोठी । न म्हणावी वृथा चावटी । पहावी निजबोधकसवटी । निजात्मदृष्टीं सज्जनीं ॥ २४ ॥ संस्कृत वंद्य प्राकृत निंद्य । हे बोल काय होती शुद्ध । हाही अभिमानवाद । अहंता अशुद्ध परमार्थी ॥ २५ ॥ मोलें भूमि खणितां वैरागरीं । अवचटें अनर्घ्यरत्न लाभे करीं । तें रत्न सांपडल्या केरीं । काय चतुरीं सांडावें ॥ २६ ॥ तेवीं संस्कृत आटाटी । सहसा परमार्थी नव्हे भेटी । तोचि जोडल्या मराठीसाठीं । तेथ घालिती मिठी सज्ञान ॥ २७ ॥ चकोरां चंद्रामृतप्राशन । वायसां पडे तेथ लंघन । तेवीं हा महाराष्ट्र ग्रंथ जाण । फळा फळपण ज्ञान अज्ञाना ॥ २८ ॥ देवासी नाहीं वाचाभिमान । संस्कृत त्या समान । ज्या वाणीं जाहलें ब्रह्मकथन । त्या भाषा श्रीकृष्ण संतोषे ॥२९॥ साजुक आणि सुकलीं । सुवर्णसुमनीं नाहीं चाली । तेवीं संस्कृत प्राकृत बोली । ब्रह्मकथनें आली समत्वा ॥ १०३० ॥ संस्कृत भाषा निंदा केली । तरी ते काय पावन जाहली । प्राकृत भाषाहरिकथा केली । ते वृथा गेली म्हणवेना ॥ ३१ ॥ जो जो भाषाअभिमान । तो तो वक्त्यासी बाधक पूर्ण । ज्या भाषा केलें ब्रह्मकथन । ते होय पावन हरिचरणीं ॥ ३२ ॥ माझी मराठी भाषा चोखडी । परब्रह्में

प्रसन्नता लाभत नाहीं. एकत्वावांचून अकर्तात्मता सर्वथा कळत नाहीं. १८ जोंवर कर्तव्याचा अहंभाव आहे, तोंवर देव सर्वथा लाभत नाहीं. अहंकारापाशीं बद्धतेची वस्ती असते, त्याच्या त्यागानें मुक्ति लाभते. १९ नाम-रूपानें एकपण हेंच माझें अनुष्ठान होय. त्यानें जनार्दन संतुष्ट झाला व त्यानें माझा मीपणा मद्रूप करून टाकिला. १०२० बाहुल्यांच्या खेळांत जसें रुसणें किंवा संतोषणें ही खेळविणारांची कल्पना असते, बाहुलीला त्याचा कांहीं अर्थ कळत नाहीं २१ त्याप्रमाणें जनार्दनानें माझ्या नांवें काव्य रचून तो स्वतः वक्ता झाला. त्यामुळें या ग्रंथांतील कथा साधु-संतांना फार आवडली. २२ मी देहाभिमानानें जर ग्रंथ केला असता तर एकहि ओवी साधली नसती. परंतु जनार्दन याचा कर्ता झाल्यामुळें या कथेला ग्रंथपणा आला. २३ सज्जनांनीं ही मराठी कथा पाहून 'ही व्यर्थ कांहींतरी बडबड आहे' असें मात्र म्हणूं नये. तर ती आत्मदृष्टीनें आत्मज्ञानाच्या कसोटीला लावून पहावी. २४ संस्कृत वंद्य आणि प्राकृत निंद्य हें बोलणें तरी शुद्ध आहे का! हेंहि अभिमानाचें बोलणें आहे. परमार्थांत अहंता सर्वथा अशुद्ध होय. २५ मोलानें माणसें लावून रत्नांची खाण खणीत असतां मोठ्या आयासांनीं अमूल्य रत्न हातीं आल्यास तें मात्र घ्यावें, आणि तेंच रत्न अकस्मात् केरांत सापडलें तर शहाण्या माणसांनीं काय टाकावें! २६ त्याप्रमाणें संस्कृताचा खटाटोप करूनहि जो परमार्थ सहज प्राप्त होत नाहीं, तोच मराठींत सांपडल्यास सज्ञान त्याच्यावर उड्याच टाकतील २७ चकोर जेथें चंद्रामृताचें प्राशन करितो तेथें कावळ्याला उपास घडतो, तसा हा महाराष्ट्र ग्रंथ आहे. त्याचें फल सज्ञानांना मात्र मिळतें व अज्ञानांना मिळत नाहीं, असें नाहीं. २८ देवाला कांहीं भाषेचा अभिमान नाहीं. त्याला प्राकृत-संस्कृत दोन्हीं समान आहेत. ज्या भाषेनें ब्रह्मकथन होतें त्या भाषेनेंच श्रीकृष्णाला संतोष होतो. २९ सोन्याच्या फुलांत ताजीं किंवा वाळलेलीं हा भेद जसा नसतो, त्याप्रमाणें संस्कृत प्राकृत कोठल्याहि भाषेनें ब्रह्मकथन सारखेंच असतें. १०३० संस्कृत भाषेंत निंदा केली तर तीहि पवित्र होते आणि प्राकृतांत हरिकथा केली तर ती वायां जाते, असें सर्वथा म्हणवत नाहीं. ३१ जेवढा भाषेचा अभिमान तेवढा वक्त्याला बाधक होतो. ज्या भाषेंत ब्रह्मकथन करावें, ती भाषाच हरिचरणीं पावन होते. ३२ माझी मराठी भाषा मोठी गोजिरवाणी आहे. ती परब्रह्मज्ञानानें उत्तम फळली आहे. तिची गोडी संत-सज्जन

फळली गाढी। संत सज्जन जाणती गोडी। त्यालागीं जोडी जोडिला ग्रंथ ॥ ३३ ॥ हे जनार्दनकवितावाडी। ब्रह्मरसें रसाळ गाढी। जे जनार्दनें लाविली गोडी। ते चवी न सोडी ग्रंथार्थ ॥ ३४ ॥ उद्धवव्याजें स्वयें श्रीकृष्ण। वदला पूर्ण ब्रह्मज्ञान। येणें छेदूनि भवबंधन। दीनजन तरावया ॥ ३५ ॥ तो हा एकादशाऐसा ग्रंथ। येथ ठाकठोक परमार्थ। येणें महाकवि समस्त। निजहितार्थ पावले ॥ ३६ ॥ पक्क फळीं शुक झेंपावे। तेथ मुंगीही रिगमू पावे। तेवीं महाकवींचीं वैभवें। मीही पावें प्राकृतें ॥ ३७ ॥ महारायाच्या ताटापाशीं। रिगमू नाहीं समर्थांसी। तेथें सुखेंसीं बैसे माशी। तेवीं हा आम्हांसी प्राकृत ग्रंथ ॥ ३८ ॥ भोजनीं धरोनि बापाचा हात। गोड तें आधीं बाळक खात। तेवीं महाकवींच्या अनुभवांत। प्राकृतें परमार्थ मीही लाभें ॥ ३९ ॥ मी लाभलों सद्गुरुवचन। तैसें हें चालिलें निरूपण। बाप कृपाळु जनार्दन। ग्रंथ संपूर्ण तेणें केला ॥ १०४० ॥ म्हणाल पूर्ण जाहला परमार्थ। पुढें आहे महाअनर्थ। तैसा नव्हे गुरुज्ञानार्थ। स्वयें कृष्णनाथ दावील ॥ ४१ ॥ माता पिता स्त्री पुत्र जन। जाति गोत सुहृद सज्जन। सकळ कुळासी येतां मरण। ममता श्रीकृष्ण कदा न धरी ॥ ४२ ॥ कृष्णआज्ञा काळ वंदी माथां। एवढी हातीं असतां सत्ता। तरी कुळरक्षणार्थ ममता। श्रीकृष्णनाथा असेना ॥ ४३ ॥ ज्यासी देहीं निरभिमानता। ज्यासी बाधीना काळाची ममता। ते देहींची निरहंकारता। श्रीकृष्ण आतां स्वांगें दावी ॥ ४४ ॥ तें ज्ञान-परिपाकनिर्वाण। अतिगोडीचें निरूपण। पुढिले दों अध्यायीं जाण। श्रीशुक आपण सांगेल ॥ ४५ ॥ तें ज्ञानगुह्य निजकथा। जनार्दनकृपा तत्त्वतां। एका जनार्दन वक्ता। अवधान श्रोतां मज द्यावें ॥ ४६ ॥ जेथ संत अवधान देती। ते कथा बोढवे परमार्थीं। एका जनार्दनीं विनंती। अवधान

जाणतात. म्हणूनच मीं हा मराठींत ग्रंथ केला. ३३ हा जनार्दनाचा कवितारूपी मळा आहे, तो ब्रह्मरसानें अति-रसाळ आहे. जनार्दनानें त्याची मला जी गोडी लावून दिली आहे, तिची चव हा ग्रंथार्थ सोडीत नाहीं. ३४ उद्धवाच्या निमित्तानें भवबंधाचा छेद करून दीन जनांचा उद्धार करण्यासाठीं श्रीकृष्णानें पूर्ण ब्रह्मज्ञान सांगितलें. ३५ तो हा एकादश स्कंधासारखा ग्रंथ, ज्यांत रोख-ठोक परमार्थ भरलेला आहे, त्यानें सगळे महाकवि आपला आत्मस्वार्थ साधून कृतार्थ झाले. ३६ ज्या पक्क झालेल्या फळावर राघू झेंपा टाकितो, (येथें शुकाचार्य असाहि लाक्षणिक अर्थ घेतां येईल) तेथें मुंगीचाहि प्रवेश होतो. त्याप्रमाणें महाकवींचें वैभव मींहि प्राकृत भाषेंत अनु-भविलें. ३७ सार्वभौम राजाच्या ताटापाशीं थोर थोर समर्थांचाहि प्रवेश होत नाहीं, पण तेथें माशी सहज जाऊन बसते. तसा हा आम्हांला प्राकृत ग्रंथ आहे. ३८ जेवते वेळीं लहान बालक आपल्या पित्याचा हात धरून अगोदर गोड पदार्थ खातो, त्याप्रमाणें महाकवींच्या अनुभवांत मींहि प्राकृत भाषेनें परमार्थाचा लाभ जोडिला. ३९ मला प्राप्त झालेल्या गुरुवचनानुसार मीं हें निरूपण चालविलें. जनार्दनस्वामी अत्यंत कृपाळु होऊन त्यानें हा ग्रंथ संपूर्ण केला. १०४० 'येथें परमार्थ संपला. आतां पुढें महा अनर्थ आहे' असें जर म्हणशील तर गुरुज्ञानाचा अर्थ तसा नाहीं. हें श्रीकृष्ण स्वतःच दाखवील. ४१ माता, पिता, स्त्री, पुत्रादि लोक, जाति, गोत्र, सुहृद, सज्जन या सर्वांसह सगळ्या कुळाला मरण आलें असतांहि श्रीकृष्ण मुळींच ममता धरीत नाहीं. ४२ श्रीकृष्णाची आज्ञा काळ शिरसा मान्य करितो. एवढी सत्ता हातीं असूनहि श्रीकृष्ण कुलाच्या संरक्षणासाठीं ममता दाखविणार नाहीं. ४३ ज्याचा देहावर अभिमान नसतो, त्याला काळाची ममता बाधत नाहीं. तो देहावरील निरहं-कार श्रीकृष्ण स्वतःच्या आचरणानें दाखवील. ४४ ज्ञानाचें परिपक्व फलच असें जें निर्याण, त्याचें अती सुरस गोड निरूपण श्रीशुक पुढील दोन अध्यायांनीं सांगेल. ४५ एका-जनार्दन वक्ता आहे. तरी श्रोत्यानें मजकडे अवधान

ग्रंथार्थीं मज द्यावें ॥ ४७ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे एकादशस्कंधे भगवदुद्धवसंवादे एकाकारटीकायां परमार्थप्राप्तिसुगमोपायकथनोद्धवबदरिकाश्रमप्रवेशो नाम एकोनत्रिंशोऽध्यायः ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

इति श्रीमद्भागवतमहापुराणे एकादशस्कन्धे एकोनविंशोऽध्यायः ॥ २८ ॥

अध्याय तिसावा.

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ जय जय सद्गुरु अनादी । जय जय सद्गुरु सर्वादी । जय जय सद्गुरु सर्वसिद्धी । जय जय कृपानिधि कृपाळुवा ॥ १ ॥ जय जय वेद्वाचका । जय जय वेदार्थप्रकाशका । जय जय वेदप्रतिपादका । जय जय वेदात्मका वेदाज्ञा ॥ २ ॥ जय जय विश्वप्रकाशका । जय जय विश्वप्रतिपाळका । जय जय विश्वनिवासका । अकर्तात्मका अव्यया ॥ ३ ॥ तुझी अव्यय अक्षर स्थिती । नाहीं नाम रूप वर्ण व्यक्ती । तो तूं नांदसी जातिगोतीं । लोकस्थितिव्यवहारें ॥ ४ ॥ तुज जगीं नाहीं दुसरें । तो तूं गृहस्थ घरदारें । तूं नपुंसक साचोकारें । कीं स्त्रीपुत्रें नांदसी ॥ ५ ॥ अज आणि वंदिसी पिता । अजन्मा तो नामिसी माता । जगीं तुझी सर्वसमता । शेखीं अरिमित्रता चाळिसी ॥ ६ ॥ तूं जगन्नाथ जगचाळक । केवीं एकाचा होसी सेवक । तूं परिपूर्ण पूर्णात्मक । कीं मागसी भीक रंकत्वें ॥ ७ ॥ तूं नैष्ठिक ब्रह्मचारी । कीं व्यभिचारें तारिसी नारी । तूं सर्वज्ञ गुरूच्या

ठेवावें . ४६ कारण जेथें संत अवधान देतात, ती कथा परमार्थांत प्रवेश करविते. म्हणून एका-जनार्दन विनवीत आहे कीं, माझ्या ग्रंथाच्या अर्थाकडे लक्ष द्यावें. १०४७.

इति श्रीमद्भागवतपुराणांतील एकादशस्कंधाचा परमहंससंहितेमधला श्रीधर-एकनाथविरचित टीकानुसार
विष्णुशर्मकृत सान्वयार्थ-भावार्थासह श्रीकृष्ण-उद्धव-संवादांतील परमार्थप्राप्तीचें सुगमउपाय-
कथन व बदरिकाश्रमप्रवेश या नांवाचा एकोणतिसावा अध्याय समाप्त झाला.

अनादि सद्गुरूचा जयजयकार असो. हे सर्वांच्या आदि, सर्वसिद्धि, कृपानिधि, दयासागर, सद्गुरो ! तुझा जयजयकार असो. १ हे वेदवक्त्या, वेदार्थ प्रकट करणाऱ्या, वेदाचा प्रतिपाल करणाऱ्या, वेदस्वरूप, वेद जाणणाऱ्या, २ विश्वाला प्रकाशित करणाऱ्या, विश्वाचें पालन करणाऱ्या, विश्वाच्या अंतरांत रहाणाऱ्या, अकर्त्या, अव्यय, जनार्दनरूप सद्गुरो ! तुझा जयजयकार असो. ३ तुझें स्वरूप अक्षर व अव्यय आहे. नाम-रूप-वर्ण-व्यक्तिरहित असा तूं नानाकुलगोत्रांतून लोकव्यवहाराप्रमाणें नांदत असतोस. ४ तुला जगांत दुसरें कोणी नाहीं. असा तूं गृहस्थरूपानें घर-दार करून रहातोस. तूं वास्तविक स्त्री व पुरुष या दोहोंच्या अतीत असूनहि स्त्री-पुत्रांमध्यें नांदत असतोस. ५ तूं जन्मरहित असून वसुदेव या पित्याला व मातेला वंदन करितोस. जगांत तुझी सर्वांशीं समता असूनहि तूं शत्रु-मित्र यांची निवड करितोस. ६ तूं जगन्नाथ जगाचा चालक असून एकाचाच सेवक कसा होतोस ! तूं परिपूर्ण पूर्णात्मक असून दरिद्री होऊन भीक कसा मागतोस ! ७ तूं नैष्ठिक ब्रह्मचारी असतां व्यभिचाराच्या मिषानें गोपिकांचा उद्धार कसा केलास ! तूं सर्वज्ञ असून सांदीपनी गुरुगृहीं गवताचे भारे व लांकडाचे भारे डोकीवरून वाहिलेस. ८ तूं जो कळिकाळाचा थरकांप करणारा, तो तूं बागुलबुवाच्या भीतीनें लपलास. तूं मायेचें निय-